अहवाल क्रमांक : १६८

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या परभणी जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

# बावीसावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक      जून, २०१९ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१९

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या परभणी जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

# बावीसावा अहवाल

## पंचायती राज समिती
## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(५) ॲड.राहुल कुल, वि.स.स.
(६) श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
(७) डॉ.देवराव होळी, वि.स.स.
(८) डॉ.सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
(९) डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स.
(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.
(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
(२२) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.
(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)
(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का)
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिती

**(सन २०१५-२०१६)**

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१४. ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.
१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री. अमित झनक, वि.स.स.
१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. **रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची “कार्यकारी समिती प्रमुख” म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त

# पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.

४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

६. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.

७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१४. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.

१५. ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.

१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

१७. श्री. अमित झनक, वि.स.स.

१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१९. श्री. सुरेश (भाऊ) लाड, वि.स.स.

२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

२१. श्री. पांडुरंग फुंडकर; वि.प.स.

२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.

२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)

(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा बावीसावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-०९ व सन २०११-१२ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-१८ साठी गठीत झालेल्या समितीने परभणी जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने परभणी जिल्हा परिषदेस दिनांक ८, ९ व १० नोव्हेंबर, २०१७ रोजी भेट देऊन श्री. प्रताप सवडे, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ व दिनांक ८ जानेवारी, २०१९ रोजी जिल्हा परिषद, परभणी संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, डॉ.प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग, श्री. चंद्रशेखर जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. र.प्र.आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. ला.रा.गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. म.सा.ठोंबरे, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्रीमती शुभांगी शेठ, सह सचिव, वित्त विभाग, श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. बाळासाहेब रासकर, उप सचिव, रोजगार हमी योजना विभाग, डॉ. प्रमोद शिंदे, उप सचिव, रोजगार हमी योजना विभाग, श्री. म.र.शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. किरण पाटील, उप सचिव, कृषी विभाग, श्री. सु.ल.टोपले, उप सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. चंद्रकांत मोटे, अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्री. विजयकुमार कलवले, सहाय्यक संचालक, मृद व जलसंधारण विभाग, श्रीमती इंद्रा मालो, आयुक्त, आयसीडीएस, महिला व बालकल्याण विभाग तसेच श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या परभणी जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०१९.

**सुधीर पारवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| १ | एक | वाहन खरेदीतील अनियमिततेबाबत (सन २००८-०९) | ३.४७/४१ | १ |
| २ | दोन | कार्यालयीन स्टेशनरी व संगणक साहित्याच्या खरेदीमधील अनियमिततेबाबत (सन (सन २००८-०९) | ३.४८/४१ | ६ |
| ३ | तीन | शालेय पाटी खरेदीतील अनियमितता (सन २००८-०९) | ३.१२६/८ | १२ |
| ४ | चार | ४ टक्के सादीलवार खर्चातील व शालेय पोषण आहार योजनेतील अनियमिततेबाबत (सन २००८-०९) | ३.१२८/७१ | १९ |
| ५ | पाच | परभणी जिल्हा परिषदेअंतर्गत रस्ते, भक्त निवास इत्यादी बांधकामातील अनियमिततेबाबत (सन २००८-०९) | ३.३०२ ते ३.३०८ | २७ |
| ६ | सहा | विशेष घटक योजने अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेच्या व साधी विहिर बांधकामातील अनियमिततेबाबत (सन २००८-०९) | ३.५६०/१० व ३.५६१/११ | ४९ |
| ७ | सात | शालांत परिक्षेत्तर शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना व अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांचे पाल्यांना शालांत पूर्व शिष्यवृत्ती देण्याच्या योजनेतील अनियमिततेबाबत (सन २००८-०९) | ३.८७६/३९१ व ३.८७७/३९१ | ६१ |
| ८ | आठ | पुरक पोषण आहार खरेदी व वाटपातील अनियमिततेबाबत (सन २००८-०९) | ३.९९७/१ | ७२ |
| ९ | नऊ | मागासवर्गीयांच्या घरावरील गवती छप्पराऐवजी टिनपत्रे पुरविणे या योजनेतील अनियमिततेबाबत (सन २००८-०९) | ४.२९१/०५ | ८१ |
| १० | दहा | संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण नसतांना वेतनवाढी दिल्यामुळे झालेल्या जादा प्रदानाबाबत (सन २०११-१२) | ३.१५२/०३ | ८६ |
| ११ | अकरा | ४३२ अंगणवाडी बांधकामाचे नियमबाह्य पध्दतीने वाटप केलेबाबत (सन २०११-१२) | ३.२८४/११ | ९२ |
| १२ | बारा | सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना निधी अंतर्गत स्मशानभूमी शेड व रस्ता बांधकामातील अनियमिततेबाबत (सन २०११-१२) | ३.२८९/३२ | १०३ |
| १३ | तेरा | लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणेबाबत (सन २००८-०९ व सन २०११-१२) | | १०८ |
| १४ | चौदा | सर्वसाधारण शिफारशी | | ११९ |
| | | **परिशिष्ट अ, ब**<br>**शासनाचे आदेश व परिपत्रके आणि**<br>**समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | | १२३ |

## प्रकरण एक

## जिल्हा परिषद, परभणी
## वाहन खरेदीतील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.४७/४१ (सन २००८-०९)**

पंचायत समिती जिंतुर व सेलूसाठी विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी जुनी वाहने निर्लेखित करुन नवीन जीप खरेदी करणेसाठी परवानगी दिल्यानुसार जिल्हा परिषदेने खरेदीची प्रक्रीया पार पाडली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) पंचायत समिती सेलु चोरीस गेलेले वाहन क्र. एम.एच.२२- ७६८१ वाहनाच्या दाव्याची रक्कम रु.६०,०००/- विमा संचालनालयाकडून प्राप्त करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

२) शासन निर्णय ग्राम विकास व जल संधारण विभाग निर्णय क्रमांक झेडपीए-२००८ प्रकरणे -५५ वित्त-९ दिनांक १५ जुलै २००८ च्या तळटीप नुसार प्रशासकीय मान्यतेची माहिती विषय समितीच्या पुढे ठेवली नाही.

३) विभागीय आयुक्तांचे पत्र क्र. ०७ दिनांक २६ डिसेंबर २००७ मधील अट क्र. ०३ नुसार पंचायत समिती जिंतुरचे जुने वाहन शासन निधीतील असल्यामुळे लिलावाव्दारे प्राप्त झालेली रक्कम शासन खात्यात जमा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाली नाही. सदरची रक्कम शासन खाती भरणा होणे आवश्यक आहे.

४) नविन वाहनाची गुणवत्ता तपासणी होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) गट विकास अधिकारी पंचायत समिती सेलू यांचे वाहन क्र. एम.एच. २२-७६८१ जे चोरीस गेले होते त्या वाहनाच्या दाव्याची रक्कम रु. ६०,०००/- विमा संचालनालयाकडून प्राप्त करून घेण्यात आली आहे. सदरील रक्कम दिनांक २६ फेब्रुवारी २००७ रोजी चलनाव्दारे शासन खाती (१५-संकीर्ण) भरणा करण्यात आलेली आहे.

२) स्थायी समिती सभा दिनांक २६ जून २००७ ठराव क्रमांक ०८ नुसार वाहन निर्लेखन आणि खरेदीस मान्यता प्रदान होती. तसेच जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक ०७ ऑगस्ट २००७ ठराव क्रमांक ४७ नुसार वाहन खरेदीस मान्यता देण्यात आली होती. त्यामुळे पुढील सभांमध्ये विषय ठेवण्याची आवश्यकता नसल्यामुळे विषय ठेवण्यात आला नाही.

३) पंचायत समिती जिंतुर साठी खरेदी करण्यात आलेले वाहन हे जिल्हा परिषद निधीतुन खरेदी करण्यात आले असल्याने त्या वाहनाच्या निर्लेखनाची रक्कम रु.३२,०००/- जिल्हा परिषद निधी मध्ये भरणा करण्यात आली .

४) वाहन खरेदी करणेसाठी जिल्हा परिषद कार्यालयास कोणत्या प्रकारचे वाहन तांत्रिकदृष्टया योग्य आहे, या बाबत उप अभियंता यांत्रिकी यांचे अभिप्राय संचिकेत घेण्यात आलेले आहे. तसेच नविन वाहन खरेदी केल्यानंतर उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडून गुणवत्ता तपासणी करुन वाहन नोंदणी करण्यात आली आहे. सोबत प्रत जोडली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, विभागीय आयुक्तांनी दिनांक २६ डिसेंबर, २००७ नुसार निर्लेखनास मान्यता दिलेली असताना जवळपास ५ वर्षे दीर्घ विलंबाने निर्लेखनाची कार्यवाही करण्यामागील प्रयोजन काय आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, स्थायी समिति सभेने दिनांक २६ जून, २००७ रोजी वाहन निर्लेखन व खरेदीस मान्यता दिली होती. तसेच, जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने दिनांक ७ ऑगस्ट, २०१७ रोजी मान्यता दिली होती.

यावर समितीने विचारणा केली की, स्थायी समिती व सर्वसाधारण सभेची मान्यता मिळाली असली तरी लेखा परिच्छेदातील आक्षेप हा ५ वर्षाच्या विलंबाबाबतचा आहे. तसेच निर्लेखनाबाबत जिल्हा परिषदेने आयुक्तांना पत्र कधी पाठविले होते व त्यास आयुक्तांनी मान्यता कधी दिली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेने दिनांक १६ ऑगस्ट, २००७ रोजी आयुक्तांना पत्र पाठविले होते व आयुक्तांनी दिनांक २६ डिसेंबर, २००७ ला मान्यता दिलेली आहे. तदनंतर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा परिषदेने उशिरा पत्र पाठविले व त्यामुळे ५ वर्षाचा विलंब झाला आहे. हा विलंब का झाला, आपण निर्लेखनाची कार्यवाही सन २००२ ला करावयास हवी होती. ती आपण सन २००६ मध्ये केली आहे. आपण निर्लेखनाची कार्यवाही वेळेत केली असती तर आक्षेप येण्याचे काही कारण नव्हते. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विलंबाची कारणे स्पष्ट करावीत. तसेच लेखा परिच्छेदामध्ये घेण्यात आलेल्या आक्षेपांचे निराकरण झालेले नाही.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, परिच्छेदातील आक्षेपांच्या अनुषंगाने सर्व माहिती संकलित करणे, त्याबाबतचा आढावा घेणे, ही मुख्य कार्यकारी अधिकारी यांची जबाबदारी आहे. कारण, त्यांचीच साक्ष घेण्यात येत आहे. निर्लेखनाच्या कार्यवाहीस विलंब का झाला, त्याबाबतची कारणे काय आहेत, प्रत्यक्ष वाहन विक्री कधी करण्यात आली, यास कोण अधिकारी जबाबदार आहेत, याबाबतचा कोणताही खुलासा समितीसमोर झालेला नाही. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भातील सर्व माहिती घ्यावी, जे अधिकारी यास जबाबदार असतील त्यांच्याविरुद्ध तात्काळ कारवाई करावी व त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करावा.

तसेच दुसरा आक्षेप असा आहे की, "जिल्हा परिषदेने प्रशासकीय मान्यतेची माहिती विषय समितीसमोर ठेवलेली नाही." या आक्षेपास जिल्हा परिषदेतर्फे असे उत्तर देण्यात आले आहे की, "स्थायी समिती सभेने दिनांक २६ जून, २००७ रोजी वाहन निर्लेखन व खरेदीस मान्यता दिली होती. तसेच, जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने दिनांक ७ ऑगस्ट, २०१७ रोजी मान्यता दिली होती. त्यामुळे पुढील सभांमध्ये विषय ठेवण्याची आवश्यकता नसल्यामुळे विषय ठेवण्यात आला नाही." हे उत्तर योग्य आहे का ?

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शासन निर्णय दिनांक १५ जुलै, २००८ नुसार स्थायी समिती व सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आली आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, दिनांक १५ जुलै, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार अधिकारांचे विकेंद्रीकरण करुन प्रशासकीय मान्यतेचे अधिकार ठरवून देण्यात आले आहेत. परंतु, याचा अर्थ असा नाही की, विषय समितीला अवगत करु नये. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, विषय समितीच्या ठरावानुसारच कार्यवाही करण्यात आली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, निर्लेखनास मान्यता देण्यात आली आहे. परंतु, प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर आपण समितीला अवगत केले का, प्रशासकीय मान्यता किती रकमेला देण्यात आली, अंदाजपत्रकीय किंमत किती आहे, याची कोणतीही माहिती विषय समितीला देण्यात आली नाही. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी नियोजनाला मान्यता घेतली आहे. परंतु, प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर ती बाब देखील विषय समितीपुढे आली पाहिजे. कारण, निर्लेखन किंवा नवीन वाहन खरेदी याबाबतच्या प्रस्तावामध्ये त्याच्या किमतीचा समावेश नसतो. तो उल्लेख प्रशासकीय मान्यतेच्या आदेशात असतो. त्यामुळे ती बाब विषय समितीपुढे आली पाहिजे. प्रशासकीय मान्यतेची बाब पुन्हा स्थायी समितीपुढे ठेवणे आवश्यक आहे, हे स्पष्ट झाले आहे. आता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केवळ याचा खुलासा करावा की, सक्षम प्राधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय मान्यतेची बाब स्थायी समितीपुढे ठेवली होती का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस नकारार्थी उत्तर दिले.

तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, समितीची बैठक सुरु होण्यापूर्वीच उप सचिवांनी नियमांची माहिती सभेला दिली आहे. समितीसमोर असत्य किंवा दिशाभूल करणारी माहिती देऊ नये, याची कल्पना अगोदरच देण्यात आली होती. पहिल्याच प्रश्नाला समाधानकारक उत्तर न मिळणे, ही बाब अतिशय गंभीर आहे. समितीने जिल्हा परिषदेला तयारी करण्यासाठी भरपूर वेळ दिला होता अशी नाराजी व्यक्त करुन समितीने विचारणा केली की, आक्षेप असा आहे की, प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर स्थायी समितीला अवगत करण्यात आले नाही. आपल्या अधिकारात आपण प्रशासकीय मान्यता दिली असली तरी ती बाब विषय समितीला समजलेली नाही. हा ठराव निर्लेखनाच्या मान्यतेचा आहे व ती माहिती स्थायी समितीला अवगत करणे गरजेचे होते.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शासन निर्णयामधील तळटिपेमध्ये स्टार देऊन असे नमूद केले आहे की, "या स्तरावर दिलेल्या मान्यतेची माहिती पुढील विषय समितीस/स्थायी समितीस, पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य राहील." या ठिकाणी आर्थिक अधिकार १ लाख, ५ लाख, १० लाख असे विभागून देण्यात आले आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, हे प्रशासकीय मान्यतेचे अधिकार आहेत. त्याबाबत समितीला काहीही म्हणावयाचे नाही. शासन निर्णयातील तळटिपेनुसार प्रशासकीय मान्यता त्या त्या स्तरावर दिल्यानंतर ती बाब स्थायी समितीला किंवा विषय समितीला अवगत करणे अनिवार्य आहे आणि ती कार्यवाही जिल्हा परिषदेने केलेली नाही. अधिकाऱ्यांकडून एखादी चूक झाली असेल किंवा त्याबाबतची परिपूर्ण माहिती नसेल तर तसे उत्तर दिले पाहिजे. विनाकारण अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचे काम मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या माध्यमातून होऊ नये. त्याऐवजी वस्तुस्थिती समितीसमोर आली पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी झालेली चुक आपल्या निदर्शनास आणून दिली आहे. ती आपल्याला मान्य आहे किंवा नाही, एवढे आपण आता सांगावे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होकारार्थी असे उत्तर दिले. यावर समितीने असे निदेश दिले की, या संदर्भात चौकशी करावी, संबधितांवर जबाबदारी निश्चित करावी व दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

वाहन निर्लेखनाची कार्यवाही सन २००२ मध्ये करणे अपेक्षित असतांना निर्लेखनाची कारवाई सन २००६ मध्ये करण्यात आल्या प्रकरणी समितीने निदेश दिल्यानुसार चौकशी करुन संबंधीतावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय. नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मा. पंचायती राज समिती जिल्हा परिषद, परभणी येथे दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकी संदर्भात प्राप्त कार्यवृत्ता नमुद केल्या प्रमाणे कार्यवाहीचा अहवाल.

प्रस्तुत परिच्छेदा मध्ये दोन वाहनाची स्थिती खालील प्रमाणे होती.

| अ.क्र. | विभागाचे नाव | पंचायत समितीचे नाव | वाहन क्र. कंपनीचे नाव | वाहन खरेदी दिनांक |
|---|---|---|---|---|
| १) | सामान्य प्रशासन विभाग | पंचायत समिती, सेलू | एम.एच.२२ ७६८१ महीन्द्रा अॅन्ड महीन्द्रा | ऑक्टोबर, १९९७ |
| २) | सामान्य प्रशासन विभाग | पंचायत समिती, जिंतूर | एम.एच.२२-अे ९४२३ महीन्द्रा अॅन्ड महीन्द्रा | दि.७ सप्टेंबर, १९९० |

शासन निर्णय ३१ ऑगस्ट, १९९९ नुसार, वाहनाचे आयुष्य हे; वाहनाने धावलेले अंतर (किमी) आणि वापरल्याचा कालावधी (वर्ष) यापैकी जे नंतर पुर्ण होईल ते असे आहे. त्यानुसार अनुक्रमांक ०२ वरिल वाहनाने धावलेल्या अंतराची अट पुर्ण करुन ते वाहन सन २००६ मध्ये निर्लेखनास पात्र झाले. तसेच अनुक्रमांक ०१ वरिल वाहन हे पण चोरीला गेल्यामुळे निर्लेखित करण्यात आले.

जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने वाहन निर्लेखनाकरिता दिनांक ०७ ऑगस्ट, २००७ रोजी मान्यता दिली. त्यानुसार जिल्हा परिषदेने वाहन निर्लेखनाकरिता दिनांक १६ ऑगस्ट, २००७ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद येथे निर्लेखनांचा प्रस्ताव सादर केला. विभागीय आयुक्त यांनी दिनांक २६ डिसेंबर, २००७ रोजी निर्लेखन प्रक्रियेला मान्यता दिली. त्यानुसार निर्लेखन करण्यात आले. जिल्हा परिषदेने खरेदीसाठी प्रशासकीय मान्यता घेऊन दिनांक १८ ऑगस्ट, २००८ रोजी या वाहनांच्या बदल्यात नविन वाहने खरेदी केले.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही झालेली आहे. निर्लेखन कार्यवाही मध्ये विलंब झालेला नाही.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :-** (पंरा-१) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ८ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, वाहन खरेदीमधील अनियमिततेबाबत २ वाहनांबद्दल आक्षेप आहे. पहिला आक्षेप पंचायत समिती सेलू आणि दुसरा आक्षेप पंचायत समिती जिंतूर येथील होता. सेलू येथील वाहनाची खरेदी माहे ऑक्टोबर, १९९७ मध्ये झाली होती आणि जिंतूर येथील वाहनाची खरेदी सन १९९९ मध्ये झाली होती. सन १९९९ च्या शासन निर्णयानुसार १० वर्षे जुना अथवा २.४ लाख किलोमीटर झाले असेल तर त्याप्रमाणे वाहनाचे निर्लेखन करावे. सेलू येथील सन १९९७ मधील वाहनाची सन २००५ मध्ये चोरी झाली होती. त्याबाबत एफआयआर करण्यात आला होता. तसेच जिंतूर येथील सन १९९९ चे वाहन चालू स्थितीत होते व त्याचे सन २००७ मध्ये निर्लेखन झाले. निर्लेखन करून नवीन वाहनाची खरेदी करण्यात आलेली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायत समिती जिंतूर व सेलूसाठी विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी जुनी वाहने निर्लेखित करुन नवीन जीप खरेदीसाठी परवानगी दिल्यानुसार परभणी जिल्हा परिषदेने खरेदीची प्रक्रिया पार पाडली. यासंदर्भात लेखापरीक्षकांनी पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविले आहेत. पंचायत समिती, सेलू येथील चोरीस गेलेल्या वाहनाच्या दाव्याची रक्कम रुपये ६०,०००/- विमा संचालनालयाकडून प्राप्त करुन शासनखाती जमा करणे आवश्यक आहे. ग्रामविकास विभागाच्या दिनांक १५ जुलै, २००८ **(परिशिष्ट क्र. १.१)** रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यतेची माहिती विषय समितीच्या पुढे ठेवली नाही. पंचायत समिती जिंतूरचे जुने वाहन शासन निधीतील असल्यामुळे लिलावाद्वारे प्राप्त झालेली रक्कम शासन खाती जमा करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. नवीन वाहनाची गुणवत्ता तपासणी होणे आवश्यक आहे.

उपरोक्त लेखा आक्षेपावर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी खुलाशाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, दिनांक १६ ऑगस्ट, २००७ रोजी जिल्हा परिषदेने विभागीय आयुक्तांना निर्लेखनाबाबतचे पत्र पाठविण्यात आले व तद्नंतर आयुक्तांनी दिनांक १६ डिसेंबर, २००७ रोजी मान्यता दिली. **वास्तविक पहाता जिल्हा परिषदेने वाहन निर्लेखनाची कार्यवाही सन २००२ या वर्षामध्ये करणे अभिप्रेत असताना ५ वर्षाच्या दीर्घ विलंबाने वाहन निर्लेखनाची कार्यवाही करण्यात आली. निर्लेखनाची कार्यवाही विहीत कालावधीत केली असती तर लेखा आक्षेप नोंदविला गेला नसता मात्र तसे झाल्याचे समितीस आढळून न आल्यामुळे समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. प्रस्तुत प्रकरणी विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

तसेच जिल्हा परिषदेने प्रशासकीय मान्यतेची माहिती विषय समितीसमोर ठेवलेली नाही. दिनांक १५ जुलै, २००८ रोजीच्या ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यतेची माहिती विषय समितीसमोर ठेवणे आवश्यक आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला सुरुवातीस स्थायी समिती व सर्वसाधारण सभेची मान्यता घेतल्याचे विदित केले. तद्नंतर प्रशासकीय मान्यतेची बाब स्थायी समितीपुढे ठेवली नसल्याचे नकारार्थी उत्तर दिले. त्यामुळे **समितीला असत्य व दिशाभूल करणारी माहिती देणे ही बाब अतिशय गंभीर व चिंताजनक आहे, त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.**

**अधिकाऱ्यांकडून एखादी चूक झाली असेल किंवा संबंधित बाबीची परिपूर्ण माहिती त्यावेळी त्यांच्याकडे उपलब्ध नसेल तर त्यांनी त्याप्रमाणे उत्तर दिले पाहिजे. मात्र विनाकारण त्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचे काम मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या माध्यमातून होणे समितीस अपेक्षित नाही. विचारणा केलेल्या बाबीची नेमकी वस्तुस्थिती समितीसमोर मांडण्यात आली पाहिजे जेणेकरून समितीस पारदर्शकपणे व निष्पक्षपातीपणे निर्णय घेणे सुकर होईल. सबब, याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी व दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, परभणी

## कार्यालयीन स्टेशनरी व संगणक साहित्याच्या खरेदीमधील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.४८/४१ (सन २००८-०९)**

कार्यालयीन स्टेशनरी व संगणक साहित्य खरेदीवर विभागाने रक्कम रुपये ९४,७६९/- खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रं.भाखस/१०८८/(२५१२) उद्योग-६ दिनांक १९ जुलै, १९९३ नुसार दरकरारा व्यतिरिक्त रु. १,०००/- ते रु.५०,०००/ पर्यंतची खरेदी मध्यवर्ती भांडार संघटनेच्या वैध नोंदणीकृत पुरवठादाराकडून दरपत्रके मागवून करणे आवश्यक असतांना तसे केल्याचे आढळून आले नाही.

२) वस्तुची आवश्यकता व वार्षिक मागणी विचारात घेऊन किफायतशीर पध्दतीने एकदाच खरेदी केली नाही. तसेच पुर्ण रक्कमेस सक्षम प्राधिकाऱ्याची प्रशासकिय व दरास मान्यता न घेता रुपये १०,०००/- च्या मर्यादेत तुकडे पाडून मंजुरी घेतली आहे.

३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ८३ (३) नुसार वस्तुचा दर्जा व गुणवत्तेबाबत तपासणी केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

४) लेखासंहीता नियम ७९ नुसार दुबार वापर होऊ नये म्हणुन प्रमाणके विरुपित करणे व प्रदानाची पोहोच घेणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) उद्योग उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्रं.भाखस/ १०८८/२५१२ उद्योग-६दि.१९ जुलै १९९३ नुसार दर करारा व्यतिरिक्त रु.१,०००/- ते ५०,०००/- पर्यंतची खरेदी मध्यवर्ती भांडार संघटनेच्या वैध नोंदणीकृत पुरवठा दाराकडून दरपत्रके मागवून करणे आवश्यक आहे. परंतू परभणी येथे मध्यवर्ती संघटनेचे नोंदणीकृत पुरवठादार निदर्शनास न आल्यामुळे शासन नियमानुसार आवश्यकतेनुसार दरपत्रके मागवून खरेदी करण्यात आलेली आहे.

२) खरेदी करण्यात आलेले साहित्य हे दैनंदिन वापरातील किरकोळ स्वरुपाचे असून साहित्याचा प्रकार हा वेगवेगळा आहे. सदरिल वेगवेगळया स्वरुपाचे साहित्य, उपलब्ध निधी व आवश्यकतेनुसार दरपत्रके मागवून खरेदी करण्यात आली आहे.

३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ८३ (३) या नियमानुसार वस्तुचा दर्जा व गुणवत्ता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) यांनी दर्जा व गुणवत्तेबाबत तपासणी करुन प्रमाणित केले आहे. सोबत प्रमाणपत्र अवलोकनार्थ सादर आहे.

४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता १९६८ चे नियम ७९ नुसार दुबार वापर होऊ नये यासाठी देयके विरुपित करणे आवश्यक आहे. परंतू देयके विरुपित केलेली नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. आक्षेपानंतर विरुपित करुन घेण्यात आलेले आहेत. दुबार वापर होणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली आहे. संबंधित पुरवठाधारकास रेखांकित धनादेश देण्यात आलेले आहेत. प्रदानाची खात्री करण्यात आलेली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेमधील सर्व विभाग व पंचायत समितीसाठी लागणारी लेखन सामग्रीची एकत्र मागणी करुन जाहीर निविदा मागवून खरेदी करण्यात येते का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नकारार्थी उत्तर दिले.

निविदा मागवून खरेदी केली जात नाही, हे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले. त्यामुळे संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई झाली पाहिजे. लेखी खुलाशामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, “खरेदी करण्यात आलेले साहित्य हे दैनंदिन वापरातील किरकोळ स्वरुपाचे असून साहित्याचा प्रकार हा वेगवेगळा आहे. सदरील वेगवेगळया स्वरुपाचे साहित्य, उपलब्ध निधी व आवश्यकतेनुसार दरपत्रके मागवून खरेदी करण्यात आली आहे.”

यावर समितीने विचारणा केली की, गेल्या दोन वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर अशा प्रकारे किरकोळ खरेदी कोणत्या वस्तुंची करण्यात आली, त्यासाठी किती खर्च करण्यात आला, त्याची तरतूद कोणत्या शीर्षामधून करण्यात आली व ही खरेदी दरपत्रकानुसारच करण्यात आली होती का, तसेच किरकोळ स्वरुपाच्या साहित्याची खरेदी करीत असताना निविदा मागविण्याची आवश्यकता नाही असे शासन निर्णयात नमूद केले आहे का, कोणते साहित्य खरेदी करण्यात आले आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, फाईल्स, स्टेपलर, टाचण्या वगैरे स्टेशनरीची खरेदी करण्यात आली आहे. तद्नंतर समितीने विचारणा केली की, खरेदीची एकूण रक्कम किती आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, रु.९४,७६९/- एवढ्या रकमेची खरेदी करण्यात आली आहे. जिल्हा परिषद आणि अन्य विभागांना वर्षभरात लागणाऱ्या स्टेशनरीची एकत्रित रक्कम साधारणपणे ७ ते १० लक्ष रुपयांची खरेदी असावी.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सर्वसाधारण सभेमध्ये जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प मंजूर केला जातो. त्यामध्ये सामान्य प्रशासन विभागामार्फत स्टेशनरीसाठी तरतूद केलेली असते. सर्व पंचायत समित्यांना लागणाऱ्या स्टेशनरीसाठी सामान्य प्रशासन विभागामार्फत अर्थसंकल्पात तरतूद केली जाते. ही तरतूद सर्व पंचायत समित्या, जिल्हा परिषदेचे सर्व विभाग यांच्याकडून मागणी नोंदवून घेऊन केली जाते. सर्वप्रथम ही मागणी अर्थ समितीपुढे ठेवली जाते व त्यानंतर सर्वसाधारण सभेमध्ये ठेऊन त्यास मंजुरी घेतली जाते. म्हणजे, सर्व पंचायत समित्यांची मागणी जिल्हा परिषदेकडे आलेली असते आणि गेल्या ३ वर्षांची सरासरी काढून अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येते. समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषेदने केवळ सामान्य प्रशासन विभागासाठी खरेदीची प्रक्रिया का केली. तसेच पूर्ण जिल्हयासाठी का केली नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, पंचायत समितीने करावयाचा खर्च पंचायत समितीकडे वर्ग केला जातो व जिल्हा परिषदेने करावयाचा खर्च जिल्हा परिषदेकडे असतो. याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजूरी घेतली जाते.

यावर समितीने विचारणा केली की, पंचायत समितीला थेट निधी वर्ग करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत काय, खात्यावर जो निधी जमा आहे तो जिल्हा परिषदेच्या मालकीचा आहे. जिल्हा परिषदेच्या ज्या विषय समित्यांनी व सर्वसाधारण सभेने जोपर्यंत पंचायत समितीला निधी देण्याबाबत मंजूरी देत नाही, तोपर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आदेश काढता येत नाही. कोषागारामधून पैसे आल्यावर बीडीएस प्रणालीद्वारे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या खात्यामध्ये जमा करता येतो, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे एवढेच काम आहे. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिकाराबाबत समितीला माहिती द्यावी.

यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, महाराष्ट्र जिल्हा परिषद अधिनियम, १९६१ मधील कलम ९४ मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये दिलेली आहेत. ९४-२-ल मध्ये म्हटले आहे की, जिल्हा निधीतून मुख्य कार्यकारी अधिकारी पैसे काढतील व त्याचे संवितरण करतील. यावर समितीने मत व्यक्त केले की, समित्यांची मान्यता असल्याशिवाय जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना खर्चाचे अधिकार नाहीत. कारण जिल्हा परिषदेच्या मालकीचा निधी असतो. ज्याप्रमाणे विधिमंडळाने अर्थसंकल्प मंजूर केल्याशिवाय शासनाला एक पैसाही खर्च करता येत नाही, हे देखील तसेच आहे. संवितरणचा चुकीचा अर्थ यांनी काढला आहे. येथे केलेली सर्व खरेदी जिल्हा परिषद कार्यालयासाठी केलेली आहे, कामाचे १०-१० हजार रुपयांचे तुकडे पाडले आहेत. वर्षभर किती स्टेशनरी लागणार आहे, याचा अंदाज असतो. जाहीर निविदा काढून ते खरेदी करु शकत होते. येथे नोंदणीकृत ठेकेदार आहेत, ही बाब जिल्हा परिषदेच्या लक्षात आलेली नाही. पण तुकडे करुन काम करण्याचा यांचा काय उद्देश आहे. दर करारानुसार निविदा न काढता तुकडे करुन ही खरेदी केली आहे, हे येथे स्पष्ट आहे. म्हणून हा लेखा आक्षेप आज खारीज न करता महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषदांतील स्टेशनरीचा जिल्हा परिषदेतील सर्व विभागांचा एकत्रित अंदाज घेऊन ही निविदा प्रक्रिया एकत्रितपणे पारदर्शीपणे पार पाडण्याकरिता ग्रामविकास विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात यावी.

याठिकाणी अनियमितता झाली आहे, ५० हजाराच्या पुढे निविदा बोलावून खरेदी करणे आवश्यक असताना तसे केले गेले नाही, हा आक्षेप लहान नाही. समित्यांना डावलून उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग यांनी काम केलेले आहे. त्यावेळी विषय सूचीवर हा विषय कधी ठेवला नसेल की, सामान्य प्रशासन विभागाकडून एवढा एवढा खर्च झाला व एवढी शिल्लक राहिली आहे. हे कोठेही आलेले नाही म्हणून ऑडीटरने हा आक्षेप घेतला आहे. पैसे वितरण करताना सर्व बाबी पाहिल्या पाहिजेत. या परिच्छेदामध्ये तीन क्रमांकाच्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ८३ (३) या नियमानुसार वस्तुचा दर्जा व गुणवत्ता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांनी दर्जा व गुणवत्तेबाबत तपासणी करुन प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. याचा अर्थ प्रमाणपत्र जोडले नव्हते. या तपासणीकरिता उपमुख्य कार्यकारी अधिकारी सक्षम आहे काय, किरकोळ खरेदी किंवा मोठी खरेदी हा विषय वेगळा आहे. पण याचे उत्तर देण्यात यावे. तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना बोलावण्यात यावे. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ८३ (३) नुसार वस्तुचा दर्जा व गुणवत्तेबाबतचा आक्षेपाबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांनी तपासणी केली आहे. नियम ८३ (३) मध्ये उल्लेख आहे की, प्रत्येक वस्तुचा दर्जा व गुणवत्ता यांच्या पडताळणीकरिता संबंधित विभागाध्यक्ष बारकाईने तपासणी करतील.

यावर समितीने विचारणा केली की, म्हणजे विभाग प्रमुखांनी चाचणीकरीता साहित्य पाठविले पाहिजे ही खाते प्रमुखांची जबाबदारी आहे. चाचणी अहवाल घेतल्याशिवाय कोणत्याही वस्तुचा वापर करायचा नाही असा अर्थ आहे.

आता या साहित्याची चाचणी केली होती का हा प्रश्न येथे उपस्थित होत आहे. महाराष्ट्रात सर्वत्र अशी पद्धत आहे की, दरपत्रक मागवून खरेदी केली जाते. यावर तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, तेव्हा सामान्य प्रशासन विभागाकडून याची खरेदी झालेली आहे.

समितीच्या निदर्शनास आले की, अर्थसंकल्पाला मंजूरी घेतली, ही मंजूरी घेताना सामान्य प्रशासन विभागाकडे जी तरतूद होती, त्याप्रमाणे पंचायत समितीची मागणी घेऊन रक्कमेची तरतूद करण्यात आली, खर्च करताना सामान्य प्रशासन विभागाने खरेदी केली व पंचायत समितीची मागणी घेऊन पैसे वितरीत केले. त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांमार्फत सांगितले असेल की, हा निधी पंचायत समितीला देण्यात यावा. जिल्हा परिषदेनने तो पैसा पंचायत समितीला दिला आहे. यावर समितीने विचारणा केली की, एखाद्या विषय समितीने जिल्हा परिषदेला शिफारस केली होती का, यावर तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा याबाबत प्रस्ताव आला होता. तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी अर्थसंकल्पाला मंजूरी दिलेली आहे. यावर समितीने विचारणा केली की, खर्च करण्यास मंजूरी दिलेली नव्हती. तुमच्याकडे स्थायी समितीचा ठराव आला होता का. खातेप्रमुखांनी निधी वर्ग करण्याचा आदेश दिल्यानंतर तुम्ही थेट पंचायत समितीला निधी वर्ग करुन घेतला आहेत. मोठया रकमेची आपण खरेदी केलेली आहे. तीन दरपत्रके बोलावले गेले. ३ कोटेशनद्वारे ५० हजार रकमेच्यावर खरेदी करता येत होती का त्यांना देयक कसे अदा केले आहे. जाहीर निविदा का प्रकाशित केली नाही. मुख्य लेखा व वित्त अधिकारी म्हणून निविदा प्रक्रियेत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची भूमिका महत्वाची आहे.

पुढे समितीने विचारणा केली की, तातडीची बाब म्हणून नियम ५४(२) मध्ये खरेदीचे अधिकार कोणाला आहेत. याबाबतचे अधिकार जिल्हा परिषद अध्यक्षांना असताना त्यांचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी का वापरले, त्या समितीची मंजूरी घेतली असती तर हा आक्षेप आला नसता. दरपत्रक मागवून खरेदी करण्याबाबतचा हा विषय आहे. विषय समितीची मंजूरी न घेता, या समितीस अवगत न करता हे झाले आहे, याबाबत अनियमिता झाली आहे. दरपत्रकामध्ये लेखन सामग्री, संगणक अशा बऱ्याच बाबी येतात. या निधीमध्ये मोठया प्रमाणावर अपहार होतो. यामुळे विषय समितीला अवगत करणे आवश्यक होते. जेवढया रकमेचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत, त्या व्यतिरिक्त समितीला अवगत न करता काही बाबी झाल्या आहेत. यामुळे मोठया प्रमाणावर अफरातफरीची प्रकरणे होतात. येथे ज्या ठिकाणी अनियमितता झाली असेल तेथे तात्काळ कार्यवाही करण्यात यावी व समितीला अहवाल पाठविण्यात यावा. निविदा न काढता खरेदी प्रक्रिया राबविल्यासंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

जिल्हा परिषदेमधील सर्व विभाग व पंचायत समितीसाठी लागणारी रु. ९४,७६९/- रक्कमेची स्टेशनरी व संगणक साहित्याची विषय समितीच्या मंजुरीविना जाहिर निविदा न काढता कार्यालयीन खरेदी करुन मोठया प्रमाणात अपहार झाल्या प्रकरणी समितीने निदेश दिल्या नुसार शासनाने चौकशी केली आहे काय, उक्त चौकशीत काय आढळून आले आहे, असल्यास त्यानुसार या प्रकरणी संबंधीताविरुद्ध कोणती कार्यवाही करण्यात आली, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

परिच्छेद क्रमांक ३.४८ (४१) कार्यालय स्टेशनरी व संगणंक साहित्याच्या खरेदी अनियमितता बाबत. खालील प्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

जिल्हा परिषदमधील सर्व विभाग व पंचायत समितीसाठी लागणारी स्टेशनरी व संगणक साहित्याची आणि किरकोळ स्वरुपाच्या साहित्याची खरेदी करित असताना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या कलम २ (१) नुसार रु १०,०००/- खर्च आकस्मिक खर्चाचे अधिकार कार्यालय प्रमुख यांना आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे कलम ८३ अन्वये स्थानिक बाजार पेठेतुन दर पत्रके मागवून खालील प्रमाणे साहित्य खरेदी करण्यात आले.

उदा. १) कॉम्प्युटर साठी लागणारे साहित्य, २) बस्ता कापड, ३) झेरॉक्स पेपर रिम, ४) पॉकेट, ५) टपाल पॅड, ६) प्रिटिंग प्रेस वरिल छपाई साहीत्य आवक /जावक रजिस्टर, फाईल कव्हर व ईतर लेखा विषय रजिस्टर, ७) पिना, स्टॅम्प पॅड व इतर किरकोळ साहित्य सन २००८-०९ या आर्थिक वर्षातील रक्कम रु.९४,७६९/- असून शाखा कर्मचाऱ्याच्या वेळोवेळीच्या मागणी नुसार खरेदी करण्यात आले.

मा. पंचायती राज समितीच्या बैठक मधील कार्यवृत्तांत नमुद केल्या नुसार स्टेशनरी खरीदी ही तुकडे पाडुन खरेदी केल्यामुळे या कार्यालयाचे पत्र जाक्र/जिप/ साप्रवि/भांडार/कावि/२१५/ २०१८ दि.१५ जून ०१८ अन्वये तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी तसेच कार्यासनाचे तत्कालिन कनिष्ठ सहाय्यक सा.प्र.वि. जिल्हा परिषद, परभणी यांना सदरील पत्रान्वये खुलासा मागविण्यात आला आहे व तो या सोबत जोडण्यात आला आहे. सदरील खरेदी मध्ये कोणत्याच प्रकारचा अपहार किंवा अनियमितता झाली नसून वेळोवेळीच्या मागणीनुसार खरेदी करण्यात आली आहे. दि. ०८ नोव्हेंबर २००७ परिच्छेद क्रं.३.४८ (४१) (सन २००८-९) पृष्ठ क्रमाक डी-१३ तेडी -१८ अन्वये खुलासा सादर करण्यात येत आहे. कृपया अनुपालन मान्य करावे, ही विनंती.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ८ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेमधील सर्व विभाग व पंचायत समितीसाठी लागणारी रु. ९४,७६९/- रक्कमेची स्टेशनरी व संगणक साहित्याची विषय समितीच्या मंजुरी विना जाहिर निविदा न काढता कार्यालयीन खरेदी करुन मोठया प्रमाणात अपहार झाल्या प्रकरणी समितीने निदेश दिल्या नुसार शासनाने चौकशी केली आहे काय, उक्त चौकशीत काय आढळुन आले आहे, असल्यास त्यानुसार या प्रकरणी यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, वर्षभरात मागणी वेगवेगळया वेळेला येते. वर्षभर खरेदी चालू रहाते. परंतु आपल्याला पैसे उशिरा प्राप्त होत असल्याने अंतिम रक्कम मार्च महिन्यामध्ये अदा करण्यात आली होती. ही खरेदी एकत्रित दिसल्यामुळे आक्षेप काढण्यात आला की, या खरेदीकरिता निविदा मागविण्यात आली नाही. परंतु प्रत्यक्षात वेगवेगळया वेळेला खरेदी करण्यात आली होती आणि अंतिम देयक मार्च महिन्यात देण्यात आले होते. यावर समितीने समाधान व्यक्त केले.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, परभणी अंतर्गत कार्यालयीन लेखन सामग्री व संगणक साहित्य खरेदीवर रुपये ९४,७६९/- एवढा खर्च केला आहे, याबाबत पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १९ जुलै, १९९३ रोजीच्या शासन निर्णयानुसार दर कराराव्यतिरिक्त रुपये १००० ते ५०,०००/- पर्यंतची खरेदी मध्यवर्ती भांडार संघटनेच्या वैध नोंदणीकृत पुरवठादाराकडून दरपत्रके मागवून करणे आवश्यक असताना तसे केल्याचे आढळून आले नाही. वस्तुची आवश्यकता व वार्षिक मागणी विचारात घेऊन किफायतशीरदाराने एकदाच खरेदी न करता १०,०००/- च्या मर्यादेत तुकडे पाडून मंजूरी घेतली आहे. वस्तुचा दर्जा व गुणवत्तेबाबत तपासणी केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असून लेखासंहिता नियम ७९ नुसार दुबार वापर होऊ नये म्हणून प्रमाणके विरुपित करणे व प्रदानाची पोहोच घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली असता साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, फाईल्स, स्टेपलर, टाचण्या इत्यादी किरकोळ स्वरुपाच्या स्टेशनरीची खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्याची आवश्यकता नाही. जिल्हा परिषद व अन्य विभागांना लागणाऱ्या स्टेशनरी खरेदीसाठी साधारणपणे ७ ते १० लाख रुपये एवढा खर्च होतो. पंचायत समित्यांनी करावयाचा खर्च पंचायत समितीकडे वर्ग केला जातो व जिल्हा परिषदेने करावयाचा खर्च जिल्हा परिषदेकडे असतो त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेतली जाते.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, विषय समित्यांची मान्यता असल्याशिवाय जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना खर्चाचे अधिकार नाहीत. ज्याप्रमाणे विधीमंडळाने अर्थसंकल्प मंजूर केल्याशिवाय शासनाला एक पैसाही खर्च करता येत नाही. त्याचप्रमाणे जिल्हा परिषद प्रशासनाला विषय समितीला अवगत करणे आवश्यक होते. जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाकडून स्टेशनरी खरेदीसाठी नेमका झालेला खर्च व नेमकी राहिलेली शिल्लक याबाबतचा उल्लेख कोठेही केल्याचे दिसून आले नाही. तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ८३ (३) नुसार वस्तुचा दर्जा व गुणवत्तेबाबत तपासणी करुन प्रमाणपत्र जोडलेले नाही.

जिल्हा परिषदेला वर्षभरात किती स्टेशनरी आवश्यक आहे त्यानुसार जिल्हा परिषदांतील सर्व विभागाचा एकत्रित अंदाज घेऊन ही निविदा प्रक्रिया एकत्रितपणे पारदर्शीपणे पार पाडून आवश्यक स्टेशनरी खरेदी करता आली असती. यासाठी नोंदणीकृत ठेकेदार आहेत, ही बाब जिल्हा परिषदेच्या लक्षात आलेली नाही. दर करारानुसार निविदा न काढता तुकडे करुन स्टेशनरी खरेदी करण्यात आली आहे हे या ठिकाणी स्पष्ट होते. त्यामुळे ग्रामविकास विभागाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये आवश्यक असणाऱ्या स्टेशनरी खरेदीबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन निकष तयार करण्यात यावेत अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.

याप्रकरणी समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता **मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी केलेल्या खुलाशानुसार लेखन सामग्रीची मागणी वेगवेगळ्या वेळेला येते त्यामुळे वर्षभर खरेदी चालू राहते. जिल्हा परिषदेला उशिराने रक्कम प्राप्त होत असल्याने अंतिम रक्कम माहे मार्च महिन्यामध्ये अदा करण्यात आली होती. ही खरेदी एकत्रित दिसल्यामुळे असा लेखा आक्षेप काढण्यात आला होता की, खरेदीकरीता निविदा मागविण्यात आली नाही. परंतु प्रत्यक्षात वेगवेगळ्या वेळेला खरेदी करण्यात आली होती आणि अंतिम देयक माहे मार्च महिन्यात देण्यात आले होते. यावर समिती समाधान व्यक्त करीत आहे.**

# प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, परभणी

## शालेय पाटी खरेदीतील अनियमितता

**परिच्छेद क्रमांक ३.१२६/८ (सन २००८-०९)**

शिक्षण विभागाने ४ टक्के सादिलवार अनुदानातून शालेय पाटी खरेदीसाठी रु.१२,३९,९६५/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग निर्णय क्र.झेडपीए-२००८/प्रक्र. ४४४/वित्त-९ दिनांक १५ जुलै, २००८ चे तळटिप-१ नुसार प्रशासकिय मान्यता तसेच तांत्रिक मंजुरीची माहिती पुढील समितीचे बैठकीत अवलोकनार्थ सादर केलेली नाही.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ८३(३) नुसार शालेय पाटी खरेदीपूर्वी दर्जा व गुणवत्तेची पडताळणी केलेली नाही.

३) गुणवत्ता तपासणीसाठी पाठविलेले साहित्य प्राप्त झालेल्या साहित्यामधूनच पाठविल्याचे संचिकेवरुन दिसून येत नाही.

४) गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती सेलू व मानवत यांचे प्रत्यक्ष मागणी पेक्षा जास्त नग शालेय पाटीचा पुरवठा केल्याचे दिसून आले.

५) लेखापरिक्षणात अर्धसमास पत्र क्र. २, दिनांक २७ जानेवारी, २००९ व अर्ध समास पत्र क्र. ४ दिनांक ३१ जानेवारी, २००९ नुसार मागणी करुनही गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती परभणी, पुर्णा, जिंतूर, गंगाखेड, पालम व सेलू यांचे कडील साठानोंद वही लेखा परिक्षणास उपलब्ध झालेला नाही. पंचायत समिती सेलू मागणी ४,९०० नग व पंचायत समिती मानवत यांची ४,१९२ असताना त्यांना प्रत्यक्षात पुरवठा अनुक्रमे ५,१०० नग व ४,३८९ नग झाला आहे. मागणी असताना कमी पुरवठा झालेल्या पंचायत समितीस त्या जादा पाट्या दिलेल्या नाहीत, यास्तव जादा पुरवठा २०० व १९७ असे एकूण ३९७ पाट्यांची रु. १९.५०/- प्रमाणे रु. ७,७४२/- वसुल करावेत.

६) गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती सोनपेठ, मानवत व पाथरी यांचे कडील साठा नोंदवही विहित नमुण्यात नाही. नोंदी दिनांकित नाही. वाटपाच्या नोंदी प्रमाणित केलेल्या नाहीत. शाळास्तरावरुन प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना शालेय पाटी वाटप केलेबाबतचे अभिलेखे लेखा परिक्षणास दर्शविलेले नाहीत.

७) मंजुर दरकरारानुसार दरामध्ये मुल्यवर्धीत करांचा समावेश आहे, पुरवठादाराकडून देयकाचे दोन टक्के दराने रुपये २४,७९९/- मुल्यवर्धित कर वसुल करुन शासन खाती भरणा केलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) गणवेश व लेखन साहित्य खरेदी अंतर्गत शालेय पाटी योजनेविषयी शिक्षण समिती बैठकीमध्ये ठराव क्रमांक ८७ दि.१२ ऑगस्ट, २००८ नुसार चर्चा होऊन कार्यवाही करणेस मान्यता झाली आहे. तसेच सदरिल योजनेकरिता एकत्रित तरतुद रु. ६२,००,०००/- असल्यामुळे जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्रमांक १७० दिनांक २५

सप्टेंबर, २००८ नुसार योजनेस महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२५ व १२६ प्रमाणे प्रशासकिय व खरेदीस मान्यता घेतलेली आहे. त्यामुळे पुढील समितीचे बैठकीत नमुद प्रशासकिय मान्यता/तांत्रिक मान्यता अवलोकनार्थ ठेवली नाही.

२) उदयोग संचालनालय मुंबई यांचे दिनांक ०४ जुलै, २००८ रोजीच्या दरकराराप्रमाणे शालेय पाटी खरेदी केलेली आहे. खरेदीपुर्वी दर्जा व गुणवत्ता पडताळणी विरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इंस्टिटयुट मुंबई (VJTI Mumbai ) या संस्थेकडून प्राप्त असून साहित्य खरेदीस योग्य दर्शविले आहे.

३) शालेय पाटी साहित्याची गुणवत्ता तपासणी विरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इंस्टिट्युट, मुंबई या द्वारे केलेली आहे. गुणवत्ता तपासणी करिता साहित्य पुरवठादार संस्थेकडून पाठविण्यात आले होते.

४) शालेय पाटी पुरवठा करताना पंचायत समिती सेलू यांना २०० पाटी व पंचायत समिती मानवत यांना १९७ पाटी मागणी पेक्षा जास्त पुरवठा झाला होता. या जादा पुरवठा केलेल्या शालेय पाट्यांची रक्कम चलन क्रमांक ३२ दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रु. ३,९००/- आणि चलन क्रमांक ३३, दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रु. ३,८४२/- या प्रमाणे एकूण रु.७,७४२/- शासन खाती भरणा केलेली आहे.

५) गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती परभणी, पुर्णा,जिंतूर,गंगाखेड, पालम व सेलू यांचे कडील साठा नोंदवही उपलब्ध असून त्यामध्ये प्राप्त साहित्याचा व वाटपाच्या नोंदी घेण्यात आल्या आहेत. शालेय पाटी पुरवठा करतांना पंचायत समिती सेलू यांना २०० आणि पंचायत समिती मानवत यांना १९७ पाटी मागणीपेक्षा जास्त पुरवठा झाला होता. या जादा पुरवठा केलेल्या शालेय पाटयांची रक्कम चालान क्रमांक ३२ दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रु.३,९००/- आणि चालान क्रमांक ३३ दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रु.३,८४२/- या प्रमाणे एकूण रु.७,७४२/- शासन खाती भरणा केलेली आहे.

६) गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती सोनपेठ, मानवत व पाथरी यांचेकडील साठा नोंदवही उपलब्ध असून साहित्य वाटपाच्या नोंदी नोंदवहीत घेण्यात आलेल्या आहेत. साठा नोंदवहीतील नोंदी विहित नमुन्यात ठेवण्यात आल्या आहेत. तथापि, नोंदी विहित पध्दतीने घेतलेल्या नव्हत्या, साठा नोंदवही अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

७) पुरवठादार संस्थेचे दर मुल्यवर्धीत करासह होते. पुरवठादाराचे देयकातून २ टक्के मुल्यवर्धीत कर रु.२४,७९९/- कपात केलेली नाही. तथापि, पुरवठादार संस्थेचे सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे कर निर्धारण झालेले असुन त्याचा अहवाल संस्थेकडून प्राप्त करुन घेतला आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखा परिक्षणाच्या वेळी प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मंजुरी आदेश उपलब्ध का करुन दिले नाहीत, पंचायत समिती सेलू व मानवत यांना जादा पाटी पुरवठा झाल्यामुळे इतर पंचायत समित्यांना त्यांच्या मागणीनुसार पुरवठा करण्यात आला आहे का, रक्कम रु.७७४२/- कोणाकडून वसूल करण्यात आली आहे, प्राप्त जादा पाटी पुरवठा संबंधित पुरवठाधारकास परत करण्यात आला आहे का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या संदर्भात प्रशासकीय मान्यता घेण्यात

आली होती. परंतु लेखा परीक्षणाच्या वेळी ती उपलब्ध करुन देण्यात आली नव्हती. तद्नंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, आता प्रशासकीय मान्यता उपलब्ध आहे.

यावर समितीने विचारणा केली की, लेखा परीक्षणाच्या वेळी प्रशासकीय मान्यता का दाखविण्यात आली नाही, तसेच सन २००८ मध्ये खरेदीकरिता प्रशासकीय मान्यता घेण्याचे अधिकार कोणाला होते, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, त्यावेळी तत्कालिन शिक्षण अधिकारी सर्वश्री इलहारे आणि पवार कार्यरत होते आता ते दोन्ही मयत झालेले आहेत. यावर समितीने पुढे विचारणा केली की, १० लाख रुपयांपेक्षा जास्त खरेदीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासकीय मान्यता देत असल्यामुळे यासंबंधी त्यांनी उत्तर देणे अपेक्षित आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, या संदर्भात दिनांक ५ ऑगस्ट, २००८ मध्ये सर्वसाधारण सभा घेऊन त्यात विषय क्रमांक ५ नुसार लेखन व साहित्य खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता घेण्यात आली होती. परंतु लेखा परीक्षणाच्या वेळी ती उपलब्ध करुन देण्यात आली नव्हती.

यावर समितीने निदर्शनास आणून दिले की, लेखी स्पष्टीकरणातील पृष्ठ क्रमांक ८ वर चौथ्या मुद्यामध्ये सन २००८-०९ मधील रक्कम दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी दोन चलनाद्वारे रक्कम रु.७,७४२/- शासन खाती भरणा केली आहे. पंचायती राज समिती येणार म्हणून ही रक्कम भरण्यात आली, अन्यथा ती भरण्यात आली नसती. सदर रक्कम कोणी भरणा केली आहे, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, ही रक्कम तत्कालिन गट शिक्षण अधिकारी यांच्याकडून भरुन घेतली. यावर समितीने पुढे विचारणा केली की, शिक्षणाधिकाऱ्यांना सन २००८ मध्ये झालेल्या गैरव्यवहारासंबंधी सन २०१७ मध्ये सदर रक्कम भरुन घेण्याचे अधिकार आहेत का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहीत नाही असे समितीस उत्तर दिले.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी खुलासा केला की, ज्यांना पुरवठा करण्यात आला होता त्यांच्याकडून लेखा परीक्षणानंतर ही रक्कम भरुन घेणे आवश्यक होते. तद्नंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, लेखा परीक्षणामध्ये आक्षेप घेण्यात आल्यामुळे सदर रक्कम शासन खाती भरुन घेण्याकरिता गटशिक्षणाधिकारी यांना पत्र दिले होते. त्यांच्याकडून ही रक्कम शासन खाती भरली आहे.

समितीने निदर्शनास आणून दिले की, लेखा परीक्षण झाल्यानंतर ३ वेळा संधी दिल्यानंतरही सदर रक्कम का भरण्यात आली नाही, लेखा परीक्षण झाल्यानंतर ३ वेळा संधी देऊन त्याची पूर्तता झाली नसल्यास तो आक्षेप पंचायती राज समितीसमोर येत असतो. सदर वसुली करण्यासाठी शिक्षणाधिकाऱ्यांनी पत्र दिले आहे. त्यांना पत्र देण्याचा अधिकार आहे का, सदर रक्कम भरुन घेण्यासाठी आपल्याला कोणी आदेश दिले होते, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, त्यासंबंधी लेखा परीक्षणामध्ये आक्षेप घेण्यात आला होता.

यानंतर समितीने निदेश दिले की, सदरहू रक्कम १० वर्षानंतर वसूल करीत असताना त्यासंबंधी व्याज आकारणी करणे आवश्यक होते. परंतु सदर रक्कम भरताना फक्त मुद्दल भरुन घेतली आहे. या संदर्भात सक्षम प्राधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक होते. तसेच मागणीपेक्षा जास्त पुरवठा करण्यात आल्यानंतर त्यासाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडून देयक अदा कसे करण्यात आले, यामुळे सदर बाबीकरिता मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुध्दा जबाबदार आहेत. ही रक्कम भरुन घेण्यासाठी शिक्षणाधिकाऱ्यांना कोणी सांगितले होते? तसेच पंचायती राज समितीसमोर आलेल्या आक्षेपांसंबंधी कार्यवाही करुन त्याबाबतची पुर्तता करण्याचे अधिकार कोणाला आहेत, यावर

संचालक स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी खुलासा केला की, समितीच्या बैठकीत एखाद्या मुद्यासंबंधी कार्यवाही करण्यासाठी सूचना दिल्यानंतर त्यासंबंधी लेखा परिक्षक म्हणून आम्ही कार्यवाही करु शकतो.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, परंतु यासंबंधी शिक्षणाधिकाऱ्यांनी परस्पर गट शिक्षणाधिकाऱ्यांना पत्र देऊन वसुलीची कार्यवाही केली आहे. तसेच मागील १ ते २ महिन्यांमध्ये अशाप्रकारे किती रक्कम भरुन घेतली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, अशा प्रकारची काही प्रकरणे आहेत. परंतु या मुद्यासंबंधी रक्कम रु.७७४२/- भरुन घेतलेली आहे.

तद्नंतर समितीने निदर्शनास आणून दिले की, पुढील पृष्ठावर सुध्दा अशा प्रकारच्या काही रक्कमा वसूल करुन शासन खाती जमा केलेल्या आहेत. आपण शिक्षण खात्याच्या प्रमुख आहात. आपल्याला पैसे भरुन घ्यावेत, असे कोणी सांगितले, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, गट शिक्षणाधिकाऱ्यांनी पैसे भरलेले आहेत.

यावर समितीने निदेश दिले की, शिक्षणाधिकाऱ्यांकडून व्याजासह संपूर्ण रक्कम वसूल करावयास पाहिजे. दहा लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या व्यवहाराचे अधिकार उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे आहेत. यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांची देखील चूक आहे. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून रक्कम वसूल करण्याबाबत माननीय समिती प्रमुखांनी निर्णय द्यावा. तसेच, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सुद्धा देयक केलेले आहे.

समिती परभणी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार असल्यामुळे पैसे भरुन घेण्यात आलेले आहेत. संबंधितांकडून पैसे भरुन घ्यावेत, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आदेश दिले असतील. मघाशी सन्माननीय सदस्य यांनी सांगितल्याप्रमाणे शालेय पाटी साहित्याचा जास्त पुरवठा करण्यात आलेला आहे. मग जास्त पाट्यांचा पुरवठा कशाच्या आधारे करण्यात आला, अधिकारी वर्ग, ठेकेदार आणि संबंधित एजन्सी यांनी हा प्रकार केलेला आहे. म्हणून या संदर्भात चौकशी झाली पाहिजे.

यानंतर समितीने पुढे आणखी विचारणा केली की, आक्षेप क्र.३ मध्ये नमूद केलेले आहे की, "गुणवत्ता तपासणीसाठी पाठविलेले साहित्य प्राप्त झालेल्या साहित्यामधूनच पाठविल्याचे संचिकेवरुन दिसून येत नाही." स्पष्टीकरणामध्ये असे नमूद केलेले आहे की, "शालेय पाटी साहित्याची गुणवत्ता तपासणी विरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजीकल इन्स्टिट्युट, मुंबई या संस्थेद्वारे केलेली आहे. गुणवत्ता तपासणीकरिता साहित्य पुरवठादार संस्थेकडून पाठविण्यात आले होते." लेखापरीक्षकांनी जो आक्षेप घेतलेला आहे तो बरोबर आहे. ज्यांनी १२ लाख रुपये अदा केले त्यांच्यावर कोणती कारवाई केलेली आहे, मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांनी सर्व बाबी तपासून देयके मंजूर करावयास पाहिजेत. जो माल प्राप्त झाला त्याची रजिस्टरमध्ये नोंद करुन स्वत: स्वाक्षरी करुन गोदामपाल यांची सुद्धा स्वाक्षरी घेतली पाहिजे. तसेच मालाची गुणवत्ता तपासण्यासाठी संबंधित ठेकेदार थेट संस्थेकडे जातो का अधिकारी संस्थेकडे जातात, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, मालाची गुणवत्ता तपासण्यासाठी अधिकारी संस्थेकडे जातात. मग ठेकेदार परस्पर मालाची गुणवत्ता तपासण्यासाठी संस्थेकडे कसा काय गेला, यामध्ये कोणाची चूक आहे, मालाची गुणवत्ता तपासण्यासाठी ठेकेदार संस्थेकडे जातो का अधिकारी संस्थेकडे जातात, यामध्ये चूक झालेली आहे. याचा अर्थ संबंधित अधिकाऱ्यांनी कामामध्ये कुचराई केलेली आहे, हा विषय शालेय पाटी साहित्य खरेदीमधील अनियमिततेचा आहे. संपूर्ण राज्याच्या दृष्टीने हा विषय महत्वाचा आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झालेली आहे. आपण या विषयावर १५-२० मिनिटांपासून चर्चा करीत आहोत. शिक्षण विभागामध्ये मोठ्या प्रमाणावर

अनियमितता आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी मालाची गुणवत्ता तपासून घ्यावयास पाहिजे. परंतु, ठेकेदार संस्थेकडे जाऊन गुणवत्ता प्रमाणपत्र आणतो, हे चुकीचे आहे. मालाची गुणवत्ता तपासून घेण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. यामध्ये पैशाची अफरातफर झालेली आहे. त्यावेळी दिलेले पैसे आता भरुन घेण्यात आलेले आहेत. हा प्रकार संगनमताने झालेला आहे. यामध्ये अनियमितता झालेली आहे. आपण ज्यांनी अनियमितता केली असेल त्यांच्यावर सेवा शर्ती नियमानुसार तात्काळ कारवाई करुन समितीला अहवाल सादर करावा. तसेच संबंधित ठेकेदाराचे नाव काळ्या यादीत टाकण्यात यावे. हा संपूर्ण राज्याचा विषय असल्यामुळे समिती या संदर्भात सचिवांची साक्ष घेईल.

तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, संबंधित ठेकेदाराचे नाव काय आहे यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जनहित सेवाभावी संस्था, औरंगाबाद या संस्थेने मालाचा पुरवठा केलेला आहे. यानंतर समितीने पुढे आणखी विचारणा केली की, आता जनहित सेवाभावी संस्था मालाचा पुरवठा करीत आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नाही असे उत्तर दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २००८ मध्ये शालेय पाटी खरेदीत झालेल्या गैरव्यवहारांसंबंधी सन २०१७ मध्ये ७,७४२/- रुपयांची रक्कम कोणतेही व्याज न आकारता संबंधीताकडून भरुन घेण्यात आलेली आहे. ही बाब गंभीर स्वरुपाची असल्याने या प्रकरणी संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शालेय पाटी खरेदी मध्ये जादा पाटी खरेदी मुळे शासनास झालेले भुर्दंडाची रक्कम रु.७,७४२/- दि. १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी शासन खाती भरणा केलेली आहे. तथापि, सदरील रक्कमेवर विलंबाबाबत व्याजाची आकारणी केलेली नसलेमुळे मा.पंचायती राज समिती बैठकीतील निर्देशा नुसार या संदर्भात तत्कालिन कार्यरत कर्मचारी याचेकडून पुरवठा आदेश टाईप करतांना झालेल्या चुकीमुळे जादा पाट्यांचा पुरवठा झालेला असलेमुळे संबंधित कर्मचारी यांना विलंबाने व्याजाची रक्कम भरणा करणे विषयी दि.२४ नोव्हेंबर, २०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस दिली होती. त्यानुसार आठ वर्षाचे कालावधीचे विलंबाची व्याजाची रक्कम रू. ४,९५४/- दिनांक १० मे २०१८ रोजी संबंधितांनी शासनखाती भरणा केली आहे. तत्कालिन कालावधीतील शिक्षणधिकारी मयत झालेले असून संबंधित कर्मचारीही सेवा निवृत झालेले आहेत.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, परभणी यांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शालेय पाटी खरेदी अनियमितते बाबतच्या मुद्दयासंदर्भात शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी समितीस खुलासा करावा. यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस खुलासा केला की, सन २००८-२००९ या वर्षी जिल्हा परिषदेमार्फत मुलांसाठी पाटी खरेदीसाठी वर्क ऑर्डर इश्यु

करण्यात आली होती. यामध्ये ६३ हजार ५८९ पाटयांची ऑर्डर देण्यात आली होती. परंतु गटांकडून जी मागणी संकलीत करण्यात आली होती, त्या मागणीपेक्षा ४०० जास्त पाटयांची ऑर्डर देण्यात आली होती. त्याची वसुली संबंधितांकडून करावी असा मुद्दा समितीने उपस्थित केला होता. अशा प्रकारे सन २०१७ मध्ये ७ हजार ७४२ रुपये रक्कम वसूल करण्यात आली. परंतु समितीने असे म्हटले होते की, विलंबाच्या रकमेवर व्याजदेखील वसूल करावे, त्याप्रमाणे आता ४९५४ रुपये व्याजदेखील वसुल करण्यात आलेले आहे. त्यामुळे आमची विनंती आहे की, हा मुद्दा वगळण्यात यावा.

यावर समितीने पुढे विचारणा केली की, या रकमेचा व्याजासह भरणा शासनाकडे केला आहे काय, यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी विदित केले की, होय, ज्या ४०० जादा पाटयांची ऑर्डर देण्यात आलेली आहे, त्या वाया गेलेल्या नाहीत, त्या पाटयांचा विद्यार्थ्यांकडून वापर करण्यात आलेला आहे. परंतु या रकमेची वसुली करण्यात आलेली आहे, तसेच व्याजाचीही वसुली करण्यात आलेली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

परभणी जिल्हा परिषदेअंतर्गत शिक्षण विभागाने ४ टक्के सादिलवार अनुदानातून शालेय पाटी खरेदीसाठी रुपये १२,३९,९६५/- एवढा खर्च नोंदविला आहे. याबाबत लेखापरिक्षकांनी घेतलेल्या लेखा आक्षेपामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, ग्रामविकास विभागाच्या दिनांक १५ जुलै, २००८ **(परिशिष्ट क्र. १.१)** रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता तसेच तांत्रिक मंजुरीची माहिती पुढील समितीचे बैठकीत अवलोकनार्थ सादर केलेली नाही. शालेय पाटी खरेदीपूर्वी दर्जा व गुणवत्तेची पडताळणी केलेली नाही. गुणवत्ता तपासणीसाठी पाठविलेले साहित्य प्राप्त झालेल्या साहित्यामधूनच पाठविल्याचे संचिकेवरुन दिसून येत नाही. पंचायत समिती, सेल व मानवत यांचे प्रत्यक्ष मागणीपेक्षा जास्त नग शालेय पाटीचा पुरवठा केल्याचे दिसून आले, मागणी करुनही गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, परभणी, पूर्णा, जिंतूर, गंगाखेड, पालम व सेलू यांचेकडील साठा नोंदवही लेखा परिक्षणास उपलब्ध झाले की नाही, पंचायत समिती सोनपेठ, मानवत व पाथरी यांचेकडील साठा नोंदवही विहित नमुन्यात नाही, नोंदी दिनांकित नाही, वाटपाच्या नोंदी प्रमाणित केलेल्या नाहीत, प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना शालेय पाटी वाटप केलेबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास दर्शविलेले नाहीत. पुरवठादाराकडून देयकाचे दोन टक्के दराने रुपये २४,७९९/- मूल्यवर्धित कर वसूल करुन शासन खाती भरणा केलेला नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, परभणी यांनी कळविलेल्या लेखी खुलाशाच्याआधारे समितीने दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, ग्रामविकास विभागाच्या दिनांक १५ जुलै, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार शालेय पाटी खरेदीसाठी प्रशासकीय मान्यता घेण्यात आली होती. परंतु लेखा परिक्षणाच्यावेळी ती उपलब्ध करुन देण्यात आली नव्हती. पंचायत समिती, सेलू यांना २०० पाटी व पंचायत समिती, मानवत यांना १९७ पाटी मागणीपेक्षा जास्त पुरवठा झाल्यामुळे जादा पुरवठा केलेल्या शालेय पाट्याची एकूण रक्कम रुपये ७,७४२/- दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी दोन चलनाद्वारे शासन खाती भरणा केली आहे व त्यावरील व्याज रुपये ४,९५४/- वसूल करण्यात आल्याचे विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले आहे. यावरुन असे दिसून येते की, पंचायती राज समिती परभणी जिल्हा परिषदेस भेट देणार असल्यामुळे तत्कालिन गट शिक्षणाधिकाऱ्यांकडून जादा पुरवठा केलेल्या शालेय पाट्याची रक्कम भरुन घेतली आहे. लेखापरिक्षण झाल्यानंतर ३ वेळा संधी दिल्यानंतरदेखील पूर्तता न झाल्यामुळे सदर लेखा आक्षेप समितीसमोर आला आहे. यासंदर्भात सक्षम प्राधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक होते. तसेच **मागणीपेक्षा जास्त पुरवठा करण्यात आल्यानंतर त्यासाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडून देयक अदा कसे**

**करण्यात आले, त्यामुळे यासाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुध्दा जबाबदार आहेत. यासंदर्भात शिक्षणाधिकाऱ्यांनी परस्पर गटशिक्षणाधिकारी यांना पत्र देऊन वसुलीची कार्यवाही केली आहे. पंचायत समिती, सेलू व मानवत या ठिकाणी शालेय पाटी साहित्याचा जास्त पुरवठा कशाच्या आधारे करण्यात आलेला आहे. याप्रकरणी संबंधित अधिकारी, ठेकेदार व संबंधित एजन्सी यांची चौकशी करण्यात यावी व सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यानुसार केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

तसेच शालेय पाटी साहित्याची गुणवत्ता तपासणी विरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजीकल इन्स्टिट्युट, मुंबई या संस्थेद्वारे केलेली आहे. सदर गुणवत्ता तपासणी करीता साहित्य पुरवठादार संस्थेकडून पाठविण्यात आले होते. शालेय पाटी खरेदीकरीता रुपये १२,३९,९६५/- एवढ्या खर्चाची देयके मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांनी मंजूर करीत असताना सर्व बाबी तपासून देयके मंजूर करणे आवश्यक होते. तसेच प्राप्त झालेल्या साहित्याची नोंदवहीत नोंद करुन गोदामपालाची स्वाक्षरी घेणे आवश्यक होते. **मालाची गुणवत्ता तपासण्यासाठी अधिकाऱ्यांनी संस्थेकडे जाण्याऐवजी संबंधित ठेकेदाराने संस्थेकडे जाऊन परस्पर मालाची गुणवत्ता तपासणी केली आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी कर्तव्याचे पालन केलेले दिसून येत नाही. यावरुन शालेय पाटी साहित्य खरेदीमध्ये अनियमितता झाल्याचे दिसून येत आहे. मालाची गुणवत्ता तपासून घेण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे, यामध्ये ज्यादा पुरवठा करण्यात आला त्यास वेगळी प्रशासकीय मान्यता न देता देयक अदा करण्यात आले. समितीच्या निदेशानुसार ज्यादा पुरवठा झाल्यामुळे संबंधिताकडून रक्कम वसूल करण्यात आली आहे. असे असले तरी प्रशासकीय अनियमितता झाली आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व चौकशीनुसार ज्या अधिकाऱ्यांनी अनियमितता केलेली असेल त्यांच्याविरुध्द सेवा शर्ती नियमानुसार तात्काळ कारवाई करावी. तसेच, संबंधित ठेकेदाराचे नाव काळया यादीत टाकण्यात यावे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करावा, अशी समितीची शिफारस आहे.**

# प्रकरण चार

## जिल्हा परिषद, परभणी

## ४ टक्के सादीलवार खर्चातील व शालेय पोषण आहार योजनेतील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.१२८/७१ (सन २००८-०९)**

पंचायत समिती पालमने ४ टक्के सादीलवार अनुदानातुन रु. ९०,६६६/- प्रदान खर्च नोंदविला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) सादिलवार अनुदान मुख्याध्यापक व अध्यक्ष, ग्रामशिक्षण समिती यांचे संयुक्त खात्यावर जमा केलेली नाही. अनुदानाची रक्कम मुख्याध्यापकाचे नावे रेखांकित नसलेल्या धनादेशाव्दारे देण्यात आली.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ५० (५) नुसार मुख्याध्यापक केंद्रीय प्राथमिक शाळा कन्या पालम यांनी धनादेश प्राप्त नोंदवही ठेवलेली नाही.

३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ९० नुसार नमुना नं. ३२ मधिल जंगम मालमत्ता नोंदवहीत व नियम ९१ नुसार नमुना नं. ३३ मधिल मालसंग्रह पुस्तकात साहित्याची नोंद विहित पद्धतीने घेतलेली नाही.

४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ५७ नुसार शाळा स्तरावर नमुना नं. ४ मधील विहित नमुन्यात किरकोळ रोखवही ठेवलेली नाही.

५) केंद्रीय प्राथमिक शाळा शेखराजुर अंतर्गत प्राथमिक शाळेकडील साठा नोंदवही दर्शविली नाही.

६) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ७९ नुसार उपप्रमाणके विरुपित केलेली नाहीत.

७) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग निर्णय क्र. पीआरई १०९४/७०४/(२) प्राशि-१/ दिनांक १४ नोव्हेंबर, १९९४ मधिल प्रपत्र अ मधिल १२४ बाबी पैकी साहित्य खरेदी करताना प्राधान्यक्रम निश्चित केलेला नाही. त्यास ग्रामशिक्षण समितीची मान्यता घेतलेली नाही.

८) सादिलवार खर्चासाठी अनुज्ञेय होणारी रक्कम शाळेच्या जून व डिसेंबर महिन्याच्या वेतन देयकामध्ये स्वंतत्र नमुद केलेली नाही.

९) महाराष्ट्र शासन उद्योग व उर्जा विभाग निर्णय क्र. भाखस /१०८८/उद्योग-६/ दिनांक ०२ जानेवारी, १९९२ नुसार रु. ५००/- पेक्षा कमी किमतीची साहित्य खरेदी मान्यता प्राप्त सहकारी भांडारातून केलेले नाही.

१०) केंद्र प्रमुख / शिक्षण विस्तार अधिकारी यांचे शाळा तपासणी बाबतचे अहवाल नोंदवहया दर्शविल्या नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) चार टक्के सादिलवार अनुदान हे माहे मार्च-२००९ अखेर वितरित केल्यामुळे आणि सादिलवार व शालेय साहित्य लवकर खरेदी करता यावे यासाठी रेखांकित नसलेले धनादेशादवारे अनुदान वितरित करण्यात आले आहे.

तथापि, सदरिल ४ टक्के अनुदानातुन शालेय साहित्य खरेदी करतांना ग्रामशिक्षण समितीचे मान्यतेने व ठरावानुसार शाळा करिता आवश्यक साहित्य खरेदी केलेले आहे.

२) तत्कालिन कालावधीत मुख्याध्यापक के.प्रा.शा.कन्या पालम यांनी धनादेश नोंदवही ठेवलेली नव्हती.

३) नमुना नं.३२ मध्ये जंगम मालमत्ता नोंदवही व नमुना नं.३३ मधिल मालसंग्रह पुस्तकात साहित्य नोंदी घेतलेल्या आहेत. तथापि सदरील नोंदी विहित पध्दतीने न घेता एकाच पानावर घेतलेल्या आहेत. खरेदी केलेला साठा हा स्टेशनरी साहित्य होते व ते दैनंदिन वापराचे होते. त्याचा शाळास्तरावर वापर केलेला आहे. साठा नोंदवही उपलब्ध आहेत.

४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ५७ नुसार शाळा स्तरावर नमुना नं.०४ मध्ये किरकोळ रोखवही ठेवण्यात आलेली आहे. नोंदवही सोबत अवलोकनार्थ सादर आहे.

५) केंद्रीय प्राथमिक शाळा शेखराजुर अंतर्गत प्रा.शा. वाडी (खु), खरबधानोरा, रहाटी, गुंज, भोगाव या प्राथमिक शाळेकडील साठा नोंद वही ठेवण्यात आलेली आहे.

नोंदवही सोबत अवलोकनार्थ सादर आहे.

६) लेखापरिक्षणाच्या वेळी उपप्रमाणके विरुपित केलेली नव्हती. अहवालातील आक्षेपाच्या अनुषंगाने उपप्रमाणके/ बिले विरुपित करण्यात आलेली आहेत. ती पुन:श्च वापरण्यात आलेली नाहीत.

७) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक १४ नोव्हेंबर १९९४ मधिल प्रपत्र अ मधिल १२४ बाबींपैकी साहित्य खरेदी ग्रामशिक्षण समितीच्या ठरावनुसार प्राधान्य क्रम निश्चित करुन केलेली आहे. शाळा करिता दैनंदिन वापराकरिता आवश्यक स्टेशनरी ग्रामशिक्षण समितीचे मान्यतेने खरेदी केलेली आहे.

८) सादिलवार खर्चासाठी अनुज्ञेय होणारी रक्कम शाळेच्या माहे जून व डिसेंबर महिन्याच्या वेतन देयकात स्वतंत्रपणे नमुद केलेली नव्हती. तथापि प्राप्त अनुदान माहे मार्च मध्ये पंचायत समितीला वितरित केल्यानंतर माहे मार्च अखेर शाळांना स्वतंत्रपणे देण्यात आलेले आहे.

९) महाराष्ट्र शासन उद्योग व उर्जा विभाग निर्णय क्रमांक भाखस/१०८८/उदयोग-६ दि.०२ जानेवारी, १९९२ नुसार रु.५००/- पेक्षा कमी किमतीचे सहित्य खरेदी मान्यता प्राप्त सहकारी भांडारातून करणे विषयी निर्देश आहेत. तथापि पालम तालूक्यात सहकारी ग्राहक भांडार नसल्यामुळे रु.५००/- पेक्षा कमी किमतीची केलेली साहित्य खरेदी स्थानिक बाजारपेठेतून केलेली आहे. प्राप्त झालेल्या साहित्याची खात्री करण्यात आलेली आहे.

१०) केंद्रप्रमुख/शिक्षण विस्तार अधिकारी यांचे शाळा भेटीचे वेळी शाळा स्तरावरिल भेट नोंदवहीत भेटीचे अनुषंगाने अभिप्राय नमुद केलेले आहेत. भेट नोंदवही अवलोकनासाठी उपलब्ध आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.१२९/८८ (सन २००८-०९) :-**

**शालेय पोषण आहार योजनेतील अनियमिततेबाबत.**

पंचायत समिती पाथरीने शालेय पोषण आहार योजनेवर रक्कम रु.१२,१५,४३६/- खर्च केलेला आहे याप्रमाणे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक शापोआ-१००२/१२७५/०२/प्राशि-४, दिनांक १६ मे, २००२ नुसार खाजगी शाळासह सर्व शाळामध्ये स्वंतत्र शिधापत्रिका ठेवलेल्या नाहीत. पुरवठा विभागाकडून निर्गमित झालेल्या तांदुळाबाबत ताळमेळ नाही.

२) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक शापोआ-१००२/१२७५/०२/प्राशि-४, दिनांक १६ मे, २००२ व शासन निर्णय शापोआ/२००३/३४१३/प्राशि-४, दिनांक ३ मार्च, २००३ नुसार शालेय पोषण योजनेसाठीचे अध्यक्ष व सचिव, शालेय शिक्षण समिती संयुक्त बँक खात्यावर जमा होणे आवश्यक असतांना, मुख्याध्यापकाने धनादेशाचे रोखीकरण करुन अतंर्गत शाळांना रोख वाटप केले आहे.

३) प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्रं.शापोआ/०५-०६/प्राशिस/३०२/९६६२, दिंनाक ९ ऑगस्ट, २००५ नुसार अन्न शिजवण्यासाठी देय असलेल्या अनुदाना पैकी ७५ टक्के खर्च हा पुरक पदार्थावर व २५ टक्के इंधन व मजुरीवर खर्च होणे आवश्यक आहे. तथापि सदरील खर्चाच्या पावत्या ठेवल्या नसल्यामुळे योग्य दर्जाचा व प्रथिनयुक्त आहार दिलेबाबत खात्री होत नाही.

४) शासन निर्णय क्रमांक शापोआ-२००४/(२४६/०४)/प्राशि-४, दिनांक ३१ मार्च, २००५ **(परिशिष्ट क्र. ४.२)** नुसार नियमित आहारासोबत आठवडयातुन किमान एकदा अंडी / केळी इ.प्रकारच्या पुरक आहार देणे बंधनकारक असताना असा आहार दिलेला नाही.

५) गणितीय परिगणना चुकीची केल्यामुळे एकूण रुपये ३,७८५ /- चे जादा प्रदान झाले आहे, जादा प्रदानाची रक्कम संबधीत शाळेकडून वसूल करुन शासन खाती जमा करावी.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) शालेय पोषण आहार योजने अंतर्गत पात्र शाळेची यादी तहसिल कार्यालय पुरवठा विभागास देण्यात येत होती. तहसिल कार्यालयाकडून गावातील स्वस्त धान्य दुकानामार्फत शाळेला तांदुळ पुरवठा केला जात होता. शाळेला पांढऱ्या शिधा पत्रिका देण्यात आलेल्या होत्या. तथापि, शिधापत्रिकेत दुकानदार नोंदी करीत नव्हते. तांदुळ पुरवठा केल्यानंतर ते स्वतंत्र पोहोच पावती देत होते. त्यानुसार शाळेला प्राप्त तांदूळ आणि शिजवलेला तांदूळ याचा ताळमेळ घेण्यात आलेला आहे. तसेच तहसिल कार्यालयाकडे दरमहा अहवाल पुढील महिन्याची मागणी करण्यात येत होती.

२) लेखा आक्षेपात नमुद केलेले केंद्रांतर्गत शाळांचे संयुक्त खाते उघडण्याची कार्यवाही पुर्ण न झाल्यामुळे अन्न शिजविण्याचे धनादेश मुख्याध्यापक केंद्रीय प्राथमिक शाळा यांच्या नावे देण्यात येऊन त्यांच्या अंतर्गत शाळेला रक्कम वितरित केलेली आहे. त्यांचे वितरण संबंधित शाळेच्या अन्न शिजविणाऱ्या यंत्रणेस रक्कम वाटप केलेली आहे.

३) आक्षेपात नमुद केले नुसार ग्रामशिक्षण समिती व मुख्याध्यापक यांच्या नियंत्रणाखाली शाळास्तरावर अन्न शिजविणाऱ्या यंत्रणा देत असलेल्या विविध प्रकारच्या आहाराच्या नोंदी चव नोंदवहीत घेण्यात आलेल्या आहेत. त्यावरुन योग्य दर्जाचा प्रथिनेयुक्त आवश्यक पुरक पोषण आहार विदयार्थ्यांना दिलेला आहे. तसेच ७५% रक्कम पुरक आहारावर व २५% रक्कम इंधन भाजीपाल्यावर खर्च झाल्याचे दिसुन येते.

४) आक्षेपात नमुद केल्याप्रमाणे शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत शाळेवर आठवडयातून नियमित आहारासोबत एकदा पुरक पोषण आहार देण्यात येत होता. त्यामध्ये केळी, बिस्किटे, गुळ-शेंगदाने, चिक्की ई. पदार्थ दिले जात होते. त्यांच्या नोंदी चव रजिस्टर मध्ये आहेत.

५) आक्षेपात नमुद केलेल्या शाळेची गणितीय परिगणना चुकीची झाल्यामुळे झालेल्या अतिप्रदानाची एकूण रक्कम रु.३,७८५/- वसूल करुन ती चलनदवारे शासनखाती भरणा केलेली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, नियमबाह्य अरेखांकित धानादेश देण्याचे प्रयोजन काय, अरेखांकीत धनादेशाच्या रकमेतून कोणकोणते साहित्य खरेदी करण्यात आले, त्याच्या नोंदी साठा नोंदवहीमध्ये घेण्यात आल्या आहेत काय, तसेच मुख्याध्यापक व व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने बँकेत संयुक्त खाते उघडावयास पाहिजे होते. मुख्याध्यापकांनी परस्पर आपल्या खात्यात पैसे जमा केले असा आक्षेप आहे. लेखा आक्षेपामध्ये नमूद केलेले आहे की, "सादिलवार अनुदान मुख्याध्यापक व अध्यक्ष, ग्रामशिक्षण समिती यांचे संयुक्त खात्यावर जमा केलेले नाही. अनुदानाची रक्कम मुख्याध्यापकाचे नावे रेखांकित नसलेल्या धनादेशाद्वारे देण्यात आली." समितीला जळगांव दौऱ्याच्या वेळी एका शाळेमध्ये असाच प्रकार आढळून आला होता. शिक्षणाधिकाऱ्यांनी समितीला चुकीचे लेखी उत्तर दिलेले आहे, हे उत्तर सांविधानिक नाही. असे उत्तर देऊन समितीची दिशाभूल केलेली आहे, शिक्षणाधिकाऱ्यांनी या आक्षेपाला लेखी उत्तर देताना समितीची दिशाभूल केलेली आहे. मुख्याध्यापक ग्रामशिक्षण समितीच्या अध्यक्षांची स्वाक्षरी न घेता व्यवहार करीत आहेत. मग केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी काय करतात, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, त्यांनी खात्यावर पैसे जमा केलेले नाहीत.

यावर समितीने विचारणा केली की, मुख्याध्यापक आणि ग्रामशिक्षण समितीचे अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने व्यवहार का झाला नाही, आक्षेपामध्ये नमूद केलेले आहे की, "केंद्र प्रमुख/शिक्षण विस्तार अधिकारी यांचे शाळा तपासणी बाबतचे अहवाल, नोंदवह्या दर्शविण्यात आल्या नाहीत." स्पष्टीकरणामध्ये नमूद केलेले आहे की, "केंद्र प्रमुख/शिक्षण विस्तार अधिकारी यांचे शाळा भेटीचे वेळी शाळा स्तरावरील भेट नोंदवहीत भेटीचे अनुषंगाने अभिप्राय नमूद केलेले आहेत. भेट नोंदवही अवलोकनासाठी उपलब्ध आहे." तीन वेळा संधी देऊन देखील आक्षेपावर स्पष्ट खुलासा केलेला नाही. समितीला नोंदवह्या दाखवाव्यात त्यांच्याकडून तत्कालिन केंद्र प्रमुख व विस्तार अधिकाऱ्यांची नावे घेऊ.

तसेच ग्रामशिक्षण समिती बरोबर संयुक्त खाते उघडण्यात आलेले नाही, असे त्यांनी भेटीच्या वेळी का नमूद केले नाही, म्हणून केंद्र प्रमुखावर सुद्धा जबाबदारी निश्चित केली पाहिजे. यांसंदर्भात मुख्याध्यापकांची सुद्धा साक्ष घेतली पाहिजे. अहवालातील पृष्ठ क्र.११ ते १८ वरील मुद्दे शिक्षण विभागाशी संबंधित आहेत. समितीने हे सर्व मुद्दे साक्षीसाठी व कारवाईसाठी घ्यावेत.

तद्नंतर समितीने पुढे आणखी विचारणा केली की, जिल्हा परिषदेने सन २००८-०९ मधील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात पृष्ठ क्र.१८ वरील स्पष्टीकणामध्ये नमूद केलेले आहे की, "आक्षेपात नमूद केलेल्या शाळेची गणितीय परिगणना चुकीची झाल्यामुळे झालेल्या अतिप्रदानाची एकूण रक्कम रु.३,७८५/- वसूल करुन ती चलनाद्वारे शासनखाती भरणा केलेली आहे." मग कोणाच्या आदेशानुसार पैसे भरुन घेण्यात आले आणि कोणत्या तारखेला पैसे भरलेले आहेत, तसेच पृष्ठ क्र.१५ वरील अ.क्र.१० च्या स्पष्टीकरणामध्ये नमूद केलेले आहे की, "केंद्र प्रमुख/शिक्षण विस्तार अधिकारी यांचे शाळा भेटीचे वेळी शाळा स्तरावरील भेट नोंदवहीत भेटीचे अनुषंगाने अभिप्राय नमूद केलेले आहेत. भेट नोंदवही अवलोकनासाठी उपलब्ध आहे." समितीला केंद्र प्रमुख व विस्तार अधिकारी (शिक्षण) यांचे दैनिक टाचण दर्शविण्यात यावे. यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, केंद्र प्रमुख व विस्तार अधिकाऱ्यांचे दैनिक टाचण मागवून घेण्यात येईल.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, गावातील स्वस्त धान्य दुकानांमार्फत शाळेला तांदुळ पुरवठा केला जात होता व त्यासाठी शाळांना पांढऱ्या शिधापत्रिका देण्यात आल्या होत्या. परंतु, त्या शिधापत्रिकेमध्ये दुकानदार नोंदी करीत नव्हते, असे खुलाशात नमूद केले आहे. वास्तविक पाहता, दुकानदारांनी शिधापत्रिकेमध्ये नोंद घेणे गरजेचे होते. दुकानदारांनी नोंद न करण्याचे कारण काय आहे, याबाबतची चौकशी जिल्हा परिषदेने लेखा परिच्छेद आल्यानंतर केली आहे का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शिधापत्रिकेत जरी नोंद केली नसली तरी धान्य पुरवठा केल्याबाबतची स्वतंत्र पोच देण्यात येत होती.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, स्वस्त धान्य वितरणाबाबतच्या नियमानुसार दुकानदारांनी प्रत्येक पुरवठ्याची नोंद शिधापत्रिकेत केली पाहिजे. या प्रकरणी तशा नोंदी घेण्यात आल्या नाहीत व त्यामुळे यामध्ये काही तरी घोळ आहे, असा संशय घेण्यास पुरेसा वाव आहे. या प्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात यावी. तसेच अधिकाऱ्यांनी केलेला खुलासा, जिल्हा परिषदेने केलेली कार्यवाही नियमानुसार नसल्यामुळे व समितीचे समाधान होत नसल्यामुळे प्रत्येक मुद्याबाबत कारवाईच्या सूचना समितीतर्फे देण्यात येत आहेत.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी खुलासा केला की, लेखा परिच्छेद व त्याअनुषंगाने जिल्हा परिषदेने केलेली कार्यवाही समितीसमोर आहे. आजच्या बैठकीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली जात आहे व त्यांना अधिक खुलासा करण्याची किंवा समितीचे समाधान करण्याची संधी दिली जात आहे. त्यानंतरही जर समितीचे समाधान झाले नाही तर समितीच्या वतीने माननीय समिती प्रमुख त्या मुद्याबाबत निर्णय देतील. निर्णयाला अनुसरुन आता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कारवाई करावयाची असून त्याचा अहवाल समितीला सादर करावयाचा आहे. त्यानंतरही जे मुद्दे निकाली निघणार नाहीत त्याबाबत विभागीय सचिवांची साक्ष होईल.

यावर समितीने निदेश दिले की, समितीच्या सन्माननीय सदस्यांकडून उपस्थित केल्या जाणाऱ्या मुद्यांबाबत समाधानकारक उत्तरे मिळालेली नाहीत. स्वस्त धान्य दुकानदारांकडून शिधापत्रिकेत पुरवठ्याची नोंद घेणे अभिप्रेत असताना तशी नोंद घेण्यात आली नाही. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या स्तरावर चौकशी करावी, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करावा. तसेच दुसरी बाब ही आहे की, शालेय पोषण आहाराबाबतच्या अनियमितता सर्व राज्यभर होत आहेत. त्यामुळे या विषयाबाबत विभागीय सचिवांची साक्षही आयोजित करण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

स्वस्त धान्य वितरणाबाबतच्या नियमानुसार दुकानदारांनी प्रत्येक पुरवठ्याची नोंद शिधापत्रिकेत घेणे आवश्यक असतांना तशी नोंद घेण्यात आली नाही, याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीने निदेश दिल्यानुसार चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले, असल्यास याप्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र. शापोआ १०००/प्र.क्र. ३६९/नापु. १७, दि. १५ मे २००२ नुसार रास्त भाव दुकानदाकडून शाळास्तरावर पटसंख्येनुसार शालेय पोषण आहार पात्र विद्यार्थ्यांना ८० टक्के उपस्थितीच्या आधारे प्रति विद्यार्थी ३ किलो तांदुळ याप्रमाणे वाटप केले जात होते.

मा. पंचायत राज समितीचे निर्देशानुसार स्वस्त धान्य दुकानदारांनी प्रत्येक पुरवठ्याची नोंद शिधापत्रिकेत घेणे आवश्यक असताना तशी नोंद घेण्यात आली नाही. याविषयी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दि.१७ एप्रिल २०१८ रोजीचे आदेशाप्रमाणे श्री. गोरे बी.टी ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा प्रभारी अधिक्षक, शालेय पोषण आहार यांनी चौकशी करुन दिनांक ११ मे २०१८ रोजी अहवाल सादर केला आहे.

चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार सन २००८-०९ मध्ये रास्त भाव दुकानदाराकडून शाळेला तांदुळ पुरवठा करण्यात आला होता. यामध्ये रास्त भाव दुकानदार यांच्याकडून शिधापत्रिकेवर नोंदी घेतल्या गेलेल्या नाहीत. शिधापत्रिकेवर नोंदी घेण्याचे काम स्वस्त धान्य दुकानदारानी करणे आवश्यक होते. परंतु त्याऐवजी रास्त भाव दुकानदारांनी तहसिल कार्यालयाकडून प्राप्त झालेली पावती पुस्तकातील पोहच पावती वर तांदुळ प्राप्त झाल्याची मुख्याध्यापकाची सही शिक्यानिशी नोंद घेवून स्वस्त धान्य दुकानदार यांनी त्यांची सही करुन सदरच्या पावत्या मुख्याध्यापक यांना दिलेल्या आहेत.

सदरच्या पावत्या संबंधित शाळास्तरावर उपलब्ध आहेत. सदरच्या पावत्यानुसार शालेय पोषण आहार नोंदवही वर प्राप्त तांदुळाच्या नोंदी केलेल्या आहेत असे चौकशीमध्ये आढळून आले. त्याप्रमाणे नोंदवही व पावत्यावरुन तांदळाचा हिशोब व ताळमेळ ठेवण्यात येत होता. नमुना पावत्या, तांदुळ ताळमेळ हिशोब वही शाळास्तरावर उपलब्ध असून वाटप रजिस्टर, साठा नोंदवही, रास्त भाव दुकानदाराच्या पावत्या हे सर्व अभिलेखे तपासले असता सर्व बरोबर असल्याचे आढळले. यामध्ये कसल्याही प्रकारचा अपहार झालेला नसून केवळ रास्त भाव दुकानदारांनी शिधापत्रिकेवर नोंदी घेणे ऐवजी तहसिल कार्यालयाकडून प्राप्त पावती पुस्तकातील, पावत्यावर नोंदी घेवून सही करुन दिलेले आहेत. त्यानुसार सर्व तांदुळाचा ताळमेळ जुळत असल्याचे आढळून आले. त्यामुळे यामध्ये आर्थिक अनियमितता झालेली नसल्याचे चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार स्पष्ट होते.

त्यानुसार यामध्ये कोणतीही आर्थिक अनियमितता व अपहार नसलेमुळे परिच्छेद वगळण्याची विनंती करण्यात येते.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, परभणी यांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सादीलवार खर्चाच्या रकमेच्या अनियमिततेबाबत तसेच स्वस्त धान्य वितरणाबाबत शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी खुलासा करावा.

यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, पाथरी तालुक्यातील शाळेमध्ये सन २००८-२००९ मध्ये अशी पध्दत होती की, विद्यार्थी संख्येप्रमाणे स्थानिक स्वस्त धान्य दुकानातून ते धान्याची उचल करीत होते. प्रत्येक विद्यार्थ्यास महिन्याचे तीन किलो तांदूळ दिलेले असतात. त्याप्रमाणे प्रत्येक शाळेला एक रेशन पुस्तिका देण्यात येत होती. दुकानदाराकडे जाऊन धान्य उचलणे व त्याप्रमाणे नोंदी करणे अपेक्षित होते. ही नोंदणी त्यांनी का केली नाही असा समितीने आक्षेप घेतला होता. चौकशीअंती असे आढळले की, तेथील तहसिलदारांनी पध्दत

ठरविली होती. रेशन पुस्तिकेत जागा कमी असल्याने त्यांना नोंदणी करणे कठीण जात असल्यामुळे त्यांनी वेगळी पावती ठेवण्याची पध्दत ठेवली होती. तीन प्रतीमध्ये त्याची पावती तयार करण्याची त्यांची पध्दत होती. दुकानदाराकडे गेल्यानंतर किती धान्य वितरीत झाले त्याची तीन प्रतीमध्ये नोंदणी केली जात होती. मुख्याध्यापकसुध्दा त्याप्रमाणे नोंदणी करीत होते. व्यवस्थितपणे धान्याचा पुरवठा होत होता. याबाबत अफरातफर किंवा आर्थिक अनियमितता झाली की नाही याची चौकशी करण्यात आली. परंतु तेथे व्यवस्थित नोंदी सापडल्या आहेत. मुख्याध्यापकांना सांगण्यात आले आहे की, यानंतर योग्य ती दक्षता घेण्यात यावी व रेशन कार्डवर सर्व नोंदी करण्यात याव्यात. कालांतराने ती पध्दत बदलली. आता तांदूळसुध्दा घेत नाही. यावर समितीने होकारार्थी उत्तर दिले.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, परभणी अंतर्गत पंचायत समिती, पालम येथे ४ टक्के सादीलवार अनुदानातून रुपये ९०,६६६/- एवढा खर्च नोंदविलेला आहे, याबाबत लेखारिक्षकांनी नोंदविलेले आक्षेप पुढीलप्रमाणे आहेत. सादीलवार अनुदान मुख्याध्यापक व अध्यक्ष, ग्रामशिक्षण समिती यांचे संयुक्त खात्यावर जमा केलेले नाही. अनुदानाची रक्कम मुख्याध्यापकाचे नावे रेखांकित नसलेल्या धनादेशाद्वारे देण्यात आली. केंद्रीय प्राथमिक शाळा पालम या शाळेच्या मुख्याध्यापकांनी धनादेश प्राप्त नोंदवही ठेवलेली नाही, मालसंग्रह पुस्तकात साहित्याची नोंद विहीत पध्दतीने घेतलेली नाही. शाळास्तरावर नमुना नं.४ मधील विहीत नमुन्यात किरकोळ रोखवही ठेवलेली नाही. केंद्रीय प्राथमिक शाळा, शेखराजूर अंतर्गत प्राथमिक शाळेकडील साठा नोंदवही दर्शविली नाही. उपप्रमाणके विरुपित केलेली नाहीत, साहित्य खरेदी करताना प्राधान्यक्रम निश्चित केलेला नाही. त्यास ग्रामशिक्षण समितीची मान्यता घेतलेली नाही. सादिलवार खर्चासाठी अनुज्ञेय होणारी रक्कम शाळेच्या जून व डिसेंबर महिन्याच्या वेतन देयकामध्ये स्वतंत्रपणे नमूद केलेली नाही. रुपये ५००/- पेक्षा कमी किंमतीची साहित्य खरेदी मान्यता प्राप्त सहकारी भांडारातून केलेली नाही. केंद्रप्रमुख/शिक्षण विस्तार अधिकारी यांचे शाळा तपासणी बाबतचे अहवाल नोंदवह्या दर्शविल्या नाही.

तसेच पंचायत समिती, पाथरी येथे शालेय पोषण आहार योजनेवर रक्कम रुपये १२,१५,४३६/- एवढा खर्च केलेला असून लेखापरीक्षकांनी याबाबत पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविलेले आहेत. शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १६ मे, २००२ (**परिशिष्ट क्र. ४.१**) रोजीच्या शासन निर्णयानुसार खाजगी शाळांसह सर्व शाळांमध्ये स्वतंत्र शिधापत्रिका ठेवलेल्या नाहीत. पुरवठा विभागाकडून निर्गमित झालेल्या तांदुळाबाबत ताळमेळ नाही. शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १६ मे, २००२ व दिनांक ३ मार्च, २००३ रोजीच्या शासन निर्णयानुसार शालेय पोषण योजनेसाठीचे अध्यक्ष व सचिव, शालेय शिक्षण समिती यांच्या संयुक्त बँक खात्यावर जमा होणे आवश्यक असताना मुख्याध्यापकांनी धनादेशाचे रोखीकरण करुन अंतर्गत शाळांना रोख वाटप केले आहे. **प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या दिनांक ९ ऑगस्ट, २००५ नुसार अन्न शिजविण्यासाठी देय असलेल्या अनुदानापैकी ७५ टक्के खर्च हा पुरक पदार्थावर, २५ टक्के इंधन व मजुरीवर खर्च होणे आवश्यक आहे. तथापि, सदरील खर्चाच्या पावत्या न ठेवल्यामुळे योग्य दर्जाचा व प्रथिनयुक्त आहार दिलेबाबत खात्री होत नाही. दिनांक ३१ मार्च, २००५ रोजीच्या शासन निर्णयानुसार नियमित आहारासोबत आठवड्यातून किमान एकदा अंडी/केळी इत्यादी प्रकारचा पुरक पोषण आहार देणे बंधनकारक असताना असा आहार दिलेला नाही. गणितीय परिगणना चुकीची केल्यामुळे एकूण रुपये ३७८५/- एवढे जादा प्रदान झाले आहे.**

उपरोक्त लेखी आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी खुलाशाच्या अनुषंगाने समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, ४ टक्के सादिलवार खर्चाबाबत प्राप्त अनुदानाची रक्कम मुख्याध्यापक व व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने बँकेतील संयुक्त खात्यामध्ये जमा करावयास हवी होती. अनुदानाची सदर रक्कम मुख्याध्यापकाचे नावे रेखांकित नसलेल्या धनादेशाद्वारे देण्यात आली. शिक्षणाधिकाऱ्यांनी समितीला दिलेले लेखी उत्तर चुकीचे आहे. सदर उत्तर संविधानिक नाही, असे उत्तर देऊन समितीची एकप्रकारे दिशाभूल केलेली आहे. मुख्याध्यापक ग्रामशिक्षण समितीच्या अध्यक्षांची स्वाक्षरी न घेता व्यवहार करीत आहेत ही बाब अत्यंत गंभीर आहे. मुख्याध्यापक व ग्रामशिक्षण समिती यांचे संयुक्त खाते उघडण्यात आले नसल्याचे लेखापरीक्षकांनी दिलेल्या भेटीच्या वेळी नमूद केलेले नाही. त्यामुळे केंद्रप्रमुखांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी तसेच शालेय पोषण आहार योजनेतील अनियमिततेप्रकरणी नोंदविण्यात आलेल्या आक्षेपानुसार शाळेची गणितीय परिगणना चुकीची झाल्यामुळे झालेल्या अतिप्रदानाची एकूण रक्कम रुपये ३,७८५/- वसूल करुन ती चलनाद्वारे शासनखाती भरणा केलेली असली तरी कोणाच्या आदेशानुसार व कोणत्या तारखेला उक्त रक्कम शासन खाती भरणा केलेली आहे. याबाबतची माहिती लेखी खुलाशामध्ये कळविण्यात आलेली नाही. सदर माहिती समितीला सादर करण्यात यावी. तसेच **गावातील स्वस्त धान्य दुकानांमार्फत शाळेला तांदुळ पुरवठा केला जात होता व त्यासाठी शाळांना पांढऱ्या शिधावाटप पत्रिका देण्यात आलेल्या होत्या परंतु सदर शिधावाटप पत्रिकेमध्ये दुकानदार नोंद करीत नव्हते असे लेखी खुलाशामध्ये नमूद करण्यात आले आहे. वास्तविक पाहता स्वस्त धान्य दुकानदारांनी शिधावाटप पत्रिकेमध्ये नोंद घेणे गरजेचे होते. जरी तेथील तहसिलदारांनी ठरविलेल्या पध्दतीनुसार रेशन पुस्तिकेत जागा कमी असल्याने नोंद करणे कठीण जात असल्यामुळे वेगळी पोहोच पावती देण्यात येत असली तरी स्वस्त धान्य वितरणाबाबतच्या नियमानुसार दुकानदारांनी प्रत्येक पुरवठ्याची नोंद शिधावाटप पत्रिकेमध्ये केली पाहिजे. नोंद नसल्यामुळे धान्य वितरणाबाबत अनियमितता झाली आहे असा संशय घेण्यास पुरेसा वाव आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द व स्वस्त धान्य दुकानदारांविरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

# प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, परभणी

## परभणी जिल्हा परिषदेअंतर्गत रस्ते, भक्त निवास इत्यादी बांधकामातील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.३०२ (सन २००८-०९) :-**

**एमएसएच-२ ते पेठशिवणी सेलू तालुका पालम (ODR-३) रस्त्याची किमी ०/०० ते १/०० सुधारणा करणे.**

एमएसएच-२ ते पेठशिवणी सेलू किमी ०/०० ते १/०० सुधारणा करणे बाबतचे रु.१९,९०,०००/- अंदाजपत्रक असुन कामावर रक्कम रु.१९,५८,३९८/- इतका खर्च केला आहे. कामाची निविदा संचिका, मोजमाप पुस्तिका तसेच अंदाजपत्रक तपासले असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) शासन निर्णय महसुल व वनविभाग क्रमांक गौखनि/१०/०२०६/प्र.क्र. ५७/ख, दिनांक १५ डिसेंबर २००६ नुसार सदर देयकातुन गौण खनिजापोटी रुपये ९१,४४२ /- वसूल करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात रु.५४,२९२/- कपात केली आहे. सबब कमी वसूल केलेली रक्कम रुपये ३७,१५०/- संबधित गुत्तेदाराककडून वसूल करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

२) बाब क्रमांक १२ मध्ये दरसुचीनूसार मुळ परिमाण १४४० घ.मी. असताना ते ७२९ घ.मी.ने वाढून दिले आहेत. त्यामुळे ७२९ घ.मी.चे प्रति घ.मी. रुपये २४/- प्रमाणे रुपये १७,४९६/- चे जादा प्रदान गुत्तेदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.

३) दरपृथकरणात Prov.२० mm thick premix bituminious basic rate as per DSR Item No.६७७ रुपये ११०/- प्रती चौमिटर असताना ११८/- दिला आहे सबब वाढीव दरापोटी रुपये २७,०००/- चे जादा प्रदान झाले आहे. सबंधित गुत्तेदाराकडून वसूल करुन शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

४) बाब क्रमांक १३.७५ एमएम थिक ६०/७० ग्रेडचे डांबर दरसुची बाब क्रमांक ६७३ नूसार मुळ परिमाण १८५.६३ घ.मी. असताना ते १६८.७५ घ.मी. दर्शवून १६.८८ घ.मी.ने कमी घेवून काम केले आहे.

५) दरपृथ्थकरण विवरणपत्र, खदानचार्ट व लिड चार्ट ला कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी प्रमाणित केलेले नाही. म्हणून दिलेले दर, वाहनावळीवर केलेल्या खर्चाची सत्यता पटत नाही.

६) कामाची मोजमापे नोंदविताना त्यासोबतच डांबर उपयोगीता प्रमाणपत्र मोजमाप पुस्तीकेत नोंदविणे आवश्यक होते. तशी कार्यवाही केलेली नाही.

७) डांबर वापर विवरणपत्रात फक्त किती डांबर वापरले याचे परिमाण दिलेले आहेत, वापराचे दर व किती वापरले हे दर्शविलेले नाही म्हणुन किती व कोणत्या दराने डांबर वापरले याची खात्री करता आली नाही.

८) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ९७ व १९७ नुसार पुर्ण झालेल्या कामाची नोंद नमूना नं. ३९ व ६९ मध्ये घेणे आवश्यक होते. परंतू सदर नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की स्वामीत्वधनाची रक्कम रुपये ९१,४४२/- पैकी प्रथम धावते देयकामधुन रुपये ५४,२९२/- आणि द्वितीय व अंतिम देयकातुन रुपये ५,७९४/- असे एकूण ६०,०८६/- रक्कम

कपात करण्यात आलेली आहे व उर्वरीत रक्कम रुपये ३१,३५६/- संबधितांकडून वसूल करुन दिनांक ०१ ऑक्टोबर २०१५ रोजी शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे.

२) सदर मुद्दयाचे अनुषंगाने बाब क्रमांक १२ मधील मूळ मंजुर परिमाण १४४० नसुन ते २१६९ घ.मी. आहे आणि मुळ परिमाण हे साईड बर्म व धावपट्टी या कामासाठी वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे वसुलीची आवश्यकता नाही.

३) मंजूर दरसुचीनूसार २० एमएम हॉटमिक्सचे दर ११८/- असून ११०/- रुपये दर हे कोल्डमिक्स चे आहेत अंदाजपत्रकात हॉटमिक्सचे दर मंजुर असल्यामुळे रुपये ११८/- चे दर देण्यात आले आहेत. सदरिल बाबतीत जादा अदाई करण्यात आलेली नाही. मोजमाप पुस्तिका क्रमांक ६० पान क्रमांक १८ ते २६ वर नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

४) अंदाजपत्रकात एकूण ९०० मिटर लांबीचे काम मंजूर आहे. त्यापैकी अंदाजपत्रकात ७५ एमएम बी.बी.एम. ६०० मिटर लांबीसाठी व ५० एमएम बी.बी.एम. ची तरतुद ३०० मिटर लांबीसाठी प्रस्तावित आहे. १६.८८ घ.मी. ची तरतूद ३०० मीटर लांबीतील डांबरी पृष्ठभाग व्यवस्थीत असल्याने मुळ अंदाजपत्रकातून वगळण्यात आली आहे. त्यामूळे ७५ एमएम बी.बी.एम. साठी १६८.७५ घ.मी. आवश्यक आहे व ती योग्य आहे. मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे काम करण्यात आलेले आहे. आवश्यक त्या परिमाणाचे काम पुर्ण केले आहे. त्यामुळे १६.८८ घ.मी. ने काम कमी झालेले नाही.

५) आक्षेपात नमुद केल्यानूसार कार्यकारी अभियंता बांधकाम यांचेकडून खदान चार्ट प्रमाणित केलेला नाही. परंतु उप अभियंता (बां.) यांनी खदान चार्ट प्रमाणित केलेला आहे.

६) आक्षेपाच्या अनूषंगाने सदरील कामाच्या परिशिष्ट ब सोबत परिशिष्ट अ निरंक आहे. म्हणजेच साहित्य खात्यामार्फत डांबराचा पुरवठा करण्यात येत नसल्यामुळे मोजमाप पुस्तीकेत डांबर उपयोगीता प्रमाणत्र नोंदविलेले नाही. तथापि डांबर वापर विवरणपत्र कार्यकारी अभियंता बांधकाम यांच्याकडून प्रमाणीत केलेले आहे.

७) डांबर वापर विवरणपत्र उपलब्ध असून त्यात वापराचे दर व वापरलेले डांबर दर्शविण्यात आलेले आहे.

८) सदर कामाची नोंद नमुना नंबर ६९ ला पृष्ठ क्रमांक (२१) वर घेण्यात आलेली आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.३०३ (सन २००८-०९) :-**

## रा.मा. २२० ते जोगवाडा रस्ता किमी १/४०० ते २/५०० मजबुतीकरण व डांबरीकरण कामातील अनियमिततेबाबत.

जिल्हा परिषद परभणी अंतर्गत बांधकाम विभागाने सदर कामाचे रु.१४,८९,६००/- चे अंदाजपत्रक बनवून त्या अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी तांत्रिक मान्यता दिलेली आहे. आणि दुसऱ्या धावते देयकाद्वारे रु.४९,०९६/- चे प्रदान केले आहे, कामाची निविदा संचीका, मोजमाप पुस्तिका तसेच अंदाजपत्रक तपासले असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) ग्राम विकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रमांक झेडपीए. २००५ प्रक्र. ३१५/वित्त-९ दिनांक २४ नोव्हेंबर २००५. नुसार रुपये ५.०० ते ५०.०० लक्ष मधील कामाची निविदा राज्यस्तरावरील मराठी वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक होते. त्यानूसार बांधकाम विभागाने योग्य दर्जाचे वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली नाही. तसेच महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रमांक केमाअ. २००५/प्र.क्र.२०८/जल-२४ दिनांक ३० एप्रिल २००६ नुसार रुपये ५.०० लक्षापुढील कामाची निविदा शासनाचे वेबसाईटवर प्रसिध्द करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही केलेली नाही.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १५३ नुसार अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक आहे. तथापि, आवश्यक त्या वेळेस नियम १२२ नुसार गुत्तेदारास लेखी आदेश काढून तसेच नियम १२४ नुसार कार्य आदेश नोंदवहीत नोंद घेऊन नियम १५६ नुसार कंत्राटदाराची संमती घेणे आवश्यक आहे. परंतु उक्त नियमानुसार कार्यवाही झालेली नाही.

३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १६८ व महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग राजपत्र दिनांक ०४ सप्टेंबर १९८५ चे सुधारणेनुसार रुपये १.०० लक्ष वरील मुळ बांधकामाच्या मोजमापाची किमान ५ टक्के तपासणी कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी बांधकाम पुर्ण होण्याच्या काळात रुपये ५०,०००/- चे प्रत्येक टप्याच्या बाबतीत परिषदेच्या कार्यकारी अभियंता यांचेकडून तेवढयाच मर्यादेपर्यत करणे आवश्यक आहे. तथापि, वरील नियमानूसार अशी कार्यवाही झालेली नाही.

४) सदर कामाचे निविदा संचिकेतील करारनाम्यावर कंत्राटदराराची व कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षरी नाहीत व करारनामा कोरा आहे. त्यामुळे करारनामा विधिग्राहय होत नाही.

५) अंदाजपत्रकाप्रमाणे दर पृथ्थकरणानुसार कंत्राटदारास डांबराच्या दरातील फरकापोटी प्रति मे.टन. ८३८६.८४,(रुपये-३२२३५-२३८४९=रु.८३८६.८४/-) दर वाढवून दिलेला आहे. तथापि, लेखापरिक्षणादरम्यान सदर प्रदानाबाबतचा प्राधिकार दर्शविलेला नाही. त्यामुळे केलेले प्रदान योग्य असल्याची खात्री होत नाही. तथापि उपयोगिता प्रमाणपत्रानुसार कामावर वापरलेल्या डांबराचे रुपये ८३८६.८४ प्रमाणे एकुण रुपये १,४८,४४७/- जादा प्रदानाची वसुली करावी.

६) ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक जिपर.२०००/प्र.क्रं.८३७/३५ दिनांक १५ सप्टेंबर २००३ तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पीर. २०००/प्रक्र.८३७.३५, दिनांक १३ फेब्रुवारी २००६ अन्वये १ टक्का विम्याची कमी वसुली केलेली रक्कम रुपये ५,३९७/- वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ९७ व १९७ नुसार पुर्ण झालेल्या कामाची नोंद नमूना ३९ व ६९ मध्ये घेणे आवश्यक होते. पंरतु सदर नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

८) तांत्रिक मान्यता आदेशातील अट क्र. ४ नुसार कार्यकारी अभियंता यांनी काम सुरु करण्यापुर्वी रस्त्याचे अस्तित्वातील खडीची जाडी तपासुन त्याची मोजमाप पुस्तिकेत नोंद घेतली नाही.

९) कार्यारंभ आदेशातील अटी व शर्ती नुसार काम सुरु करण्यापुर्वी प्रत्यक्ष कामाचे जागेवर कामा बाबत संपुर्ण माहिती असलेला फलक लावावयाचा आहे व फलक लावल्याबाबत उप अभियंता बांधकाम यांना तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतु असे प्रमाणपत्र संचिकेत आढळुन आले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक झेडपीए २००५ /प.क्रं. ३६६/ वित्त -९ दिनांक ३० डिसेंबर, २००६ मधील तरतूदी नूसार जिल्हा परिषदांकडून विविध कामा संदर्भात जाहिराती देण्यात येतात. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार रू.५ लाख ते ५० लाखापर्यंतची खर्चाची कामे राज्यस्तरावरील मराठी / हिंदी वृत्तपत्रात देण्याची तरतुद आहे. त्यानुसार विभागाने सामान्य प्रशासन विभाग

नियंत्रित रोस्टरनुसार सदर कामाची जाहिरात ही दैनिक सकाळ या राज्यस्तरीय वर्तमानपत्रात दिनांक ११ जानेवारी २००८ रोजी प्रसिध्द  करण्यात आलेली आहे. त्या कालावधीत जिल्हा परिषदेची संकेत स्थळावर नसल्यामुळे कामाची निविदा संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली नाही.

२) आक्षेपात नमुद केल्यानुसार अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार काम करणे आवश्यक आहे. आवश्यकतेनुसार नाममात्र कमी / अधिक खर्च झालेला आहे. त्यामुळे याबाबतच्या प्रत्यक्ष जायमोक्यावर काम करताना कंत्राटदारास सूचना देण्यात आलेल्या होत्या.

३) आक्षेपामध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचेकडून त्या त्या टप्यावर तपासणी करण्यात आली नाही. परंतु एकूण कामाच्या ५% रकमेएवढी तपासणी मोजमाप पुस्तीका क्रमांक १८२४ पृष्ट क्रमांक ८५ वर केलेली आहे.

४) सदर कामाच्या करारनाम्यावर संबधित कंत्राटदार व कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांच्या स्वाक्षरी राहुन गेल्या होत्या. परंतु आक्षेप प्राप्त झाल्यानंतर संबधित कंत्राटदार आणि कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी स्वाक्षरी करुन करारनामा पुर्ण केला आहे.

५) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, दरसुची सन २००७-०८ मधील पान क्रमांक ०२ वरील नोट क्रमांक ४ (C) नुसार डांबराचा बाजारभाव दरातील फरक निश्चीत करुन अधिक्षक अभियंता यांनी अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. दरसुचीमधील डांबराचा मुळ दर रुपये २३,८४९/- आणि दिनांक ३१ डिसेंबर, २००७ रोजीचा डांबराचा बाजारभाव रुपये ३२,२३५.८४/- त्याचे दरपृथ्थकरण खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| मुळ डांबराचा दर | - | २४६००.००/- |
| एक्साईज डयुटी | - | ३९३६.००/ |
| शैक्षणीक कर सेस | - | ११८.०८/- |
| व्हॅट | - | ३५८१.७६/- |
| एकुण दर | - | ३२२३५.८४/- |

अंदाजपत्रकास अधीक्षक अभियंता सा. बा. मंडळ नांदेड यांनी दिनांक २१ जानेवारी २००८ रोजी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. दरसुचीतील सर्वसाधारण सुचना क्रमांक २.६ नुसार दर निश्चीती केलेली असल्यामुळे रुपये ८,३८६.८४/- दर वाढवून दिलेला नाही. त्यामुळे जादा प्रदान झालेले नाही.

६) आक्षेपात नमुद करण्यात आलेली विमा रक्कम रू.५,३९७/- संबधितांकडून वसूल करुन दिनांक ०३ ऑक्टोबर २०१५ रोजी शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे.

७) सदर कामाची नोंद नमुना क्रमांक ६९ ला पृष्ठ क्रमांक (२५) वर घेण्यात आलेली आहे.

८) अंदाजपत्रक सादर करीत असताना कार्यकारी अभियंता( बांधकाम) यांच्या स्वाक्षरीने अस्तित्वातील खडीच्या जाडीची नोंद अंदाजपत्रकात घेण्यात आली होती व त्यानुसार काम करण्यात आलेले असून काम सुरु करण्यापुर्वी खडीच्या जाडीची तपासणी पुर्ण करण्यात आलेली आहे.

९) प्रत्यक्ष कामाच्या जागेवर कामाबाबत संपुर्ण कामाची माहीती असलेला फलक लावण्यात आलेला नव्हता, ही वस्तुस्थिती आहे. अंदाजपत्रकात नमुद केलेल्या दराप्रमाणे संबधितास बोर्ड लावण्यासाठीचे रुपये ६,९६६/- चे प्रदान करण्यात आलेले नाही.

**परिच्छेद क्रमांक ३.३०४ (सन २००८-०९) :-**

**रा.मा -२१७ बोरी वाघी - जवळा रस्ता तालुका जिंतुर किमी ३/५०० ते ७/०० रस्त्याची सुधारणा करणे कामातील अनियमितता**

१) ग्राम विकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रमांक झेडपीए २००५प्रक्रं./३१५/वित्त-९ दिनांक २४ नोव्हेंबर २००५ नुसार रुपये ५.०० लक्ष ते ५०.०० लक्ष मधील कामाची निवीदा प्रसिध्दी राज्यस्तरावरील मराठी वर्तमानपत्रात करणे आवश्यक होते. त्यानुसार बांधकाम विभागाने योग्य दर्जाचे वर्तमान पत्रात निवीदा प्रसिध्द केलेली नाही. तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्र. केताअ. २००५/ प.क्र.२०८/जल-२४ दिनांक ३० एप्रिल २००६ नुसार रुपये ५.०० लक्ष पुढील कामाची निवीदा शासनाचे संकेत स्थळावर प्रसिध्द करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही केलेली नाही.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १५३ नुसार अंदाज पत्रकानुसार काम करणे बंधनकारक आहे. तथापि, आवश्यक त्यावेळेस नियम १२२ नुसार गुत्तेदारास लेखी आदेश काढुन तसेच नियम १२४ नुसार कार्यादेश नोंदवहित नोंद घेऊन, १५६ नुसार कंत्राट दाराची समंती घेणे आवश्यक आहे, परंतु उक्त नियमानुसार कार्यवाही झालेली नाही.

३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १६८ व महाराष्ट्र शासन ग्राम विकास राजपत्र दिनांक ०४ सप्टेंबर १९८५ चे सुधारणेनुसार रु.१.०० लक्ष वरिल मुळ बांधकामाच्या मोजमापाचे किमान ५% तपासणी कार्यकारी अभियंता यांनी बांधकाम पुर्ण होण्याच्या काळात रु. ५०,०००/- चे प्रत्येक टप्याच्या बाबतीत परिषदेच्या कार्यकारी अभियंता यांचेकडून तेवढयाच मर्यादेपर्यंत करणे आवश्यक आहे. तथापी वरिल नियमानुसार अशी कार्यवाही झालेली नाही.

४) अंदाजपत्रकाप्रमाणे दरपृथ्थकरणानुसार कंत्राटदारास डांबराच्या दरातील फरकापोटी प्रति मे.टन ८३८६.८४ (रुपये ३२,२३५ (-) २३,८४९ ) =रु.८३८६.८४/-) दर वाढवुन दिलेला आहे. मोजमाप पुस्तिकानुसार बाब क्रं. ४, ५, ६, ७ वर रु. ५,१८,८६१/- चे डांबर वापरलेले आहे. तथापि, लेखा परिक्षण दरम्यान सदर प्रदानाबाबतचा प्राधिकार दर्शविलेला नाही, त्यामुळे केलेले प्रदान योग्य असल्याची खात्री होत नाही, पुर्तता दर्शवावी अन्यथा रक्कम रु.५,१८,८६१/- चे जादा प्रदानाची वसुली संबधित गुत्तेदाराकडून करावी.

५) शासन निर्णय महसुल व वनविभाग क्रं. गोकनि.१०/०२०६/ प्रक्रं.५७/ख, दिनांक १५ डिसेंबर, २००६ नुसार सदर कामावर रॉयल्टीची रक्कम रुपये ४२,९३८/- वसुल करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात केवळ रु. ७,२७५/- वसुल केली आहे. व रु.३५,६६३/- ने स्वामित्वधन कमी कपात केलेली रक्कम रु-३५,६६३/- संबंधितांकडून वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

६) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ९७ व १९७ नुसार पुर्ण झालेल्या कामाची नोंद नमूना ३९ व ६९ मध्ये आवश्यक होते परंतु सदर नोंदी घेण्यात असलेल्या नाहीत.

७) कार्यारंभ आदेशातील व अटी व शर्तनुसार काम सुरु करण्यापुर्वी प्रत्यक्ष कामाची जागेवर कामाबाबत संपुर्ण माहिती असलेला फलक लावावयाचा आहे व फलक लावल्याबाबत उप अभियंता बांधकाम यांनी तसे प्रमाण पत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतु असे प्रमाणपत्र संचिकेत आढळुन आले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) आक्षेपाच्या अनुषंगाने अनूपालन सादर करण्यात येते की, विविध विकास कामाच्या जाहीराती वर्तमानपत्रात देण्यासाठी शासननिर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रंमाक झेडपीए २००५ /प.क्रं. ३६६/ वित्त-९ दिनांक ०५ फेब्रुवारी, २००८ मधील तरीतुदीनुसार जिल्हा परिषदेच्या जाहीराती वितरण करण्याचे अधिकार हे जिल्हा माहीती अधिकारी/विभागीय माहीती अधिकारी/मुख्यालय यांना दिलेले आहेत. त्यानूसार जिल्हा परिषदेच्या विविध विकास कामाच्या जाहीराती जिल्हा माहिती अधिकारी यांचेकडे पाठविण्यात येत होत्या त्यांनी जाहिराती दिल्यानूसारच जिल्हा परिषदेने कार्यवाही केलेली आहे. सदर कामाची जाहिरात ही दैनिक यशोभुमी/गावतलाव या राज्यस्तरीय वर्तमानपत्रात दिंनाक ११ जानेवारी, २००८ रोजी व साप्ताहिक धर्मभुमी या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्या कालावधीत जिल्हा परिषदेची संकेतस्थळ नसल्यामुळे कामाची निविदा संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली नाही.

२) प्रत्यक्ष काम करीत असतांना आवश्यकतेनुसार नाममात्र कमी अधिक झालेला खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमेच्या मर्यादेत करण्यात आला आहे.

३) आक्षेपामध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचेकडून त्या त्या टप्यावर तपासणी करण्यात आली नाही. परंतू एकूण कामाच्या ५% रकमेएवढी तपासणी मोजमाप पुस्तिका क्रमांक २१२१ पृष्ठ क्रमांक ४७ व ५७ वर केलेली आहे.

४) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की , दरसुची २००७-०८ मधील पान क्रमांक ०२ वरील नोट क्रमांक ४(C) नुसार डांबराचा बाजारभाव दरातील फरक निश्चीत करुन कार्यकारी अभियंता (बांध.) यांनी अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. दरसुचीमधील डांबराचा मुळ दर रुपये २३,८४९/- आणि दिनांक ३१ डिसेंबर, २००७ रोजीचा डांबराचा बाजारभाव रुपये ३२,२३५.८४/- त्याचे दरपृथ्थकरण खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| मुळ डांबराचा दर | - | २४६००.००/- |
| एक्साईज डयुटी | - | ३९३६.००/ - |
| शैक्षणिक कर सेस | - | ११८.०८/- |
| व्हॅट | - | ३५८१.७६/- |
| एकूण दर | - | ३२२३५.८४/- |

अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता (बांध.) यांनी दिनांक १२ डिसेंबर, २००८ रोजी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. दरसुचीतील सर्वसाधारण सुचना क्रमांक २.६ नुसार दर निश्चिती केलेली असल्यामुळे रुपये ८३८६.८४/- दर वाढवून दिलेला नाही. त्यामुळे जादा प्रदान झालेले नाही.

५) आक्षेपाच्या अनूषंगाने अनूपालन सादर करण्यात येते की, स्वामित्वधनाची रक्कम रु.४२,९३८/- पैकी देयका मधुन रु. ७,२७५/- वसूल करण्यात आली होती. आक्षेपातील नमुद रक्कम रु. ३५,६६३/- संबधिता कडून वसूल करुन दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ रोजी शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे.

६) सदर कामाची नोंद नमुना क्रमांक ६९ ला पृष्ठ क्रमांक (२७) वर घेण्यात आलेली आहे.

७) प्रत्यक्ष कामाच्या जागेवर कामाबाबत संपुर्ण माहीती असलेला फलक कंत्राटदाराने स्वखर्चाने लावला आहे. त्यामुळे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही. अंदाजपत्रकात तरतुद नसल्याने कामाची माहिति असलेला फलक लावण्यात आला नव्हता.

**परिच्छेद क्रमांक ३.३०५ (सन २००८-०९) :-**

**रा.मा. २१७ ते आंबेटाकळी ते दामपुरी रस्ता किमी ३/०० ते ५/०० मजबुतीकरण व डांबरीकरण कामातील अनियमिततेबाबत.**

जिल्हा परिषद, परभणी अंतर्गत बांधकाम विभागाने सदर कामाचे रु-२३,८१,५००/- अंदाजपत्रक बनवून त्यास अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी तांत्रिक मान्यता दिलेली आहे. दुसऱ्या व अंतिम देयकाद्वारे रु.१७,९३,२५९/- चे प्रदान केलेले आहे. कामाची निविदा संचीका, मोजमाप पुस्तिका तसेच अंदाजपत्रक तपासले असता, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) सदर कामाचे निविदा संचिकेतील टिपणी नूसार महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १२५ नूसार प्रशासकीय मान्यता व कलम १२६ नुसार निविदेस जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मंजुरी दिल्याचे नमुद केले आहे. तथापि सदर ठराव लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेला नाही.

२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रं. झेडपीए. २००५ प्रक्र.३१५/ वित्त-९ दिनांक २४ नोव्हेंबर, २००५ नुसार रुपये ५.०० लक्ष ते ५०.०० लक्ष मधील कामाची निवीदा राज्यस्तरावरील मराठी वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक होते. त्यानुसार बांधकाम विभागाने योग्य दर्जाचे वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्द केलेली नाही. तसेच महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रमांक केमाअ२००५/ प्र.क्र.२०८/जल-२४ दिनांक ३० एप्रिल, २००६ नुसार रु.५.०० लक्ष पुढील कामाची निविदा शासनाचे संकेत स्थळावर प्रसिध्द करणे आवश्यक होते. उक्त निर्णयानुसार बांधकाम विभागाने कार्यवाही केलेली नाही.

३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १५३ नुसार अंदाज पत्रकानुसार काम करणे बंधनकारक आहे. परंतु कमी जादा काम करुन त्यास सक्षम प्राधिकारी यांची मंजुरी घेतलेली नाही.

४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १६८ प्रमाणे अंतीम मोजमापाच्या ५% नोंदी कार्यकारी अभियंता यांनी तपासल्या नसतांनाही प्रदान केलेले आहे.

५) सदर कामाचे निविदा संचिकेतील करारनाम्यावर कंत्राटदाराची स्वाक्षरी नाही. त्यामुळे करारनामा विधिग्राहय होत नाही.

६) सार्वजनिक बांधकाम विभागाचे नियम पुस्तिकेमधील परिच्छेद क्रं. २१७ अन्वये निविदा मंजुर तारखेनंतर ८ दिवसांत कामाचे आदेश देणे आवश्यक आहे. तथापि काम वाटप आदेशानंतर जवळपास १ महिन्याने कामाचे आदेश उशिराने देण्यात आले.

७) अंदाज पत्रकाप्रमाणे दरपृथ्थकरणानुसार कंत्राटदारास डांबराच्या दरातील फरकापोटी प्रति मे. टन ८,३८६.८४ (रुपये ३२,२३५/-(-) रु-२३,८४९/- = ८,३८६.८४ /-) दर वाढवुन दिलेला आहे. तथापि, लेखा परिक्षणा दरम्यान सदर प्रदानाबाबतचा प्राधिकार दर्शविलेला नाही, त्यामुळे केलेले प्रदान योग्य असल्याची खात्री होत नाही. पुर्तता दर्शवावी

अन्यथा उपयोगिता प्रमाणपत्रानुसार कामावर वापरलेल्या डांबराचे रुपये ८,३८६.८४/- प्रमाणे एकूण रुपये २,३३,४९०/- जादा प्रदानाची वसुली करावी.

८) ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक जिप २०००/प्रक्र.८३७/३५ दिनांक १५ सप्टेंबर २००३ तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पीर २०००/प्रक्र.८३७/३५ दिनांक १३ फेब्रुवारी २००६ नुसार जिल्हा परिषदेकडून वेगवेगळया कंत्राटदारांना देण्यात येणाऱ्या कंत्राटी कामाचा व त्यावरील कामगारांचा विमा शासकीय विमा संचालनालय मुंबई यांकडे उतरविणे अनिवार्य आहे. कमी वसुल केलेली रक्कम रुपये १०२/- वसूल करुन पुर्तता दर्शवावी.

९) अंदाज पत्रकाप्रमाणे दरपृथ्थकरणानुसार कंत्राटदारास डांबराच्या दरातील फरकापोटी प्रति मे. टन ८,३८६.८४ (रुपये ३२२३५/- (-) २३८४९/- = ८३८६.८४ /-) दर वाढवुन दिलेला आहे. मोजमाप पुस्तीकेनुसार बाब क्रमांक ११,१२,१३ वर रुपये २,३३,५१७/- चे डांबर वापर केल्याचे दिसुन येते. तथापि लेखापरीक्षणा दरम्यान सदर प्रदानाबाबतचा प्राधिकार दर्शविला नाही, त्यामुळे केलेले प्रदान योग्य असल्याची खात्री होत नाही. पुर्तता दर्शवावी अन्यथा रक्कम रुपये २,३३,५१७/- जादा प्रदानाची वसुली करावी.

१०) कामाचे मोजमाप नोंदविताना, त्यासोबत डांबर उपयोगिता प्रमाणपत्र मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक होते, परंतु मोजमाप पुस्तिकेत उपयोगिता प्रमाणपत्र नोंदविलेले नाही.

११) कार्यारंभ आदेशातील अटी व शर्तीनुसार काम सुरु करण्यापुर्वी प्रत्यक्ष कामाचे जागेवर कामाबाबत संपुर्ण माहिती असलेला फलक लावायचा आहे व फलक लावल्याबाबत उप अभियंता (बांधकाम) यांनी तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतु असे प्रमाणपत्र संचिकेत आढळुन आलेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १२५ नुसार प्रशासकिय मान्यता स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ६५ दिनांक २९ फेब्रुवारी, २००८ अन्वये निवीदेस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. आणि कलम १२६ नुसार स्थायी समीती सभा ठराव क्रं. ६५ दिनांक २९ फेब्रुवारी, २००८ अन्वये निविदेस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

२) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, विविध विकास कामाच्या जाहीराती वर्तमानपत्रात देण्यासाठी शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रंमाक झेडपीए २००५/प.क्रं.३६६/ वित्त-९ दिनांक ०५ फेब्रुवारी, २००८ मधिल तरीतुदीनुसार जिल्हा परिषदेच्या जाहीराती वितरण करण्याचे अधिकार हे जिल्हा माहीती अधिकारी/विभागीय माहीती अधिकारी/मुख्यालय यांना दिलेले आहेत. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या विविध विकास कामाच्या जाहीराती जिल्हा माहीती अधिकारी यांचेकडे पाठविण्यात येत होत्या त्यांनी जाहीराती दिल्यानूसारच जिल्हा परिषदेने कार्यवाही केलेली आहे. सदर कामाची जाहीरात ही दैनिक सकाळ या राज्यस्तरीय वर्तमानपत्रात दिंनाक ११ जानेवारी, २००८ रोजी व मराठवाडासाथी या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्या कालावधीत जिल्हा परिषदेची संकेतस्थळ नसल्यामुळे कामाची निविदा संकेत स्थळवर प्रसिध्द करण्यात आलेली नाही.

३) अंदाजपत्रकानुसार काम करण्यात आलेले आहे. तसेच नियम १५३ नुसार कमी / अधिक खर्चाचे विवरणपत्रास सक्षम प्राधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता बांधकाम याची मान्यता घेण्यात आलेली आहे.

४) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, मोजमाप पुस्तिका क्रमांक ५६ पृष्ठ क्रं. ५५३३ वर बाब क्रमांक १२ साठी कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी तपासणी दिलेली आहे. जी अंतिम देयकाच्या (बिलाच्या) ५% प्रमाणात आहे.

५) सदर कामाचे निविदा संचिकेतील करारनाम्यावर आक्षेपाच्या वेळी स्वाक्षरी नव्हती. ती घेण्यात आली आहे.

६) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येत की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम १२६ नुसार सदर कामाची निविदा स्विकारण्याचे अधिकार स्थायी समितीस आहेत त्यानुसार सदर कामाची निवीदा प्रस्ताव दिनांक २९ फेब्रुवारी, २००८ च्या स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यात येवुन ठराव क्रमांक ६५ नुसार मान्यता घेण्यात आली. समितीचा कार्यवृतांत दिनांक १८ मार्च, २००८ रोजी प्राप्त झाला. त्यानंतर कार्यारंभ आदेशाची संचिका प्रवाही करुन दिनांक ३१ मार्च, २००८ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले.

७) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, दरसुची २००७-०८ मधील पान क्रमांक ०२ वरील नोट क्रमांक ४(C) नुसार डांबराचा बाजारभाव दरातील फरक निश्चीत करुन मा. अधिक्षक अभियंता यांनी अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. दरसुचीमधील डांबराचा मुळ दर रुपये २३,८४९/- आणि दिनांक ३१ डिसेंबर, २००७ रोजीचा डांबराचा बाजारभाव रुपयं ३२,२३५.८४/- त्याचे दरपृथ्थकरण खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| मुळ डांबराचा दर | - | २४६००.००/- |
| एक्साईज डयुटी | - | ३९३६.००/- |
| शैक्षणिक कर सेस | - | ११८.०८/- |
| व्हॅट | - | ३५८१.७६/- |
| एकूण दर | - | ३२२३५.८४/- |

अंदाजपत्रकास अधीक्षक अभिंयता सा.बा. मंडळ नांदेड यांनी दिनांक २१ जानेवारी, २००८ रोजी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. दरसुचीतील सर्वसाधारण सुचना क्रमांक २.६ नुसार दर निश्चीती केलेली असल्यामुळे रुपये ८३८६.८४/- दर वाढवून दिलेला नाही. त्यामुळे जादा प्रदान झालेले नाही.

८) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, आक्षेपात नुमुद करण्यात आलेली विमा रक्कम रुपये १०२/- ऐवजी रुपये ३००/- संबंधित कंत्राटदार यांनी दिनांक १९ ऑक्टोबर, २०१५ रोजी शासन खाती भरणा केलेली आहे.

९) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, दरसुची २००७-०८ मधील पृष्ठ क्रमांक ०२ वरील नोट क्रमांक ४ (C) नुसार डांबराचा बाजारभाव दरातील फरक निश्चीत करुन मा. अधिक्षक अभियंता यांनी अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. दरसुचीमधील डांबराचा मुळ दर रुपये २३,८४९/- आणि दिनांक ३१ डिसेंबर, २००७ रोजीचा डांबराचा बाजारभाव रुपये ३२,२३५.८४/- त्याचे दरपृथ्थकरण खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| मुळ डांबराचा दर | - | २४६००.००/- |
| एक्साईज डयुटी | - | ३९३६.००/- |
| शैक्षणिक कर सेस | - | ११८.०८/- |
| व्हॅट | - | ३५८१.७६/- |
| एकूण दर | - | ३२२३५.८४/- |

अंदाजपत्रकास अधीक्षक अभियता सा. बा. मंडळ नांदेड यांनी दिनांक २१ जानेवारी, २००८ रोजी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. दरसुचीतील सर्वसाधारण सुचना क्रमांक २.६ नुसार दर निश्चीती केलेली असल्यामुळे रुपये ८३८६.८४/- दर वाढवून दिलेला नाही. त्यामुळे जादा प्रदान झालेले नाही.

१०) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, सदरील कामाच्या परिशिष्ट ब सोबत परिशिष्ट अ दिलेले नाही. म्हणजेच साहित्य खात्यामार्फत पुरवठा करण्यात येत नसल्यामुळे मोजमाप पुस्तिकेत डांबर उपयोगीता प्रमाणपत्र नोंदविलेले नाही. तथापि, डांबर वापर विवरणपत्र कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांच्याकडून प्रमाणित केलेले आहे.

११) कामाबाबत संपुर्ण माहिती असलेला फलक प्रत्यक्षात काम करताना लावलेला असून त्यांची नोंद मोजमाप पुस्तिका क्रमांक ५६ पृष्ठ क्रमांक ५५३४ वर घेतलेली आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.३०६ (सन २००८-०९) :-**

**पालम येथे वार्ड क्रमांक ५ पठाण गल्लीमध्ये सि.सि. रोड व नाली बांधकाम करणे या कामातील अनियमिततेबाबत.**

पालम येथे पठाण गल्ली वार्ड क्रमांक ५ मध्ये सि.सि. रोड व नाली बांधकाम करणे कामी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद यांनी परभणी यांनी रु.५.०० लक्षास तांत्रिक मंजूरी व मा.जिल्हाधिकारी परभणी यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करुन आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत कामावर रु.४,८१,३८९/- खर्च केला आहे. याबाबत खालील अभिप्राय आहेत.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १५३ नुसार अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक आहे. परंतू कमी जादा काम करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेतलेली नाही.

२) सदरचे काम यापुर्वी कोणत्या योजनेतून केले आहे किंवा त्याची दुरुस्ती करणे बाबत अंदाजपत्रकातील सर्वसाधारण अहवालामध्ये उल्लेख नाही.

३) प्रशासकीय आदेशातील अट क्रमांक ६ नुसार काम पुर्ण झाल्यावर दर्शनी भागावर सदरचे काम स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेण्यात आल्याचे नामफलक आमदारांच्या नावासह लावण्यात आला नाही.

४) प्रशासकीय आदेशातील अट क्रमांक ८ नुसार मंजूर केलेले काम शासकीय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या व ताब्यात असलेल्या जागेतच घेणे आवश्यक आहे व तसे प्रमाणपत्र काम सुरु करण्यापुर्वी संबंधित यंत्रणेने प्राप्त करुन जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे.परंतू अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

५) प्रशासकीय आदेशातील अट क्रमांक ११ नुसार निधी उपलब्ध असल्याशिवाय काम सुरु करावयाचे नाही. परंतू निधी उपलब्ध नसतांना कामाचे आदेश दिलेले आहेत.

६) अंदाज पत्रकातील खाडाखोड/उपरीलेखन आहे. परंतू त्यास सक्षम अधिकाऱ्याचे साक्षांकन केलेले नाही.

७) करारनामा कोरा आहे व त्यावर कंत्राटदार व कार्यकारी अभियंता यांच्या सहया नाहीत. म्हणून सदरचा करारनामा विधी ग्राहय होत नाही.

८) देयकासोबत कामावर वापरलेले सिमेंट खडीचे चाचणी अहवाल नाहीत.

९) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ९७ व १९७ नुसार पुर्ण झालेल्या कामाची नोंद नमुना नं. ३९ व ६९ मध्ये घेणे आवश्यक आहे. परंतू अशा नोंद घेण्यात आलेल्या नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सदर प्रस्तावित रस्ता हा ग्रामपंचायतीच्या हद्दीतील आहे. अंदाजपत्रक तयार करतेवेळेस प्रत्यक्ष रस्त्यावर अस्तित्वातील सोंलीगचा थर असल्यामुळे त्यामधील ३५% खड्डे भरणे करीता सोलींग  व मुरुम दबाईसहीत प्रस्तावित होते. परंतू प्रत्यक्ष काम सुरु करण्यापुर्वी कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी दिनांक ०५ ऑक्टोबर २००८ रोजी प्रत्यक्ष मोक्यावर जाऊन कामाची पाहणी करुन गरजेनुसार काम करण्याच्या सुचना निरिक्षण टिप्पणीद्वारे दिल्या व सदर काम प्रशासकीय मान्यतेपेक्षा जादा होणार नाही याची दक्षता घेणेबाबत सुचित केले व त्या नुसार काम करुन घेण्यात आले आहे.

२) याबाबत सादर करण्यात येते की, अस्तित्वातील रस्ता यापुर्वी ग्रामपंचायतीच्या निधीतुन करण्यात आलेला आहे असे ग्रामपंचायत पालमने प्रमाणीत केलेले आहे.

३) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, मुळ अंदाजपत्रकात नामफलकाची तरतुद केलेली नसल्यामुळे नामफलक बसविण्यात आलेला नाही. पंरतु ग्रामपंचायतीने सदर कामाचा नामफलक लावण्यात आलेला आहे असे प्रमाणपत्र दिले आहे.

४) अंदाजपत्रकातील लोकेशन प्लॅन वार्ड क्रमांक ५ हा ग्रामपंचायत हद्दीतील असल्याबाबत संबधित ग्रामपंचायत पालम, यांचा नमूना नं २६ चा उतारा हा आक्षेपानंतर प्राप्त करुन घेऊन संचिकेत ठेवण्यात आला आहे.

५) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती परभणी यांच्याकडे आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्ध झाल्यानंतर प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात येतात. प्रशासकीय मान्यतेनुसार २ टप्प्यात जिल्हाधिकारी यांच्याकडून निधी प्राप्त होतो. सदरील कामासाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यामुळे सदर कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.

६) अंदाजपत्रकातील खाडाखोड व उपरीलेखनाबाबत तत्कालीन उप अभियंता व शाखा अभियंता यांनी साक्षांकन केलेले नव्हते. तथापि आता संबधित उपअभियंता व कार्यकारी अभियंता (बांध) यांनी सदर नोंदीना प्रमाणित केलेले आहे.

७) आता करारनामा पुर्ण करुन ठेकेदाराची व कार्यकारी अभियंता बांधकाम यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे.

८) गुणवत्ता चाचणी अहवाल क्रमांक १२५८ दिनांक १७ डिसेंबर २००८ नुसार सिमेंट वापर नमुन्यामध्ये सिमेंट चांगल्या प्रतीचे असल्याबाबत प्रमाणित करण्यात आलेले आहे. आणि क्रमांक १२५७/१ दिनांक १७ डिसेंबर २००८ नुसार खडीचा चाचणी अहवाल उपलब्ध आहे.

९) सदर कामाची नोंद नमुना क्रमांक ६९ ला पृष्ठ क्रमांक (२७) वर घेण्यात आलेली आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.३०७ (सन २००८-०९) :-**

**मौजे फळा ता. पालम येथे भक्त निवास बांधकामातील अनियमिततेबाबत.**

मौ.फळा ता.पालम येथे भक्तनिवास बांधकामावर रु. ३,०६,४८०/- एवढा खर्च खासदार स्थानिक विकास कार्यक्रमातंर्गत करण्यात आलेला आहे. सदर कामास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद परभणी यांनी प्रशासकीय मान्यता व कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी रु ५.०० लक्षची तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) शासन अधिसुचना ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक झेडपीए २०००/प्रक्र.४०२३/३३ दि. १२ जानेवारी, २००१ अन्वये व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ४ खालील परिशिष्ट (२) नुसार कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी निविदा किंवा कंत्राट स्विकारल्यामुळे दिलेल्या मान्यतेची माहिती पुढील स्थायी समिती / विषय समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

२) सन २००६-०७ या वित्तीय वर्षातील अखर्चित निधी सन २००८-०९ मध्ये खर्च करण्याची परवानगी लेखापरिक्षणास पाहावयास मिळालेली नाही.

३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रमांक झेडपीए २००० प्र.क्र.१८/३३ दिनांक १९ जानेवारी, २००१ नुसार ग्रामपंचायत स्वतःजी कामे करील त्यातील ५% इतकी रक्कम बचत करुन ग्राम निधीत जमा करील परंतु अशी रक्कम जमा केली नाही. तरी ५% प्रमाणे रक्कम रुपये ४७,०९७/- वसूल करुन भरणा करणे आवश्यक आहे.

४) करारनामा सुरक्षा रक्कमेच्या ३% मुल्याच्या मुद्रांक पेपरवर करावयाचे आहे. प्रस्तुत प्रकरणात रुपये ३००/- चा कमी मुद्रांक पेपर वापरलेला आहे. तरी संबंधित गुत्तेदाराकडून सदर रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १५३ नुसार अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक आहे. परंतु कमी जादा काम करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेतलेली नाही.

६) देयकासोबत कामावर वापरलेले सिमेंट, खडीचे चाचणी अहवाल नाही.

७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ९७ व १९७ नुसार पुर्ण झालेल्या कामाची नोंद नमुना क्रमांक ३९ व ६९ मध्ये घेणे आवश्यक आहे. परंतु अशा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, सदर काम हे मराठवाडा विकासाचा कालबध्द कार्यक्रम अंतर्गत मंजूर आहे. सदर बाबतची माहिती पुढील सभेत ठेवण्यात आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. याबाबत यापुढे दक्षता घेण्यात येत आहे.

२) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक विकास २००७ / पक्र. ५९०/यो-७ मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दिनांक १ ऑक्टोबर, २००८ अन्वये सन २००६-०७ चा अखर्चीत निधी सन २००८-०९ या आर्थिक वर्षात खर्च करण्यास परवानगी देण्यात आली होती. त्यानुसार खर्च करण्यात आला.

३) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, शासन निर्णयानुसार एकुण कामाच्या ५% रक्कम ग्रामनिधीत भरणा करणे बाबत या कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र जिप/बांध/आस्था/कावी/३१६८/१५ दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ अन्वये पत्र देवुन सरपंच व ग्रामसेवक ग्रा.प.फळा यांचेकडून अहवाल व खुलासा मागविण्यात आला होता त्यानुसार ३० सप्टेंबर, २०१५ नुसार रुपये ४७,०९७/- रक्कम ग्रामनिधीत जमा केली असल्याबाबत कळविले आहे.

४) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, सुरक्षा रक्कमेच्या ३% मुल्याचे मुद्रांक शुल्क रुपये ९००/- पैकी रुपये ६००/- रक्कमेचा मुद्रांक शुल्कावर करारनामा करण्यात आलेला आहे. आक्षेपात नमुद केल्यानुसार उर्वरित रुपये ३००/- सरपंच ग्रामपंचायत फळा ता. पालम यांचेकडून वसूल करुन स्टेट बँक ऑफ हैद्राबाद चलन क्रमांक ५५ दिनांक १९ सप्टेंबर, २०१५ रोजी शासनास भरणा करण्यात आलेली आहे.

५) आक्षेपाच्या अनुषगांने अनुपालन सादर करण्यात येते की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ११८ अन्वये कार्यकारी अभियंता बांधकाम जिल्हा परिषद परभणी यांची निरीक्षण टिप्पणी दिनांक २५ जानेवारी, २००८ अन्वये व ग्रामपंचायत चे सहमतीने कमी / जास्त कामास मान्यता घेवुन काम करण्यात आलेले आहे. व अंतीम देयकासोबत कमी / अधिक खर्च विवरणपत्र जोडण्यात आले असुन त्यास कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी मान्यता दिली आहे.

६) कामावर वापरण्यात आलेल्या सिमेंट व खडीचे चाचणी अहवाल जोडण्यात आलेले आहेत.

७) सदर कामाची नोंद नमुना क्रमांक ६९ ला पृष्ठ क्रमांक (२९) वर घेण्यात आलेली आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.३०८ (सन २००८-०९) :-**

**प्रजिमा ४ ते एस.टी.बी.टी. वझर बु सायखेडा किमी ०/०० ते ३/०० रस्त्याची सुधारणा करणे.**

जिल्हा परिषद परभणीने उपरोक्त कामावर रु.१७,९५,६०७/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) कामाचे निविदा रक्कमेच्या संपुर्ण एक टक्का रक्कम रुपये १७,९५६/- वसूल करुन एक रक्कमी शासकीय विमा संचालनालयाकडे पाठविणे आवश्यक आहे. तथापि, विमा निधीची रक्कम केलेल्या वेगवेगळया कामाच्या दोन देयकामधुन कपात केलेली आहे.

२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रमांक झेडपीए. २००५/पक्रं./३१५/वित्त/९ दिनांक २४ नोव्हेंबर, २००५ नुसार रुपये ५.०० लक्ष ते ५० लक्ष मधिल कामाची निवीदा प्रसिध्दी राज्य स्तरावरील मराठी वर्तमानपत्रात करणे आवश्यक होते. त्यानुसार बांधकाम विभागाने योग्य दर्जाचे वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्दी केलेली नाही. तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रमांक कमाअ-२००५ तक्रं.२०८/जल-२४ दिनांक ३० एप्रिल, २००६ नुसार रु. ५.०० लक्षापुढील कामाच्या निविदा शासनाचे वेबसाईटवर प्रसिध्द करणे आवश्यक होते. उक्त निर्णयानुसार बांधकाम विभागाने कार्यवाही केलेली नाही.

३) शासन निर्णय महसुल व वन विभाग क्रमांक गोखनि.१०/० २०६/प्रक्र.५७/ख दिनांक १५ डिसेंबर, २००६ नुसार सदर कामावर रॉयल्टीची रक्कम रुपये ४८,२८५/- वसूल करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात केवळ रुपये २३,०५८/- वसूल केली आहे. रुपये २५,२२७/- ने रॉयल्टी कमी कपात केलेली आहे. सबब रक्कम रुपये २५,२२७/- सबंधीत गुत्तेदाराकडून वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

४) मोजमाप पुस्तिकेतील मोजमाप नोंदविल्याचे दिनांक उप अभियंता यांनी नोंदविलेले नाहीत.

५) सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक २१७ नुसार निविदा मंजुरीनंतर ८ दिवसात कामाचे आदेश देणे आवश्यक असताना दोन महिन्यानंतर दिलेले आहेत.

६) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ९७ व १९७ नुसार पुर्ण झालेल्या कामाची नोंद नमुना नंबर ३९ व ६९ मध्ये घेणे आवश्यक आहे. परंतु अशा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. पुर्तता होणे आवश्यक आहे.

७) लिडचार्ट व खदान चार्टला कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित केलेले नाही म्हणुन दिलेली लिड बरोबर असल्याची खात्री होत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) आक्षेपाच्या अनूषंगाने सादर करण्यात येते की विमा निधीची पुर्ण रक्कम एक टक्का एक रक्कमी कपात करुन रु १७९५६/- विमा संचालनालयाकडे पाठविणे आवश्यक होते. तथापि, सदर देयकाची अदाई ही दोन धावत्या देयकाव्दारे करण्यात आलेली आहे. ज्यामध्ये प्रथम धावते देयकामधुन (रु. ४,६६,८९७/- चे देयक) एक टक्का रक्कम रुपये ४,६६९/- आणि दुसरे व अंतिम देयका मधुन (रुपये १३,२८,७१०/- चे देयक) विमा रक्कम रूपये १३,२८७/- असे एकूण १७,९५६/- देयकामधुन कपात करण्यात आली आहे व निविदा रक्कम रुपये १७,९५,६०७/- रक्कमेच्या एक टक्का रक्कम रुपये १७,९५६/- शासकीय विमा संचनालयाकडे भरणा करण्यात आलेला आहे.

२) आक्षेपाच्या अनुषंगाने अनूपालन सादर करण्यात येते की, विविध विकास कामांच्या जाहिराती वर्तमानपत्रात देण्यासाठी शासननिर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक झेडपीए २००५/ प.क्रं. ३६६/ वित्त -९ दिनांक ०५ फेब्रुवारी, २००८ मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषदेच्या जाहिराती वितरण करण्याचे अधिकार हे जिल्हा माहिती अधिकारी/विभागीय माहिती अधिकारी / मुख्यालय यांना दिलेले आहेत. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या विविध विकास कामाच्या जाहिराती जिल्हा माहिती अधिकारी यांचेकडे पाठविण्यात येत होत्या त्यांनी जाहिराती दिल्यानुसारच जिल्हा परिषदेने कार्यवाही केलेली आहे. सदर कामाची जाहिरात ही गोदातरंग व अमृतवाणी या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्या कालावधीत जिल्हा परिषदेची संकेतस्थळ नसल्यामुळे कामाची निविदा संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली नाही.

३) सदरील कामाच्या पहिल्या धावत्या देयकातुन रुपये ६५,४४०/- व दुसरे अंतिम देयकातुन रुपये २३,०५८/- अशी एकूण ८८,४९८/- रक्कमेची कपात गौण खनिजापोटी देयकातुन कलेली आहे. अंदाजपत्रकानुसार करण्यात आलेली कपात बरोबर आहे. त्यामुळे आक्षेपानुसार रक्कम वसूलपात्र नाही.

४) मोजमाप पुस्तिकेतील मोजमाप नोंदविल्याचे दिनांक उप अभियंता यांनी नोंदविलेले नाहीत.

ही वस्तुस्थिती आहे.

५) आक्षेपाच्या अनुषगांने अनुपालन सादर करण्यात येते की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम १२६ नुसार सदर कामाची निविदा स्वीकारण्याचे अधिकार स्थायी समितीस आहेत. त्यानुसार सदर कामाच्या निविदा प्रस्तावास ठराव क्रं. ७५ दिनांक १९ एप्रिल, २००८ च्या स्थायी समितीने मान्यता दिली. निविदा शाखेने, प्रस्ताव मान्य झाल्यानुसार दिनांक ०९ जुलै, २००८ रोजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेनुसार कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

६) सदर कामाची नोंद नमुना क्रमांक ६९ ला पृष्ठ क्रमांक (२७) वर घेण्यात आलेली आहे.

७) आक्षेपात नमुद केल्यानुसार कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचेकडून खदान चार्ट प्रमाणित केलेला नाही. परंतु उप अभियंता (बांधकाम) यांनी खदान चार्ट प्रमाणित केलेला आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, देयकाचे प्रदान करताना गौण खनिजाची संपूर्ण रक्कम का वसूल करण्यात आली नाही, गौण खनिजाची परिगणना करण्यात आली नव्हती काय, लेखापरीक्षकांनी कमी कपात निदर्शनास आणून दिल्यानंतर दिर्घ विलंबाने रक्कम वसूल करण्याचे प्रयोजन काय, तात्काळ वसुलीची कार्यवाही का केली  नाही.

यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी खुलासा केला की, गौण खनिजाची रक्कम रुपये ५४,२९२/- व ५,७९४/- वसूल करण्यात आली आहे. तसेच उर्वरित रक्कम रुपये ३१,३५६/- संबंधितांकडून वसूल करुन दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ रोजी शासन खाती भरणा करण्यात आली आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, लेखापरिक्षकांच्या लक्षात आले म्हणून आपण ही वसुली करु शकलो. अन्यथा, एवढ्या रकमेचा महसूल बुडाला असता. लेखापरिक्षक सर्व प्रकरणे तपासू शकत नाहीत. त्यामुळे अशा प्रकारची अनेक प्रकरणे असतील. त्यावेळी कार्यकारी अभियंता कोण होते, त्यांच्या किंवा त्यांच्या अधिनस्त अन्य अधिकाऱ्यांच्या ही बाब का लक्षात आली नाही, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या देखील ही बाब लक्षात आली नाही. लेखापरिक्षकांनी लक्षात आणून दिल्यानंतर अधिकाऱ्यांनी वसुली करावी, असे आहे का, किंवा ही चुक जाणुनबुजून केली आहे का, या प्रकरणी वसुली झाली म्हणजे आपण सुटलो असे नाही. संबंधितांवर कारवाई देखील झाली पाहिजे.

तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, अनुक्रमांक ८, ९, १०, ११, १२, १३ व १४ (परिच्छेद क्रमांक ३.३०२, ३.३०३, ३.३०४, ३.३०५३.३०६, ३.३०७, ३.३०८) यामध्ये फार मोठ्या प्रमाणावर अनियमितता दिसून येत आहेत. केवळ रक्कम वसूल केली म्हणजे कार्यवाही झाली, असे नाही. ही कामे पार पाडीत असताना किंवा देयक अदा करीत असताना अनेक अधिकाऱ्यांच्या हाताखालुन ती नस्ती जात असते. त्यामुळे एका अधिकाऱ्याच्या तरी ही बाब लक्षात यावयास हवी होती. परंतु, ही रक्कम जाणुनबुजून कापण्यात आलेली नाही, असे प्रथमदर्शनी तरी दिसून येत आहे. त्याचप्रमाणे समितीने यापूर्वी सांगितलेल्या अन्य परिच्छेदांमध्ये देखील अनेक अनियमितता दिसून येत आहेत. या परिच्छेदांबाबतची प्रश्नावली समितीकडून मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येईल. या सर्व परिच्छेदांबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करावी, संबंधित सर्व अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी, दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी व पूर्तता अहवाल एक महिन्याच्या आत समितीला सादर करावा. तसेच अनुक्रमांक ८, ९, १०, ११, १२, १३ व १४ बाबत विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

परिच्छेद क्र. ३.३०२, ३.३०३, ३.३०४, ३.३०५, ३.३०६, ३.३०७ व ३.३०८ यामध्ये अनियमितता झाल्याने या प्रकरणी समितीने निदेश दिल्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी केली आहे काय, असल्यास उक्त चौकशीत काय आढळुन आले आहे, त्यानुसार सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केलेली आहे काय, असल्यास त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**१) परि.क्र. ३.३०२, (सन २००८-०९) :-**

**एमएसएच-२ ते पेठशिवणी रस्त्याची सुधारणा करणे यात झालेल्या अनियमीततेबाबत.**

मा.पंचायती राज समितीने दिलेल्या निर्देशानुसार एमएसएच-२ ते पेठशिवणी रस्त्याची सुधारणा करणे या कामी झालेल्या अनियमिततेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी चौकशी समिती नेमली. समितीने सदर कामी गौण खनिज रक्कम उशिराने भरणे, खदान चार्ट प्रमाणित न करणे, डांबर विवरणपत्र लेखापरिक्षणास न दर्शविणे अशा अनियमितता झाल्याचे नमुद केले आहे. सदर आक्षेपाप्रमाणे सदरिल कामाची स्वामित्व धनाची रक्कम रु.९१,४४२/- पैकी प्रथम धावते देयकामधून रु.५४,२९२/- आणि दिवतीय व अंतिम देयकातुन रु.५,७९४/- असे एकूण रु.६०,०८६/- कपात करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम रु.३१,३५६/- संबंधिताकडून वसूल करुन दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ रोजी शासनखाती भरणा करण्यात आली आहे. सदर कामामध्ये शासनाचे आर्थिक नुकसान झालेले नाही. तथापि अशा चुकीची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. पैकी तत्कालिन कार्यकारी अभियंता (बांधकाम), श्री.जी.एस.खाडे व उप अभियंता, श्री.एस.एन.गोडसे हे सेवानिवृत्त झाले आहेत. तसेच संबंधित शाखा अभियंता, श्री.एस.यु.बांगर आणि वरिष्ठ सहाय्यक, एस. एम. पाटील यांना कर्तव्यात कसूर येऊ नये करिता ताकीद देण्यात आली आहे.

**२) परि.क्र. ३.३०३, (सन २००८-०९) :-**

**रामा.२२० ते जोगवाडा रस्ता किमी १/४०० ते २/५०० मजबुतीकरण व डांबरीकरण कामातील अनियमितता.**

मा.पंचायती राज समितीने दिलेल्या निर्देशानुसार सदर कामी झालेल्या अनियमिततेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी चौकशी समिती नेमली. समितीने सदर कामी कामाचे वेळी करारनामा पुर्ण नसणे, विमा रक्कम उशिराने शासनखाती भरणा करणे, अशा अनियमितता झाल्याचे नमुद केले आहे. सदर आक्षेपामध्ये कामाची विमा रक्कम रु.५,३९७/- संबंधिताकडून वसूल करुन दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१५ रोजी शासनखाती भरणा करण्यात आली आहे. सदर कामामध्ये शासनाचे आर्थिक नुकसान झालेले नाही. तथापि अशा चुकीची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. पैकी तत्कालिन कार्यकारी अभियंता (बांधकाम) श्री.खाडे जी.एस. हे सेवानिवृत्त झाले असून उप अभियंता श्री.पी.जी.खडेकर यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली

आहे. तसेच संबंधित शाखा अभियंता श्री.पी.एन.परभणीकर आणि वरिष्ठ सहाय्यक एस. एम. पाटील यांना कर्तव्यात कसुर येऊ नये करिता ताकीद देण्यात आली आहे.

**३) परि.क्र. ३.३०४, (सन २००८-०९) :-**

**रा.मा -२१७ बोरी वाघी - जवळा रस्ता तालुका जिंतुर किमी ३/५०० ते ७/०० रस्त्याची सुधारणा करणे या कामातील अनियमिततेबाबत**

मा.पंचायती राज समितीने दिलेल्या निर्देशानुसार सदर कामी झालेल्या अनियमिततेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी चौकशी समिती नेमली. समितीने सदर गौण खनिजाची रक्कम कमी वसूल करणे आणि प्रत्येक टप्प्यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांची तपासणी नसणे अशा अनियमितता झाल्याचे नमुद केले आहे. सदर आक्षेपामध्ये कामाची स्वामित्वधनाची रक्कम रु.४२,९३८/- ही पैकी देयकामधुन रु.७,२७५/- कपात करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम रु. ३५,६६३/- संबंधिताकडून वसूल करुन दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ रोजी शासनखाती भरणा करण्यात आली आहे. सदर कामामध्ये शासनाचे आर्थिक नुकसान झालेले नाही. तथापि अशा चुकीची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. पैकी तत्कालिन कार्यकारी अभियंता (बांधकाम), श्री.खाडे जी.एस. हे सेवानिवृत्त झाले असून उप अभियंता, श्री.पी.जी.खडेकर यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. तसेच संबंधित शाखा अभियंता, श्री.बी.एस.सामाले यांना कर्तव्यात कसूर येऊ नये करिता ताकिद देण्यात आली आहे.

**४) परि.क्र. ३.३०५ (सन २००८-०९) :-**

**रा.मा. २१७ ते आंबेटाकळी ते दामपुरी रस्ता किमी ३/०० ते ५/०० मजबुतीकरण व डांबरीकरण कामातील अनियमिततेबाबत.**

मा.पंचायती राज समितीने दिलेल्या निर्देशानुसार सदर कामी झालेल्या अनियमिततेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी चौकशी समिती नेमली. समितीने सदर करारनामा अपुर्ण असणे, कामाचे आदेश उशिराने देणे, विमा रक्कम कमी भरणे अशा अनियमितता झाल्याचे नमुद केले आहे. सदर आक्षेपामध्ये कमी वसूल केलेली विमा रक्कम रु.१०२/- ऐवजी रु.३००/- संबंधिताकडून वसूल करुन दिनांक १९ ऑक्टोबर, २०१५ रोजी शासनखाती भरणा करण्यात आली आहे. सदर कामामध्ये शासनाचे आर्थिक नुकसान झालेले नाही. तथापि अशा चुकीची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. पैकी तत्कालिन कार्यकारी अभियंता (बांधकाम), श्री.खाडे जी.एस. हे सेवानिवृत्त झाले असून उप अभियंता, श्री.पी.जी.खडेकर यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे तसेच संबंधित शाखा अभियंता, श्री.बी.एस.सामाले आणि वरिष्ठ सहाय्यक, एस.एम.पाटील यांना कर्तव्यात कसूर येऊ नये करिता ताकिद देण्यात आली आहे.

**५) परि.क्र. ३.३०६ (सन २००८-०९) :-**

**पालम येथे वार्ड क्रमांक ५ पठाण गल्ली मध्ये सि.सि. रोड व नाली बांधकाम करणे या कामातील अनियमिततेबाबत.**

मा.पंचायती राज समितीने दिलेल्या निर्देशानुसार सदर कामी झालेल्या अनियमिततेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी चौकशी समिती नेमली. समितीने सदर कामी जागा मालकीची असणेबाबत प्रमाणपत्र सादर न करणे, अंदाजपत्रकात उपरी लेखन करणे, करारनामा अपुर्ण असणे, अशा अनियमितता झाल्याचे नमुद केले

आहे. या अनियमिततांबाबत सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. पैकी तत्कालिन कार्यकारी अभियंता (बांधकाम), श्री.जी.एस.खाडे व उप अभियंता, श्री.एस.एन.गोडसे हे सेवानिवृत्त झाले आहेत. तथापि, अशा प्रकारच्या त्रुटी पुन्हा राहणार नाही यासाठीसंबंधित शाखा अभियंता, श्री.आर.यु.सावंत आणि वरिष्ठ सहाय्यक, एस.एम.पाटील यांना ताकिद देण्यात आली आहे.

**६) परि.क्र. ३.३०७ (सन २००८-०९) :-**

**मौजे फळा ता. पालम येथे भक्त निवास बांधकामातील अनियमिततेबाबत.**

मा. पंचायती राज समितीने दिलेल्या निदेशानुसार सदर कामी अनियमिततेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी चौकशी समिती नेमली. समितीने सदर कामी ५ टक्के ग्रामनिधी भरणा उशिराने करणे, मुद्रांक शुल्क कमी भरुन घेणे अशा अनियमितता झाल्याचे नमुद केले आहे. सदर आक्षेपामध्ये शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०००/प्र.क्र.१८/३३ दिनांक १९ जानेवारी, २००१ नुसार ग्राम पंचायत स्वत:ची कामे करिल त्यातील ५ टक्के इतकी रक्कम बचत करुन ग्राम निधीत जमा करिल परंतू अशी रक्कम जमा केली नसल्याचे आक्षेपात नमुद आहे त्यानुसार ग्रामपंचायतीने कामाची ५ टक्के रक्कम रु.४७,०९७/- दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ नुसार ग्रामनिधीत जमा केलेली आहे व कामाचा करारनामा हा सुरक्षा रकमेच्या ३ टक्के मुल्याचे मुद्रांक रु.९००/- वर करणे आवश्यक होता. करारनामा हा रु.६००/- रकमेच्या मुद्रांक शुल्कावर करण्यात आला होता. उर्वरित रक्कम रु.३००/- दिनांक १९ सप्टेंबर, २०१५ अन्वये शासन खाती भरणा करण्यात आलेला आहे. सदर कामामध्ये शासनाचे आर्थिक नुकसान झालेले नाही. तथापि अशा चुकीची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. पैकी तत्कालिन कार्यकारी अभियंता (बांधकाम), श्री.जी.एस.खाडे व उप अभियंता, श्री.एस.एन.गोडसे हे सेवानिवृत्त झाले आहेत. तसेच संबंधित शाखा अभियंता, श्री.एन.एम.चौधरी यांना कर्तव्यात कसूर येऊ नये करिता ताकिद देण्यात आली आहे.

**७) परि.क्र. ३.३०८ (सन २००८-०९) :-**

**प्रजिमा ४ ते एस.टी.बी.टी. वझर बु सायखेडा किमी ०/०० ते ३/०० रस्त्याची सुधारणा करणे.**

मा.पंचायती राज समितीने दिलेल्या निर्देशानुसार सदर कामी झालेल्या अनियमिततेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी चौकशी समिती नेमली. समितीने सदर विमा निधीची रक्कम एकरक्कमी वसूल न करणे, मोजमाप पुस्तिकेतील मोजमापांवर उप अभियंता यांनी दिनांकीत स्वाक्षरी न करणे, लिड चार्ट व खदान चार्ट कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी प्रमाणित न करणे अशा अनियमितता झाल्याचे नमुद केले आहे. सदर आक्षेपामध्ये विमा रक्कम प्रथम धावते देयकामधून रु.१७,९५६/- कपात करणे आवश्यक असतांना प्रथम धावते देयकातून रु.४,६६९/- व दुसरे व अंतिम देयकातून रु.१३,२८७/- असे एकूण रु.१७,९५६/- कपात करण्यात आली आहे व सदर कामाची स्वामित्व धनाची रक्कम रु.४८,२८५/- वसूल करणे आवश्यक असतांना रु.२३,०५८/- वसूल केली आहे. रु.२५,२२७/- कमी कपात केल्याबाबत आक्षेपात नमुद आहे. परंतु प्रथम धावते देयकातुन रु.६५,४४०/- व दुसरे व अंतिम देयकातून रु.२३,०५८/- अशी एकूण रु.८८,४९८/- रकमेची कपात देयकातुन करुन शासनखाती भरणा करण्यात आलेली आहे. सदर कामामध्ये शासनाचे आर्थिक नुकसान झालेले नाही. तथापि अशा चुकीची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. पैकी तत्कालिन कार्यकारी अभियंता (बांधकाम), श्री.खाडे जी.एस. हे सेवानिवृत्त झाले असून उप अभियंता, श्री.पी.जी.खडेकर यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. तसेच संबंधित शाखा अभियंता, श्री.बी.एस.सामाले यांना कर्तव्यात कसूर येऊ नये करिता ताकिद देण्यात आली आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (बांधकाम-३) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ८ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, परिच्छेद क्र. ३.३०२, ३.३०३, ३.३०४, ३.३०५, ३.३०६, ३.३०७ व ३.३०८ यामध्ये अनियमितता झाल्याने या प्रकरणी समितीने निदेश दिल्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी केली आहे काय, असल्यास उक्त चौकशीत काय आढळुन आले आहे, त्यानुसार सर्व संबंधीत अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित केलेली आहे काय, असल्यास त्यानुसार दोषी अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यामध्ये काही आक्षेप आले होते. यासंदर्भात कार्यवाही झालेली असून चौकशी समितीचा अहवाल सादर केलेला आहे.

यावर समितीने विचारणा केली की, या ठिकाणी असे दिलेले आहे की, संबंधित शाखा अभियंता श्री. एस.यु. बांगर आणि वरिष्ठ सहाय्यक श्री. एस.एम. पाटील यांना कर्तव्यात कसूर होऊ नये करिता ताकीद देण्यात आलेली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, महोदय, यामध्ये समितीने चौकशी केली होती. परंतु काही किरकोळ बाबी निघाल्या होत्या. यावर समितीने निदेश दिले की, कर्तव्यात कसूर केलेली आहे, अशी ताकीद दिली पाहिजे. कर्तव्यात कसूर करू नये, म्हणून ताकीद दिली जात नाही. यापुढे अशा बाबी करू नये, अशी ताकीद देण्यात यावी व असा उल्लेख त्यामध्ये करण्यात यावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले.

## अभिप्राय व शिफारशी

परभणी जिल्हा परिषदेअंतर्गत रस्ते, भक्त निवास इत्यादी बांधकामातील अनियमिततेप्रकरणी लेखा परिक्षकांनी अनुक्रमे पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविले आहेत परिच्छेद क्र.३.३०२, सन २००८-२००९ एमएसएच-2 ने पेठशिवणी सेलू, तालुका पालम (ओडीआर-३) रस्त्याची किमी ०/०० ते १/०० सुधारण करणेबाबत रूपये १९,९०,०००/- रक्कमेचे अंदाजपत्रक असून या कामावार रूपये १९,५८,३९८/- इतका खर्च केला आहे. महसूल व वन विभागाच्या दिनांक १२ डिसेंबर, २००६ रोजीच्या शासन निर्णयानुसार गौण खनिजापोटी रूपये ९१,४४२/- एवढी रक्कम वसूल करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात रूपये ५४२९२/- कपात केली आहे. रूपये ३७१५०/- एवढी रक्कम संबंधित गुत्तेदाराकडून वसूल करून शासनास भरणा करणे आवश्यक आहे. दरसूचीनुसार १७४९६/- रूपये जादा प्रदान गुत्तेदाराकडून वसूल करणे आवश्यक होते. वाढीव दारापोटी रूपये २७०००/- चे जादा प्रदान झाले आहे. संबंधित गुत्तेदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. डांबर दरसूची बाब क्रमांक ६७३ नुसार मूळ परिमाण १८५.६३ घ.मी. असताना ते १६८.७५ घ.मी. दर्शवून १६.८८ घ.मी. ने कमी घेवून काम केले आहे. कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचेकडून खदान चार्ट प्रमाणित केलेला नाही. मोजमाप पुस्तिकेत डांबर उपयोगिता प्रमाणपत्र नोंदविलेले नाही. तथापि, डांबर वापर विवरणपत्र कार्यकारी अभियंता यांच्याकडून प्रमाणित केलेले आहे.

**परिच्छेद क्र.३.३०३**

रा.मा. २२० ते जोगवाडा रस्ता किमी १/४०० ते २/५०० मजबुतीकरण व डांबरीकरण कामातील अनियमिततेप्रकरणी पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविलेले आहेत. जिल्हा परिषद परभणी अंतर्गत बांधकाम विभागाने सदर कामाचे रूपये १४,८९,६००/- चे अंदाजपत्रक बनवून अधीक्षक अभियंता (सार्वजनिक बांधकाम) यांनी तांत्रिक मान्यता दिलेली आहे आणि धावते देयकाद्वारे रूपये ४९,०६६/- प्रदान केले आहे. ग्रामविकास विभागाच्या दिनांक २४ नोव्हेंबर, २००५ रोजीच्या शासन निर्णयानुसार रूपये ५ ते ५० लक्ष कामाची निविदा राज्यस्तरावरील मराठी वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक होते त्यानुसार निविदा प्रसिध्द केली नाही. दिनांक ३० एप्रिल, २००६ रोजीच्या शासन निर्णयानुसार रूपये ५ लक्ष पुढील कामाची निविदा शासनाचे संकेत स्थळावर प्रसिध्द करणे आवश्यक असतानाही तशी कार्यवाही केलेली नाही.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १५३ नुसार अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक आहे. तथापि, नियमानुसार कार्यवाही झालेली नाही. वरील अधिनियमानुसार रूपये १ लक्ष वरील मूळ बांधकामाच्या मोजमापाची किमान ५ टक्के तपासणी कार्यकारी अभियंता यांनी बांधकाम पूर्ण होण्याच्या काळात ५०,०००/- चे प्रत्येक टप्प्याच्या बाबतीत केलेली नाही. करारनाम्यावर कंत्राटदाराची व कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. उपयोगिता प्रमाणपत्रानुसार डांबराचे एकूण रूपये १,४८,४४७/- जादा प्रदानाची वसुली करावी. १ टक्का विम्याची कमी वसुली केलेली रक्कम रूपये ५,३९७/- शासनखाती भरणे आवश्यक आहे. नमुना ३९ व ६९ मध्ये नोंदी घेण्यात आल्या नाहीत. तांत्रिक मान्यता आदेशातील अटीनुसार खडीची जाडी तपासून त्याची मोजमाप पुस्तिकेत नोंद घेतली नाही. कार्यारंभ आदेशातील अटी व शर्तीनुसार संपूर्ण माहितीचा नामफलक लावण्याबाबत प्रमाणपत्र सादर केले नाही.

**परिच्छेद क्र.३.३०४**

रा.मा.२१७ बोरी वाघी जवळा रस्ता जिंतुर कि.मी ३/५०० ते ७/०० रस्त्याबाबत लेखापरिक्षकांनी कामाची निविदा राज्यस्तरावरील मराठी वर्तमानपत्रात प्रसिध्द केली नसल्याचे लेखी आक्षेप नोंदविले आहेत तसेच अंदाजपत्रामधील दर पृथ्थकरणानुसार कंत्राटदाराने दर वाढवून ५१८, ८६१/- रू. चे डांबर वापरले आहे. सदर जादा प्रदानांची वसुली गुत्तेदाराकडून भरणा करावी. स्वामित्वधनाची रक्कम रूपये ३५,६६३/- संबंधितांकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्र.३.३०५**

रा.मा. २१७ ते आंबेटाकळी ते दामपुरी रस्ता कि.मी. ३/०० ते ५/०० मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत रूपये २३,८१,५००/- अंदाजपत्रक बनवून त्यास अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी तांत्रिक मान्यता दिलेली आहे. दुसऱ्या व अंतिम देयाकाद्वारे रूपये १७,९३,२५९ चे प्रदान केलेले आहे. कामाची निविदा संचिका, मोजमाप पुस्तिका तसेच अंदाजपत्रक तपासले असता पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १२५ नुसार प्रशासकीय मान्यता व कलम १२६ नुसार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मंजुरी दिल्याचे नमूद केले आहे. तथापि, सदर ठराच लेखा परिक्षणात उपलब्ध करून दिला नाही तसेच परिच्छेद क्र. ३.३०३ व ३.३०४ प्रमाणे निविदा प्रसिध्दीबाबत आक्षेप घेण्यात आलेले आहेत. अंदाजपत्रकानुसार काम केल्याचे सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी घेतलेली नाही. अंतिम मोजमापाच्या ५ टक्के नोंदी कार्यकारी अभियंता यांनी तपासल्या नसतानाही प्रदान केलेले आहे. करारनाम्यावर कंत्राटदाराची स्वाक्षरी नसतानाही निविदा मंजूर तारखेनंतर ८ दिवसात कामाचे आदेश देणे आवश्यक असताना १ महिना उशिराने कामाचे

आदेश देण्यात आले. उपयोगिता प्रमाणपत्रानुसार कामावर वापरलेल्या डांबराचे रूपये ८३८६.८४/- प्रमाणे रूपये २,३,,४९०/- जादा प्रदानाची वसुली करावी. मोजमाप पुस्तिकेत उपयोगिता प्रमाणपत्र नोंदविलेले नाही.

**परिच्छेद क्र.३.३०६**

पालम येथे वार्ड क्रमांक ५ पठाण गल्ली मध्ये सी.सी. रोड नाली बांधकाम करणे कामी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, परभणी यांनी रूपये ५ लक्षास तांत्रिक मंजुरी व जिल्हाधिकारी, परभणी यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करून आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत कामावर रूपये ४,८१,३८९/- एवढा खर्च केला आहे. या कामाबाबत पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप घेण्यात आलेले आहेत. अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक आहे परंतु कमी जादा काम करून त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी घेतलेली नाही. सदर काम कोणत्या योजनेतून केले आहे किंवा त्याची दुरूस्ती करणेबाबत अंदाजपत्रकातील सर्वसाधारण अहवालामध्ये उल्लेख नाही. काम पूर्ण झाल्यावर सदर काम स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेण्यात आल्याचा नामफलक आमदारांच्या नावासह लावण्यात आला नाही. सदर काम स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या व ताब्यात असलेल्या जागेवर होणे आवश्यक आहे त्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयास प्रमाणपत्र पाठविले नाही. निधी उपलब्ध नसताना कामाचे आदेश दिलेले आहेत. अंदाजपत्रकामध्ये खाडाखोड/उपरीलेखन आहे त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे साक्षांकन केलेले नाही. करारनामा कोरा आहे त्यावर कंत्राटदार व कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. कामासाठी वापरलेले सिमेंट, खडीचे चाचणी अहवाल नाहीत. पूर्ण झालेल्या कामाची नोंद नमुना नं.३९ व ६९ मध्ये घेण्यात आलेली नाही.

**परिच्छेद क्र.३.३०७**

मौजे फळा, ता.पालम येथे भक्त निवास बांधकामावर रूपये ३,०६,४८०/- एवढा खर्च खासदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेला आहे. सदर कामास मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी रूपये ५ लक्ष एवढी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. या कामाबाबत पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.

ग्रामविकास विभागाच्या दिनांक १२ जानेवारी, २००१ रोजीच्या अधिसूचनेनुसार व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ४ खालील परिशिष्ट (२) नुसार स्थायी समिती / विषय समितीच्या बैठकीत सदर कामाच्या मान्यतेची माहिती अवलोकनार्थ सादर करणे अनिर्वाय आहे परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. सन २००६-२००७ या वित्तीय वर्षातील अखर्चित निधी सन २००८-२००९ मध्ये खर्च करण्याची परवानगी लेखा परिक्षणाच्यावेळी पहावयास मिळाली नाही. ग्रामविकास विभागाच्या दिनांक १९ जानेवारी, २००१ नुसार ग्रामपंचायतीने केलेल्या कामातील ५ टक्के इतकी रक्कम ग्रामनिधीत जमा करील परंतु अशी रक्कम रूपये ४७०९७/- वसूल करून भरणा करणे आवश्यक आहे. करारनामा सुरक्षा रक्कमेच्या ३ टक्के मुल्याच्या मुद्रांक शुल्कावर करावयाचा असताना रूपये ३००/- चे मुद्रांक शुल्क आकारले असल्यामुळे ३ टक्के मुद्रांक शुल्काची रक्कम संबंधित गुत्तेदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे. अंदाजपत्रकानुसार कमी जादा कामास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेतलेली नाही. देयकासोबत कामासाठी वापरलेले सिमेंट, खडीचे चाचणी अहवाल नाहीत. पूर्ण झालेल्या कामाची नोंद नमुना नं.३९ व ६९ मध्ये घेणे आवश्यक असताना त्याप्रमाणे नोंद घेण्यात आलेली नाही.

**परिच्छेद क्र.३.३०८**

प्रजिमा ४ ते एस.टी.बी.टी. वझर बु. सायखेडा किमी ०/०० ते ३/०० रस्त्याची सुधारण करणे या कामावर रूपये १७,९५,६०७ एवढा खर्च केलेला असून सदर कामावर पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविलेले आहेत.

सदर कामाच्या निविदा रक्कमेच्या एक टक्का रक्कम रूपये १७,९५६/- वसूल करून एकरकमी शासकीय विमा संचालनालयाकडे पाठविणे आवश्यक असताना धावते देयकामधून कपात केलेली आहे. परिच्छेद क्र. ३.३०३, ३,३०४, ३,३०५ प्रमाणे निविदा प्रसिध्दीबाबत लेखा आक्षेप घेण्यात आले आहेत. महसूल व वन विभागाच्या दिनांक १५ डिसेंबर, २००६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर कामावरील स्वामिधनत्वाची रक्कम रूपये ४८,२८५/- एवढी वसूल करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात रूपये २३,०५८/- वसूल केले आहेत. उर्वरित रक्कम रूपये २५,२२७/- संबंधित गुत्तेदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तिकेत उप अभियंता यांनी मोजमाप नोंदविलेले नाही. निविदा मंजुरीनंतर ८ दिवसांत कामाचे आदेश देणे आवश्यक असताना दोन महिन्यानंतर आदेश दिलेले आहेत. पूर्ण झालेल्या कामाची नोंद नमुना नं.३९ व ६९ मध्ये घेण्यात आली नाही. लिडचार्ट व खदान चार्टला कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित केलेले नाही. उपरोक्त लेखा परिच्छेदावर नोंदविलेल्या आक्षेपासंदर्भात जिल्हापरिषद, परभणी यांचेकडून कळविण्यात आलेल्या लेखी खुलाशावरून असे दिसून येते की, शासन निर्णयानुसार गुत्तेदाराकडून उपरोल्लेखित कामांबाबत वसूल करावयाची रक्कम विलंबाने वसूल करून शासन खाती जमा केल्याचे दिसून येत आहे. बहुतांश कामाच्या निविदा शासन निर्णयानुसार जाहिरात प्रसिध्द करून दिलेल्या नाहीत. साहित्य वापराचे परिमाण विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे वापरल्याचे दिसून आले नाही तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियमांचे पालन बंधनकारक असताना नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. स्वामिधनत्वाची रक्कम संबंधितांकडून वसूल करून शासनखाती भरणा केलेली नाही. कार्यारंभ आदेश निघाल्यानंतर विलंबाने कामाचे आदेश देण्यात आले आहेत. करारनाम्यावर स्वाक्षऱ्या नाहीत इत्यादी गंभीर स्वरूपाच्या अनियमितता आढळून आल्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

सदर लेखा आक्षेपावर जिल्हा परिषदेने सादर केलेल्या लेखी खुलाशाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली असता साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, लेखा परिच्छेद क्र.३.३०२ पेठशिवणी सेलू, तालुका पालम (ओडीआर-३) रस्त्याची ०/०० ते १/०० सुधारणा करणे या कामासंदर्भात गौण खनिजाची रक्कम रूपये ५४२९२/- व रूपये ५,७९४ वसूल करण्यात आली आहे. तसेच उर्वरित रक्कम रूपये ३१३५६/- एवढी रक्कम संबंधितांकडून दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ रोजी शासन खाती भरणा करण्यात आली आहे. तथापि, सदर रक्कम लेखा परिक्षकांनी निदर्शनास आणून दिल्यामुळे वसूल होऊ शकली अन्यथा शासनाचा एवढ्या मोठ्या रक्कमेचा महसूल बुडाला असता. लेखा परिक्षक सर्व प्रकरणे तपासू शकत नाहीत त्यामुळे अशा प्रकारची अनेक प्रकरणे तत्कालिन कार्यकारी अभियंता किंवा त्यांच्या अधिनस्त अधिकाऱ्यांच्या तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या  या बाबी निदर्शनास येणे आवश्यक होते. परंतु तसे झालेले दिसून येत नाही त्यामुळे ही चूक जाणून बुजून करण्यात आली आहे काय अशी शंका उपस्थित होते. याप्रकरणी वसुली झाली म्हणजे अधिकाऱ्यांनी कर्तव्य पालन केले असे होत नाही. त्यामुळे **लेखा परिच्छेद क्र.३.३०२, ३.३०३, ३.३०४, ३.३०५, ३.३०६, ३.३०७ व ३.३०८ या परिच्छेदांमध्ये उल्लेखित केलेल्या कामांच्या अनियमिततेप्रकरणी तत्कालिन कार्यकारी अभियंता, उप अभियंता, संबंधित शाखा अभियंता व वरिष्ठ सहाय्यक यापैकी बहुतांश अधिकारी सेवानिवृत्त झाले असून कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना केवळ कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. तसेच काही अधिकाऱ्यांना कर्तव्यात कसूर करू नये याकरिता ताकीद देण्यात आली आहे. या अतिशय किरकोळ प्रशासकीय कार्यवाहीमुळे कामाच्या गुणवत्तेमध्ये व दर्जामध्ये भविष्यात सुधारणा होऊ शकणार नाही, असे समितीचे स्पष्ट मत आहे. सबब, उपरोल्लेखित परिच्छेदांमधील कामातील अनियमिततेचे स्वरूप व गांभीर्य लक्षात घेऊन सर्व संबंधित अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा लेखापरिच्छेद निहाय खुलासा समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

# प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, परभणी

**विशेष घटक योजनेअंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेच्या व साधी विहीर बांधकामातील अनियमिततेबाबत**

**परिच्छेद क्रमांक ३.५६०/१० (सन २००८-०९) :**

**विशेष घटक योजनेअंतर्गत नळपाणी पुरवठा योजना कामातील अनियमितता :-**

जलव्यवस्थापन समितीने निवड केल्यानुसार विशेष घटक योजनेतुन घेतलेल्या कामांचे अभिलेखे तपासून या बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) शासन पत्र, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दिनांक १४ सप्टेंबर ०८ नुसार कामाची निवड करतांना अनुसूचित जातीची आवश्यक लोकसंख्या असणे बाबत खात्री पटवणे आवश्यक आहे.

२) विविध योजनेमधून नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत असल्यामुळे उपरोक्त निवड झालेली कामे इतर योजनेतुन हाती घेण्यात आली नाहीत. (उदा.मौ.खैरी व मौ.ईसाद.)

३) लोकसहभागाशी सबंधित ही योजना असल्यामुळे लोकवर्गणी अंशतः भरून उर्वरित वर्गणीपोटी श्रमदान प्रस्तावित केले आहे. परंतु प्रस्तावित श्रमदानाचा तपशील दिलेला नाही व वर्गणीदाराच्या यादीत उपरीलेखन व स्वाक्षऱ्याही नाहीत. त्यामुळे वर्गणीसह योजना राबविल्या बाबत खात्री पटविणे आवश्यक आहे.

४) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.झेडपीए-२००८/ प्रक्र४४४ वित्त-०९/ दिनांक १५ जुलै ०८ नुसार कार्यकारी अभियंता यांनी प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामाबाबतची माहिती विषय समितीच्या अवलोकनार्थ सादर न केल्यामुळे याबाबत क्षमापन प्राप्त करणे आवश्यक आहे.

५) ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रं.ग्रापापु/१०९३/सीआर-४४८(अ)/३९ दि. १७ सप्टेंबर १९९४ नुसार शक्यतो महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील नोंदणीकृत ठेकेदारास व तांत्रिक माहिती असणाऱ्यास देणे आवश्यक असतांना कामे देण्यात आलेल्या ग्रामपंचायती तांत्रिक दृष्टया सक्षम असल्याबाबत खात्री पटवावी.

६) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, निर्णय क्रं.ग्रापापु/१०९८/प्र.क्रं-२४७/पापु-०७ दि. ११ जानेवारी १९९९ मधील परि.२८ नुसार उद्भवातील पाणी पिण्यायोग्य असल्या बाबत चाचणी घेतलेली नाही.

७) मुद्रांक शुल्क अधिनियम १९५८ चे परिशिष्ट ५ व शासन महसुल व वन विभाग परिपत्रक क्रं.एसटीपी-१०६६/२५०१७४-एम दि. १७ फेब्रुवारी १९७२ नुसार केलेल्या करारनाम्यावर तारीख, साक्षीदार व कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी नसल्यामुळे विधीग्राहयतेबाबत खात्री पटवणे आवश्यक आहे.

८) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १५३ नुसार कंत्राटदाराकडून अंदाजपत्रकाप्रमाणे कामे करून घेण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता यांची आहे. तथापि तांत्रिक कारणामुळे काही बदल करावयाचा असल्यास नियम १२२ प्रमाणे आदेश देवून व नियम १२४ प्रमाणे कार्यादेश नोंदवहीत नोंद घेवून १५६ प्रमाणे कंत्राटदाराच्या संमतीने करता येतो परंतु मौ.ईसाद तालूका गंगाखेड कामात मुख्य उध्दरण नलिका खोदकामात अंदाजपत्रका पेक्षा २५ टक्के जादा काम केले आहे.

९) लेखा संहिता नियम ८७ नुसार कामासाठी वापरलेल्या साहित्याच्या गुणवत्ता व दर्जा बाबत खात्री पटविणे आवश्यक आहे.

१०) पाणी उपसण्याच्या कामाचे लॉगबुक दर्शवून खात्री पटवणे आवश्यक आहे.

११) कामाची अंदाजपत्रके तयार करण्यापुर्वी संबंधित उपअभियंता/सक्षम प्राधिकारी यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केलेली नाही.

१२) प्रशासकिय मान्यतेच्या अटीनुसार जुन्या साहित्याची नोंद उपविभागाचे भांडारातील नोंदवहीत जमा दाखविणे आवश्यक आहे.

१३) लेखासंहिता नियम १४८ नुसार विहित मुदतीत काम करणे आवश्यक असतांना व कामाची मुदत संपण्यापुर्वी मुदतवाढीचा अर्ज सादर करणे आवश्यक असतांना मुदतीनंतर अर्ज प्राप्त झालेला असतांना नियमबाहयपणे मुदतवाढीस मंजुरी दिलेली आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) आक्षेपात नमुद केल्या प्रमाणे खालील प्रमाणे कामे प्रस्तावित करण्यात आलेले आहेत तसेच तहसिलदार यांचे प्रमाणपत्रान्वये अनुसूचित जातीची लोकसंख्या विचारात घेऊन कामाची निवड करून खात्री करण्यात आली आहे. त्याचे विवरण खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | तालुका | तहसिलदार यांचे प्रमाणपत्रान्वये अनु.जाती लोकसंख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| १ | राणी सावरगाव | गंगाखेड | १०७४ | विहिर जलकुंभ व पाईप लाईन |
| २ | खादगाव | गंगाखेड | २९८ | विहिर पाईप लाईन |
| ३ | ईसाद | गंगाखेड | ४५२ | पाण्याची टाकी विद्युत मोटार व पाईप लाईन |
| ४ | खैरी | सेलू | १२० | विहिर खोल करणे, जलकुंभ व पाईप लाईन |
| ५ | सोन्ना | सेलू | २६२ | विंधन विहिर पंप व जलकुंभ |

२) उपरोक्त निवड झालेली कामे इतर योजनेतुन हाती घेतली नसल्या बाबत उप अभियंता यांच्या मार्फत खात्री करण्यात आलेली असून त्या प्रमाणे उप अभियंता यांचे प्रमाणपत्र घेण्यात आले आहे.

३) शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१००५/प्र.क्र.०६/पापु-०७/ दिनांक २४ जानेवारी २००५ अन्वये १% लोकवर्गणी रोखीने भरून घेतली असून ४% रक्कम श्रमदान न केल्यामुळे ग्रामपंचायतीला अदा करण्यात आली नाही. वर्गणीदाराच्या यादीत उपरी लेखन झाले आहे व वर्गणीदाराच्या स्वाक्षऱ्या नाहीत, ही वस्तूस्थिती आहे. परंतु यादी ग्रामपंचायतने

प्रमाणित केली आहे व त्यानुसार योजना राबविण्यात आली आहे. वर्गणीचा तपशिल सोबत जोडला आहे. देयकातून कपात खालील प्रमाणे करण्यात आली आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | तालुका | १% लोक सहभाग |
|---|---|---|---|
| १ | राणी सावरगाव | गंगाखेड | ४८०५/- |
| २ | खादगाव | गंगाखेड | ४६००/- |
| ३ | ईसाद | गंगाखेड | २३००/- |
| ४ | खैरी | सेलू | ४६००/- |
| ५ | सोन्ना | सेलू | ३२००/- |
| | एकूण | | १९५०५/- |

४) प्रशासकिय मान्यता दिलेली कामे जल व्यवस्थापन समितीच्या बैठकीत हाती घेतल्या बाबतचा ठराव घेण्यात आला होता त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | ठराव क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | राणी सावरगाव | (०४) | १८/०८/२००७ |
| २ | खादगाव | (३१) | १५/०४/२००८ |
| ३ | ईसाद | (१०७) | २४/०८/२००६ |
| ४ | खैरी | (४५) | ०७/०८/२००८ |
| ५ | सोन्ना | (४८) | ०१/१०/२००८ |

वरिल प्रमाणे सर्व कामांना जलव्यवस्थापन समितीनेच प्रस्तावित केल्यामुळे पुढील विषय समिती सभेत अवलोकनार्थ ठेवण्यात आला नाही.

५) सदरील कामे ही जिल्हा परिषदेच्या शाखा अभियंता या तांत्रिक अधिकाऱ्याच्या देखरेखी खाली पुर्ण करण्यात आली आहेत व उप अभियंता यांनी १००% कामाची तपासणी केली आहे.

६) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, निर्णय क्रं.ग्रापापु/१०९८/प्र.क्रं-२४७/ पापु-०७ दि. ११ जानेवारी १९९९ मधील परि.२८ नुसार उद्‌भवातील पाणी पिण्या योग्य असल्या बाबत चाचणी घेण्यात आली नाही ही वस्तूस्थिती आहे नंतर सर्व गावांच्या पाणी नमुन्याची तपासणी करण्यात आली असून पाणी पिण्यायोग्य असल्याचे अहवालात प्रमाणित केले आहे.

७) आक्षेपात नमुद केल्यानुसार (५) पैकी (३) कामाच्या करारनाम्यावर स्वाक्षऱ्या आहेत. (२) कामाच्या करारनाम्यावर कार्यकारी अभियंता याच्या स्वाक्षऱ्या नाहीत ही वस्तूस्थिती आहे. परंतु करारनाम्याप्रमाणे सर्व कामे पुर्ण असून योजनेव्दारे पाणी पुरवठा चालू आहे.

८) कमी / जास्त कामा बाबत तुलनात्मक तक्त्यावर कार्यकारी अभियंता यांची मान्यता घेण्यात आलेली आहे तसेच सदरील कामे प्रशासकिय व तांत्रिक मान्यतेच्या मर्यादेमध्येच कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत. ग्रामपंचायतला प्रत्यक्ष काम करीत असतांना कामातील बदला बाबत सुचना देण्यात आलेल्या होत्या व त्यानुसार कार्यवाही केली आहे. मौ.ईसाद ता.गंगाखेड या कामात मुख्य उध्दरण नलिका खोदकामात अंदाजपत्रकापेक्षा २५% चे परिमाण इतके जास्त आहे. ही तत्कालिन आवश्यकता होती. गरजेनुसारच काम पुर्ण केले असून कमी जास्त परिमाणाची नोंद तुलनात्मक तक्त्यात घेतली आहे. प्रशासकिय मान्यता / तांत्रिक मान्यता किंवा अंदाजपत्रकापेक्षा अधिक काम केले नाही.

९) लेखा संहिता ८७ नुसार कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याचा दर्जा व गुणवत्ता बाबत चाचणी अहवाल घेण्यात आला नाही ही वस्तूस्थिती आहे. तथापि, उप अभियंता यांची १००% व कार्यकारी अभियंता यांची ५% कामाची तपासणी करून कामाचा दर्जा व गुणवत्ता चांगली असल्या बाबत खात्री करण्यात आली आहे व गावास पाणी पुरवठा चालू आहे.

१०) परिच्छेदात नमुद केल्यानुसार मौ. खादगाव ता. गंगाखेड व मौ. खैरी ता. सेलु येथील काम करत असतांना पाणी उपसा केल्याचे लॉगबुक ठेवण्यात आलेले होते लेखा परिक्षण कालावधीत दर्शविण्यात आले नसावेत. लॉगबुक सत्यप्रत अवलोकनार्थ सादर.

११) आक्षेपात नमुद केल्या प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यापुर्वी सक्षम प्राधिकारी यांचा स्थळ पहाणी अहवाल घेण्यात आलेला होता.

१२) आक्षेपात नमुद केल्या प्रमाणे सदरील कामे नविन बोर व नविन विहिरीची असल्याने जुने साहित्य नव्हते.

१३) ग्रामपंचायतीने विहित मुदतीत मुदत वाढीसाठी अर्ज सादर करणे आवश्यक होते परंतू तशी कार्यवाही झालेली नाही ही वस्तूस्थिती आहे. तथापि, सदरील कामे पुर्ण करण्यासाठी संबंधीत ग्रामपंचायतीस दंड लावून कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.५६१/११ (सन २००८-०९) :**

**विशेष घटक योजनेअंतर्गत साधी विहीर बांधकामातील अनियमिततेबाबत :-**

जलव्यवस्थापन समितीने निवड केल्यानुसार विशेष घटक योजनेतून घेतलेल्या कामाची अभिलेखे तपासून याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) विविध योजनेतून नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत असल्यामुळे उक्त निवडलेली कामे इतर योजनेतून (विशेषत: मौ. कलमुला तालुका पुर्णा) हाती घेण्यात आली नसल्याबाबत खात्री पटवणे आवश्यक आहे.

२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२००८/प्र.क्र.४४/वित्त-९ दि. १५ जुलै २००८ मधिल तळटीप नुसार कार्यकारी अभियंता यांनी प्रशासकिय मान्यता दिलेल्या कामाची माहिती पुढील विषय समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर न केल्यामुळे क्षमापण घेणे आवश्यक आहे.

३) शासन निर्णय क्रमांक १००५/प्र.क्र.०६/पापू.०७ दि.२४ जानेवारी २००५ नुसार लोकसहभागातील ५ टक्के वर्गणी पैकी ग्रामपंचायतच्या ठरावानुसार १ टक्के वर्गणीची रक्कम रोख व ४ टक्के रकमेपोटी श्रमदान करणे प्रस्तावित केले आहे. परंतू श्रमदानाचा तपशिल नमुद केला नाही त्यामुळे आवश्यक लोकवर्गणीसह योजना राबविल्याबाबत खात्री पटवणे आवश्यक आहे.

४) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम १९५८ चे परिशिष्ट ५ ब व शासन महसुल व वन विभागातील परिपत्रक क्रमांक एसटीपी/१०६६/२५०१७४-एम, दिनांक १७ फेब्रुवारी १९७२ नुसार केलेल्या करारनाम्यावर साक्षीदार व स्वाक्षरी नसल्यामुळे करारनाम्याच्या विधी ग्राहयतेबाबत खात्री पटवणे आवश्यक आहे.

५) योजनेचे १८ विहिरीचे ठिकाण रितसर दानपत्राआधारे अथवा सार्वजनिक मालकीच्या जागेत असणे आवश्यक आहे. विहिर खोदकाम करणेपुर्वी पाण्याच्या उदभवाची खात्री करणे व योजना कार्यरत राहण्यासाठी ग्रामपंचायतचे संमत्ती पत्र घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही न केल्यामुळे विहिर रितसर दानपत्राआधारे घेतलेल्या अथवा सार्वजनिक मालकीच्या ठिकाणी, पुरेसे पाणी असल्याबाबत नळपाणीपुरवठा योजना कार्यरत राहण्यासाठी परिरक्षण होत असल्याबददल खात्री पटविणे आवश्यक आहे.

६) शासन पत्र सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग दिनांक १४ सप्टेंबर, २००८ च्या निकषानुसार आवश्यक तेवढी अनुसूचित जातीची लोकसंख्या असणे आवश्यक आहे. तथापि, उप अभियंता यांनी अनुसूचित जातीची लोकसंख्या केवळ १७ असल्याचे मत नोंदविले आहे. याबाबत आवश्यक लोकसंख्या असल्याबाबत खात्री पटविणे आवश्यक आहे.

७) पाणी उपसण्याचे काम लॉगबुक मध्ये ठेवणे तसेच पाणी उपसणेसाठी जादा दर लावल्यामुळे रु.१७,६५५/- वसूल करणे आवश्यक आहे.

८) ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए-२०००/प्र.क्र.४४/३३. दि. २२ डिसेंबर २००० नुसार मोजमापे नोंदविणारे अभियंता यांनी मोजमापे नोंदविल्याचा व उपअभियंता/ कार्यकारी अभियंता यांनी मोजमापे तपासणीच्या दिनांकीत स्वाक्षऱ्या करणे आवश्यक आहे. तथापि सदर प्रमाणे कार्यवाही मोजमाप पुस्तीका लिहीण्याच्या प्राथमिक नियमाचे पालन केले नाही.

९) विहिर खोदकामात ६ मीटर व्यासाचे खोदकामात ३ मीटर खोली नंतर प्रत्येक १.५ मीटर टप्प्यातील ०.०२ घ.मी.जादा परिमाण दर्शवल्यामुळे जादा प्रदान रक्कम रूपये २७/- वसूल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) विशेष घटक योजने अंतर्गत प्रस्तावित झालेली कामे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र | गावाचे नांव | तालूका | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १ | तांदूळवाडी | सेलू | विहिर खोलीकरण |
| २ | सिमनगाव | सेलू | विहिर |
| ३ | कलमुला | पुर्णा | विहिर |

सदरील कामे इतर योजनेतुन हाती घेण्यात आलेली नाहीत या बाबत उप अभियंता यांचा अहवाल घेण्यात आला आहे.

२) प्रशासकिय मान्यता दिलेली कामे जल व्यवस्थापन समितीच्या बैठकीत हाती घेतल्या बाबतचा ठराव घेण्यात आला होता. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | ठराव क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | तांदूळवाडी | ३९ | १०/०७/२००८ |
| २ | सिमनगाव | ४८ | ०१/१०/२००८ |
| ३ | कलमुला | १०७ | २४/०८/२००६ |

वरिल प्रमाणे सर्व कामांना जलव्यवस्थापन समितीनेच प्रस्तावित केल्यामुळे पुढील विषय समिती सभेत अवलोकनार्थ ठेवण्यात आली नाही ही वस्तूस्थिती आहे.

३) शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१००५/प्र.क्र.०६/पापु-०७/ दिनांक २४ जानेवारी २००५ अन्वये १% लोकवर्गणी रोखीने भरून घेतली असुन ४% लोकवर्गणीची रक्कम श्रमदान न केल्यामुळे ग्रामपंचायतला अदा करण्यात आली नाही. वर्गणीचा तपशिल सोबत जोडला आहे. देयकातून कपात खालील प्रमाणे करण्यात आली आहे.

| अ.क्र | गावाचे नांव | तालुका | १ % लोक सहभाग |
|---|---|---|---|
| १ | तांदूळवाडी | सेलू | ४,९००/- |
| २ | सिमनगाव | सेलू | ५,०००/- |
| ३ | कलमुला | पुर्णा | २,४८५/- |
| | एकूण | | १२,३८५/- |

४) आक्षेपात नमुद केल्यानुसार करारनाम्यावर कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या आहेत परंतु साक्षिदारांच्या स्वाक्षऱ्या नाहीत, हे खरे आहे.

५) आक्षेपात एकूण १८ विहिरी नमुद आहेत. परंतु स्थानिक निधी लेखाच्या मुळ आक्षेपात ०३ कामांचा समावेश आहे. त्याबाबत खालील प्रमाणे तपशिल देण्यात येत आहे.

| अ.क्र | गावाचे नांव | तालुका | अस्तित्वातील दस्तऐवज |
|---|---|---|---|
| १ | तांदूळवाडी | सेलू | ग्रा.पं.ची जागा न.नं. ८(अ) उपलब्ध आहे. |
| २ | सिमनगाव | सेलू | ७/१२ गट नं २३० वर नोंद उपलब्ध आहे |
| ३ | कलमुला | पुर्णा | रजिस्टर दानपत्र उपलब्ध आहे |

सदर कामाची मागणी ग्रामपंचायतीने केल्यामुळे परिरक्षण व योजनांची देखभाल करणेची जबाबदारी ग्रामपंचायतीची आहे.

६) आक्षेपात नमुद केल्याप्रमाणे खालील प्रमाणे कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र | गावाचे नांव | तालुका | एकूण लोक संख्या | अनु.जाती लोक संख्या | अनु.जमाती लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| ३ | कलमुला | पुर्णा | ८६५ | १७ | ३२ |

तहसिलदार यांचे प्रमाणपत्रान्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांची एकूण लोकसंख्या विचारात घेऊन कामाची निवड करून खात्री करण्यात आली आहे.

७) आक्षेपात नमुद केल्यानुसार अंदाजपत्रकास पाणी उपसण्याचा दर हा २१.०० रूपये प्रती तास आहे त्यानुसार परिशिष्ठ “ब” तयार करण्यात आले असून त्यानुसारच ग्रामपंचायतीला देयकाची अदायी केली आहे. मोजमाप पुस्तिकेत सुरवातीस दर हा ३२.०० रूपये प्रती तास असा नमुद करण्यात आला आहे. परंतु अदायी २१.०० रूपये प्रमाणे झालेली असल्यामुळे वसुली करण्यात आलेली नाही.

८) आक्षेपात नमुद केल्यानुसार मोजमाप पुस्तिकेत उप अभियंता / कार्यकारी अभियंता यांच्या दिनांकित स्वाक्षऱ्या नाहीत, परंतु मोजमाप पुस्तिकेच्या विशेष स्तंभात दिनांक नमुद करण्यात आले आहे. तथापि, यापुढे दिनांकीत स्वाक्षऱ्या घेण्याबाबत दक्षता घेण्यात येत आहे व याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

९) आक्षेपात नमुद केल्या प्रमाणे ज्यादा प्रदान वसुली रक्कम रू.२७/- वसुली करून शासन खाती भरणा करण्यात आली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, परिच्छेद क्रमांक ३ . ५६० / १८ / विशेष घटक योजनेअंतर्गत नळपाणी पुरवठा योजना कामातील अनियमितता तसेच परिच्छेद क्रमांक ३ . ५६१ / १९ / विशेष घटक योजनेअंतर्गत साधी विहीर बांधकामातील अनियमितता या दोन्ही परिच्छेदाबाबत मोठया प्रमाणावर आक्षेप काढण्यात आलेले आहेत. यामध्ये गंभीर बाबी आहे, या मुद्यांबाबत समितीचे समाधान झालेले नाही. याची संपूर्ण चौकशी करण्यात यावी. कारण यामध्ये मोठया प्रमाणावर अनियमितता आहे. वरील दोन्ही मुददयांबाबत आलेल्या आक्षेपाबाबत जे विभाग प्रमुख जबाबदार असतील त्यांच्यावर रितसर कायदेशीर कारवाई करुन विभागीय सचिवांच्या साक्षीच्या पूर्वी अहवाल समितीला सादर करण्यात यावा. यातील काही मुद्यांवर मुख्य कार्यकारी अधिकारी तात्काळ कारवाई करु शकत होते. त्याबाबत काही कारवाई केलेली असल्यास समितीला सांगावे. त्यामुळे येथील मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे लागले.

समितीच्या मते समिती विभाग प्रमुखांना प्रश्न विचारत आहे, परंतु या सर्व बाबींसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जबाबदार असतात. याबाबत तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दुर्लक्ष झाल्याचे आढळत असल्यास संबंधित मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर निष्काळजीपणाबाबत कारवाई करण्यात यावी. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे लक्ष नसेल, नियमित पर्यवेक्षण केले नसेल तर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार हा प्रश्न आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी हे जिल्हा परिषदेचे प्रमुख आहेत, त्यांची जबाबदारी आहे. तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या काळात हे झाले असेल. लेखा आक्षेपाबाबत ३-३ वेळा नोटीसा आल्या आहेत. त्यातून जिल्हा परिषदेने किती अधिकारी कर्मचारी यांच्यावर कारवाई केलेली आहे. किती जणांना निलंबित केले, किती जणांच्या वेतनवाढी थांबविल्या आहेत. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग यांनी खुलासा केला की, सामान्य प्रशासन विभागात कनिष्ठ सहायक, श्री.गायकवाड यांना निलंबित केलेले आहे.

यावर समितीने सुचित केले की, सध्या जो परिच्छेद चालू आहे, त्याबाबत अधिकारी कर्मचाऱ्यांवर केलेल्या कारवाईबाबत समितीला माहिती देण्यात यावी. जे लेखा आक्षेप निर्माण झालेले आहेत त्या अनुषंगाने समिती आपणास विचारत आहे की, समितीचे समाधान झालेले नाही. त्यामुळे आपण संबंधितांवर कोणत्या प्रकारची कारवाई केली, हे समितीला अपेक्षित आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या कारवाईबाबत माहिती आता देण्यात यावी. येथील अधिकाऱ्यांमध्ये समन्वय दिसत नाही. समाधानकारक उत्तरे दिलेली नाहीत. समितीला सहाकार्य केले जात नाही, समितीने मागितलेली माहिती दिली जात नाही. अधिकारी तयारी करुन आले नाहीत. याबाबत आपण काय कारवाई करु शकतो, या बाबत गांभीर्य नाही.

एवढे आक्षेप असताना एका प्रश्नाचे उत्तर बरोबर देऊ शकत नाही. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून जबाबदार आहोत. समितीचा दौरा ठरलेला असताना विभाग प्रमुखांकडून माहिती घेऊन तयारी करणे गरजेचे होते. आरोपाच्या आक्षेपाच्या अनुषंगाने कोणती कारवाई केलेली आहे. लेखा आक्षेप १८ व १९ याबाबत समितीला एका तासामध्ये माहिती अवगत करण्यात यावी. प्रश्नावली समितीने अगोदर पाठविली आहे, समिती त्या अनुषंगाने सखोल चौकशी करणार आहे. रवळगाव, ता.सेलू येथील विहीरीचे देयक काढले आहे, परंतु विहीरच जागेवर नाही. विहिर नसताना पैसे कसे उचलण्यात आले त्या संदर्भात केव्हा तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला आश्वस्त केले की, याबाबत समितीने दिलेल्या सुचनेनुसार कारवाई करुन त्यासंबंधीचा अहवाल समितीला सादर करण्यात येईल. तद्नंतर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू यांनी खुलासा केला की, उक्त विषयासंबंधी ४ महिन्यांपूर्वी तक्रार प्राप्त झाली होती. माझ्याकडे येथे त्यासंबंधी निश्चित तारीख उपलब्ध नाही. सदर प्रकरणी चौकशी करुन गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

यावर समितीने विचारणा केली की, सदर कामांच्या संदर्भात कोणत्या अधिकाऱ्यांनी देयके काढलेली आहेत व विहिरीची कामे केलेली नसताना देयके काढण्यात आल्यामुळे असे सिध्द होत आहे की, परभणी जिल्हयात मोठया प्रमाणात गैरव्यवहाराची प्रकरणे झालेली आहेत. सदर प्रकरणांच्या वेळी कोणकोणते अधिकारी कार्यरत होते, यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू यांनी खुलासा केला की, त्यावेळी तत्कालिन गट विकास अधिकारी श्री.मोडक कार्यरत होते. यावर समितीने विचारणा केली की, विहिरी नसताना देयके काढण्यात आल्यामुळे सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कोणती कारवाई केली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, यासंबंधी माझ्याकडे माहिती प्राप्त झालेली नाही.

यावर समितीने विचारणा केली की, ४ महिन्यांपूर्वी तक्रार प्राप्त झाल्यानंतर आपल्यापर्यंत ही माहिती प्राप्त होत नाही. या जिल्हयात अधिकारी व ठेकेदार यांचे संगनमत असून त्यांच्याकडून अशा प्रकारे कार्यवाही केली जात आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. परभणी जिल्हयात पाणी पुरवठा, घरकुल योजनेमध्ये अशाप्रकारे कामे केली जात आहेत. यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू यांनी खुलासा केला की, या प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरण न्यायालयात गेले आहे.

यावर समितीने विचारणा केली की, सदर प्रकरणी मा.न्यायालयात कोण गेले होते व या प्रकरणी आपल्या स्तरावरुन कोणती कारवाई करण्यात आली, जागेवर तपासणी झाल्यानंतर तेथे विहिर नसल्याचे सिध्द झाले व हा विषय मा.न्यायालयापर्यंत गेला. यासंबंधी मुख्य कार्यकारी अधिकारी स्तरावर कोणती कारवाई करण्यात आली, यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू यांनी खुलासा केला की, सेलू तालुक्यातील एक ग्रामस्थ मा.न्यायालयात गेले होते. सदर नरेगाच्या विहिरी प्रकरणी तत्कालिन गट विकास अधिकाऱ्यांनी मान्यता दिली होती.

यावर समितीने विचारणा केली की, या प्रकरणी तांत्रिक मंडळावर असलेल्या शाखा अभियंत्यांनी पर्यवेक्षण केले नसताना सुध्दा तसे दाखविले. म्हणून या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली, या प्रकरणी संपूर्ण यंत्रणा सहभागी आहे. अशा प्रकारची जवळपास ९० टक्के प्रकरणे आहेत. नरेगा योजनेच्या कामाकरिता रोजगार सेवक, ग्रामसेवक, सरपंच, संग्राम कक्षातील डाटा एन्ट्री ऑपरेटर, गटविकास अधिकारी अशाप्रकारचे सर्व जण सहभागी असतात. ४ महिन्यापूर्वी ही घटना घडली असून त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्याला काही माहीत नसल्यासंबंधी समितीला उत्तर दिले आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. हा संघटित गुन्हा असल्यामुळे या प्रकरणी चौकशी करुन त्यात सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द मोक्का लावला पाहिजे. परभणी जिल्हयात विहिरी, रस्ते, पाणी पुरवठा योजना असून संबंधित अधिकारी आपल्याला त्यासंबंधी सविस्तर माहिती देत नाहीत असे दिसून येत आहे. सदर प्रकरणी फक्त खालील स्तरावरील अधिकारी दोषी नसून त्यात मोठी टोळी आहे, ही सर्वांची जबाबदारी आहे. त्यामुळे यासंबंधी सविस्तर माहिती घेण्यासाठी नरेगाच्या उपायुक्तांना बोलाविणे आवश्यक आहे. तसेच हा संघटित गुन्हा असल्यामुळे त्यात सहभागी असलेल्या सर्वांविरुध्द तातडीने कारवाई होणे अत्यावश्यक आहे.

यावर समितीने विचारणा केली की, या प्रकरणी तत्कालिन गटविकास अधिकारी उपस्थित आहेत काय, यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू यांनी खुलासा केला की, ते आज उपस्थित झालेले नाहीत. यावर समितीने मत व्यक्त केले की, पंचायती राज समितीची बैठक होणार असताना ते आज बैठकीला उपस्थित न राहता जाणीवपूर्वक गैरहजर राहिलेले आहेत. ही बाब योग्य नाही. परभणी जिल्हयात मोठी अनियमितता झालेली आहे. अशा अनेक विहिरींमध्ये अनियमिता झाल्याचे यावरुन दिसून येत आहे. या प्रकरणी जे अधिकारी सहभागी असतील त्यांची आपल्या स्तरावरुन तातडीने चौकशी करावी. आपण मुख्य कार्यकारी अधिकारी या नात्याने सर्व विभाग प्रमुखांसमवेत बैठकी घेत असतात. त्या बैठकींच्या वेळी आपण सर्व गोष्टींचा निश्चितपणे आढावा घेत असणार, असे असताना या प्रकरणी आपल्याला सविस्तर माहिती न देता अंधारात ठेवण्याचे काम संबंधित अधिकाऱ्यांनी केलेले आहे. आपण या प्रकरणी चौकशी करुन जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल एक महिन्यात समितीला कळवावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, समितीच्या निदेशानुसार कार्यवाही केली जाईल.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, समितीने आतापर्यंत जेवढया मुद्यांवर चर्चा केली ते सर्व विषय आक्षेपार्ह आहेत. अशा परिस्थितीत समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यासंबंधी त्यांना अगोदर अधिकार प्रदान आहेत. परंतु त्यांनी आजपर्यंत यासंबंधी चौकशी करुन कारवाई का केली नाही व मा.न्यायालयाने आदेश दिल्यानंतर सुध्दा या प्रकरणी गुन्हा दाखल झालेला नसावा. तसेच या प्रकरणी कोणाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे, यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू यांनी खुलासा केला की, या प्रकरणी तत्कालीन गटविकास अधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल झाला असून त्यांना अटक करण्यात आली होती.

यावर समितीने विचारणा केली की, सदर प्रकरणी तत्कालिन गटविकास अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल झाला असला तरी यात संपूर्ण यंत्रणा सहभागी आहे. सदर प्रकरणी खालच्या स्तरावरुन वरच्या स्तरापर्यंत चौकशी करुन संबंधिताविरुध्द तात्काळ कारवाई करावी व त्यासंबंधीचा अहवाल समितीला कळवावा. तसेच अशा प्रकारे जिल्हयामध्ये किती प्रकरणे आहेत त्याबाबत देखील समितीला कळवावे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

विशेष घटक योजने अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामातील अनियमीतता तसेच साधी विहिर बांधकामातील अनियमीतते प्रकरणी समितीने निदेश दिल्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर चौकशी करण्यात आली आहे काय ? असल्यास उक्त चौकशीत काय आढळुन आले आहे ? त्यानुसार संबंधीत दोषी अधिकाऱ्यांविरध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर चौकशी समिती नेमन्यात आली. चौकशी समितीने तात्कालीन कार्यकारी अभियंता,उप अभियंता,शाखा अभियंता तसेच सहायक लेखाधिकारी व वरिष्ठ / कनिष्ठ सहायक यांचे कडून अंशत: झालेल्या अनियमितता झाल्याबाबत चौकशी अहवालात नमुद केले आहे. त्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना नोटीस बजावुन खुलासा मागविण्यात आला होता. परंतु त्यांनी खुलासा सादर न केल्यामुळे त्यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही करणेबाबत त्यांच्या अधिनस्त विभागास कळविण्यात आले आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-** सदरहू प्रकरणी अनियमीततेवर खुलासा न करणाऱ्या कर्मचारी/अधिकाऱ्यावर जिल्हा परिषदेने प्रशासकीय कारवाई करणे बाबत त्यांच्या प्रशासकीय विभागास कळविण्यात आले असल्याने त्याबाबत शासन सहमती आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, विशेष घटक योजनेतंर्गत नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामातील अनियमिततेसंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर चौकशी करण्यात आली आहे का, असल्यास या चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली, कारवाई केली नसल्यास त्याची विलंबाची कारणे काय,

यावर अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी खुलासा केला की, या प्रकरणी पाच टक्के लोकवर्गणी द्यायची होती, त्यापैकी एक टक्का कॅश कम्पोनंट होता आणि चार टक्के श्रमदान होते. ग्रामपंचायतीतील लोकांनी चार टक्के श्रमदानातून सहभाग घ्यायचा होता, परंतु या केसमध्ये त्यांनी श्रमदान केले नाही म्हणून जेव्हा त्यांचे अंतिम देयक गेले. ते करताना आपण चार टक्के रक्कम ग्रामपंचायतीची कपात केलेली आहे. यामध्ये दुसरा मुद्दा असा होता की, बांधकाम करण्याअगोदर पाण्याचा नमुना तपासणी करुन घ्यायला हवा होता. या ठिकाणी ती चूक झालेली आहे. एखाद्या वेळेस पाणी चांगले नाही आणि आपण बांधकाम केले तर सर्व पैसा वाया जातो. यावर समितीने विचारणा केली की, यामध्ये कोण दोषी आहे, यावर अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी विदित केले की, इंजिनिअर लोकांवर आपण ठपका ठेवला आहे. यावर समितीने विचारणा केली की, आपण फक्त ठपकाच ठेवला आहे. कारवाई केली नाही का, ठपका ठेवण्याचे वेगवेगळे प्रकार आहेत.

यावर अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी खुलासा केला की, जी सक्षम प्राधिकारी आहे त्यांना कारवाई करण्याचे अधिकार असतात. यावर समितीने पुढे विचारणा केली की, आपण शासनामार्फत पाणी पुरवठ्याच्या योजना घेतो. काही योजना या चार, पाच वर्षापूर्वी झालेल्या असतात. परंतु तेथे त्या गावामध्ये पाणी सुरु झालेले नसते. ऑन रेकॉर्ड कागदावर योजना चालू झालेली असते. त्यामध्ये गावातील लोकांची व अधिकाऱ्यांची चूक असते. त्या गावाला आज पाणी मिळत नाही. नवीन योजना प्रस्तावित केली तर कागदावर असते की, ही योजना झालेली आहे. त्यामध्ये त्या गावक-यांचा दोष नाही. नवीन योजना देऊ शकत नाही. शासनाचा पैसा तेथे यापूर्वीच खर्च झालेला आहे. अशी काही गावे असतील तर त्याकरिताही काहीतरी योजना दिली पाहिजे. मागील योजना सुरु झाली नाही, त्यामध्ये गावक-यांचा दोष नाही.

यावर अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी खुलासा केला की, यामध्ये धोरण असे आहे की, जेव्हा आपण एखाद्या गावासाठी नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर करतो. ते करीत असताना त्या गावामध्ये अस्तित्वात पाणीपुरवठा योजना कोणती आहे, त्याची नावे घेतो. हात पंप आहे, पॉवर पंप आहे, साधी विहिर आहे. हा सगळा आढावा घेऊनच नवीन योजना मंजूर केली जाते. परंतु त्या गावामध्ये जुनी योजना पाच वर्षे जुनी असली तरीही त्या योजनेमधून पाणी येत नसेल तर किंवा उद्‌भव कोरडा पडला असेल तर त्या योजनेसाठी नवीन उद्‌भव घेऊन रिज्युवेशन करुन देतो.

यावर समितीने विचारणा केली की, आपले असे धोरण आहे, ही चांगली गोष्ट आहे. याबाबत खाली जाताना खालीच कट मारला जातो की, तुमच्याकडे जुनी योजना आहे. याबाबत योग्य त्या सूचना देण्यात याव्यात. यामुळे काही गावांमध्ये पाणी येईल. यावर अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी याबाबत परिपत्रक काढण्यात येईल असा खुलासा केला.

## अभिप्राय व शिफारशी

विशेष घटक योजनेंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेच्या व साधी विहीर बांधकामातील अनियमिततेबाबत लेखापरीक्षकांनी घेतलेल्या लेखा आक्षेपामध्ये असे निदर्शनास आले आहे की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००८ रोजीच्या पत्रानुसार कामाची निवड करीत असताना अनुसूचित जातीची आवश्यक लोकसंख्या असणेबाबत खात्री पटविणे आवश्यक आहे. विविध योजनेमधून नळपाणी पुरवठा योजना राबविण्यात येत असल्यामुळे निवड झालेली कामे इतर योजनेतून हाती घेण्यात आली नाहीत. लोकसहभागाशी संबंधित योजना असल्यामुळे वर्गणीसह योजना राबविल्याबाबत खात्री पटविणे आवश्यक आहे, कामाबाबतची माहिती विषय समितीच्या अवलोकनार्थ सादर न केल्यामुळे क्षमापन प्राप्त करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील नोंदणीकृत ठेकेदारास व तांत्रिक माहिती असणाऱ्यास देणे आवश्यक असताना कामे देण्यात आलेल्या ग्रामपंचायती तांत्रिकदृष्टया सक्षम असल्याबाबत खात्री पटविणे आवश्यक आहे, उद्‌भवातील पाणी पिण्यायोग्य असल्याबाबतची चाचणी घेतलेली नाही, करारनाम्यावर तारीख, साक्षीदार व कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी नसल्यामुळे विधीग्राह्यतेबाबत खात्री पटविणे आवश्यक आहे.

मौजे ईसाद ता.गंगाखेड कामात मुख्य उध्दरण नलिका खोदकामात अंदाजपत्रकापेक्षा २५ टक्के जादा काम केले आहे. लेखासंहीता २७ नुसार कामासाठी वापरलेल्या साहित्याच्या गुणवत्ता व दर्जाबाबत तसेच पाणी उपसण्याच्या कामाचे लॉगबुक दर्शवून खात्री पटविणे आवश्यक आहे. संबंधित उप अभियंता/सक्षम प्राधिकारी यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केलेली नाही. जुन्या साहित्याची नोंद उपविभागाचे भांडारातील नोंदवहीत जमा दाखविणे आवश्यक आहे. लेखासंहिता नियम १४८ नुसार विहित मुदतीत काम करणे आवश्यक असताना व कामाची मुदत संपण्यापूर्वी मुदतवाढीचा अर्ज सादर करणे आवश्यक असताना मुदतीनंतर अर्ज प्राप्त झालेला असताना नियमबाह्य मुदतवाढीस मंजुरी दिलेली आहे.

विशेष घटक योजनेंतर्गत साधी विहीर बांधकामातील अनियमिततेबाबत लेखापरीक्षकांनी घेतलेल्या आक्षेपानुसार विविध योजनेतून नळपाणी पुरवठा योजना राबविण्यात येत असल्यामुळे उक्त निवडलेली कामे इतर योजनेतून (मौ.कलमुला ता.पूर्णा) हाती घेण्यात आली नसल्याबाबत खात्री पटविणे आवश्यक आहे. दिनांक १५ जुलै, २००८ रोजीच्या ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयानुसार कार्यकारी अभियंता यांनी प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामाची माहिती पुढील विषय समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर न केल्यामुळे क्षमापण घेणे आवश्यक आहे. आवश्यक लोकवर्गणीसह योजना राबविण्याबाबत खात्री पटविणे आवश्यक आहे. दिनांक १७ फेब्रुवारी, १९७२ नुसार केलेल्या करारनाम्यावर साक्षीदार व स्वाक्षरी नसल्यामुळे करारनाम्याच्या विधीग्राह्यतेबाबत खात्री पटविणे आवश्यक आहे. योजनेचे १८ विहिरींचे ठिकाण रितसर दानपत्राआधारे अथवा सार्वजनिक मालकीच्या जागेत असणे आवश्यक आहे, विहीर खोदकामापूर्वी पाण्याच्या उद्‌भवाची खात्री करणे व योजना कार्यरत राहण्यासाठी ग्रामपंचायतचे संमतीपत्र घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही न केल्यामुळे योजना कार्यरत राहण्यासाठी परिरक्षण होत असल्याबद्दल खात्री पटविणे आवश्यक आहे. उपअभियंता यांनी अनुसूचित जातीची लोकसंख्या केवळ १७ असल्याचे मत नोंदविल्यामुळे आवश्यक लोकसंख्या असल्याबाबत खात्री पटविणे आवश्यक आहे.

पाणी उपसण्याचे काम नोंदवहीमध्ये (लॉगबुक) ठेवणे तसेच पाणी उपसणेसाठी जादा दर लावल्यामुळे रुपये १७,६५५/- वसूल करणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तिका लिहीण्याच्या प्राथमिक नियमाचे पालन केले नाही, याबाबत समिती असमाधान व्यक्त करीत आहे. उपरोक्त लेखा आक्षेपावर परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, विशेष घटक योजनेंतर्गत नळपाणी पुरवठा योजना कामातील अनियमितता तसेच विशेष घटक योजनेंतर्गत साधी विहीर बांधकामातील अनियमितता या दोन्ही परिच्छेदांबाबत मोठ्या प्रमाणात आक्षेप असून यामध्ये गंभीर बाबी आहेत. तसेच मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे दिसून येत आहे. सदर दोन्ही लेखा परिच्छेद नोंदविलेल्या आक्षेपाबाबत जे विभाग प्रमुख जबाबदार असतील त्यांचेविरुध्द रितसर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. समितीच्या मते या सर्व बाबींसाठी विभाग प्रमुखांची जबाबदारी निश्चित करताना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

परभणी जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागातील कनिष्ठ सहायक श्री.गायकवाड यांना निलंबित केलेले आहे. रवळगाव ता.सेलू येथील विहीरीचे देयक काढले आहे. परंतु त्या ठिकाणी विहीर नसतानादेखील पैसे उचलण्यात आलेले आहे. सदर कामाच्या संदर्भात कोणत्या अधिकाऱ्यांनी विहीरींची कामे झालेली नसतानादेखील देयक अदा केलेले आहेत. त्यामुळे अधिकारी व ठेकेदार यांचे संगनमत असून गैरव्यवहार झाला असल्याचे दिसून येते. कारण तांत्रिक मंडळावर शाखा अभियंता यांनी पर्यवेक्षण केलेले नसताना पर्यवेक्षण झाल्याचे दर्शविलेले आहे. अशाप्रकारची परभणी जिल्ह्यामध्ये जवळपास ९० टक्के प्रकरणे आहेत.

**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (नरेगा) योजनेच्या कामात रोजगार सेवक, ग्रामसेवक, सरपंच, संग्राम कक्षातील डाटाएन्ट्री ऑपरेटर, गटविकास अधिकारी यांचा सहभाग असतो. तत्कालिन गटविकास अधिकारी यांचेविरुध्द गुन्हा दाखल झाला असला तरी संपूर्ण यंत्रणा यामध्ये सहभागी असल्याचे समितीचे मत आहे. मा.न्यायालयाने या प्रकरणी आदेश दिल्यानंतर दाखल झालेला गुन्हा संघटीत गुन्हा असल्यामुळे व साक्षीपूर्वी चार महिने आधी ही घटना घडलेली असतानाही याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी अनभिज्ञ असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे, ही बाब अत्यंत गभीर आहे. याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व त्यानुसार सर्व संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

# प्रकरण सात

## जिल्हा परिषद, परभणी

## शालांत परिक्षेत्तर शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना व अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांचे पाल्यांना शालांत पूर्व शिष्यवृत्ती देण्याच्या योजनेतील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.८७६/३९१ (सन २००८-०९)**

एकूण रु.२,२७,३७०/ चा खर्च शालांत परिक्षेत्तर शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करण्यासाठी केला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. इ.डी.डी.२००३/प्र.क्र.७१/सुधार-२ दि. १५ नोव्हेंबर २००३ अन्वये अर्जदार शासन अनुदानित वसतीगृहात किंवा अनुदानित निवासी विद्यार्थी नसणे आवश्यक आहे याबाबत विभागाने खात्री केलेली नाही.

२) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. इ.डी.डी.२००३/प्र.क्र.७१ /सुधार-२ दि. १५ नोव्हेंबर २००३ मधील अट क्रं ९ नुसार विद्यार्थी गुणवत्ता शिष्यवृत्ती खेरीज इतर कोणतीही शिष्यवृत्ती अथवा विद्यावेतन घेत नसल्याची विभागाने खात्री केलेली नाही.

३) प्रस्ताव तपासणी अधिकारी, समाज कल्याण अधिकारी यांच्या स्वाक्षरीनिशी मंजुर केलेले नाहीत.

४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम २० प्रमाणे शिष्यवृत्ती वाटप पत्रके दर्शविली नाहीत.

५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ७९ नुसार मंजुर प्रस्ताव विरुपित केलेले नाहीत.

६) प्राप्त अनुदानातील अखर्चीत रक्कम रु.१,२२,६३०/- शासनाकडे जमा केलेली नाही.

७) शिष्यवृत्तीची रक्कम विलंबाने वितरीत केलेली आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. इ.डी.डी.२००३/प्र.क्र.७१/सुधार-२ दिनांक १५ नोव्हेंबर, २००३ नुसार शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्याचे प्रस्तावासोबत (परिशिष्ठ) संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे मार्फत अर्जदार शासन अनुदानित किंवा अनुदानित निवासी विदयार्थी नाहीत, असे प्रमाणपत्र प्राप्त असून अवलोकनार्थ सादर.

२) विद्यार्थ्याचे प्रस्तावासोबत (परिशिष्ठ) संबंधित महाविदयालयाचे प्राचार्य यांचे मार्फत अर्जदार गुणवत्ता शिष्यवृत्ती खेरीज इतर कोणतीही शिष्यवृत्ती अथवा विद्यावेतन घेत नसल्याबाबत प्रमाणपत्र घेतलेले असून अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

३) प्रस्ताव तपासणी अधिकारी आणि समाज कल्याण अधिकारी यांच्या स्वाक्षरीनेच मंजुर झालेले आहेत.

४) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, संबंधित महाविदयालयाचे मार्फत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप केली जाते. पोहच पावत्या महाविदयालय स्तरावर असतात. त्या आता अवलोकनार्थ उपलब्ध करुन घेण्यात आल्या आहेत.

५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ७९ नुसार प्रस्ताव मंजूरीनंतर विरुपीत करण्यात आले नाहीत. परंतू संबंधित विद्यार्थ्यांना दुबार शिष्यवृत्ती अदा होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात आली आहे.

६) सदर योजनेसाठी रु. ३,५०,०००/- तरतुद प्राप्त असून खर्च रु. २,२७,३७०/- झालेला असून रु. १,२२,६३०/- अखर्चित रक्कम शासनखाती जमा करण्यात आली आहे.

७) आयुक्त अपंग कल्याण, पुणे यांचे आदेश क्रमांक २२०२ दि. २० ऑगस्ट २००८ अन्वये सदर २२३५ लेखाशिर्ष अंतर्गत तरतुद प्राप्त झाली. त्यानंतर प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने छाननी करुन सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने देयक मंजूर झाल्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे मार्फत संबंधित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्यात आली.

**परिच्छेद क्रमांक ३.८७७/३९१ (सन २००८-०९) :-**

**अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांचे पाल्यांना शालांतपूर्व शिष्यवृत्ती योजनेतील अनियमिततेबाबत.**

एकूण रक्कम रुपये १२,४२,६७०/ चा खर्च अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना शालांतपुर्व शिष्यवृत्ती रक्कम वाटप करण्यासाठी केलेला आहे. या बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) भारत सरकार सामाजिक व विशेष न्याय विभाग पत्र क्र. ११०१४/२८२०२ एससीडी ५ दिनांक २९ मार्च, २००३ नुसार लाभार्थी कडुन प्रत्येक वर्षी पालक अस्वच्छ व्यवसायात असलेबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र घेतलेले नाही. तसेच महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग परिपत्रक क्र. इबीसी२००८/प्रक्र६२/मावक२/ दिनांक १२ जून, २००८ नुसार विद्यार्थ्याच्या पालकाकडून रु.२०/- चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र घेतलेले नाही.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ७९ नुसार प्रदानानंतर संबंधीत प्रस्ताव विरुपित केलेले नाही.

३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम २० व ५१(२) नुसार संबंधीत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम प्राप्त झाले बाबतची पोहच घेणे आवश्यक होते. तथापि, लेखापरिक्षणाचेवेळी अर्धसमास पत्र क्र. २ दिनांक १० मार्च, २०१० नुसार मागणी करुन देखील रकमा वाटप झाल्याबाबातची पोच / वाटप पत्रके लेखापरिक्षणास दर्शवलेले नाहीत.

४) भारत सरकार सामिजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग पत्र क्र. ११०१४/२८००२ एससीडी ५ दिनांक २९ मार्च, २००३ चे परि.क्र. १०(६) नुसार सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर शालांतपुर्व शिष्यवृत्ती अनुज्ञेय होत नाही. समाज कल्याण विभागाने याबाबतची खात्री करुन त्या आशयाचे प्रमाणपत्र दिले नाही.

५) शिष्यवृत्ती रक्कमेचा लाभ विद्यार्थ्यांना मंजुर शैक्षणिक वर्षात मिळणे आवश्यक होते, तथापि विद्यार्थ्यांना विलंबाने शिष्यवृत्तीची रक्कम वितरीत केली आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग परिपत्रक क्र.इबीसी २००८/प्र.क्र.६२/मावक२/ दिनांक १२ जून, २००८ नुसार अनुसुचित जातीमध्ये समाविष्ट असलेल्या विदयार्थ्यांच्या प्रस्तावासोबत पालक अस्वच्छ व्यवसायात काम करत असल्याबाबतचे तहसिलदार यांचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत प्राप्त असून अवलोकनार्थ उपलब्ध आहे. तसेच प्रत्येक विदयार्थ्यांचे पालक हे अस्वच्छ व्यवसाय करतात या बाबतचे रु.२०/- चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र /प्रतिज्ञापत्र घेण्यात आलेले होते. ते अवलोकनार्थ उपलब्ध आहेत.

२) शिष्यवृत्तीचे प्रस्ताव विरुपित करण्यात आले नाहीत. परंतु संबंधित विदयार्थ्यांना दुबार शिष्यवृत्ती अदा होणार नाही याची दक्षता घेतलेली आहे.

३) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, संबंधित शाळांमार्फत विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप केली जाते. पोचपावत्या शालेय स्तरावर असतात. त्या आता अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

४) सदर योजनेखाली शिष्यवृत्ती वाटप करताना विद्यार्थ्यांना इतर शालांतपुर्व शिष्यवृत्ती मिळाली नसल्याबाबत प्रत्येक प्रस्तावासोबत विद्यार्थ्यांच्या पालकांकडून इतर कोणत्याही प्रकारची शिष्यवृत्ती घेत नसल्याबाबतचे शपथपत्र घेतले असुन त्यास संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने प्रमाणित केले आहे. अवलोकनार्थ सादर.

५) आयुक्त समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेश दिनांक १५ जुलै, २००८ व दिनांक ०५ डिसेंबर, २००८ अन्वये लेखाशिर्ष २२२५ अंतर्गत तरतुद प्राप्त झाली. त्यानंतर प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने छाननी करुन सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने देयक मंजूर झाल्यानंतर शाळेचे मुख्याध्यापकामार्फत शिष्यवृत्ती संबंधितांना अदा करण्यात आली.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, महाविद्यालयांकडून प्राप्त प्रमाणपत्रे लेखापरिक्षणाचे वेळेस उपलब्ध होती काय, किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप केली आहे, यावर समाजकल्याण अधिकारी यांनी खुलासा केला की, विद्यावेतन घेत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, लेखी खुलाशात असे नमूद केले आहे की, "इतर कोणतीही शिष्यवृत्ती अथवा विद्यावेतन घेत नसल्याबाबत प्रमाणपत्र घेतले असून अवलोकनार्थ उपलब्ध आहे." ही प्रमाणपत्रे कुणाच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आली आहेत, यावर समाजकल्याण अधिकारी यांनी खुलासा केला की, समितीच्या अवलोकनार्थ उपलब्ध आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, "महाविद्यालयांमार्फत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप होते. पोहोच पावत्या महाविद्यालय स्तरावर असतात आणि त्या आता अवलोकनार्थ उपलब्ध करुन घेण्यात आल्या आहेत", असे आपल्या लेखी खुलाशात म्हटले आहे. याचा अर्थ असा आहे की, प्रश्नावलीमध्ये हा प्रश्न असल्यामुळे या समितीसाठी आपण पोहोच पावत्या उपलब्ध करुन घेतल्या. परंतु, कार्यपध्दतीनुसार महाविद्यालयांनी शिष्यवृत्त्यांचे वाटप केले किंवा नाही, याची तपासणी करण्याचे काम समाजकल्याण अधिकारी म्हणून आपले होते. ते केलेले नाही. पंचायती राज समितीसमोर साक्ष आहे, यासाठी हे सर्व अभिलेखे नंतर तयार करुन घेतले आहे, असा आक्षेप समितीने घेतल्यास आपल्याकडे काय खुलासा आहे, नेमकी वस्तुस्थिती काय आहे, हे आपण समितीसमोर स्पष्ट करावे.

यावर समाजकल्याण अधिकारी यांनी खुलासा केला की,अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबतची ही योजना असून हे सर्व विद्यार्थी अनिवासी आहेत. त्यामुळे महाविद्यालयांकडून या शिष्यवृत्तीखेरीज त्या विद्यार्थ्यांनी अन्य कोणत्याही शिष्यवृत्तीचा अथवा विद्यावेतनाचा लाभ घेतलेला नाही, अशाप्रकारचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असते. त्याचवेळी प्रमाणपत्र घेण्यात आले असून ते नस्तीला जोडलेले आहे.

यावर समितीने विचारणा केली की, समितीचा आक्षेप एवढाच आहे की, ही प्रमाणपत्रे लेखापरीक्षण झाल्यानंतर जोडली आहेत का, हा प्रश्न यामुळे उपस्थित होतो की, लेखापरीक्षण करीत असताना त्रुटींची पूर्तता करण्याची संधी आपल्याला असते. त्यानंतर ३ वेळा लेखापरीक्षकांकडून संधी दिली जाते. अशा प्रकारच्या ४ संधींमध्ये पूर्तता केली नाही तर तो लेखा आक्षेप पंचायती राज समितीसमोर येतो. ज्या अर्थी, हा आक्षेप पंचायती राज समितीसमोर आला आहे त्या अर्थी जिल्हा परिषदेला मिळालेल्या संधीमध्ये पूर्तता केलेली नाही आणि आता पंचायती राज समिती येण्यापूर्वी ही प्रमाणपत्रे उपलब्ध करुन पूर्तता करण्याचा प्रयत्न केला आहे. ही प्रमाणपत्रे आता उपलब्ध करुन काय उपयोग आहे, लेखापरीक्षणाच्या वेळीच ती उपलब्ध असावयास हवी होती.

यावर समाजकल्याण अधिकारी यांनी खुलासा केला की, ही प्रमाणपत्रे दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजीची आहेत. यावर समितीने निदेश दिले की, लेखापरीक्षणाच्या वेळी आणि नंतरही आपण प्रमाणपत्र सादर करु शकला नाही. आता देखील जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांना संधी देण्यात आली. परंतु, त्यांच्याकडून योग्य खुलासा झालेला नाही. त्यामुळे ही प्रमाणपत्रे आता उपलब्ध करुन पूर्तता करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे, या निष्कर्षाप्रत समिती आली आहे. "शिष्यवृत्तीची रक्कम विलंबाने वितरित करण्यात आली", असाही आक्षेप आहे. वास्तविक पाहता, किती अपंग विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत, किती विद्यार्थी या योजनेसाठी पात्र आहेत, याची माहिती शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीसच मिळते. त्यामुळे शिष्यवृत्तीचे वाटप करण्यास विलंब होण्याचे काही कारण नाही. अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे हे झालेले आहे.

तद्नंतर समितीने पुढे विचारणा केली की, पुढील अ.क्र.२३ वरील लेखा परिच्छेदामध्ये देखील अशाच प्रकारचा आक्षेप आहे. हा आक्षेप असा आहे की, "महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम २०.५१(२) नुसार संबंधित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम प्राप्त झाल्याबाबतची पोच घेणे आवश्यक होते. तथापि, लेखापरीक्षणाच्या वेळी अर्धसमास पत्र क्रमांक २, दिनांक १० मार्च, २०१० नुसार मागणी करुन देखील रकमा वाटप झाल्याबाबतची पोच/वाटप पत्रके लेखापरीक्षणास दर्शविलेले नाहीत." वारंवार मागणी करुन देखील लेखापरीक्षकांना त्यावेळी पोच पत्रे दाखविण्यात आली नाहीत.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, "संबंधित महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्तीचे वाटप केले जाते. पोहोच पावत्या महाविद्यालय स्तरावर असतात. त्या आता अवलोकनार्थ उपलब्ध करुन घेण्यात आल्या आहेत."

यावर समितीने विचारणा केली की, प्राप्त अनुदानातील अखर्चित रक्कम रुपये १,२२,६३०/- शासनाकडे जमा करण्यात आली आहे. किती विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र आहेत, याचा अंदाज घेऊनच निधीची मागणी केली जाते. सुरुवातीलाच अतिरिक्त मागणी करण्यात आली होती का, रक्कम अखर्चित राहण्याचे कारण काय आहे तसेच अन्य कोणतीही शिष्यवृत्ती किंवा विद्यावेतन घेत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र महाविद्यालय स्तरावर असते. त्यामुळे जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांनी याबाबतची खात्री करुन घेतली नाही, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. वास्तविक पाहता, ही खात्री शासकीय अधिकाऱ्यांनी करुन घेणे गरजेचे होते. त्यामुळे शिष्यवृत्ती वाटपात काही घोटाळा झाला नसेल, याची खात्री देऊ शकत नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शासन निर्णय दिनांक १५ नोव्हेंबर, २००३ मध्ये "गुणवत्ता शिष्यवृत्तीखेरीज इतर कोणतीही शिष्यवृत्ती अथवा विद्यावेतन घेत नसल्याबाबत प्रमाणपत्र घेण्यात यावे", असे नमूद केले आहे.

यावर समितीने विचारणा केली की, शासन निर्णयात दिलेल्या मार्गदर्शनानुसार आपण कार्यवाही केली नाही, हाच समितीचा आक्षेप आहे. ही शिष्यवृत्ती समाजकल्याण विभागामार्फत दिली जाते. त्यामुळे प्रमाणपत्रे समाकल्याण विभागाकडेच असली पाहिजेत. परंतु, ती महाविद्यालयामध्ये होती आणि ती त्याच वेळी प्राप्त करुन घेतली आहेत, याबाबतची खात्री जिल्हा समाजकल्याण अधिकारी आता देऊ शकत नाहीत.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी अन्य शिष्यवृत्ती घेतली असेल तर त्यांना अपात्र ठरविण्याबाबत जर शासन निर्णयात अट असेल आणि ती जर जाचक असेल तर ती अट वगळण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने पाठविला पाहिजे. या समितीचे सदस्य म्हणून आमचेही असे मत आहे की, अपंग विद्यार्थ्याने अन्य शिष्यवृत्ती घेतली असली तरी गुणवत्ता शिष्यवृत्ती त्यास मिळाली पाहिजे व त्यासाठी शासन निर्णयातील ही अट वगळण्यात यावी याबाबत योग्य वेळी समिती शासनास शिफारस करेल.

तद्नंतर समितीने पुढे विचारणा केली की, रुपये १,२२,६३०/- ही रक्कम शासनखाती कधी जमा करण्यात आली, या समितीसमोर साक्ष आहे म्हणून आता ही रक्कम जमा करण्यात आली आहे का, तसेच किती अपंग विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते, किती विद्यार्थी या योजनेसाठी पात्र ठरले, किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला, ज्या अर्थी, १ लाख २२ हजार रुपये शासनखाती भरण्यात आले आहेत, याचा अर्थ, तेवढे लाभार्थी उपलब्ध झाले नाहीत का, लाभार्थी मिळविण्यासाठी समाजकल्याण विभागाने काय प्रयत्न केले, अनेक जिल्ह्यात लाभार्थी जास्त व निधी कमी, अशी परिस्थिती असताना या जिल्ह्यातील निधी परत पाठविला जातो. म्हणजे, ही योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात अधिकारी कमी पडत आहेत काय,

यावर समाजकल्याण अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०१७ मध्ये ही रक्कम शासनखाती जमा करण्यात आली आहे. तद्नंतर समितीने विचारणा केली की, दोन वर्षात रक्कम खर्च झाली नाही तर ती रक्कम पुढील आर्थिक वर्षात शासनखाती जमा केली पाहिजे, असा नियम आहे. या प्रकरणी एवढी वर्षे रक्कम शासनखाती जमा न करण्याची कारणे काय आहेत, तसेच दुसरा प्रश्न असा आहे की, शिष्यवृत्तीसाठी पात्र लाभार्थ्यांची यादी माहे सप्टेंबरअखेरपर्यंत प्राप्त होते. त्यानुसार वर्षभराची रक्कम निश्चित करुन मागणी नोंदविली जाते. डीपीसीमध्ये मागणी केल्यानुसार रक्कम मंजूर केली जाते. माहे डिसेंबर महिन्यामध्ये सुधारित बजेट होते. त्यावेळी सुध्दा आपण सांगू शकला असता की, या योजनेसाठी जिल्हा परिषदेला एवढी रक्कम लागणार नाही. समाजकल्याण विभागाच्या अन्य योजनेसाठी ही रक्कम त्याचवेळी वळविता आली असती. या कार्यपध्दतीनुसार आपण रक्कम का निश्चित केली नाही, अखर्चित रक्कम का राहिली, ही रक्कम सन २००७-२००८ या वर्षातील आहे आणि अखर्चित रक्कम सन २०१७ मध्ये परत केली आहे. म्हणजे, रक्कम परत करण्यास ७ वर्षांचा कालावधी लागला आहे. ही रक्कम नेमकी कोणाच्या खात्यात पडून होती, सन २००७ ते सन २०१७ या १० वर्षाच्या काळात शिष्यवृत्तीच्या अखर्चित राहिलेल्या रकमा जिल्हा परिषद खात्यामध्ये किती आहेत.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, लेखाशीर्ष समाजकल्याण विभागाचे असून मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या खात्यात ही रक्कम होती. यावर समितीने मत व्यक्त केले की, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला प्रश्न गंभीर स्वरुपाचा आहे, या रकमेचा ताबडतोब भरणा केला पाहिजे. १० वर्षापूर्वीची रक्कम जिल्हापरिषदेने

आता भरली आहे. यामध्ये खूप दिरंगाई झाली आहे. याचा अर्थ अहवाल वर्षाव्यतिरिक्त इतर वर्षांमध्येही अशीच परिस्थिती झाली असेल. राज्याच्या दृष्टीकोनातून मागासवर्गीय, आदिवासी, अपंग यांच्याकरिता अत्यंत महत्वाचा विषय आहे. त्यांना वेठीस धरणे योग्य नाही. आपण या प्रकरणाची पूर्ण खात्री केली असेल, तुम्ही शिष्यवृत्ती रक्कम विलंबाने वितरीत केली असे म्हटले आहे, हा निधी जिल्हा परिषदेला कोणत्या महिन्यात मिळाला होता. उशिरा मिळाला असेल तर समिती जिल्हाधिकारी यांची साक्ष घेईल. यावर समाजकल्याण अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक २० ऑगस्ट, २००८ रोजी निधी मिळाला आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, म्हणजे हा निधी विहित कालावधीत मिळाला आहे. जिल्हा परिषदेला सप्टेंबरला यादी आली असताना ऑक्टोबरला ही रक्कम देता येऊ शकली असती. विषय समितीमध्ये हे सर्व विषय घेतले पाहिजे. त्याचा आढावा वित्त समितीपुढे आला पाहिजे. परंतु अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे हे घडले आहे. अपंगाच्या शिष्यवृत्तीबाबत अशा प्रकारची दिरंगाई अधिकाऱ्यांकडून होत असेल तर हे योग्य नाही. या प्रकरणास १० वर्षे झाली आहेत, अशी प्रकरणे मोठया प्रमाणात या जिल्हयात आढळली आहेत. विहीत कालावधीत निधी प्राप्त झाला आहे. परंतु गांभीर्य कोणाला नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे.

आता अधिकाऱ्यांकडे सन २००८-२००९ चे वार्षिक लेखे आहेत का, त्यामध्ये कोणत्या लेखाशीर्षावर अखर्चित रकमा आहेत हे लिहून दिलेले असतील. या रकमा समायोजित झाल्या की नाही हे तपासले आहे का, परंतु ग्रामविकास विभागाने शासन म्हणून वार्षिक लेखे तपासले पाहिजेत. यामधील अखर्चित रकमेचा आढावा घ्यावा, या रक्कमा परत सरकारकडे जमा झाल्या आहेत किंवा कसे ही बाब ग्रामविकास विभागाने केली पाहिजे.

सरकार म्हणून ग्रामविकास विभागाची जबाबदारी आहे. सर्व जिल्हा परिषदेमध्ये समिती सातत्याने दौऱ्याच्या निमित्ताने साक्षी घेतल्या जातात या बाबी नवीन नाहीत, या बऱ्याच वर्षांपासून चालू आहेत. जिल्हा परिषदांनी वार्षिक लेखे विधिमंडळासमोर ठेवले, विधानमंडळाने ते मंजूर केले. आता राहिलेल्या त्रुटीस कोण जबाबदार आहे तर ग्रामविकास खात्याचे सचिव यास जबाबदार आहेत.

यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, निधी आल्यावर त्या वर्षामध्ये खर्च करावे असे बंधन पंचायत समितीला नाही. यावर समितीने खुलासा केला की, समितीचा प्रश्न असा आहे की, दोन वर्षात संधी देऊनही निधी खर्च झाले नाहीत, वार्षिक निधी ग्रामविकास विभागाकडे आल्यावर तो अखर्चित आहे. ही रक्कम शासनाकडे समायोजीत झालेली आहे किंवा नाही याचा ग्रामविकास विभागाने आढावा घेतला आहे का, यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, वार्षिक लेखे त्या त्या वर्षात येतात. यावर समितीने विचारणा केली की, आता सन २०१७ वर्ष चालू आहे. आपण सन २००८-२००९ च्या वार्षिक लेख्याबाबत बोलत आहोत. सन २०१५ मध्ये किती रक्कम अखर्चित आहे. ही रक्कम कधी भरली आहे. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेने सन २०१५-२०१६ मध्ये १८ कोटी रुपये भरले आहेत.

यावर समितीने निदेश दिले की, किती भरले आहेत, ही माहिती नको, अखर्चित रक्कम किती आहे ते सांगावे. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, काही रक्कम अखर्चित आहे. यावर समितीने विचारणा केली की, आजरोजी किती खर्चित रक्कम येथे शिल्लक आहे. याचा अर्थ ही रक्कम वार्षिक लेख्यामध्ये आली होती, परंतु ग्रामविकास खात्याने हे पाहिले नाही. सन २०१४-२०१५ मध्ये मागील अखर्चित निधी आला असेल की नाही, सन २००८-२००९ वर आपण चर्चा करीत आहोत. सन २००९-२०१० च्या वार्षिक लेख्यामध्ये जिल्हा परिषदेस मिळालेला निधी अखर्चित राहिला असेल तर तो यामध्ये येईल. याचा आढावा ग्रामविकास विभागाने घेतला आहे का, जिल्हा

परिषदेला दिलेला निधी बरोबर खर्च होतो की नाही हे पाहण्याकरिता वार्षिक लेखे मागविले जातात. संचालक, स्थानिक निधी लेखा यांना समितीचा प्रश्न आहे की, संचालक स्थानिक निधी लेखा यांनी बरेच आक्षेप काढले आहेत. दिनांक ३१ मार्च नंतरही मार्चचे काम जिल्हा परिषद सुरु ठेवते आहे. कारण या सर्व तारखा ३१ मार्चच्या दाखवितात. सर्व विभगाचा दिनांक ३१ मार्चला रात्री १२.३० वाजता सर्व्हर बंद होतो. जिल्हा परिषदेचे सर्व्हर त्या दिवशी का बंद होत नाही. दोन वर्षांची मुदत देऊनही जिल्हा परिषदेचा मार्च महिना जुलै पर्यत का चालतो.

यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, बीडीएस सिस्टीम अलिकडे आली आहे. यावर समितीने निदेश दिले की, यापुढे दिनांक ३१ मार्चला रात्री १२.३० वाजता सर्व्हर बंद करावे. मार्च महिना जिल्हा परिषद ऑगस्टपर्यत चालविते. त्यामुळे चालू आर्थिक वर्षात कामे एप्रिलपासून सुरु व्हावयास पाहिजेत, ते ऑगस्टनंतर सुरु होतात. याबाबत आक्षेप निघाले पाहिजेत. ग्रामविकास खात्याने जिल्हा परिषदेचे सर्व्हर दिनांक ३१ मार्चला रात्री १२.३० वाजता बंद करावे. कारण यामुळे खूप अनियमितता होत आहे.याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी खुलासा केला की, सध्या दिनांक ३१ मार्च ही तारीख आपोआप बंद होत नाही, सध्या सर्व्हरमध्ये अशी सोय करुन ठेवली आहे की, दिनांक ३१ मार्च ही तारीख जुलै पर्यत चालेल. यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषद वगळता राज्यातील इतर विभागात दिनांक ३१ मार्चला त्यांचे सर्व्हर बंद होते. परंतु जिल्हा परिषदेचे सर्व्हर त्या दिवशी का बंद होत नाही.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी खुलासा केला की, वरुन सर्व्हर चालू राहिल्याने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे देखील खाते चालू राहते. त्यांना १० तारखेपर्यतची मुदत दिली आहे. यावर समितीने विचारणा केली की, काही वर्षांपूर्वी अंतिम टप्प्यामध्ये पैसे येत होते. आता जून-जुलैमध्ये पहिल्या टप्प्यात पैसे येतात. त्यामुळे दिनांक ३१ मार्चला निधी आला असे म्हणावयाची गरज आहे का. आपणास शासन नियतव्यय एप्रिलमध्ये मिळतो. म्हणजे त्या आर्थिक वर्षात किती निधी येणार आहे, याची माहिती एप्रिलमध्ये कळते. यामुळे जिल्हापरिषदेकडील प्रशासकीय मान्यतेची प्रक्रिया सुरु झाली पाहिजे. म्हणून जिल्हापरिषदेचा मार्च महिना ३१ तारखेला रात्री १२.३० वाजता बंद झाला पाहिजे. यातून जिल्हा परिषदेला एकच वर्ष त्रास होईल.

हा विषय गंभीर आहे. शिष्यवृत्तीचा निधीमध्ये मोठया प्रमाणात खर्चित निधी आहे. मोठया प्रमाणावर प्रलंबित राहात आहे. समितीच्या लक्षात हा विषय आलेला आहे. सचिवांनी याबाबत लक्ष घालण्याची गरज आहे. यामध्ये झालेल्या दिरंगाईबाबत तात्काळ चौकशी करण्यात यावी व जबाबदार असलेल्या व्यक्तींवर तात्काळ कारवाई करण्यात यावी.

हा संपूर्ण राज्याचा विषय असल्याने शासनानेही याबाबत लक्ष देण्याची गरज आहे. धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. त्यामुळे मुद्दा क्रमांक २२ व २३ हे विषय विभागीय सचिवांच्या साक्षीकरिता घेत आहे. ग्रामविकास, वित्त, समाजकल्याण खात्यांच्या सचिवांची साक्ष घेण्यात यावी. तसेच मुददा क्रमांक २३ मध्ये ३ क्रमांकाचा मुद्दा अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत आहे. यामधील क्रमांक ३ मध्ये लिहिले आहे की, दिनांक १० मार्च, २०१० नुसार मागणी करुन देखील रकमा वाटप झाल्याबाबतची पोहच/ वाटप पत्रके लेखा परीक्षणास दर्शविलेले नाहीत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, आता आम्ही मागवून घेतलेले आहे. यावर समितीने विचारणा केली की, ७ वर्षानंतर आपण मागविले आहे. केव्हा पावत्या सादर केल्या आहेत, ते सांगा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, शालेय स्तरावर याच्या पोहोच पावत्या होत्या, त्या आता समितीच्या अवलोकनार्थ उपलब्ध आहेत. शाळेवर उपलब्ध असताना त्या दाखविल्या गेलेल्या नव्हत्या.

यावर समितीने निदेश दिले की, मुद्दा क्रमांक २२ व २३ मध्ये धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. ग्रामविकास, वित्त व समाजकल्याण विभागाच्या सचिवांची साक्ष आयोजित करण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २००७-०८ या वर्षातील अपंग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम सन २०१७ पर्यंत अखर्चित राहिल्या प्रकरणी अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना शालांतपुर्व शिष्यवृत्ती योजनेची रक्कम वाटप झाल्याची पत्रके सादर न केल्या प्रकरणी समितीने निर्देश दिल्यानुसार जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, असल्यास त्यानुसार संबंधितावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदरील योजनअंतर्गत १८३ विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करण्यात आली. संबंधित महाविदयालयामार्फतच शिष्यवृत्ती वाटप केली जाते. पोहेच पावत्या लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध नव्हत्या. त्या आता उपलब्ध करुन घेण्यात आल्या आहेत.

अंदाजपत्रकामध्ये शिष्यवृत्ती योजनेसाठी वार्षिक अंदाजित रकमांची मागणी करण्यात आली होती. मागणी केलेल्या रकमेच्या तुलनेत शिष्यवृत्ती अर्ज कमी प्राप्त झाले. त्यामुळे रक्कम अखर्चित राहिली आहे. तदनंतर अखिर्चित रक्कम तात्काळ शासन खाती न भरणे बाबत संबधित वैदयकिय सामाजिक कार्यकर्ते, सहाय्यक लेखाधिकारी यांना खुलासा विचारण्यात आला आहे. सदर अखर्चित रक्कम रु.१,२२,६३०/- शासन खाती भरणा करण्यात आली आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय :-** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे अभिप्रायाशी सहमत.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शालांतपूर्व शिष्यवृत्ती योजनेची रक्कम वाटप झाल्याची पत्रके सादर न केल्याप्रकरणी समितीने निर्देश दिल्यानुसार जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, असल्यास त्यानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत, प्रथमत: संबंधित अधिकाऱ्यांनी समितीने निर्देश देऊनही खुलासा सादर केला नाही, त्यामुळे आपण खुलासा सादर न करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली,

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २००७-०८ ची रक्कम होती. ३.५ लाख रुपये इतकी रक्कम त्यावेळी उपलब्ध झाली होती, त्यापैकी रु.२,२७,३७० इतकी रक्कम खर्च होऊन रु.१,२२,६३० इतकी रक्कम शिल्लक होती. सन २०१७ मध्ये ही रक्कम शासन खाती जमा केली आहे. तत्कालीन समाजकल्याण अधिकारी, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते होते त्यांना जिल्हा परिषदेकडून आयुक्त, समाजकल्याण व अपंग कल्याण यांच्यामार्फत नोटीस पाठविण्यात आली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, आपण नोटीस पाठवूनही अद्याप त्यांनी उत्तर दिलेले नाही, नोटीस केव्हा पाठविली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक ११ सप्टेंबर, २०१८ रोजी पाठविली आहे. यावर समितीने विचारणा केली की, प्रकरण सन २००७-०८ मधील असून तुम्ही २०१८ मध्ये नोटीस पाठविली आहे. साक्षीला येत असताना कारवाई काय केली हे सांगणे अपेक्षित आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेकडे काही खुलासे प्राप्त झाले आहेत. आयुक्तांना कारवाई करण्याचे अधिकार असल्यामुळे त्यांच्याकडे पाठविले आहेत. सन २००७-०८ पासून २०१७ पर्यंत ५ समाजकल्याण अधिकारी व ४ वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते होते, अशा एकूण ९ लोकांना जिल्हा परिषदेने नोटीस पाठविली होती.

यावर समितीने मत व्यक्त केले की, त्यांचे खुलासे काय आहेत याची समितीकडे माहिती नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी एक खुलासा जिल्हा परिषदेकडे प्राप्त झालेला आहे. दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ रोजी संबंधितांना नोटीस देण्यात आली होती व दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी त्यांचा खुलासा प्राप्त झालेला आहे.

यावर समितीने विचारणा केली की, खुलासा समितीकडे का पाठविला नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू खुलासा जिल्हा परिषदेने अमान्य करून हा विषय पुढील कार्यवाहीसाठी आयुक्तांकडे पाठविलेला आहे.

तद्नंतर समितीने पुढे विचारणा केली की आयुक्तांकडून कोणती माहिती प्राप्त झालेली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू प्रकरण आयुक्तांकडे कार्यवाही करण्यासाठी पाठविण्यात आलेले आहे. संबंधितांना आयुक्त कार्यालयाकडून प्रशासकीय कारवाईसाठी नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. शिस्तभंगाविषयक प्राधिकरण आयुक्त कार्यालय असल्यामुळे ते कार्यवाही करीत आहे.

अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या मागासवर्गीय पालकांच्या बाबतीतील गंभीर विषय आहे. तसेच अपंग विद्यार्थ्यांच्या संदर्भातील विषय आहे. अशा प्रकरणामध्ये अपंग, दिव्यांग, मतीमंदांच्या प्रकरणांमध्ये कुठेही दिरंगाई होता कामा नये. हा फार संवेदनशील विषय आहे. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी काळजी घेतली पाहिजे असे समितीने निदेश दिले.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, त्यावेळी १८३ विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते व सर्वांना शिष्यवृत्ती वाटप झाली होती. ही शिल्लकची रक्कम होती. यामध्ये कोणीही वंचित राहिलेले नाही. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, असे असेल तर संबंधितांना नोटीस द्यायला नको होती. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, त्या कालावधीमध्ये अखर्चित रक्कम राहिली असेल तर ती रक्कम शासन खात्यात जमा करणे आवश्यक असते. परंतु त्यावेळी ती रक्कम शासन खात्यात जमा करण्यात आली नव्हती. यावर समितीने निदेश दिले की, यासंदर्भात पाठपुरावा करून कार्यवाही करण्यात यावी.

## अभिप्राय व शिफारशी

परभणी जिल्हा परिषदेअंतर्गत एकूण रुपये २,२७,३७०/- एवढा खर्च शालांत परिक्षेत्तर शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करण्यासाठी केला आहे याबाबत पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप घेण्यात आले आहेत. सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक १५ नोव्हेंबर, २००३ अन्वये अर्जदार शासन अनुदानित वसतिगृहात किंवा

अनुदानित निवासी विद्यार्थी नसणे आवश्यक आहे तसेच विद्यार्थी गुणवत्ता शिष्यवृत्ती खेरीज इतर कोणतीही शिष्यवृत्ती अथवा विद्यावेतन घेत नसावा. उक्त दोन्ही अटींची विभागाने खात्री केलेली नाही तसेच शिष्यवृत्तीचे प्रस्ताव तपासणी अधिकारी समाजकल्याण अधिकारी यांच्या स्वाक्षरीनिशी मंजूर केलेले नाहीत, शिष्यवृत्ती वाटप पत्रके दर्शविली नाहीत, मंजूर प्रस्ताव विरुपित केलेले नाहीत, प्राप्त अनुदानातील अखर्चित रक्कम रुपये १,२२,६३०/- शासनाकडे जमा केलेली नाही तसेच शिष्यवृत्तीची रक्कम विलंबाने वितरीत केलेली आहे.

तसेच अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांचे पाल्यांना शालांतपूर्व शिष्यवृत्ती योजनेमध्ये एकूण रक्कम रुपये १२,४२,६७०/- एवढी रक्कम वाटप केलेली आहे. सदर शिष्यवृत्ती योजनेची रक्कम लाभार्थ्यांना वाटप करताना विद्यार्थ्यांचे पालक अस्वच्छ व्यवसायात असले बाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र घेतलेले नाही. तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांकडून रुपये २०/- चे मुद्रांक शुल्क (स्टॅम्प पेपर) असलेल्या कागदावर हमीपत्र घेतलेले नाही. शिष्यवृत्ती प्रदानानंतर प्रस्ताव विरुपित केलेले नाही. शिष्यवृत्तीची रक्कम वाटप झाल्याबाबतची पोहोच / वाटप पत्रके, लेखापरीक्षणात दर्शविलेले नाहीत. या योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर शालांतपूर्व शिष्यवृत्ती अनुज्ञेय होत नाही. याबाबतची खात्री करुन त्या आशयाचे प्रमाणपत्र दिले नाही. विद्यार्थ्यांना विलंबाने शिष्यवृत्तीची रक्कम वितरीत केलेली नाही.

सदर लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त लेखी माहितीच्या आधारे घेण्यात आलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, शालांत परिक्षेत्तर शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना व अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांचे पाल्यांना शालांत पूर्व शिष्यवृत्ती देत असताना इतर कोणतीही शिष्यवृत्ती अथवा विद्यावेतन विद्यार्थी घेत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयांकडून घेतलेले असून ते उपलब्ध आहे. तसेच महाविद्यालयामार्फत शिष्यवृत्तीचे वाटप करताना महाविद्यालय स्तरावर पोहोच पावत्या देखील उपलब्ध आहेत. तथापि, **समितीच्या मते लेखापरीक्षण करीत असताना निदर्शनास आलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याची संधी जिल्हा परिषदेला असते त्यानंतरही तीन वेळा लेखापरीक्षकांकडून संधी दिली जाते. अशा प्रकारच्या चार संधींमध्ये जिल्हा परिषदेने पूर्तता न केल्यास सदर लेखा आक्षेप पंचायती राज समितीसमोर ठेवण्यात येतो. ज्या अर्थी सदर लेखा आक्षेप पंचायती राज समितीसमोर आलेले आहेत, त्याअर्थी जिल्हा परिषदेला मिळालेल्या संधींमध्ये लेखा आक्षेपांची पूर्तता केलेली नाही आणि पंचायती राज समिती येण्यापूर्वी आवश्यक प्रमाणपत्रे उपलब्ध करुन पूर्तता करण्याचा प्रयत्न केला आहे असे सकृतदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

तसेच शिष्यवृत्तीची रक्कम विलंबाने वितरीत करण्यात आली आहे असा आक्षेप आहे. वास्तविक पाहता किती अपंग विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेले आहेत व किती विद्यार्थी सदर योजनेसाठी पात्र आहेत याची माहिती शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस मिळते त्यामुळे शिष्यवृत्ती वाटप करण्यास विलंब होण्याचे काहीही कारण नाही. संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे शिष्यवृत्ती वाटप करण्यास विलंब झालेला आहे असे दिसून येत आहे. प्राप्त अनुदानातील अखर्चित रक्कम रुपये १,२२,६३०/- शासनाकडे जमा करण्यात आली आहे. सुरुवातीलाच अतिरिक्त मागणी करण्यात आल्यामुळे रक्कम अखर्चित राहिली असल्याचे दिसून येते. जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांनी शिष्यवृत्ती खर्चाची मागणी करीत असताना खात्री करुन घेणे आवश्यक होते तसेच अनेक जिल्ह्यात लाभार्थी जास्त व निधी कमी अशी परिस्थिती असताना परभणी जिल्ह्यात अपंग विद्यार्थ्यांना सन २००७-०८ या वर्षातील दिनांक २० ऑगस्ट, २००८ रोजी शालांत पूर्व शिष्यवृत्ती योजनेसाठी प्राप्त झालेल्या निधीतील अखर्चित रक्कम सन २०१७ मध्ये शासन खाती जमा करावी लागली त्यामुळे जवळपास १० वर्षे ही अखर्चित रक्कम मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या खात्यात पडून असणे ही बाब

अत्यंत गंभीर आहे. **याप्रकरणी तत्कालिन ५ समाजकल्याण अधिकारी व ४ वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते यांना आयुक्त, समाजकल्याण व अपंग कल्याण यांच्यामार्फत दिनांक ११ सप्टेंबर, २०१८ रोजी प्रदिर्घ विलंबाने नोटीस पाठविली आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी तात्काळ जबाबदारी निश्चित करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

**तसेच अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना शालांतपूर्व शिष्यवृत्तीच्या रकमा वाटप झाल्याबाबतच्या पोहोच पावत्या / वाटप पत्रके लेखा परीक्षणाच्यावेळी उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत, याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.**

**समितीच्या असेही निदर्शनास आले आहे की, गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी अन्य शिष्यवृत्ती घेतली असल्यास त्या विद्यार्थ्यांना अपात्र ठरविण्याबाबत शासन निर्णयामध्ये अट असेल आणि अट जाचक असेल तर ती अट वगळण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने शासनाकडे पाठविला पाहिजे. समितीचे देखील असे मत आहे की, अपंग विद्यार्थ्याने अन्य शिष्यवृत्ती घेतली असली तरी गुणवत्ता शिष्यवृत्ती संबंधित विद्यार्थ्याला मिळण्याच्या दृष्टीने शासन निर्णयातील सदर अट वगळण्यात यावी व याकरीता शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

# प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, परभणी

## पुरक पोषण आहार खरेदी व वाटपातील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.९९७/१ (सन २००८-०९)**

पुरक पोषण आहार योजनेतंर्गत जिल्हयातील नऊ प्रकल्पासाठी रुपये ६०,२२,८९१/ एवढा खर्च नोंदविला आहे. जिल्हयातील ४८३ अंगणवाडी केंद्रांना महिला बचत गटामार्फत आणि ८२० केंद्रांना महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कंझुमर्स फेडरेशन लि.मुंबई यांचे मार्फत आहाराचा पुरवठा झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) पुरवठा केलेल्या मालाची गुणवत्तेबाबत शासकीय प्रयोगशाळेतुन तपासणी होणे आवश्यक आहे. तसेच मालाचा दर्जा व वजनाबाबत तपासणी करण्याऱ्या समितीने याबाबत खात्री करुन तशा आशयाचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. परंतु वरिलप्रमाणे कार्यवाही न झाल्यामुळे व अंगणवाडी सेविकांनीही प्रमाणित केले नसल्यामुळे मालाचा दर्जा, गुणवत्ता व वजनाबाबत खात्री होत नाही.

२) करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार विहीत वेळेत पुरवठा करुन गावातील पंचासमक्ष वजन करुन पोहोच घेणे आवश्यक असताना अशाप्रकारे पोहोच घेतली नाही.

३) सुरक्षा अनामत रक्कम रुपये ६,८७,०००/- च्या ३ टक्के रुपये २०,६१०/- च्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असताना रुपये १००/- एवढया मुद्रांकावर केली आहे. यास्तव कमी रक्कम रुपये २०,५१०/- वसूल करुन शासन खाती भरणा होणे आवश्यक आहे.

४) डिलेव्हरी चलनानुसार आहारात कमी / जादा पुरवठा केल्याने रक्कम रुपये ७,१४३/- चे जादा प्रदान झाले आहे सदरील जादा प्रदानाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

५) एकात्मीक बालविकास सेवा संचालनालय एकविकासे/का-१/आस्था-१०२७/८९ नुसार बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी दरमहा ५० व मुख्य सेविकांनी २० अंगणवाडयांची तपासणी केली नाही.

६) पुरवठा आदेशातील शर्तीनुसार १५ दिवसाचे आत आहाराचा पुरवठा अन्यथा ५ टक्के दंड आकारणे आवश्यक आहे. परंतु डिलेव्हरी चलनावर माल प्राप्तीची तारीख नसल्यामुळे वेळेवर पुरवठा झाल्याची खात्री होत नाही.

७) रिकाम्या गोण्यांची विक्री करुन त्याची रक्कम शासन खाती भरणा होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) आक्षेपाच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की,अंगणवाडी केद्रांना धान्यादी मालाचा प्रत्यक्ष पुरवठा करण्यापुर्वी पुरवठादाराने धान्यादी मालाचे नमूने शासकीय प्रयोग शाळेतुन स्वखर्चाने तपासणी करुन घेतली आहेत. तथापि करारनाम्यानुसार समिती ऐवजी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी तशा आशयाचे प्रमाणपत्र सादर केले आहे.

धान्यादी माल ताब्यात घेताना अंगणवाडी सेविका यांनी सर्व माल चांगल्या प्रतीचा प्रत्यक्ष मोजुन माझ्या ताब्यात मिळाला त्याबाबतची पोहोच घेतली आहे.

प्रयोगशाळा तपासणी अहवाल, बाल विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र व पोहोच पावती संचिकेत उपलब्ध आहे.

२) करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार पुरवठादाराने अंगणवाडीस पोषण आहार पुरवठा विहित वेळेत केलेला आहे. तसेच पुरवठादाराने मालाची वाहतुक करणाऱ्या वाहनात प्रमाणित वजनकाटा ठेवला असून अंगणवाडी सेविका यांनी स्थानिक व्यक्ती समक्ष मालाचे वजन करुन घेतले नंतर अंगणवाडीस मालाचा पुरवठा झालेला आहे. याबाबतच्या नमुन्यादाखल अंगणवाडी केंद्रातील पोहोच पावत्या संचिकेत उपलब्ध आहेत.

३) सुरक्षा अनामत रु ६,८७,०००/- च्या ३% प्रमाणे रु २०,६१०/- मुद्रांकाची रक्कम रु २०,५१०/- चलन क्र २७ दि.०३ जुलै २०१७ अन्वये शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे. चलनाची साक्षांकित प्रत संचिकेत उपलब्ध आहे.

४) डिलेव्हरी चलनानुसार आहारात कमी जादा पुरवठा केल्याने वसुली रक्कम रु.७,१४३/- शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे. चलनाच्या साक्षांकित प्रती संचिकेत उपलब्ध आहेत.

५) सन २००८-०९ मध्ये बाल विकास प्रकल्प अधिकारी व मुख्य सेविका यांनी अंगणवाडी केंद्रांना वेळोवेळी भेटी दिलेल्या असुन तपशील व तपासणी अहवाल संचिकेत उपलब्ध आहे.

६) बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत पुरवठा झालेबाबत देयकासोबत प्रमाणपत्र दिलेले आहे. विलंबाने पुरवठा न झाल्यामुळे दंड आकारलेला नाही. या बाबत प्रकल्प स्तरावरील प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती संचिकेत उपलब्ध आहेत.

करारनाम्यानुसार पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पुरवठा करणे आवश्यक आहे.त्यानुसार अंगणवाडी केंद्रास विहित मुदतीत मालाचा पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच याबाबत पुरवठा आदेश, पोहच पावती यांच्याव्दारे खात्री करण्यात आली आहे. पुरवठा आदेश व पोहोच पावती संचिकेत उपलब्ध आहेत.

७) रिकाम्या गोण्याची प्रकल्पस्तरावर विक्री करुन रक्कम शासनखाती भरणा करण्यात आलेली आहे. प्रकल्पनिहाय तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) गंगाखेड | १५००/- |
| २) पाथरी | ११८०/- |
| ३) परभणी १ | १४१०/- |
| ४) परभणी २ | १४५०/- |
| ५) जिंतूर १ | १३००/- |
| ६) जिंतूर २ | १५००/- |
| ७) पालम | १५००/- |
| ८) पूर्णा | १५००/- |
| ९) सेलू | १५००/- |
| १०) मानवत | १०००/- |
| ११) सोनपेठ | ९६०/- |
| एकूण | १४८००/- |

चलनाच्या सांक्षाकित प्रती संचिकेत उपलब्ध आहेत.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पुरवठा केलेल्या धान्यादी मालाचे तपासणी अहवाल उपलब्ध आहेत का, चांगल्या प्रतीचा माल मोजून प्राप्त झाल्याबाबतचे अंगणवाडी सेविका यांच्याकडील प्रमाणपत्रे लेखा परीक्षणाच्या वेळी सादर का करण्यात आली नाहीत, तपासणी अहवाल, योग्य वजन तसेच चांगल्या दर्जाच्या मालाचे प्रमाणपत्र कधी उपलब्ध करुन घेण्यात आली आहेत. तसेच सुरक्षा अनामत रकमेच्या ३ टक्क्यानुसार मुद्रांक शुल्काची रक्कम रु.२०,५१०/- दिनांक ३ जुलै, २०१७ रोजी चलनाद्वारे शासन खाती भरली आहे. परंतु सन २००८-०९ मधील हा मुद्दा आहे. पंचायती राज समिती येथे आली नसती तर ही रक्कम भरली नसती. ही रक्कम कोठून भरली तसेच सदर रक्कम भरण्याकरिता आपणास कोणी सांगितले.

यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण विभाग यांनी खुलासा केला की, सन २०१५ पासून ऑडिट कॅम्प सुरु असताना रु.७१४३/- चलनाद्वारे रक्कम भरली आहे. तसेच यासंबंधी १०० रुपयांच्या बॉण्डवर कार्यवाही करण्यासंबंधी शासन पत्र होते, परंतु ते आम्हाला मिळाले नाही. आम्ही यासंबंधी विभागीय व्यवस्थापक, औरंगाबाद फेडरेशन यांना पत्र दिले होते. परंतु त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. परंतु सन २००७ मध्ये आम्ही त्यांना पत्र पाठविले होते. त्यानंतर त्यांच्याकडून दिनांक ३ जुलै, २००७ मध्ये सदर रक्कम प्राप्त झाल्यानंतर आम्ही ती चलनाद्वारे बँकेत भरली. इतर रकमा एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालयाच्या आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, सदर रक्कम लेखा परीक्षणाचा आक्षेप आल्यानंतर भरणे आवश्यक असताना जुलै, २०१७ मध्ये मुद्रांकाची रक्कम चलनाद्वारे शासन खाती भरली आहे. सदर रक्कम व्याजासह भरणा केली आहे का?

यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण विभाग यांनी खुलासा केला की, मुद्रांक शुल्काची रक्कम व्याजासह घेतलेली नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, या संदर्भात २० हजार रुपयांच्या बंधपत्रावर करारनामा करावयास पाहिजे होता. परंतु १०० रुपयांच्या बॉण्डवर करारनामा केल्यामुळे मुद्रांक शुल्काची रक्कम रु. २०,५१०/- दिनांक ३ जुलै, २०१७ रोजी चलनाद्वारे शासन खाती भरली आहे.

यावर समितीने पुढे विचारणा केली की, दुसरा मुद्दा असा आहे की, बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी दरमहा ५० व मुख्य सेविकांनी २० अंगणवाडया तपासणे बंधनकारक असताना त्यांच्याकडून तशी तपासणी करण्यात आली नाही. या संदर्भात असे उत्तर देण्यात आले आहे की, बाल विकास प्रकल्प अधिकारी व मुख्य सेविकांनी अंगणवाडी केंद्राना वेळोवेळी भेटी दिल्या असून तपासणी अहवाल संचिकेत उपलब्ध आहे. त्यांच्या तपासणीच्या वेळी गुणवत्ता प्रमाणपत्र नसल्याची बाब निदर्शनास का आली नाही तसेच गुणवत्ता तपासली नसताना मालाचा वापर कसा करण्यात आला, तत्कालीन एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी यांना आजच्या बैठकीला बोलाविले आहे काय, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण विभाग यांनी खुलासा केला की, तत्कालीन एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी यांना आजच्या बैठकीला बोलाविले होते. ते सेवानिवृत्त झालेले असून आज येथे उपस्थित नाहीत. या संदर्भात दिनांक २६ ऑगस्ट, २००८ आणि १८ ऑक्टोबर, २००८ चा प्रयोगशाळेचा अहवाल सादर केलेला आहे. प्रत्येक देयक तालुका स्तरावर निघत असते. देयकासोबत एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी यांचे प्रमाणपत्र असल्याची खात्री करण्यात आली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, मालाचे वाटप अंगणवाडीत होत असल्यामुळे सदर मालाच्या गुणवत्तेबाबत प्रमाणपत्र मिळाल्याबाबत अंगणवाडी सेविकेला माहीत होते का, करारनाम्यानुसार पुरवठा केलेल्या मालाचे नमुने घेऊन प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी पाठविणे आवश्यक असते. परंतु तसे घडले नाही. तसेच एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी यांना आवश्यक तितक्या अंगणवाडयांना भेटी न दिल्याबाबत आक्षेप घेतल्यानंतर लेखी स्पष्टीकरणात वेळोवेळी भेटी दिल्याचे नमूद करण्यात आले आहे. परंतु गुणवत्ता प्रमाणपत्र नसताना मालाचा वापर कसा करण्यात आला.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, अंगणवाडयांच्या पूरक पोषण आहाराचा विषय अतिशय गंभीर आहे. अंगणवाडयांमध्ये लहान मुले असतात. तसेच पुरवठयाच्या संदर्भात गुणवत्ता प्रमाणपत्र आवश्यक असते. अंगणवाडयांमध्ये गुणवत्ता प्रमाणपत्र नसल्यामुळे मालाचा दर्जा चांगला आहे किंवा कसे याची माहिती मिळू शकत नाही. तसेच नमुन्यानुसार पुरवठा होत नसल्यामुळे मोठी अनियमितता होत आहे. यामुळे जिल्हा परिषद किंवा गटविकास अधिकारी यांच्याकडून पुरवठादाराला सहकार्य करण्याची भूमिका नाकारता येऊ शकत नाही. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संपूर्ण चौकशी करावी. तसेच आपण तेथे भेटी देऊन पाहणी करावी. तेथे त्यात अनियमितता आढळून आल्यास संबंधितांविरुध्द कारवाई करावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले.

यावर समितीने विचारणा केली की, पुरक पोषण आहाराचे नमुने अंगणवाडी सेविकांना प्राप्त करुन घ्यावयाचे असतात. ते नमुने अंगणवाडीच्या ठिकाणी उपलब्ध आहे का तसेच काल परभणी जिल्हयात एका अंगणवाडी सेविकेने आत्महत्या केली आहे. ती याच कारणामुळे झाली आहे का, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण विभाग यांनी विदित केले की, तसे नमुने अंगणवाडीमध्ये उपलब्ध नाहीत.

यावर समितीने मत व्यक्त केले की, आपण चुकीचे उत्तर देऊ नये. आम्हाला यासंबंधी संपूर्ण माहिती आहे. आम्ही जिल्हा परिषद सदस्य या नात्याने ग्रामीण भागात अनेक वर्षे काम केलेले आहे. आमच्या माहितीप्रमाणे कोणत्याही अंगणवाडीतून मालाचे नमुने तपासणीसाठी पाठविले जात नाहीत.

तद्नंतर समितीने पुढे विचारणा केली की, पुरक पोषण आहाराकरिता एक वर्षामध्ये किती खर्च होतो, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण विभाग यांनी विदित केले की, एक महिन्याकरिता एक कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. तसेच प्रकल्प स्तरावर त्यासंबंधीची बिले सादर केली जातात. यावर समितीने निदेश दिले की, एक महिन्याकरिता १ कोटी रुपयांची तरतूद आहे. परंतु त्यात जवळपास ५० लाख रुपयांची बोगस बिले असू शकतात. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे, हा अतिशय गंभीर मुद्दा आहे. असे असताना संबंधित अधिकाऱ्यांनी मालाचे नमुने तपासणीला पाठवित असल्याबाबत समितीला चुकीचे उत्तर दिले आहे.

यावर समितीने विचारणा केली की, आपण सदर पदावर केव्हा पासून कार्यरत आहात, तसेच तुम्ही दरमहा किती अंगणवाडयांना भेटी देतात, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण विभाग यांनी खुलासा केला की, ते २ वर्षापासून उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) या पदावर कार्यरत असून त्यांनी ३ महिन्यांचे लक्ष्य दिलेले असते त्यानुसार दर महिन्याला १७ ते १८ भेटी होतात.

यावर समितीने मत व्यक्त केले की, आपण जी वस्तुस्थिती आहे ती समिती समोर मांडली पाहिजे. अंगणवाडी सेविकांच्या संदर्भातील मुद्दा समिती समोर उपस्थित झालेला आहे. ज्या मुद्याच्या संदर्भात लेखी आक्षेप आहे त्या संदर्भात आपल्याकडून तत्काळ कार्यवाही झाली पाहिजे. आपण अ.क्र.२५ व २६ वरील मुद्यांच्या संदर्भात महिला व बाल कल्याण विभागाच्या सचिवांची व आयुक्तांची साक्ष घेऊ.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

१) अंगणवाडयांच्या पुरक पोषण आहारा संदर्भात गुणवत्ता प्रमाणपत्र नसल्यामुळे मालाचा दर्जा व गुणवत्ता या बाबत माहिती न मिळाल्या प्रकरणी समितीने निर्देश दिल्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी केली आहे काय, असल्यास उक्त चौकशीत काय आढळुन आले आहे, त्यानुसार संबंधितािवरुध्द जबाबदारी निश्चित करुन कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

२) परभणी जिल्हयात अंगणवाडी सेविकांचे सन २०१७ मध्ये ०६ महिन्यापासुन मानधन प्रलंबित होते. तसेच मागील कालावधितील कामे नोंदविले नसल्यामुळे सर्व अधिका-यांनी दबाव टाकुन प्रचंड कामाच्या त्रासामुळे एका अंगणवाडी सेविकेने आत्महत्या प्रकरणी समितीने निदेश दिल्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय? त्यानुसार संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्याविरुध्द जबाबदारी निश्चित करुन कोणती कारवाई करण्यात आली, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

३) अंगणवाडी सेविकांचे वेतन ऑनलाईन पध्दतीने करण्यासाठी आधार कार्ड बँकखात्याशी लिंक होत नसल्यामुळे त्यांना ६/६ महिने वेतन मिळत नसल्या प्रकरणी समितीने निदेश दिल्याप्रमाणे महिला व बाल विकास विभागाने संबंधीताविरुध्द कोणती कार्यवाही केली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) मा. पंचायती राज समितीने दिलेल्या निर्देशाप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) यांनी दि २७ जुलै २०१८ रोजी पोखर्णी (नृ.) ता. परभणी येथील अंगणवाडी क्र.०६ ला भेट दिली. अंगणवाडी केंद्राची तपासणी करुन धान्यादि मालाची साठा रजिस्टरप्रमाणे मोजणी करण्यात आली. साठा रजिस्टरप्रमाणे प्रत्यक्ष मोजणीत धान्यादि माल उपलब्ध होता. उपस्थितांसमक्ष धान्यादि मालाचा पंचनामा करुन नमुने प्रयोगशाळेस तपासणीसाठी पाठविण्यात आले. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झालेला असून अहवालात धान्यादि मालाचा दर्जा व गुणवत्ता चांगली असल्याबाबत नमुद आहे.

याचबरोबर प्रत्येक अंगणवाडी केंद्रावर धान्यादि माल पुरवठा करणाऱ्या संस्थेसोबत झालेल्या करारनाम्याची प्रत अंगणवाडी केंद्रावर ठेवण्यात आलेली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ अन्वये देण्यात आलेल्या सुचनेप्रमाणे बचतगटामार्फत पुरवठा होणाऱ्या गरम ताजा आहार माता समिती मार्फत तपासल्या जातो.

२) शासन स्तरावरुन शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग दि. १४ फेब्रुवारी, २०१७ अन्वये अंगणवाडी सेविका/मदतनीस यांचे मानधन केंद्र शासनाच्या पीएफएमएस प्रणालीद्वारे आयुक्तालयामार्फत अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्याप्रमाणे माहे जून २०१७ पासून पीएफएमएस प्रणालीद्वारे परभणी जिल्हयांतर्गत अंगणवाडी सेविका/मदतनीस यांचे मानधन आयुक्तालयामार्फत अदा करण्यास सुरुवात झालेली आहे. परभणी जिल्हयातील एकूण कार्यरत अंगणवाडी सेविका/मदतनीस/ मिनी अंगणवाडी सेविकांपैकी ५४ अंगणवाडी सेविका/मदतनीस /मिनी अंगणवाडी सेविका यांचे तांत्रिक कारणास्तव मानधन पीएफएमएस प्रणालीद्वारे करण्यास अडचण निर्माण झालेली होती. त्या ५४ मध्ये मयत अंगणवाडी सेविका श्रीमती सुमित्रा राखुंडे यांचा समावेश होता. पंचायत राज समितीच्या दौऱ्यानिमीत्त जिल्हा परिषद अंतर्गत सर्वच विभागांनी त्यांच्या अधिनस्त कर्मचा-यांना काम विहीत मुदतीत करुन घेण्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. परंतु कोणत्याही प्रकारचा दबाव टाकण्यात आलेला नव्हता. सेविकेने आत्महत्या केल्याप्रकरणी संबंधित बीटच्या पर्यवेक्षीका श्रीमती ए.ए.गुंजोटीकर यांना तात्काळ निलंबीत करुन समितीने

निदेश दिल्यानुसार जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.प.परभणी यांना याबाबत चौकशी करण्यासाठी आदेशीत करण्यात आलेले होते. त्यांच्या चौकशी अहवालामध्ये तसेच पोलीसांकडून प्राप्त झालेल्या अहवालामध्येही श्रीमती सुमित्रा राखुंडे यांनी घरगुती अडचणींमुळेसुध्दा आत्महत्या केली असावी असे नमुद केले आहे. त्यामुळे संबंधित बीटच्या पर्यवेक्षिका श्रीमती ए. ए. गुंजोटीकर हया दोषी असल्याचे आढळून आले नाही.

३) शासन स्तरावरुन शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग दि. १४ फेब्रुवारी, २०१७ अन्वये अंगणवाडी सेविका/मदतनीस यांचे मानधन केंद्र शासनाच्या पीएफएमएस प्रणालीद्वारे आयुक्तालयामार्फत अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्याप्रमाणे आयुक्तालयामार्फत संबंधितांचे मानधन पीएफएमएस प्रणालीद्वारे अदाई होत आहे. आज रोजी काही तांत्रिक अडचणींमुळे २६ अंगणवाडी सेविका/मदतनीस यांचे मानधन पीएफएमएस प्रणालीद्वारे होत नसल्यामुळे ऑफलाईन पध्दतीने मानधन अदाई करण्यासाठी शासनाकडून निधी प्राप्त होत आहे. सद्यस्थितीत माहे जुन २०१८ पर्यंतचे मानधन संबंधीतांना अदाई करण्यात आलेले आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**महिला व बालविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, एकात्मिक बाल विकास योजनेतील खरेदी व वाटपातील अनियमिततेसंदर्भात अंगणवाडयांच्या पुरक पोषण आहार पुरवठयाबाबत गुणवत्ता प्रमाणपत्र नसल्यामुळे गुणवत्तेबाबत माहिती न मिळाल्यामुळे समितीने निदेश दिल्यानुसार कार्यवाही केली आहे काय,

यावर सह सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी खुलासा केला की, समितीने दिलेल्या निर्देशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण विभाग यांनी दि.२७ जून, २०१८ रोजी भेट दिली असून अंगणवाडीची तपासणी करुन मालाच्या साठयाची रजिस्टर नोंदणी नुसार मोजणी करण्यात आली. तेथील मालाचा नमुना प्रयोगशाळेमध्ये तपासणीकरीता पाठवला असता चांगली गुणवत्ता असल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. प्रत्येक अंगणवाडी केंद्रावर माल पुरवठा करणाऱ्या संस्थेशी झालेल्या करारनाम्याची प्रत देखील अंगणवाडीमध्ये ठेवली जाते. बचत गटामार्फत पुरवठा केला जाणारा गरम, ताजा माल माता समिती मार्फत तपासला जात आहे.

यावर समितीने विचारणा केली की, समितीने सांगितल्यानुसार त्यांनी चौकशी केली आहे. जो माल पाठवला जातो, त्याची गुणवत्ता तपासणी करुन द्यायची आहे. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग यांनी विदित केले की, आम्ही एक अचानक भेट अंगणवाडीला केली असून त्याचे नमुने घेऊन त्याची तपासणी पुणे येथील प्रयोगशाळेत केली आहे. त्याची गुणवत्ता योग्य असल्याचे प्रमाणपत्र आले होते.

यावर समितीने विचारणा केली की, पुरक पोषण आहाराचा पुरवठा करणारा पुरवठादार व सरकार यांच्यामध्ये करारनामा झालेला आहे. त्याची प्रत मराठीत आहे काय, पुरक पोषण आहाराच्या कराराची प्रत इंग्रजीत आहे. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग यांनी विदित केले की, होय, ही प्रत मराठीत आहे.

यावर समितीने विचारणा केली की, दोन्ही प्रत मराठीत असाव्यात अशा सूचना या पूर्वी समितीने दिली होती. यावर आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, महिला बालकल्याण विभाग यांनी खुलासा केला की, पुरक पोषण आहाराचा करारनामा जिल्हा स्तरावर होत असून तो मराठीत झालेला आहे. टीएचआरचे निविदा राज्य पातळीवर झाले होते. आयुक्त पातळीवर तो करारनामा होतो.

यावर समितीने विचारणा केली की, पुरक पोषण आहाराचा करारनामा मराठीत असला पाहिजे. अंगणवाडी सेविकांना तो समजला पाहिजे, तो अद्यापही इंग्रजीत आहे. यावर सह सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी विदित केले की, अंगणवाडीस पुरक पोषण आहाराची मराठी प्रत उपलब्ध करुन देण्यात येईल.

यावर समितीने निदेश दिले की, या बाबत समितीने मागील वेळी सूचना दिलेल्या आहेत. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार आहार स्वीकारला पाहिजे हेच त्या अंगणवाडी सेविकांना माहीत नाही. ठेकेदारांचा दबाव असतो. सँपल लॅबमध्ये तपासणीकरिता पाठवले जाते ते ठेकेदारच परस्पर घेऊन जातो. एकाही अंगणवाडीवर आम्हाला शालेय पुरक पोषण आहाराचा नमुना पहायला मिळाला नाही. ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वैयक्तिकरित्या तपासली होती काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, मी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालविकास विभाग आम्ही अनपेक्षित भेट दिली होती. तेथील मालाचे नमुने आम्ही प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले होते. अपेक्षेनुसार त्याची गुणवत्ता होती. दर महिन्याला उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालविकास विभाग यांच्या कडून वेगवेगळया अंगणवाडीमधून तपासणीसाठी माल पाठवला जातो. समितीने सांगितले होते की, तपासणीसाठी माल पुरवठादाराकडून जातो. आता तसे होत नाही. तो माल आमच्यामार्फत जातो.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, परभणी जिल्ह्यात भेट दिली असता एकाही अंगणवाडीमध्ये जो माल स्वीकारायचा आहे त्याचा नमुना आढळून आला नाही. आणलेला माल घेतात, सही करुन देयक देतात. यंत्रणेत काहीही सुधारणा झालेली नाही. तेथे वजनकाटा देखील नसतो. याबाबत आपण काय कार्यवाही केली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या बाबत नोंद घेतली जाईल असे समितीस उत्तर दिले.

यावर समितीने निदेश दिले की, सदस्यांनी या ठिकाणी त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. या सर्व गोष्टींचे अनुपालन झाले पाहिजे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अचानकपणे भेटी द्याव्यात, याप्रमाणे भेटी झाल्या पाहिजेत आणि मालाची तपासणी केली पाहिजे. धान्याचा चांगला पुरवठा झाला पाहिजे, निकृष्ठ दर्जाचे धान्य त्या छोट्या छोटया बालकांना मिळता कामा नये, असा समितीचा उद्देश आहे. आरोग्याच्या दृष्टीकोनातून त्यांच्यावर विपरित परिणाम होता कामा नये, याची दक्षता आपण घेतली पाहिजे.

## अभिप्राय व शिफारशी

सन २००८-०९ मध्ये पुरक पोषण आहार योजनेंतर्गत परभणी जिल्ह्यातील नऊ प्रकल्पासाठी रुपये ६०,२२,८९१/- एवढा खर्च नोंदविला आहे. जिल्ह्यातील ४८३ अंगणवाडी केंद्रांना महिला बचत गटामार्फत आणि ८२० केंद्रांना महाराष्ट्र स्टेट को.ऑप.कंझ्युमर्स फेडरेशन लिमिटेड, मुंबई यांचेमार्फत आहाराचा पुरवठा झाला आहे. याबाबत घेण्यात आलेल्या लेखा आक्षेपानुसार पुरवठा केलेल्या मालाची गुणवत्तेबाबत शासकीय प्रयोगशाळेतून तपासणी होणे आवश्यक होते. तसेच मालाचा दर्जा गुणवत्ता व वजनाबाबत खात्री होत नाही. गावातील पंचासमक्ष वजन करुन पोहोच घेतली नाही. सुरक्षा अनामत रकमेच्या ३ टक्के रकमेएवढ्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असताना रुपये

१००/- एवढ्या मुद्रांकावर केले आहे. त्यामुळे रुपये २०,५१०/- एवढी रक्कम शासन खाती भरणा करणे आवश्यक होते. पुरवठा चलनानुसार कमी/जादा पुरवठा केल्याने रक्कम रुपये ७,१४३/- एवढ्या जादा रकमेचे प्रदान झाले आहे. बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी दरमहा ५० अंगणवाड्या व मुख्य सेविकांनी दरमहा २० अंगणवाड्यांची तपासणी केली नाही. १५ दिवसांच्या आत मालाचा पुरवठा न झाल्यास ५ टक्के दंड आकाराणे आवश्यक असते. परंतु पुरवठा चलनावर माल प्राप्तीची तारीख नसल्यामुळे मालाचा वेळेवर पुरवठा झाल्याची खात्री होत नाही. रिकाम्या गोण्याची विक्री करुन त्यापोटी प्राप्त झालेली रक्कम शासन खाती जमा करणे आवश्यक होते.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, परभणी यांनी लेखी खुलासा केला आहे की, मालाचा दर्जा, गुणवत्ता वजनाबाबत करारनाम्यानुसार बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी प्रमाणपत्र सादर केले आहे. अंगणवाडी सेविकांनी चांगल्या प्रतीचा माल पोहोचल्याबाबत पोहोच पावत्या संचिकेत उपलब्ध आहेत. मुद्रांकाची रक्कम रूपये २०,५१०/- शासन खाती जमा करण्यात आलेली आहे. कमी/जादा पुरवठा केल्याप्रकरणी वसुली रक्कम रुपये ७,१४३/- शासन खाती जमा करण्यात आलेली आहे. बालविकास प्रकल्प अधिकारी व मुख्य सेविका यांनी अंगणवाडी केंद्रांना वेळोवेळी भेटी दिलेल्या आहेत. विहित मुदतीत पुरवठा झालेबाबत देयकासोबत प्रमाणपत्र दिलेले आहे व रिकाम्या गोण्या विक्री करुन एकूण रुपये १४,८००/- एवढी रक्कम शासनखाती भरणा करण्यात आलेली आहे.

उपरोक्त लेखी खुलाशाच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, **पुरक पोषण आहार योजनेंतर्गत कमी जादा पुरवठा करण्यात आल्याप्रकरणी वसुलीची रक्कम रुपये ७,१४३/- सन २००८-०९ मध्ये भरणा करणे अपेक्षित असताना सन २०१५ नंतर चलनाद्वारे भरणा करण्यात आली आहे. तसेच बंधपत्राद्वारे भरावयाची मुद्रांक शुल्काची रक्कम रुपये २०,५१०/- दिनांक ३ जुलै, २०१७ रोजी चलनाद्वारे शासन खाती भरणा केली आहे. यावरुन सकृतदर्शनी असे दिसून येते की, शासन खाती जमा करावयाची रक्कम प्रदीर्घ विलंबाने म्हणजेच जवळपास ८ वर्षे एवढ्या विलंबाने जमा झालेली आहे. त्यामुळे समिती या प्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.**

पुरक पोषण आहाराचे वाटप अंगणवाड्यांना झाल्यानंतर पुरवठा झालेल्या मालाचे नमुने प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी पाठविणे आवश्यक होते. परंतु तसे घडलेले नाही तसेच एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी आवश्यक तितक्या अंगणवाड्यांना भेटी न दिल्याबाबत आक्षेप घेतल्यानंतर लेखी स्पष्टीकरणात वेळोवेळी भेटी दिल्याचे नमुद करण्यात आले आहे. परंतु गुणवत्ता प्रमाणपत्र नसताना मालाचा दर्जा गुणवत्ता चांगली आहे किंवा नाही हे माहित नसताना मालाचा वापर कसा करण्यात आला. याबाबत समितीपुढे शंका उपस्थित होते. कारण अंगणवाड्यांच्या पुरक पोषण आहाराचा विषय लहान मुलांशी निगडीत असल्यामुळे या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता पुरवठा करण्यात येणारा माल नमुन्यानुसार होत नसल्याचे दिसून येत आहे, त्यामुळे मोठी अनियमितता झाल्याचे दिसून येते. या प्रकरणामध्ये जिल्हा परिषद किंवा गटविकास अधिकारी यांच्याकडून पुरवठादाराला सहकार्य करण्याची भूमिका नाकारता येऊ शकत नाही. समितीच्या असेही निदर्शनास आले की, पुरक पोषण आहाराचे नमुने अंगणवाडी सेविकांनी प्राप्त करुन घ्यावयाचे असताना व ते नमुने अंगणवाडीच्या ठिकाणी उपलब्ध आहेत किंवा नाही याची खातरजमा करुन ते नमुने अंगणवाडीतून तपासणीसाठी प्रयोगशाळेमध्ये पाठविणे आवश्यक असते.

**पुरक पोषण आहाराकरीता एक महिन्याकरीता सुमारे एक कोटी रुपयांची तरतुद करण्यात येते. त्यामध्ये जवळपास ५० लाख रुपयांची देयके बनावट असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे समिति याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे व याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व चौकशीनुसार कोणी दोषी आढळल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

# प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, परभणी

## मागासवर्गीयांच्या घरावरील गवती छप्परा ऐवजी टिनपत्रे पुरविणे या योजनेतील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ४.२९१ (०५) (सन २००८-०९)**

पंचायत समितीने स्व:उत्पन्नातुन १०० टक्के अनुदानावर सदरची योजना राबविली आहे. यासाठी वर्तमानपत्रातुन जाहिर निविदा न मागविता स्थानिकरित्या पत्राद्वारे दराची चौकशी करुन सर्वात कमी दर असलेल्या महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळाकडून खरेदी करुन रुपये १,२६,२८०/ खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखंस १०९३(२६२५) दि. १० जुलै, १९९३ नुसार ५०,०००/ पेक्षा जास्त रकमेची खरेदी असल्यामुळे पंचायत समिती ठराव क्र.५३ दिनांक १० फेब्रुवारी, २००९ नुसार वर्तमान पत्रातून जाहीर निविदा मागवून खरेदी करण्याचे प्रस्तावित होते. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन त्यावर रु. २९६०/ खर्चही केला आहे. परंतू पत्र क्र. पसप /व्हीपी/३/कावि ५/ दि. ९ जानेवारी, २००९ अन्वये विशिष्ठ पुरवठादाराचे दर मागवून खरेदी प्रक्रिया पार पाडली आहे. यास्तव जाहिरातीवर झालेला निष्फळ खर्च वसूल होणे बाबत आणि विहीत खरेदी प्रक्रियेचा व पंचायत समितीच्या ठरावाचा भंग होणेबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांकडे क्षमापण घेणे आवश्यक आहे.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९९ व १२५ अंतर्गत योजनेस अनुक्रमे तांत्रिक व प्रशासकिय मंजूरी घेणे आवश्यक आहे.

३) डिलीव्हरी चलनवर माल प्राप्तीची तारिख नसल्यामुळे १५ दिवसाच्या आत मालाचा पुरवठा झाला नसल्यास दररोज रु. १०० प्रमाणे दंडाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

४) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परांस १०२० प्र.क्र.१४/३८ दिनांक ९ फेब्रुवारी, २००१ अन्वये विहित केलेल्या पध्दतीने लाभार्थ्यांची निवड झाली नाही.

५) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र झेडपीए २००८/प्रक्र ४४६/ वित्त ९ दि. २० जून, २००८ नुसार वैयक्तीक लाभाच्या योजना राबविणेसाठी आखून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

६) उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखस /१०८८ (२५१२) उदयोग ६ दिनांक २ जानेवारी, १९९२ मधील परिशिष्ठ ८ मधील परिच्छेद क्र. ८ मध्ये नमूद प्राधिकाऱ्याकडून वस्तूची तपासणी झाली नसल्यामुळे योग्य दर्जाबाबत खात्री होणे आवश्यक आहे.

७) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक पीआरसी १०८३ /सीआर/१०७४/ ५७ दि.२९ जुलै, २००८ नुसार फलनिष्पत्ती / उपयोगीता प्रमाणपत्र दर्शविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) मागासवर्गीयांच्या घरावरील गवती छपराऐवजी टिनपत्रे पुरविणे या योजनेंतर्गत टिनपत्रे खरेदी करीता प्रथमत: वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या व जाहिरातीवर रु २,९६०/- खर्च करण्यात आला हे सत्य आहे. त्याच बरोबर स्पर्धात्मक दराचा फायदा मिळावा म्हणुन त्याच दिवशी खुल्या बाजारातून दरपत्रके मागविण्यात आली होती.

जाहिरातीतील निविदेस प्रतिसाद मिळाला नाही परंतु खुल्या बाजारातुन मागविलेल्या दरपत्रकास प्रतिसाद मिळाला, खुल्या बाजारातुन मागविलेल्या दरपत्रकात एम.एस.एस.आय.डी.सी. जिल्हा उद्योग केंद्र परभणी यांचे दरपत्रक प्राप्त झाले आणि त्यांचे दर कमी असल्यामुळे त्यांना पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. पंचायत समिती सभेच्या ठरावाप्रमाणे कार्यवाही झालेली आहे.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९९ व १२५ अंतर्गत योजनेस तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे.

३) पुरवठा आदेश दिनांक २४ फेब्रुवारी, २००९ ला घेण्यात आला असून एम.एस.आय.डी.सी. परभणी यांनी पुरवठा चालान क्रमांक ३५६० नुसार २४ फेब्रुवारी, २००९ ला मालाचा पुरवठा केला असून पुरवठा १५ दिवसांचे आत झालेला आहे याची खात्री करण्यात आली आहे. म्हणून दंडाची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

४) निविदा मागविण्यापुर्वी लाभार्थ्यांची निवड करण्यात आली नाही ही वस्तूस्थिती आहे. तथापि पात्र लाभार्थी निवडणे बाबत खात्री करण्यात आलेली आहे.

५) सदर योजनेस पंचायत समिती सर्वसाधारण सभा दिनांक १४ फेब्रुवारी, २००९ अन्वये मान्यता दिल्या नुसार प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात येवुन सदर योजना राबविण्यात आली व पात्र लाभधारकांना लाभ देण्यात आला.

६) शासन निर्णय ०२ जानेवारी, १९९२ मधिल परिशिष्ट ०८ मधिल ०८ मध्ये नमुद प्राधिकारी यांचेकडून वस्तुची तपासणी करण्यात आलेली नाही. परंतू वस्तुची गुणवत्ता व दर्जा याची तपासणी प्राचार्य औदयागिक प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद यांचे पत्र क्रमांक ३८२९ दि.०५ मार्च, २००९ नुसार करण्यात आलेली असून प्राप्त साहित्य हे चांगल्या दर्जाचे आहे. साहित्याची गुणवत्ता व दर्जा भारतीय मानक दंडाप्रमाणे आय.एस.आय.मानांकनाचा असल्याची खात्री करण्यात आलेली आहे.

७) गट विकास अधिकारी यांचे उपयोगीता प्रमाणपत्र घेण्यात आले आहे. तसेच ज्या कारणसाठी टीन पत्रे खरेदी करण्यात आली होती त्याच कारणासाठी त्याचा उपयोग करण्यात आला असल्यामुळे योजनेचा उद्देश सफल झाला आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, मागासवर्गियांच्या घरावरील गवती छपराऐवजी टिन पत्रे पुरविणे या योजनेमध्ये अनियमितता झालेली नाही, असे खात्रीपूर्वक आपण

सांगू शकता का, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग यांनी खुलासा केला की, एम.एस.एस.आय.डी.सी. हा शासन अंगिकृत व्यवसाय आहे. स्पर्धात्मक दराचा फायदा मिळावा म्हणून त्याच दिवशी खुल्या बाजारातून दरपत्रके मागविण्यात आली होती व वाटप करण्यात आले आहे.

यावर समितीने विचारणा केली की, शासन अंगिकृत व्यवसाय आहे म्हणून कसेही साहित्य खरेदी करायचे का, लेखापरीक्षकांचा आक्षेप नेमका काय आहे, यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी खुलासा केला की, आक्षेप असा आहे की, सर्वप्रथम खुल्या निविदा काढल्या होत्या. निविदा उघडण्यापूर्वीच दरपत्रक प्राप्त झाले आणि निविदेला प्रतिसाद मिळाला नाही म्हणून दरपत्रके मागविण्यात आली, असे दाखविण्यात आले आहे. यावर समितीने विचारणा केली की, निविदा उघडण्यापूर्वी दरपत्रक कशी प्राप्त झाली, निविदेला प्रतिसाद मिळाला नव्हता का आणि जर निविदा उघडण्यापूर्वी दरपत्रक प्राप्त झाले असतील तर समझोता केलेला आहे, हे उघड होत आहे. समितीने पुढे असेही निदर्शनास आणून दिले की, मुळात नियमामध्ये अशी तरतूद आहे की, दरपत्रकापेक्षा बाजार भावामध्ये कमी दराने साहित्य उपलब्ध असता कामा नये. तसे असेल तर त्यांच्याकडून साहित्य घेणे बंधनकारक नाही. निविदा या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मागविल्या जातात आणि दरपत्रक कोणत्याही ३ दुकानदारांकडून मागविले जाते.

तद्नंतर समितीने आणखी अशी विचारणा केली की, निविदा मागविल्यानंतर आणि त्याबाबतची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत दरपत्रक मागविणे संयुक्तिक आहे का, हा अतिशय गंभीर मुद्दा आहे. एकीकडे निविदा मागविण्यात आल्या आणि प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच दरपत्रक न मागवून खरेदी करण्यात आली, ही एक प्रकारची अनियमितता आहे. त्यामुळे या विषयाबाबत उद्योग विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

मागासवर्गीयांच्या घरावरील गवती छप्पराऐवजी टिनपत्रे पुरविणे या योजने अंतर्गत निविदा मागविण्यात आलेल्या असतांना आणि प्रक्रिया पुर्ण होण्यापूर्वीच दरपत्रक मागवून साहित्य खरेदी करण्यात आल्या प्रकरणी समितीने निदेश दिल्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे. त्यानुसार संबंधीताविरुध्द जबाबदारी निश्चित करुन कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सन २००८-०९ या वर्षात पंचायत समिती परभणी येथे पंचायत समिती सेस अंतर्गत मागासवर्गीयांच्या घरावरील गवती छपराऐवजी टिनपत्रे पुरविणे या योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आली होती. सदर खरेदीच्या अनुषंगाने पंचायत राज समितीने दिलेल्या सुचनांनुसार चौकशी केली असता चौकशीत खालील बाबी निदर्शनास आल्या.

१) सन २००८-०९ करिता मागासवर्गीयांना टिनपत्रांचा पुरवठा करण्यासाठी रु.१,००,०००/- ची मुळ तरतुद ठेवण्यात आली होती. त्यानुसार दिनांक ०९ जानेवारी, २००९ रोजी निविदा व स्थानिक बाजारपेठेतून दरपत्रके मागविण्यात आले होते. पंचायत समिती विशेष सभा दिनांक १० फेब्रुवारी, २००९ ठराव क्रमांक ११४ अन्वये मागासवर्गीयांना घराची सोय करणे अंतर्गत टिनपत्राचा पुरवठा करणे रु.१,००,०००/- ऐवजी निधी वाढवून सुधारित तरतुद रु.१,३०,०००/- मंजूर करण्यात आली. यामध्ये जाहिरातीद्वारे वर्तमानपत्रात मागविण्यात आलेल्या निविदा कालावधी पुर्ण न होताच स्थानिक बाजारपेठेमधुन दरपत्रके मागविण्यात आली. शासन निर्देशानुसार रु.५०,०००/- पेक्षा जास्त रकमेच्या साहित्याची खरेदी जाहीर निविदा मागवुन करणे आवश्यक होते. तसेच जाहीर निविदा मागवून प्रक्रिया पूर्ण न होताच दरपत्रके मागविणे ही केलेली कृती योग्य नाही.

याबाबीस तत्कालिन गट विकास अधिकारी श्री.डी.एस.चव्हाण जबाबदार आहेत. तथापि श्री.डी.एस.चव्हाण हे नियत वयोमानानुसार दि.३० सप्टेंबर, २०११ रोजी सेवानिवृत्त झालेले असल्याने त्यांच्या विरुध्द सध्या कारवाई करता येणे शक्य नाही.

जाहिरातीवर करण्यात आलेल्या खर्चाची रक्कम रु.२,९६०/- ही श्री.चव्हाण यांचेकडून दि.३१ ऑक्टोबर, २०१५ रोजी वसुल करण्यात आलेली आहे.

या प्रक्रियेत निविदेस प्रतिसाद आला नाही परंतु दरपत्रकाद्वारे तीन दर प्राप्त झाले. त्यात सर्वात कमी दर असलेल्या शासन अंगिकृत एम.एस.एस.आय.डि.सी. महामंडळाकडून साहित्य (टिनपत्रे) खरेदी करण्यात आले तसेच सर्व टिनपत्रे प्राप्त झाले असून तांत्रिकदृष्टया योग्य असून त्याचा लाभ लाभार्थ्यांना दिला असल्याचे नमुद केले आहे. तसेच संबंधित गट विकास अधिकारी दिनांक ३० सप्टेंबर, २०११ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-३) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ८ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली की, मागासवर्गीयांच्या घरावरील गवती छपराऐवजी टिनपत्रे पुरविणे ही पंचायत समिती, परभणी येथील २००८-२००९ या वर्षीची योजना होती. पंचायत समितीकडे १ लाख ३० हजार रूपये होते. सन १९९३ च्या शासन निर्णयानुसार ५० हजार रूपयांच्या वरील खरेदी निविदा काढून करावयाची होती. पंचायत समितीने दिनांक ९ जानेवारी, २००९ रोजी निविदा प्रसिद्ध केली होती. तसेच निविदेची अंतिम मुदत दिनांक २३ जानेवारी, २००९ होती. तसेच त्यांनी निविदा प्रसिद्ध केल्याच्या दिवशी दरपत्रक देखील मागविले होते.

यावर समितीने विचारणा केली की, निविदा प्रसिद्ध न करता दरपत्रकानुसार खरेदी करण्यात आली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, त्यांनी दिनांक ९ जानेवारी, २००९ रोजी निविदा प्रसिद्ध केली होती व त्याच दिवशी दरपत्रक मागविले होते. यावर समितीने असे निदर्शनास आणून दिले की, एकही निविदा प्राप्त झाली नाही, त्यामुळे दरपत्रकानुसार खरेदी करण्यात आली, अशी माहिती दिलेली आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, होय, ही खरेदी सरकारी संस्थेकडून केलेली आहे. यावर समितीने विचारणा केली की, त्याकरिता कोणाची मान्यता घेण्यात आली होती. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, गट विकास अधिकारी यांनी सरकारी संस्थेकडून १ लाख ३० हजार रूपयांची खरेदी केलेली आहे. यावर समितीने समाधान व्यक्त केले.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायत समितीने मागासवर्गीयांच्या घरावरील गवती छापराऐवजी टिनपत्रे पुरविणे ही योजना स्वयं उत्पन्नातून १०० टक्के अनुदानावर राबविली आहे. यासाठी वर्तमान पत्रातून जाहीर निविदा न मागविता स्थानिकरित्या पत्राद्वारे दराची चौकशी करुन सर्वात कमी दर असलेल्या महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळाकडून खरेदी करुन रुपये १,२६,२८०/- एवढा खर्च करण्यात आला आहे, याबाबत लेखापरीक्षकांनी पुढीलप्रमाणे आक्षेप घेतले आहेत.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १० जुलै, १९९३ रोजीच्या शासन निर्णयानुसार रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त रकमेची खरेदी असल्यामुळे पंचायत समितीच्या दिनांक १० फेब्रुवारी, २००९ रोजीच्या ठरावानुसार वर्तमानपत्रातून जाहीर निविदा मागवून रुपये २९६०/- खर्च केला आहे. परंतू दिनांक ९ जानेवारी, २००९ अन्वये विशिष्ट पुरवठादाराचे दर मागवून खरेदी प्रक्रिया पार पाडली आहे. यास्तव जाहिरातीवर झालेला निष्फळ खर्च वसूल होणेबाबत व विहित खरेदी प्रक्रियेचा व पंचायत समितीच्या ठरावाचा भंग झाल्याप्रकरणी सक्षम प्राधिकाऱ्याकडे क्षमापण घेणे आवश्यक आहे. योजनेस तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी घेणे आवश्यक आहे. बटवडा चलनावर (डिलीव्हरी चलनावर) माल प्राप्तीची तारीख नसल्यामुळे १५ दिवसाच्या आत मालाचा पुरवठा झाला नसल्यास दररोज रुपये १००/- प्रमाणे दंडाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे, विहित केलेल्या पध्दतीने लाभार्थींची निवड झाली नाही. ग्रामविकास विभागाच्या दिनांक २० जून, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबविणेसाठी आखून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २ जानेवारी, १९९२ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार नमूद प्राधिकाऱ्याकडून वस्तूची तपासणी झाली नसल्यामुळे योग्य दर्जाबाबत खात्री होणे आवश्यक आहे. तसेच ग्रामविकास विभागाच्या दिनांक २९ जुलै, २००८ रोजीच्या परिपत्रकानुसार उपयोगिता प्रमाणपत्र दर्शविणे आवश्यक आहे.

उपरोक्त लेखा आक्षेपावर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, टिनपत्रे पुरविण्याबाबत सर्वप्रथम खुल्या निविदा काढल्या होत्या. निविदा खुल्या करण्यापूर्वी दरपत्रक प्राप्त झाले आणि निविदेला प्रतिसाद मिळाला नाही, म्हणून दरपत्रके मागविण्यात आल्याचे दर्शविण्यात आले आहे. निविदा खुल्या करण्यापूर्वी दरपत्रक प्राप्त झाले असेल तर समझोता झाल्याचे उघड होत आहे तसेच नियमातील तरतुदीनुसार बाजारामधील दरपत्रकापेक्षा कमी दराने साहित्य उपलब्ध असता कामा नये तसे असेल तर निविदाधारकाकडून साहित्य घेणे बंधनकारक नाही. निविदा वर्तमानपत्राद्वारे जाहिरात देऊन मागविल्या जातात आणि दरपत्रक कोणत्याही तीन दुकानदारांकडून मागविले जाते. **प्रस्तुत प्रकरणी निविदा मागविल्यानंतर आणि त्याबाबतची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत दरपत्रक मागविणे संयुक्तिक वाटत नाही. एकीकडे निविदा मागविण्यात आल्या आणि प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच दरपत्रक मागवून टिनपत्रे खरेदी करण्यात आले ही एक प्रकारची अनियमितता आहे. याबाबीस तत्कालिन गटविकास अधिकारी श्री.डी.एस.चव्हाण जबाबदार आहेत. तथापि, ते दिनांक ३० सप्टेंबर, २०११ रोजी सेवानिवृत्त झालेले असल्याने त्यांच्याविरुध्द कारवाई केल्याचे दिसून येत नाही. तथापि, जाहिरातीवरील खर्चाची रक्कम रुपये २९६०/- वसूल करण्यात आलेली आहे व महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ या शासनाच्या उपक्रमाकडून रुपये १ लाख ३० हजाराची खरेदी केलेली असल्यामुळे समिती याबाबत समाधान व्यक्त करीत आहे.**

## प्रकरण दहा

## जिल्हा परिषद, परभणी

## संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण नसतांना वेतनवाढी दिल्यामुळे झालेल्या जादा प्रदानाबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.१५२/०३ (सन २०११-१२)**

पंचायत समिती पुर्णा अंतर्गत येणाऱ्या केंद्रीय प्राथमिक शाळा व जिल्हा परिषद (माध्यमिक शाळा) हायस्कूल येथील कर्मचारी यांनी संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण केली नसतांनाही त्यांना वेतनवाढी प्रदान केल्यामुळे रक्कम रु.५२,४८,९७८/- जादा प्रदान झालेली आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/प्रक्र २००१/३९, दिनांक २० जुलै, २००२ (**परिशिष्ट क्र. १०.१**) व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मातंस/नस्ती-४/२२४/३९ दिनांक ०५ मे, २००७ (**परिशिष्ट क्र. १०.२**) नुसार संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण करुन शासनास प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दिनांक ३१ डिसेंबर, २००७ ही अंतिम मुदत निश्चित केली होती. तथापि, प्राथमिक शाळा कावलगाव, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, फुलकळस, केंद्रिय प्राथमिक शाळा चुडावा, जिल्हा परिषद प्रशाला ताडकळस व केंद्रीय प्राथमिक शाळा माटेगाव येथील कर्मचारी यांनी सदरची परीक्षा सदरील कर्मचारी उत्तीर्ण नसल्यामुळे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/प्र.क्र.५/२००१/३९ दिनांक २० जुलै, २००२ चे परिच्छेद ३ नुसार संबंधित कर्मचारी दिनांक ३० डिसेंबर, २००७ नंतरची वेतनवाढी रोखणे आवश्यक होते. तथापि, अशी कार्यवाही न केल्यामुळे रु. ५२,४८,९७८/- अतिप्रदान झाले आहे.

२) के.प्रा.शा. धनगरटाकळी, कन्या पुर्णा, देऊळगाव दुधाटे, गणपुर, ताडकळस, जिल्हा परिषद हायस्कुल वझुर, माध्यमिक शाळा पुर्णा, चुडावा व एरंडेश्वर येथील कार्यरत कर्मचारी परीक्षा उत्तीर्ण अथवा अनुत्तीर्ण असल्याबाबतचे अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध न केल्यामुळे सदर बाबींची तपासणी करता आली नाही.

३) लेखा परिक्षणात काही शाळांनी नवीन बदलून आलेल्या व तेथून बदलून गेलेल्या कर्मचा-यांची मूळ सेवा पुस्तिका उपलब्ध नसल्यामुळे सदरील कर्मचा-यांनी सदरील परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण केल्या बद्दल खात्री झाली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) आक्षेपात नमुद केल्या प्रमाणे संगणक अर्हता नसतांना देण्यात आलेल्या वेतनवाढीमुळे झालेली जादा अदाई रक्कम रु.५२,४८,९७८/- वसुली बाबत, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ नुसार आदेशित केले होते.

दरम्यान जादा अदाई वसुलीच्या सदरचे आदेशाविरुध्द राष्ट्रवादी शिक्षक संघटना, पुर्णा यांनी याचिका क्रमांक WP १२०२५/२०१५ व महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ पुर्णा यांनी याचिका क्रमांक WP १२०२९/२०१५ मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यांचेकडे दाखल केली.

सदर दोन्ही याचिकेमध्ये दिनांक ११ डिसेंबर, २०१५ रोजी मा.उच्च न्यायालयाने अंतरिम आदेशानुसार वेतनवाढीच्या जादा अदाई वसुली बाबत स्थगिती दिली आहे. त्यामुळे वसुलीची कार्यवाही स्थगित ठेवण्यात आली आहे. दरम्यानचे कालावधीत १५ शिक्षकांकडून रु.२,९६,९०४/- वसुली करुन शासन खाती भरणा केले आहेत.

सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

२) आक्षेपात नमुद केलेल्या शाळेमधील शिक्षक/कर्मचारी यांचे विषयी संगणक अर्हता पडताळणी बाबत अहवाल घेतलेला आहे. त्यानुसार (९) शाळांमधील २६१ कर्मचाऱ्यांपैकी २३९ कर्मचारी संगणक अर्हता परिक्षा उत्तिर्ण/सुट मिळालेले आहेत. उर्वरित २२ कर्मचारी संगणक अर्हता परिक्षा उत्तिर्ण नाहीत किंवा त्यांना सुटही मिळालेली नाही. त्यांचे बाबतीतही मा. उच्च न्यायालयाचे अधिन राहून योग्य ती कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येईल.

३) पंचायत समिती पुर्णा अंतर्गत शाळेवरील कार्यरत कर्मचारी यांचे संगणक अर्हता विषयी गट शिक्षणाधिकारी यांचे कडून अहवाल घेतला आहे. त्यानुसार तालूका अंतर्गत सर्व शाळांवरिल कार्यरत एकूण ५४२ कर्मचाऱ्यापैकी ५०६ कर्मचारी संगणक अर्हता परिक्षा उत्तिर्ण तसेच वयाचे ५० वर्ष पुर्ण झालेमुळे सुट मिळालेले आहेत. उर्वरित ३६ कर्मचारी हे संगणक अर्हता परिक्षा उत्तिर्ण नाहीत किंवा त्यांना सुटही मिळालेली नाही. याचे बाबतीतही मा.उच्च न्यायालयाचे निर्णयाचे अधिन राहून योग्य ती कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येईल.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण नसताना वेतनवाढी दिल्यामुळे झालेल्या जादा प्रदानाबाबतचा महत्वाचा विषय आहे. एमएससीआयटी ज्या कर्मचाऱ्यांनी केलेले नाही, त्यांना वेतनवाढ देता येत नाही. आपण याबाबत उत्तर वेगळे दिलेले आहे. वास्तविक उच्च न्यायालयाचा निर्णय असा नाही. आपल्याकडे उच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत असल्यास दाखवावी.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, संबंधित कर्मचाऱ्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यावर समितीने विचारणा केली की, वेतनवाढी रोखण्याकरिता स्थगिती नाही, वसुलीसाठी स्थगिती आहे. त्यानंतर वेतनवाढ देण्यात आली आहे, आताही हे कर्मचारी एमएससीआयटी परिक्षा पूर्ण झालेले नाहीत. यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढी रोखण्यात आलेल्या आहेत.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, या वसुलीकरिता मा.औरंगाबाद खंडपीठाच्या उच्च न्यायालयाची स्थगिती आहे. वेतनवाढी दया असे म्हटलेले नाही. अगोदर ज्या वेतनवाढी दिलेल्या आहेत त्या वसुली करु नका याकरिता ही स्थगिती आहे. यामध्ये पुन्हा पुनर्विलोकन याचिका झालेली आहे. दिलेल्या वेतनवाढीची वसूली करु नका याचा अर्थ पुढील वेतनवाढी एमएससीआयटी केल्याशिवाय द्याव्यात असा नाही. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या या निर्णयामध्ये पुनर्विलोकन याचिका झालेली आहे, पुन्हा जैसे थे परिस्थिती ठेवली आहे, त्यामुळे वेतनवाढी चालू आहेत. शिक्षणाधिकारी यांनी याची प्रत मागवून घ्यावी व समितीला द्यावी. यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस होकारार्थी असे उत्तर दिले.

तद्नंतर समितीने असे निदेश दिले की, सन्माननीय सदस्यांनी शिक्षकांच्या बाबतीत हा विषय मांडला आहे. शिक्षकांनी याबाबत स्थगिती घेतली आहे. परंतु या शिवाय कृषी, आरोग्य व इतर विभागातील कर्मचाऱ्यांच्या

एमएससीआयटी कोर्स बाबतचा हा विषय मोठा आहे. इतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कोणतीही स्थगिती नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एमएससीआयटीबाबत परभणी जिल्हा परिषदेमधील सर्व विभागांची याबाबत चौकशी करावी व कार्यवाही करावी. हा राज्यस्तरावरील विषय असल्यामुळे या संदर्भात संबंधित विभागाच्या विविध सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

महाराष्ट्र शासनाचे एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षण पुर्ण न करता किती जणांना वेतनवाढ देण्यात आली होती, एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण नसतांना व मा.उच्च न्यायालयाने सदर कर्मचा-यांच्या/अधिकाऱ्यांच्या वेतनवाढीस स्थगिती दिलेली नसतांना वेतनवाढ प्रदान करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द समितीने निदेश दिल्यानुसार जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या विरुध्द नियमानुसार कोणती कारवाई केली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शिक्षण विभाग पंचायत समिती पुर्णा अंतर्गत संगणक अर्हता परिक्षा पुर्ण नसताना १६६ शिक्षकांना तत्कालिन कालावधीत वेतनवाढी मंजुर केल्या होत्या. त्या बाबत लेखा आक्षेपानुसार संगणक अर्हता उत्तीर्ण नसताना दिलेल्या वेतनवाढीची वसुली करणे बाबत दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी आदेश निर्गमीत केले होते. दरम्यान या आदेशाविरुद्ध दोन शिक्षक संघटनांनी मा.उच्च न्यायालयात W.P. १२०२५/२०१५ व W.P. १२०२९/२०१५ या प्रमाणे दोन याचिका सादर केल्या होत्या या दोनही याचिकांमधील अंतरिम आदेशानुसार जादा अदाई वसुलीस मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे.

दरम्यान तद्नंतर बहुसंख्य कर्मचारी शिक्षकांनी एसएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण केली आहे. तसेच वयाचे ५० वर्ष पुर्ण झाले मुळे त्यांना संगणक सुट अनुज्ञेय झाली आहे. सद्यस्थितीत शिक्षण विभागांतर्गत एकूण ५१ शिक्षक संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण नाहीत या सर्वांच्या वेतनवाढी थांबविण्यात आलेल्या आहेत.

तत्कालिन कालावधीत संगणक अर्हता उत्तिर्ण नसतांना वेतनवाढ मंजूर केल्यामुळे तत्कालिन गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पूर्णा यांना कारणे दाखवा नोटीस दिली आहे. खुलासा प्राप्त होताच योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, परभणी यांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (आस्था-१४) जिल्हा परिषदेने कार्यवाही केलेली आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली होती. सदरहू साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण नसताना वेतनवाढी दिल्यामुळे झालेल्या जादा प्रदानाबाबत अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस माहिती द्यावी.

यावर अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस खुलासा केला की, नियमाप्रमाणे शिक्षकांना वार्षिक वेतनवाढ देतो तेव्हा त्यांना अट असते की, त्यांनी एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असते. काही ठराविक शिक्षक असे होते की, प्रत्यक्षात त्यांनी परीक्षा उत्तीर्ण केली नसताना त्यांना वेतनवाढ देण्यात आली होती. स्थानिक निधी लेखापरिक्षणामध्ये व समितीने हा मुद्दा लक्षात आणल्यानंतर संबंधितावर कारवाई करण्यात आली. १६६ शिक्षकांना अशी वेतनवाढ देण्यात आली होती. त्यांच्याकडून वसुली करण्याची कारवाई सुरु करण्यात आली. गट शिक्षणाधिकाऱ्याच्या लक्षात ही बाब कशी आली नाही याची पाहणी आम्ही केली, संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे प्रत्येकाची सेवापुस्तिका असते. वर्षातून एकदा गटशिक्षणाधिकाऱ्याकडे सेवापुस्तिका आणल्या जातात. यामध्ये नोंदी पाहिल्या जातात की, त्यांना मागील वेतनवाढ दिलेली आहे की नाही. यानंतर वेतनवाढ मंजूर करुन शिक्का मारला जातो. तेव्हा तेथे नवीन गट शिक्षणाधिकारी होते, त्यांचा प्रशिक्षण कालावधी होता, ते अनुभवी नव्हते, मुख्याध्यापकांनी त्यांच्याकडे सेवापुस्तिका आणल्या.

मुख्याध्यापकांनी त्यांच्या निदर्शनास हा मुद्दा आणून दिला नाही. तसेच वेतनवाढ देण्याकरिता एमएससीआयटी उत्तीर्ण असले पाहिजे या अटीबाबत त्यांना माहीत नव्हते. तसेच त्यांचे प्रशासकीय दृष्टीने काही प्रशिक्षण घेतले जाते किंवा कसे ही बाब मी तपासली. त्यांना याबाबत सर्व माहिती असली पाहिजे. परंतु आपल्या यंत्रणेमध्ये तसे काही दिसत नाही. तसेच त्यांना यासंबंधी प्रशिक्षण देण्यात आले नव्हते. त्यामुळे हा मुद्दा त्यांच्या लक्षात आला नाही. मुख्याध्यापकांनी ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली नाही. तसेच त्यांनी जुनी नोंदणी बघून त्यांना वेतनवाढ दिली. त्यावेळी हे सर्व चुकीचे घडले आहे.

यावर समितीने विचारणा केली की, तेव्हा चुकीचे घडल्यामुळे संबंधितांवर काही कारवाई केली का, यावर अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, विभागाने त्यानंतर एक तपासणी केली. यासंबंधी एक नस्ती सादर होत असते व त्यामध्ये सर्व बाबींची नोंद घेणे अपेक्षित असते की, त्यांची एमएससीआयटीची परीक्षा झाली आहे किंवा नाही. त्यांच्याकडे या सर्व गोष्टी सादर करण्यासाठी तेव्हा लिपिक वगैरे कर्मचारीवृंद नव्हता. त्यामुळे मुख्याध्यापकांनी गट शिक्षण अधिकाऱ्याकडे सेवापुस्तक सादर करुन दिलेल्या माहितीप्रमाणे मान्य करण्याची पध्दत होती. त्यामुळे हे सर्व घडले आहे. त्यात त्यांचा दोष दिसून येत आहे. यामुळे विभागाने त्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन कारवाई सुरु केली आहे. मध्यंतरी असे घडले की, त्यांना दिलेली वेतनवाढ चुकीच्या पध्दतीने दिल्यामुळे त्याबाबत विभागाने त्यांच्याकडून वसुली करण्याचा प्रयत्न केला होता. त्यावर त्यांनी मा.उच्च न्यायालयाकडून स्थगनादेश मिळविल्यामुळे त्यांच्याकडून सदर वसुली करता आली नाही. त्यानंतर जे शिक्षक एमएससीआयटी उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांना वेतनवाढ दिली आहे. याबाबत जिल्हा परिषदेने खात्री केली आहे. सध्या जिल्हा परिषदेकडे ४८७१ शिक्षक असून त्यापैकी ४८२० शिक्षकांनी एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण केली आहे. उर्वरित ५१ शिक्षक एमएससीआयटीची परीक्षा उत्तीर्ण नाहीत. त्यामुळे त्यांची वेतनवाढ थांबविण्यात आली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, सदर प्रकरणी त्यांच्याकडून चूक झाली असल्यामुळे यासंबंधी शासन स्तरावर कारवाई होणे अत्यावश्यक आहे. अशा प्रकारे अधिकाऱ्यांनी चुकीच्या पध्दतीने वेतन काढणे व त्यानंतर कर्मचाऱ्यांनी न्यायालयात जाणे यासंबंधी प्रशासकीय दृष्टया कारवाई करण्यासंबंधी काही भाग राहिला असल्यास त्यासंबंधी आपण कार्यवाही केली पाहिजे.

यावर अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस खुलासा केला की, त्यानंतर कोणीही न्यायालयात गेलेले नाही. शालेय शिक्षण विभागाला मा.न्यायालया प्रकरणी २ दिवसांपूर्वी एक निर्णय प्राप्त झाला आहे. नांदेड

प्रकरणी मिळालेला सदर निर्णय विभाग वितरित करीत आहेत. अशाप्रकारे अदा केलेले जादा वेतन त्यांच्याकडून पूर्णत: वसूल करण्यासंबंधी मा.न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. सदर निर्णय औरंगाबाद उपायुक्तांकडे पाठविलेला आहे.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, यासंबंधी न्यायालयाने निर्णय दिला असल्यामुळे संबंधितांविरुध्द प्रशासकीय कारवाई सुध्दा करावी. यावर अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस खुलासा केला की, सदर प्रकरणी चुकीच्या पध्दतीने वेतनवाढ देण्यात आल्यामुळे संबंधितांकडून ती रक्कम पूर्णत: वसूल करण्याबाबत न्यायालयाने निर्णय दिला आहे. सदर निर्णय शालेय शिक्षण विभाग सर्वांना वितरीत करणार आहे. यावर समितीने विचारणा केली की, सदर निर्णयाच्या आधारे संबंधितांविरुध्द प्रशासकीय कारवाई सुध्दा केली पाहिजे. सदर प्रकरणी ज्यांनी जाणीवपूर्वक जादा वेतन अदा केले व एमएससीआयटी उत्तीर्ण प्रमाणपत्र नसताना जाणीवपूर्वक ज्यांनी वेतनवाढ घेतली अशा दोघांवर कारवाई करणे आवश्यक आहे.

यावर अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, तत्कालिन गट शिक्षण अधिकारी श्री.अशोक पाटील यांना सदर प्रकरणी नोटीस पाठविण्यात आली आहे. सध्या ते जालना जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत आहेत. लेखापरिक्षणामध्ये ५-६ वर्षापूर्वी परिच्छेद येतात. परंतु सदर काळात कोणतीही कार्यवाही केली जात नाही. जेव्हा पंचायती राज समिती येते तेव्हा वसुलीची कार्यवाही सुरु केली जाते. त्यानंतर संबंधित कर्मचारी मा.न्यायालयामध्ये जाऊन त्यावर स्थिगिती आणतात. यासंबंधी ग्रामविकास विभागामार्फत परिपत्रक काढून त्यांना कळविले पाहिजे. वेतननिश्चिती, प्रवासभत्ता, एमएससीआयटी यासंबंधी अनेक कर्मचाऱ्यांकडून कोटयवधीची रक्कम वसूलीस पात्र आहे. जोपर्यंत पंचायती राज समिती तेथे जात नाही तोपर्यंत सदर वसुली केली जात नाही. तसेच आपण त्यांना नोटीस दिल्यानंतर ते कोर्टात जातात. अशाप्रकारे परिपत्रक काढून ऑडिटमध्ये आढळून आलेल्या वसुलीच्या रक्कमा ताबडतोब वसूल केल्या पाहिजेत. त्यामुळे कोर्टात जाण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही.

यावर समितीने निदेश दिले की, यासंबंधी ताबडतोब कार्यवाही करावी. यावर अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस होकारार्थी असे उत्तर दिले.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायत समिती पूर्णा अंतर्गत येणाऱ्या केंद्रीय प्राथमिक शाळा व जिल्हा परिषद हायस्कूल येथील कर्मचाऱ्यांनी संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण नसतानाही त्यांना वेतनवाढ प्रदान केल्यामुळे रक्कम रूपये ५२,४८,९७८/- जादा प्रदान करण्यात आल्याप्रकरणी पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २० जुलै, २००२ व दिनांक ५ मे, २००७ रोजीच्या शासन निर्णयानुसार संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण करून दिनांक ३१ डिसेंबर, २००७ ही अंतिम मुदत शासनास प्रमाणपत्र सादर करण्यासाठी निश्चित केली होती. तथापि, प्राथमिक शाळा कावलगाव, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा फुलकळस, केंद्रीय प्राथमिक शाळा चुडावा, जिल्हा परिषद प्रशाला ताडकळस व केंद्रीय प्राथमिक शाळा माटेगांव येथील कर्मचारी संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण नसल्यामुळे त्यांची ३० डिसेंबर, २००७ नंतरची वेतनवाढ रोखणे आवश्यक होते. तथापि, अशी कार्यवाही न केल्यामुळे रूपये ५२,४८,९७८/- एवढे अतिप्रदान झाले आहे. केंद्रीय प्राथमिक शाळा धनगर टाकळी, कन्या पूर्ण, देवूळगांव दुधाटे, गणपूर, ताडकळस, जिल्हा परिषद हायस्कूल वझुर, माध्यमिक शाळा पुर्णा, चुडावा व एरंडेश्वर येथील कार्यरत कर्मचारी परिक्षा उत्तीर्ण अथवा अनुत्तीर्ण असल्याबाबतचे अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध न केल्यामुळे सदर बाबीची तपासणी करता आली नाही. तसेच मूळे सेवा पुस्तिका उपलब्ध नसल्यामुळे संगणक अर्हता परिक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण झाल्याची खात्री झाली नाही. जादा अदाई रक्कम वसुलीच्या आदेशाविरूध्द शिक्षक

संघटनांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठामध्ये सन २००५ मध्ये याचिका दाखल केलेली आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार जादा अदाई वसुलीबाबत स्थगिती दिली आहे.

परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी समितीने साक्ष घेतली असता, साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी वेतनवाढ रोखण्यासाठी स्थगिती दिलेली नसून जादा अदाई केलेल्या रक्कमेच्या वसुलीसाठी स्थगिती दिलेली आहे. सदर कर्मचारी एमएस-सीआयटी ही संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण झालेले नाहीत तरी देखील जिल्हा परिषदेने संबंधितांना वेतनवाढी दिलेल्या आहेत. मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या या निर्णयाबाबत पुन्हा पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यात आलेली आहे. उच्च न्यायालयाने पुन्हा जैसे थे परिस्थिती ठेवली आहे त्यामुळे वेतनवाढी चालू आहेत. शिक्षकांनी याबाबत स्थगिती घेतली आहे. परंतु याशिवाय **कृषी, आरोग्य व इतर विभागातील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत एमएस-सीआयटी संगणक अर्हता परिक्षेचा व्यापक विषय आहे. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एमएस-सीआयटी संगणक अर्हतेबाबत परभणी जिल्हा परिषदेमधील सर्व विभागांतील अधिकारी/कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, १६६ शिक्षकांना एमएस-सीआयटी संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण नसतानांही वेतनवाढ देण्यात आली होती. त्यांच्याकडून वसुली करण्याची कारवाई सुरू करण्यात आली ही बाब गट शिक्षणाधिकाऱ्यांच्या लक्षात आली नाही. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे प्रत्येकाची सेवा पुस्तिका असते. वर्षातून एकदा गट शिक्षणाधिकाऱ्याकडे सेवापुस्तिका आणल्या जातात त्यामधील नोंदीत मागील वेतनवाढ दिली आहे किंवा नाही हे पाहिले जाते यानंतर वेतनवाढ मंजूर करून शिक्का मारला जातो. गटशिक्षणाधिकारी नवीन असल्यामुळे हा मुद्दा मुख्याध्यापकांनी गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक होते. वेतनवाढ देण्याकरिता एमएस-सीआयटी संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण असले पाहिजे ही अट गटशिक्षणाधिकारी यांना ज्ञात नव्हती. मुख्याध्यापकांनी ही बाब गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली नाही तसेच त्यांनी जुनी नोंदणी पाहून वेतनवाढ दिली. **प्रस्तुत प्रकरणी चुकीच्या पध्दतीने वेतनवाढ देण्यात आल्यामुळे संबंधितांकडून ती रक्कम पूर्णत: वसुल करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. सदर निर्णयाच्या आधारे संबंधितांविरूध्द कारवाई करण्यात यावी तसेच ज्यांनी जाणीवपूर्वक जादा वेतन अदा केले व एमएस-सीआयटी संगणक अर्हता परिक्षेचे उत्तीर्ण असलेले प्रमाणपत्र नसताना ज्यांनी जाणीवपूर्वक वेतनवाढ घेतली अशा दोघांवर कारवाई करण्यात यावी. तसेच वेतननिश्चिती, प्रवास भत्ता, एमएस-सीआयटी यासंबंधी अनेक कर्मचारी कोट्यावधी रूपये रक्कम वसुलीस पात्र आहेत. जोपर्यंत पंचायती राज समिती त्या ठिकाणी दौऱ्यावर जात नाही तोपर्यंत वसुली केली जात नाही तसेच जिल्हा परिषदेने/शासनाने नोटीस दिल्यानंतर त्याविरुध्द संबंधित कर्मचारी मा.न्यायालयामध्ये याचिका दाखल करतात. त्यामुळे अशा प्रकरणी संबंधित विभागाने परिपत्रक निर्गमित करुन लेखापरिक्षणामध्ये आढळून आलेल्या वसुलीच्या रक्कमा त्वरीत वसुल केल्या पाहिजेत. त्यामुळे अधिकारी/कर्मचारी मा.न्यायालयात याचिका दाखल करण्याचा प्रश्न उद्भवणार नाही असे समितीला प्रकर्षाने वाटते. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

# प्रकरण अकरा

## जिल्हा परिषद, परभणी

## ४३२ अंगणवाडी बांधकामांचे नियमबाह्य पध्दतीने वाटप केलेबाबत

### परिच्छेद क्रमांक ३.२८४/११ (सन २०११-१२)

सन २००९-१० विविध विकास योजनेतंर्गत मंजुर (४३२) अंगणवाडी बांधकामाचे कंत्राट शासन निर्देशाचे पालन न करता मजुर संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना नियमबाहय वाटप करुन केलेल्या गंभीर अनियमितता व सदर कामे विहीत मुदतीत न केल्यामुळे (१५९) कामे रद्द करुन रक्कम रु.५,९६,२५,०००/- निरर्थक गुंतवुन ठेवले बाबत.

बांधकाम विभाग, जिल्हा परिषद परभणीचे सन २०११-१२ या कालावधीचे लेखापरिक्षणात विविध विकास योजनेतंर्गत अंगणवाडी इमारत बांधकामाची मंजुर कामे ग्रामपंचायती मार्फत करुन न घेता मजुर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना कामे वाटप समिती मार्फत काम वाटप कलेली आहेत. सदर एजन्सी मार्फत केलेल्या कामाची पुर्ण झालेली उदिष्टे व फलश्रुती बाबतचे अभिलेखे दर्शविणे बाबत अर्धसमास पत्र क्रमांक २१ दि.२६ डिसेंबर, २०१२ अन्वये लेखी मागणी करुनही उपलब्ध केले नाहीत. या बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) परभणी जिल्हा परिषदेतंर्गत एकूण अंगणवाडी केंद्र संख्या किती, सन २००९-१० पुर्वी विविध विकास योजनेतंर्गत किती अंगणवाडी बांधकाम पुर्ण केली याबाबत तालुका निहाय अंगणवाडी बांधकाम पुर्ण केल्याचे वर्ष निहाय तपशील, बांधकाम पुर्ण नोंदवही व ग्रामपंचायतीस ताब्यात दिल्याचे अभिलेखे दर्शविले नाही.

२) सन २००९-१० ते २०११-१२ या कालावधीत विविध विकास योजने अंतर्गत अंगणवाडी बांधकाम हाती घेण्यापुर्वी तालुका निहाय प्रत्यक्ष किती अंगणवाडी बांधकामाची आवश्यकता होती. या बाबतचा प्राधान्यक्रम कसा निश्चित केला या बाबत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) एकात्मिक बाल विकास प्रकल्प व महिला व बाल कल्याण अधिकारी (सर्व) तालुका निहाय अंगणवाडी पर्यवेक्षिका यांचे अहवाल उपलब्ध करुन दिले नाहीत.

३) बांधकाम विभाग जिल्हा परिषद परभणी ने सन २००९-१० मध्ये अंगणवाडी बांधकाम हाती घेतलेली आहे. सदर कामे काम वाटप समितीच्या मासिक बैठक दिनांक ०५ जून, २०१० नुसार (४३२) कामे मजुर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना वाटप केलेली आहेत. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक ग्रासेयो.२००७/प्र.क्र.१/ यो.९, दिनांक ०८ मे, २००७ अन्वये काम वाटप समितीने मंजुर कामाची यादी, समिती बांधकाम पाटबंधारे, पाणीपुरवठा विभागाकडून संबधित सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी संस्था यांना पुरवठा केलेली कामे, कामाचे स्वरुप, अंदाजित किंमत व कामाचा कालावधी बाबतचे अभिलेखे दर्शविणे बाबत मागणी करुनही ते उपलब्ध केले नाही. तसेच काम वाटपात ३३:३३:३४ प्रमाणे प्रमाणबध्दता राखलेली नाही.

४) मजुर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना वाटप केलेले ४३२ अंगणवाडी इमारत बांधकामापैकी एकूण १५९ अंगणवाडी इमारतीचे बांधकाम विहित कालावधीत न केल्यामुळे कोणतेही कारण नमुद न करता कामे रद्द करुन ग्रामपंचायतीस वर्ग केलेले आहेत. सदर बाब गंभीर असून मजुर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी काम न केल्यामुळे शासनाची रक्कम रुपये ५,९६,२५,०००/- निरर्थक गुंतुन पडलेली आहे.

५) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक झडपीए.२००८/प्र.क्र.४७२/वित्त-९ (३३) दिनांक ९ फेब्रुवारी, २००९ अन्वये ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार ग्रामपंचायत संस्थानचे बळकटीकरण करण्याचे व आर्थिक दृष्टया सक्षम करणे या शासनाच्या धोरणाच्या अनुषंगाने ग्रामपंचायतींना त्यांच्या हद्दीतील कामे देणे बंधनकारक असतांना कार्यकारी अभियंता बांधकाम, जिल्हा परिषद परभणी व काम वाटप समिती यांनी सदर निकषाचे पालन न करता मजुर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांच्या मार्फत कामे केलेली आहेत. संबधितास काम वाटप करण्यापुर्वी ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्र (NOC) घेणे आवश्यक आहे. परंतु ना हरकत प्रमाणपत्र न घेता केलेली कार्यवाही नियमबाहय आहे.

६) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १००२/प्र.क्र.१२८ अर्थोपाय, दिनांक ०६ जून, २००८ नुसार शासनाने जिल्हा परिषदांना शासनाकडून मुक्त केलेला अखर्चित निधी लगतच्या वर्षा अखेर पर्यंत खर्च करण्यास अनुमती दिलेली असुन पुढील आर्थिक वर्षा-अखेर जास्त कालावधीसाठी अखर्चित राहिलेला निधी स्वायत्त संस्थांनी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे. परंतू सन २०१०-११ मधील प्राप्त तरतुद जिल्हा नियोजन समिती रुपये ७४.३८ लक्ष, मानव विकास मिशन रुपये ९४.२८ लक्ष व एकवेळ केंद्रीय अर्थसहाय्य रुपये ९२.५३ लक्ष अशी एकूण २६१.१९ लक्ष अखर्चित रक्कम शासन खाती भरणा केलेली नाही.

७) प्रशासकीय मान्यता आदेशातील अट क्रमांक १२ नुसार कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी संबधित ग्रामपंचायतीची मागणी असावी त्या ठिकाणी अंगणवाडी इमारत स्वतःची नसावी ज्या जागेवर बांधकाम करावयाचे असेल त्या जागेच्या मालकी हक्काची खात्री आणि सर्व ब-१ निविदाची कार्यवाही करारनामा पुर्ण केल्याशिवाय कार्यारंभ आदेश देण्यात येऊ नयेत. असे असताना कार्यकारी अभियंता बांधकाम यांचे पत्र क्रमांक १०४८/१२ दिनांक २८ मार्च, २०१२ अन्वये सन २००९-१० व २०१०-११ या एकूण ४३ कामे जागेची अडचण / वाद असल्यामुळे रद्द करणे बाबत प्रस्ताव सादर करुन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद परभणी यांचे आदेश क्रमांक्र ५१२ दिनांक ३१ मार्च, २०१२ अन्वये मान्यता दिलेली आहे.

८) पंचायत समिती स्तरावरुन ग्रामपंचायतीस ५५४ व सुशिक्षित बेराजगार अभियंता व मजुर सहकारी संस्था यांना ४३२ असे एकूण ९८६ अंगणवाडी इमारत बांधकामास प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. परभणी जिल्हया अंतर्गत एकूण ७०४ ग्रामपंचायती असून ग्रामपंचायत निहाय एकूण अंगणवाडी केंद्र किती सन २००९-१० पुर्वी अंगणवाडी बांधकाम केल्याची वर्षनिहाय नोंदवही दर्शवुन मंजूर करतात. कोणतीही अनियमितता अथवा दुबार कामे झाली नसल्याची तालुका निहाय अंगणवाडी बांधकाम पुर्ण नोंदवही दर्शविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) जिल्हा निहाय एकूण अंगणवाडी केंद्राची संख्या तसेच सन २००९-१० पुर्वी विविध विकास योजने अंतर्गत पुर्ण केलेली बांधकामे खालील दिलेल्या तक्त्यामध्ये देण्यात आलेली आहेत. तक्त्यामध्ये नमुद अंगणवाडी केंद्रामध्ये सद्यस्थितीत अंगणवाडी चालविल्या जातात.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नांव | मंजुर अंगणवाडी केंद्र संख्या | सन २००९-१० पुर्वी विविध योजनातंर्गत पुर्ण झालेली अंगणवाडी संख्या | अंगणवाडी बांधकाम हस्तांतरण केलेली संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | गंगाखेड | १९६ | २२ | २२ |
| २ | पाथरी | ११९ | ३२ | ३२ |
| ३ | परभणी १ | १४१ | ४० | ४० |
| ४ | परभणी २ | १४५ | ५० | ५० |
| ५ | जिंतुर १ | १३६ | २४ | २४ |
| ६ | जिंतुर २ | १६४ | ३० | ३० |
| ७ | पालम | १५० | ४० | ४० |
| ८ | पुर्णा | १८३ | ५४ | ५४ |
| ९ | सेलू | १५० | ३३ | ३३ |
| १० | मानवत | १०० | १९ | १९ |
| ११ | सोनपेठ | ९६ | २८ | २८ |
| | | १५८० | ३७२ | ३७२ |

२) सन २००९-१० ते २०११-१२ या कालावधीत विविध विकास योजने अंतर्गत अंगणवाडी बांधकाम हाती घेण्यापुर्वी खाली नमुद केलेल्या तक्त्यानुसार १२०८ अंगणवाडी बांधकामांची आवश्यकता होती. सन २००९-१० या वर्षात विविध योजने अंतर्गत एकूण ४३२ अंगणवाडी बांधकामे मंजुर करण्यात आलेली होती. या अंगणवाडी इमारत बांधकामासाठी अंगणवाडी केंद्राची निवड करण्यापुर्वी सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेकडून अंगणवाडीची स्वत:च्या इमारत असल्याबाबतची माहिती मागविण्यात आली व सदर माहितीच्या आधारे अंगणवाडी केंद्राची निवड शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग दिनांक १६ सप्टेंबर, २००९ मध्ये नमुद प्राधान्य क्रमानुसार करण्यात आली. सदर अंगणवाडी बांधकामे विहित मुदतीत पुर्ण होण्याच्या दृष्टीने दिनांक २३ डिसेंबर, २००९ ते २९ डिसेंबर, २००९ या कालावधीत तालुकानिहाय ग्रामसेवक यांच्या बैठका आयोजीत करुन नमुना नंबर ८ जागेचा नकाशा, ग्रामपंचायतचे ना-हरकत प्रमाणपत्र व स्थळ पाहणी अहवाल इत्यादी बाबीची बैठकीत खात्री करुन अंगणवाडी इमारत

बांधकामे मंजुर करण्यात आलेली आहेत. अंगणवाडी बांधकामांची आवश्यकता असले बाबतचे बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे अंगणवाडी केंद्र निहाय सविस्तर अहवाल संचिकेत उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नांव | मंजुर अंगणवाडी केंद्र संख्या | स्वत:ची इमारत उपलब्ध असलेल्या अंगणवाडी केंद्राची संख्या | स्वत:ची इमारत उपलब्ध नसलेल्या (इमारत आवश्यक असलेल्या) अंगणवाडी केंद्राची संख्या |
|---|---|---|---|---|
| (1 | गंगाखेड | १९६ | २२ | १७४ |
| (2 | पाथरी | ११९ | ३२ | ८७ |
| (3 | परभणी १ | १४१ | ४० | १०१ |
| (4 | परभणी २ | १४५ | ५० | ९५ |
| (5 | जिंतुर १ | १३६ | २४ | ११२ |
| (6 | जिंतुर २ | १६४ | ३० | १३४ |
| (7 | पालम | १५० | ४० | ११० |
| (8 | पुर्णा | १८३ | ५४ | १२९ |
| (9 | सेलू | १५० | ३३ | ११७ |
| (10 | मानवत | १०० | १९ | ८१ |
| (11 | सोनपेठ | ९६ | २८ | ६८ |
| | | १५८० | ३७२ | १२०८ |

३) जिल्हा परिषद परभणीने सन २००९-१० मध्ये हाती घेतलेल्या ४३२ अंगणवाडी इमारत बांधकामाकरिता जाहीर निविदा प्रसिध्द केली होती. सदरच्या ४३२ अंगणवाडी इमारत बांधकामांपैकी फक्त ६४ कामांच्या निविदांना प्रतिसाद मिळाला व ३६८ कामांना दुसरी वेळ निविदा बोलावुनही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे सदरची कामे ही दिनांक ०५ जून, २०१० च्या काम वाटप समिती मार्फत सुशिक्षित बेरोजगार अभियंता, मजुर सहकारी संस्था यांना वाटप करण्यात आली. सदरील सर्व कामांची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ३.७५ लक्ष असून सदरची कामे ३१ मार्च, २०११ पर्यत पुर्ण करणे अपेक्षित होते. अंगणवाडी इमारत बांधकामांची सर्व प्रथम जाहीर निविदा मागवुन सदर कामे पुर्ण करण्याचा प्रयत्न केला असता त्यास अत्यल्प प्रतिसाद मिळाल्यामुळे काम वाटप समिती मार्फत सदर अंगणवाडी बांधकामांची कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी संस्था यांना वाटप करण्यात आली.

४) सुशिक्षित बेराजगार अभियंता व मजुर सहकारी संस्था यांना काम वाटप समिती मार्फत वाटप करण्यात आलेल्या ३६८ कामांपैकी १५९ अंगणवाडी इमारत बांधकामे होऊ शकत नसल्यामुळे शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग दिनांक १६ सप्टेंबर, २००९ मधील तरतुदीनुसार रद्द करुन सदरची अंगणवाडी बांधकामे पुर्ण होण्याच्या दृष्टीने व बालकांना इमारत उपलब्ध व्हावी यास्तव सदर कामे ग्रामपंचायतकडे वर्ग करण्यात आली. अंगणवाडी बांधकामे पुर्ण होऊ शकत नसल्याबाबत कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचा अहवाल, अंगणवाडी बांधकामे रद्द केल्या बाबतचे आदेश, तसेच सदर कामे ग्रामपंचायतकडे वर्ग केल्याचे आदेश संचिकेस उपलब्ध आहेत.

५) सन २००९-१० ते २०११-१२ मध्ये जिल्हा नियोजन समिती, अल्पसंख्याक विभाग महाराष्ट्र शासन, मानव विकास व एक वेळ केंद्रिय अर्थसहाय्य (मानव विकास) या विविध विभागाकडून एकूण ४३२ अंगणवाडी इमारत बांधकामे मंजुर झालेली होती. जिल्हयामध्ये मंजुर अंगणवाडीची संख्या १५८० असून फक्त ३७२ अंगणवाडयाना स्वत:च्या इमारती उपलब्ध होत्या तसेच या मंजुर अंगणवाडया ३१ मार्च, २०११ पर्यत पुर्ण करणे अपेक्षित असल्यामुळे तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनी संयुक्तरित्या जाहीर निविदांद्वारे सदरची बांधकामे पुर्ण करण्याचा निर्णय घेतला. ४३२ कामांपैकी फक्त ६४ कामांनाच जाहीर निविदेद्वारे प्रतिसाद मिळाल्यामुळे उर्वरित ३६८ कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी संस्था यांना काम वाटप समिती मार्फत वाटप करण्यात आली. कामे विहित वेळेत पुर्ण व्हावीत म्हणुन सदरचा निर्णय घेण्यात आला होता.

६) सुरु न झालेल्या व रद्द करण्यात आलेल्या अंगणवाडी इमारत बांधकामांचा निधी खालील प्रमाणे शासन खाती भरणा करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | योनजेचे नांव | रद्द करण्यात आलेली कामे | शासन खाती भरणा करण्यात आलेला निधी रु.लाखात | चलन / धनादेश क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|
| I | जिल्हा नियोजन समिती | -- | -- | रु.७४.३८ लक्ष निधी सन १०-११ मध्ये खर्च करण्यात आला |
| II | मानव विकास कार्यक्रम ०९-१० | १३ | ४८.७५ | ५१०६३५ दि.३१.०३.१२ रु.२६.२५<br>५१०६४४ दि.२.७.१२<br>रु.२२.५० |
| III | एकवेळ केंद्रीय अर्थ सहाय्य ०९-१० | ०९ | ६.७५<br>(*) | ५१०६४३ दि.२.७.१२<br>रु.६.७५ |
| IV | अल्पसंख्यांक विकास ०९-१० | १५ | ५६.२५ | २२९ दि.२०.०५.१४<br>रु.५२.५०<br>५१<br>दि.१९.११.१५<br>रु.३.७५ |
| | एकूण | ३७ | १११.७५ | |

एकवेळ केंद्रीय अर्थसहाय्य २००९-१० अंतर्गत मंजुर ४८ अंगणवाडी बांधकामासाठी प्रति अंगणवाडी रु. ३.७५ लाख प्रमाणे एकूण निधी रु. १८०.०० लाख ची आवश्यकता असताना प्रत्यक्षात निधी रु. १५३.०० लाख प्राप्त झालेला होता. अप्राप्त निधि रु. २७.०० लाख होता. त्यामुळे ०९ रदद केलेल्या अंगणवाडी बांधकामाचा एकूण अखिर्चित निधी रु. ३३.७५ लाख मधुन अप्राप्त निधी रु. २७.०० लाख वजा जाता उर्वरीत निधी रु. ६.७५ लाख शासनखाती भरणा करण्यात आलेला आहे. या बाबतची माहिती संचिकेत उपलब्ध आहे.

७) ग्रामपंचायत स्तरावर जागेचा वाद, जागेची अडचण आणि इतर गाव स्तरावरील अडचणीमुळे ३७ अंगणवाडी इमारत बांधकामे होवू शकले नाही. त्यामुळे सदर कामे रद्द करुन त्याची रक्कम रु. १११.७५ लक्ष शासन खाती भरणा केलेली आहे .

८) सन २०१०-११ या वर्षा मध्ये पंचायत समिती स्तरावरुन ग्रांमपंचायत स्तरावर ५५४ अंगणवाडी त्याच बरोबर सन २००९-१० च्या जाहिर निविदा, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी संस्था आणि ग्रामपंचायत मार्फत ४३२ अशा एकूण ९८६ कामांना मान्यता मिळाली हे खरे आहे. परभणी जिल्हा अंतर्गत एकुण ११ ग्रामीण प्रकल्पामध्ये १५८० अंगणवाडी केंद्र मंजुर आहेत. लोकसंख्येच्या प्रमाणात गावात एक किंवा एकापेक्षा जास्त अंगणवाडी केंद्र मंजुर असल्यामुळे ग्रामपंचायती पेक्षा अंगणवाडी केंद्राची संख्या जास्त आहे अंगणवाडी इमारत मंजुर करतांना त्या ठिकाणी या पुर्वी कोणत्याही योजने मधुन अंगणवाडी इमारत बांधकाम मंजुर नसल्याची संबंधित पर्यवेक्षिका व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे कडून खात्री करुन तसेच जिल्हा स्तरावर सदर माहितीची पडताळणी करुन नवीन अंगणवाडी इमारत बांधकामास मंजुरी देण्यात येते. अंगणवाडी बाधकामात कोणतीही अनियमीतता अथवा दुबार काम मंजुर होणार नाही याची दक्षता घेतली जाते.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ४३२ अंगणवाडी इमारत बांधकामासाठी जाहिर निविदा काढल्या होत्या. त्यापैकी ६४ कामांना प्रतिसाद मिळाला होता. त्यापैकी किती कामे आज अखेर पूर्ण झाली, तसेच ३६८ कामे मजूर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देण्यात आली होती. त्यापैकी किती कामे पूर्ण झाली आहेत, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी खुलासा केला की, प्रथम निविदा काढल्यानंतर ४३२ पैकी ६४ कामांना प्रतिसाद मिळाला होता. दुसऱ्यांदा निविदा काढल्यानंतर त्याकरिता प्रतिसाद मिळाला नाही.

यावर समितीने विचारणा केली की, त्या काळात ग्रामपंचायतींच्या मागणीनुसार कामे दिली असती तर सदर कामांसाठी निविदा मागविण्याची गरज नव्हती. तसेच ग्रामपंचायतींना कामे दिल्यानंतर त्यात काही ग्रामपंचायतींनी कामे न घेतल्यास त्याकरिता ३३:३३:३४ च्या रेशोमध्ये कामे वाटप करायची होती. त्यासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सक्षम प्राधिकारी आहेत. परंतु अशा पध्दतीने कार्यवाही न केल्यामुळे सदर आक्षेप काढण्यात आला आहे.

यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी खुलासा केला की, त्यावेळी तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांनी या संदर्भात एकत्रित निर्णय घेतला होता व प्रशासकीय मान्यता दिली होती. यावर समितीने विचारणा केली की, शासनाने यासंबंधी जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार दिले होते का, सदर निधी जिल्हा वार्षिक योजनांमधील आहे. माहे फेब्रुवारी, २००८ च्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यतेचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थेतील सक्षम प्राधिकाऱ्यांना आहेत. ग्रामपंचायतींना कामे देणे गरजेचे असताना सुध्दा निविदा का काढण्यात आल्या, सदर निविदाकरिता कोणत्या वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात देण्यात आली होती, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी खुलासा केला की, सदर निविदेसंबंधी जिल्हा स्तरावरील वर्तमानपत्रात दोन वेळा जाहिरात दिली होती.

यावर समितीने विचारणा केली की, तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी आणि तत्कालिन जिल्हाधिकाऱ्यांची नावे काय आहेत, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी खुलासा केला की, त्यावेळी श्री.वळवी, तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी होते. ते माहे ऑक्टोबर, २०१० मध्ये सेवानिवृत्त झाले असून तत्कालिन जिल्हाधिकारी श्री.ठोंबरे होते.

त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, तत्कालिन जिल्हाधिकारी आणि तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लवकरात लवकर कार्यवाही होण्यासाठी सदर चार योजना क्लब करुन निविदा काढण्यात आल्या होत्या. प्रथम निविदा काढल्यानंतर ४३२ पैकी ६४ कामांना प्रतिसाद मिळाला होता. दुसऱ्यांदा निविदा काढल्यानंतर एकाही कामाला प्रतिसाद मिळाला नाही. यामुळे उर्वरित ३६८ कामे मजूर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना देण्यात आली होती. त्यापैकी त्यांनी २०९ अंगणवाडया बांधल्या. उर्वरित कामे त्यांनी न केल्यामुळे १५९ अंगणवाडयांची कामे ग्रामपंचायतींना देण्यात आली.

यावर समितीने विचारणा केली की, या संदर्भात अगोदर ग्रामपंचायतींना कामे का देण्यात आली नाहीत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर कार्यवाही अगोदर करणे अत्यावश्यक होते. त्यासंबंधी शासन निर्णय सुध्दा होते. परंतु सदर कामे लवकरात लवकर पूर्ण व्हावी यासाठी तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांनी एकत्रित निर्णय घेतला होता. यावर समितीने पुढे आणखी विचारणा केली की, तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांनी यांनी चुकीचा निर्णय घेतल्यामुळे २.६१ कोटी रुपये अखर्चित राहिले आहेत. यासंबंधी क्लिअर शासन निर्णय होता. शासनाच्या स्पष्ट गाईडलाईन्स असल्यामुळे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ही कामे करावयाची असल्यामुळे योजना क्लब करण्याची काही गरज नव्हती. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांनी या संदर्भात एकत्रित निर्णय घेण्यापूर्वी शासनाची परवानगी घेतली होती का, हा महत्वाचा विषय आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या संदर्भात निर्णय घेण्यापूर्वी शासनाची पूर्वपरवानगी घेण्यात आली नव्हती.

यावर समितीने विचारणा केली की, १२ ते १३ कोटी रुपयांची कामे करण्यासाठी निविदेची जाहिरात द्यावयाची असल्यास त्यासंबंधी शासनाचे निकष ठरविण्यात आलेले आहेत. परंतु अधिकाऱ्यांनी दाखविलेल्या कागदपत्रांनुसार "वक्तकर ताजा" आणि "साप्ताहिक कृपावंत" नावाच्या वर्तमानपत्रांमध्ये जाहिराती दिल्या आहेत. परंतु सदर वर्तमानपत्रे कोणीही वाचत नाहीत. या संदर्भात लोकमत, सकाळ, पुण्यनगरी, लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स अशा प्रकारच्या वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात देणे आवश्यक होते. परंतु तसे घडलेले नाही. यामुळे सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करुन समितीकडे सादर करणे अत्यावश्यक आहे.

४३२ अंगणवाडयांच्या कामांमध्ये नियोजनाचा अभाव झाल्याचे दिसून येत आहे. परिणामी मोठी अनियमिता झाली आहे. यासंबंधी शासनाच्या स्पष्ट मार्गदर्शक तत्वे असताना सुध्दा तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) आणि तत्कालिन जिल्हाधिकाऱ्यांनी एकत्रित निर्णय घेण्यापूर्वी शासनाची परवानगी सुध्दा घेतली नव्हती. सदर कामांच्या संदर्भात २.६१ कोटी रुपये अखर्चित राहिले होते. ही बाब गंभीर आहे. ४३२ अंगणवाडी इमारतींच्या बांधकामापैकी १५९ अंगणवाडी इमारतींची बांधकामे विहित काळात न केल्यामुळे त्यासंबंधी कोणतेही कारण नमूद न करता ती कामे रद्द करुन ग्रामपंचायतींना दिली आहेत. सदर प्रकरणांमध्ये सदर संस्थांना काळया यादीत टाकून त्यांना नोटीसेस द्यावयास पाहिजे होत्या. तसेच त्यांच्याकडून दंड देखील वसूल करणे अत्यावश्यक होते. परंतु असे काही घडलेले नाही.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, सदर कामांमध्ये मोठी अनियमितता झाली असून कोणताही ठराव न घेता सदर कामे ग्रामपंचायतींकडे वर्ग करण्यात आली. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या स्तरावर चौकशी करुन त्यात ज्या संस्था दोषी आढळून येतील त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी व त्यासंबंधीचा अहवाल समितीकडे सादर करावा. सदर विषय विभागीय सचिवांच्या साक्षीकरिता घेण्यात येत आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

१) ४३२ अंगणवाडयांच्या बांधकामामध्ये नियोजनाचा अभाव तसेच शासनाच्या मार्गदर्शक सुचनाचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी आणि तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी एकत्रित निर्णय घेण्यापुर्वी शासनाची परवानगी न घेतल्याप्रकरणी सदर कामाच्या संदर्भात रु.२.६१ कोटी इतकी रक्कम अखर्चित राहिल्या प्रकरणी समितीने निदेश दिल्यानुसार संबंधीतांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे ? नसल्यास विलंबाची कारणे काय ?

२) सदर कामे ग्रामपंचायतीकडे कोणताही ठराव न घेता वर्ग करण्यात आल्या प्रकरणी समितीने निदेश दिल्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय ? त्यात काय आढळुन आले आहे. त्यानुसार संबंधिताविरुध्द जबाबदारी निश्चित करुन कोणती कारवाई करण्यात आली आहे ? नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) सन २००९-१० मध्ये महिला व बाल विकास विभागाला अंगणवाडी इमारत बांधकाम करण्यासाठी विविध योजनेतून एकुण ४३२ अंगणवाडी इमारत बांधकामे करण्यासाठी निधी प्राप्त झाला होता. सदरची बांधकामे विहीत कालावधीत करावयाची होती. यासाठी स्थानिक परिस्थिती लक्षात घेवून बांधकामे कोणत्या यंत्रणेकडून पूर्ण करुन घ्यायची याचे अधिकार शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र. एबावि-२००८/प्र.क्र.१७३/का-६ मंत्रालय, मुंबई दि. १६ सप्टेंबर, २००९ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेले होते. त्यामुळे सदरची कामे एकाच यंत्रणेकडून लवकर पूर्ण करण्यासाठी ई निविदेद्वारे कामे करण्याचा निर्णय तत्कालिन जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतला. परंतु दोन वेळा ई निविदा देवूनही केवळ ६४ कामांनाच प्रतिसाद मिळाल्यामुळे इतर कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता आणि मजूर सहकारी संस्था यांना देण्यात आली होती. विविध कारणास्तव त्यांनीही १५९ कामे सुरु केली नसल्यामुळे सदरची कामे ग्रामपंचायतींना देण्यात आली होती. कोणत्याही परिस्थितीत ही कामे पूर्ण करुन घेणे हाच यामागचा जिल्हा प्रशासनाचा उद्देश होता.

उल्लेखीत रु. २.६१ कोटी निधी पैकी २.०५ कोटी निधी हा पुढील वर्षी खर्च करण्यात आलेला आहे. अंगणवाडी बांधकामासाठी काही ठिकाणी जागेचा वाद किंवा जागा उपलब्ध नसणे इत्यादी कारणामुळे रद्य करण्यात आलेल्या (२२) कामांचा निधी रु. ५५.५० लाख मार्च २०१२ अखेर शासनखाती भरणा करण्यात आलेला आहे.

२) विहीत कालावधीत कोणत्याही परिस्थितीत संपूर्ण बांधकामे पूर्ण करण्यासाठी १५९ बांधकामे ग्रामपंचायतींकडे वर्ग करण्यात आली. सदरची बांधकामे ग्रामपंचायतींकडे वर्ग करण्यापूर्वी वेळोवेळी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आलेली होती.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**महिला व बालविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेच्या अभिप्रायांशी शासन सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ८ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली होती. सदरहू साक्षीच्या वेळी समितीस सह सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी विदित केले की, सन २००९-२०१० मध्ये महिला व बालविकास विभागाला अंगणवाडी इमारतींचे बांधकाम करणेसाठी विविध योजनेतून एकूण ४३२ अंगणवाडी इमारत बांधकामे करण्यासाठी निधी प्राप्त झाला होता. सदरचे बांधकाम विहीत कालावधीत करायचे होते. यासाठी स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन याचे अधिकार, शासन निर्णय महिला बालविकास विभाग, दिनांक १६ सप्टेंबर, २००९ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेले होते. त्यानुसार काम पूर्ण करण्यासाठी ई निविदेद्वारे काम करण्याचा निर्णय तत्कालिन जिल्हाधिकारी यांनी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतला होता. परंतु दोनवेळा ई निविदा काढूनही केवळ ६४ कामांनाच प्रतिसाद मिळाला होता. इतर कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता आणि मजूर सहकारी संस्थाना देण्यात आले होते. विविध कारणास्तव त्यांनीही १५९ कामे पूर्ण केली नसल्यामुळे सदरची कामे ग्रामपंचायतींना देण्यात आली होती.

यावर समितीने विचारणा केली की, १५९ बांधकामे ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्यात आली, याची काय स्थिती आहे, १५९ बांधकामाचा हा खूप मोठा विषय आहे. यावर आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, महिला व बालकल्याण विभाग यांनी विदित केले की, पैसे शासनखाती जमा केलेले आहेत. १५९ अंगणवाडयांचे बांधकाम ग्रामपंचायतीला दिले होते, त्यातील काही कामे पूर्ण झाली आहेत. फक्त त्यातील ३७ बांधकामे जागेच्या वादामुळे रद्द झाली आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, आपण १५९ अंगणवाड्यांचे बांधकाम ग्रामपंचायतीला दिले म्हणून सांगितले. यावर आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, महिला व बालकल्याण विभाग यांनी विदित केले की, ही कामे सुरु झाली नव्हती म्हणून ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्यात आली होती. त्यामध्ये काही अडचणी होत्या. काही अंगणवाड्यांसाठी जागा मिळत नव्हती.

यावर समितीने पुढे आणखी विचारणा केली की, १५९ अंगणवाडयांसाठी जागा नव्हत्या का, यावर आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, महिला व बालकल्याण विभाग यांनी विदित केले की, काहींच्या जागा आहेत तर काहींना जागा नव्हत्या.

यावर समितीने मत व्यक्त केले की, यामध्ये चुकीच्या पध्दतीचे संदेश गेले असल्याचे दिसते आहे. तुमच्या दोन्ही विभागाची पूर्वचर्चा बरोबर झाल्या नाहीत का, समितीच्या साक्षीला येत असताना व्यवस्थितपणे कामाची माहिती घ्यायला नको का, ते अधिकारी वेगळी माहिती सांगतात तर आपण वेगळी माहिती सांगत आहात.

यावर आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, महिला व बालकल्याण विभाग यांनी विदित केले की, आमची मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्यासोबत चर्चा झाली होती. यावर समितीने मुख्य लेखा व वित्त अधिकारी कोण आहेत असा प्रश्न विचारला असता मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, १५९ कामांपैकी ३७ कामे सुरु झाली नव्हती.

यावर समितीने विचारणा केली की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सांगितले की, सर्व कामे सुरुच झाली नाहीत म्हणून पैसे परत केले. मुख्य लेखा व वित्त अधिकारी वेगळी माहिती सांगत आहेत आणि आपण वेगळी माहिती

सांगत आहात. आपण समितीला दिलेल्या माहितीमध्ये तसा उल्लेख करायला पाहिजे होता. आपण तसा उल्लेख यामध्ये का केला नाही, ४३२ अंगणवाडयांचे दुभागून देणे आवश्यक होते.

यावर आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, महिला व बालकल्याण विभाग यांनी विदित केले की, जिल्ह्यास्तरावर याची माहिती आहे. यावर समितीने विचारणा केली की, जिल्हास्तरावर माहिती आहे हे बरोबर आहे. आपण जेव्हा समितीसमोर साक्षीला येतात तेव्हा आपण जिल्ह्याच्या वतीने उत्तर देत असताना आपल्याकडे पूर्वचर्चा घेऊन आपण उत्तर द्यायला हवे होते. आपण जिल्हास्तरावर माहिती आहे म्हणून सांगत आहात. जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांचे आणि तुमचे संवाद व्हायला हवे होते. ३७ अंगणवाड्यांच्या बांधकामांचा पैसा परत करण्याचे कारण काय आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, त्यामध्ये जागेचा वाद होता. यावर समितीने विचारणा केली की, तेथे शासनाची जागा नव्हती का, त्या गावात वन विभागाची जागा असेल, गायरान जमीन असेल, महसूल विभागाची किंवा ग्रामपंचायतीची कुठली तरी जागा तेथे असेल, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, त्यावेळेस जागेचा वाद झाला होता. त्यासाठी कालबध्दता होती म्हणून ते पैसे परत केले.

यावर समितीने निदेश दिले की, अंगणवाडयांचा तसा कठीणच प्रश्न आहे. नाल्याची कामे, तसेच रस्त्याच्या कामामध्ये जसे ठेकेदार प्रतिसाद देतात तसा इमारतींच्या बाबतीत देत नाहीत. त्यांची फार मोठी चूक आहे अशातला भाग नाही. काही झाडांखाली, काही भाड्याच्या जागेमध्ये अंगणवाड्या सुरु असतात. त्यांचेसाठी किमान सुसज्ज अशी अंगणवाडी झाली पाहिजे, असा शासनाचा उपक्रम आहे. त्यासाठी आपण प्रयत्न केला पाहिजे. आता ३७ अंगणवाडी इमारती पूर्ण जिल्ह्यात बाकी आहेत. या पूर्ण करण्यासाठी शासनाकडून निधीची मागणी करावी आणि या इमारती पूर्ण कराव्यात. जागेचा जेथे वाद आहे त्या सर्वांचा पुन्हा एकदा आढावा घ्यावा.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर दिले.

## अभिप्राय व शिफारशी

परभणी जिल्हा परिषदेमध्ये सन २००९-१० मध्ये विविध विकास योजनेंतर्गत मंजूर ४३२ अंगणवाडी बांधकामाचे कंत्राट शासन निर्देशाचे पालन न करता मजूर संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना नियमबाह्य वाटप करण्यात आले. सदर १५९ कामे विहित मुदतीत न झाल्यामुळे व ती रद्द करण्यात आल्यामुळे रुपये ५,९६,२५,०००/- एवढी रक्कम निरर्थक गुंतवून ठेवण्यात आली. याबाबत सन २०११-१२ या कालावधीच्या लेखा परिक्षण अहवालामध्ये पुढीलप्रमाणे आक्षेप घेण्यात आले. सन २००९-१० पूर्वी तालुकानिहाय अंगणवाडी बांधकाम पूर्ण केल्याचे वर्ष निहाय तपशिल, बांधकाम पूर्ण नोंदवही व ग्रामपंचायतीस ताब्यात दिल्याचे अभिलेखे दर्शविले नाही. सन २००९-१० ते २०११-१२ या कालावधीत तालुकानिहाय किती अंगणवाडी बांधकामाची आवश्यकता होती याबाबतचे अहवाल उपलब्ध करुन दिले नाहीत. संबंधित बेरोजगार अभियंता व मजूर सहकारी संस्था यांना पुरवठा केलेली कामे, कामाचे स्वरुप, अंदाजित किंमत व कामाच्या कालावधीबाबतचे अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत. तसेच काम वाटपात ३३:३३:३४ प्रमाणे प्रमाणबध्दता राखलेली नाही. ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कामे ग्रामपंचायतींना न देता मजूर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांच्यामार्फत केलेली आहेत. संबंधितांनी ग्रामपंचायतीचे ना-हरकत प्रमाणपत्र न घेताच नियमबाह्य कार्यवाही करण्यात आली आहे. अखर्चित रक्कम रुपये २६१.१९ लक्ष शासनखाती भरणा करण्यात आलेली नाही. तालुकानिहाय अंगणवाडी बांधकाम नोंदवहीत दर्शविणे आवश्यक होते.

सदर आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीनुसार सन २००९-१० पूर्वी विविध योजनांतर्गत पूर्ण झालेल्या ३७२ अंगणवाड्यांची बांधकामे हस्तांतरण केलेली आहेत. अंगणवाडी बांधकामाची आवश्यकता असल्याबाबतचे बालविकास प्रकल्प अधिकारी यांचे अंगणवाडी केंद्रनिहाय सविस्तर अहवाल उपलब्ध आहेत. सदर अंगणवाडीची इमारत बांधकाम दिनांक ३१ मार्च, २०११ पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित होते. त्यामुळे या कामासाठी निविदा काढल्या होत्या, त्यांना अत्यल्प प्रतिसाद मिळाल्यामुळे काम वाटप समितीने ही कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजूर सहकारी संस्थांना वाटप करण्यात आली. दिनांक १६ सप्टेंबर, २००९ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार इमारतबांधकाम पूर्ण होऊ शकत नसल्याबाबत कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी दिलेला अहवाल व बांधकामे रद्द केल्याचे आदेश सदर कामे ग्रामपंचायतीकडे हस्तांतरण करण्यात आल्याचे आदेश उपलब्ध आहेत. अखर्चित निधी रुपये ११८.५० लक्ष शासन खाती जमा करण्यात आला आहे.

सदर लेखी माहितीच्या आधारे घेण्यात आलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, अंगणवाडी बांधकामे ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार देण्यात आली असती तर सदर कामांसाठी निविदा मागविण्याची गरज नव्हती तसेच ग्रामपंचायतींना कामे दिल्यानंतर त्यात काही ग्रामपंचायतींनी कामे न घेतल्यास त्याकरीता ३३:३३:३४ च्या प्रमाणामध्ये (रेशो) कामे वाटप करण्यात आलेली नाहीत. त्यासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सक्षम प्राधिकारी आहेत. सदर निधी जिल्हा वार्षिक योजनांमधील असल्यामुळे माहे फेब्रुवारी, २००८ च्या ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यतेचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थेतील सक्षम प्राधिकाऱ्यांना आहेत. तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांनी यासंदर्भात एकत्रित निर्णय घेऊन प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी माहे फेब्रुवारी, २००८ मधील ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे अभिप्रेत होते. सदर अंगणवाडी बांधकामे करण्याची कामे ग्रामपंचायतींना देणे गरजेचे असताना सुध्दा निविदा काढण्यात आल्यामुळे समिती आश्चर्य व्यक्त करीत आहे.

तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनी एकत्रितपणे अंगणवाडी बांधकामाबाबत निर्णय घेण्यापूर्वी शासनाची पूर्वपरवानगी घेतलेली नव्हती. सदर निर्णयामुळे रुपये २.६१ कोटी एवढी रक्कम अखर्चित राहिलेली आहे. त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. ४३२ अंगणवाडी इमारतींच्या बांधकामांपैकी १५९ अंगणवाडी इमारतींची बांधकामे विहित काळात पूर्ण न करण्याची कोणतीही कारणमिमांसा नमूद न करता अंगणवाडी इमारतीची बांधकामे रद्द करुन ग्रामपंचायतींना दिलेल्या आहेत. याप्रकरणी संबंधित संस्थांचा काळ्या यादीत समावेश करुन त्यांना नोटीसेस द्यावयास पाहिजे होत्या व त्या संस्थांकडून दंडाची रक्कम वसूल करणे आवश्यक होते. **अंगणवाडी इमारतीची बांधकामे सुसज्ज पध्दतीने व्हावीत यासाठी शासनाने उपक्रम राबविलेले आहेत. त्यानुसार परभणी जिल्ह्यात ३७ अपूर्ण असलेल्या अंगणवाडी इमारती पूर्ण करण्यासाठी शासनाकडून निधीची मागणी करण्यात यावी आणि ज्या ठिकाणी जागेचा वाद आहे त्या सर्वांचा पुन्हा एकदा आढावा घेऊन इमारत बांधकामे लवकरात लवकर पूर्ण करावीत असे समितीचे स्पष्ट मत आहे. प्रस्तुत प्रकरणी मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली असून ग्रामपंचायतीचा कोणताही ठराव न घेता अंगणवाडी इमारतींची बांधकामे ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्यात आली आहेत. त्यामुळे यासंदर्भातील मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर सखोल चौकशी करुन केलेल्या चौकशीनुसार दोषी आढळून आलेल्या संबंधित संस्थांविरुध्द तात्काळ दंडात्मक कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण बारा

## **जिल्हा परिषद, परभणी**

## **सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना निधी अंतर्गत स्मशानभूमी शेड व रस्ता बांधकामातील अनियमिततेबाबत**

### **परिच्छेद क्रमांक ३.२८९/३२ (सन २०११-१२)**

पंचायत समिती जिंतूर सन २०११-१२ चे लेखापरिक्षणात सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना निधी अंतर्गत स्मशानभूमी शेड व रस्ता बांधकामाचे अभिलेखे तपासणी केली असता एकुण (१५) कामावर रक्कम रु.३८,८५,४०० चा खर्च केलेला असून याबाबत खालील प्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

१) आयकर अधिनियम १९६१ च्या कलम १९४ (क) प्रमाणे कंत्राटदाराच्या देयकातून कामाच्या मुल्यांच्या २.३० टक्के दराने कपात करणे आवश्यक होते. परंतु आयकराची रक्कम कपात करण्यात आलेली नाही. आयकराची रक्कम रु.८७,८१० वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

२) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग निर्णय क्रमांक बीडीजी-२००५/पत्र क्रमांम ३२४/इमारती-२, दिनांक ०३ मार्च, २००६ चे परि. क्रमांक ५ मधिल तरतुदीनुसार ४ टक्के दराने मुल्यवर्धित कर वसूल करण्यात यावा असा स्पष्ट आदेश आहेत परंतू स्मशानभूमी बांधकाम बोर्डी, बोरी,सावंगी (भां) व अंबरवाडी च्या देयकातून रक्कम रु.२४,२५६/- कमी कपात केलेली आहे. सदरची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

३) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्रमांक, गौणखनिज/१०/२/२००६ / प्र.क्र. ५७/२/ ब मंत्रालय मुंबई-३२, दिनांक १५ डिसेंबर, २००६ अन्वये स्वामित्व धनाची परिगणना करुन देयकातून  कपात करुन महसुल खाती भरणा करणे आवश्यक असतांना स्मशानभुमी शेड बांधकाम दुधगांव, बोर्डी, सावरगांव व सावंगी (भां) चे देयकातून रु.१,०४,७१६ कपात करुन महसुल खाती भरणा न करताच देयक पारित केलेले आहे. स्मशानभुमी शेड बांधकाम जांब (बु), माळेगाव, दुधगाव बोरी करवली, गणपुर, नागनगाव, भोगाव, वाघी (बो) आणि शेख व अंबरवाडी वरील कामाची रॉयल्टी रक्कम परिगणीत करुन मोजमाप पुस्तीकेत न नोदविता देयक पारित केलेले आहे. तरी रक्कम रु.१,०४,७१६ व उर्वरित सर्व कामाची रॉयल्टी रक्कम परिगणित करुन वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

४) सदर स्मशानभूमी शेड व रस्ता बांधकामाचे सामान्य पावती नमुना नं.१० नुसार वसुल केलेली निविदा रक्कम जिल्हा परिषद उपकर खाती भरणा केल्याचे चलन दर्शविले नाही.

५) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.सिमेंट/साहित्य/१०९९/ ५६/३५, दि. ३० जून २००० नुसार सिमेंट गिट्टी रेती याचा वापर करण्यापुर्वी शासनाच्या अधिकृत प्रयोग शाळेतून गुणवत्ता चाचणी करुन घेण्यात आलेली नाही.

६) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ च्या नियम १६६ (१) च्या तरतुदीनुसार मुल्यांकन करतांना मोजमाप पुस्तीकेवर दिनांकीत स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत.

७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १९७ अन्वये नमुना नं.६९ मध्ये पूर्ण झालेल्या कामाची नोंद मालमत्ता नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. परंतु अशी नोंद वही दर्शविली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) आक्षेपाच्या अनुषंगाने आयकराची एकूण रक्कम रु. ८७,८१० वसुल करण्यात आली आहे. यासोबत चलनाच्या प्रती अवलोकनार्थ जोडण्यात आलेल्या आहेत.

(२) आक्षेपाच्या अनुषंगाने मुल्यवर्धीत कराची रक्कम रु. २४,२५६ वसुल करण्यात आलेली आहे. यासोबत चलनच्या प्रती अवलोकनार्थ जोडण्यात आलेल्या आहेत.

(३) आक्षेपात नमुद स्वामित्वधनाची रक्कम रु. १,०४,७१६ आणि उर्वरित देयकातील स्वामित्वधनाची रक्कम परिगणना करुन रु.७८,५१६ असे एकूण रु.१,८३,२९२ वसूल करण्यात आली आहे.

(४) आक्षेपाच्या अनुषंगाने निविदा रक्कम रु. २८,००० सामान्य पावती नमुना नं.१० अन्वये वसूल करण्यात आलेली रक्कम जिल्हा परिषद उपकर खाती भरणा करण्यात आली आहे.

(५) आक्षेपाच्या अनुषंगाने नमुद करण्यात येते की, ग्रामपंचायत दुधगाव, गणपुर (गोधळा) व नागणगाव येथिल कामाचे गुणवत्ता चाचणी अहवाल उपलब्ध आहेत. उर्वरित १२ कामांची गुणवत्ता चाचणी अहवाल उपलब्ध नाहीत.

(६) संबंधित मुल्यांकन करतांना मोजमाप पुस्तीकेवर दिनांकीत स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. करिता संबंधित शाखा अभियंता यांना जाक्र/पसजि/बा/कावि/ ५५३/१६ दि. २९ डिसेंबर २०१६ व ३१४/१७ दि. २५ जुलै, २०१७ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात येऊन यापुढे कामाचे मुल्यांकन करतांना मोजमाप पुस्तिकेत दिनांकीत स्वाक्षऱ्या करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १९७ अन्वये नमुना नं.६९ मध्ये पुर्ण झालेल्या कामाची नोंद घेण्यात आलेली नव्हती, ही वस्तुस्थिती आहे. यापुढे कामाचे अंतिमीकरण झाल्यानंतर नोंदी नमुना नंबर ६९ सदयस्थितीत ठेवण्यात येत आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ नोव्हेंबर २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखापरीक्षणामध्ये सूचित केल्याप्रमाणे रक्कम रु.२,९५,३५८ केव्हा वसूल करण्यात आली, विलंबाने रक्कम वसूल करण्याची कारणे काय आहेत, चाचणी अहवाल घेण्यामध्ये काय अडचणी आहेत, चाचणी अहवालाशिवाय कामाच्या गुणवत्तेची खात्री कशी केली, १२ कामांचे चाचणी अहवालाशिवाय काम पूर्ण करुन घेण्यात आले आहे काय, मोजमाप पुस्तिकेवर दिनांकित स्वाक्षरी न करण्याची कारणे काय आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिंतूर पंचायत समिती अंतर्गत १५ कामे होती. ती रक्कम भरुन घेतलेली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, अहवालातील पृष्ठ क्र.५५ वर उर्वरित १२ कामांचे गुणवत्ता चाचणी अहवाल उपलब्ध नाहीत असे नमूद केलेले आहे. म्हणजे जो आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे तो त्यांनी मान्य केलेला आहे, त्यांनी कामाची गुणवत्ता तपासण्यासाठी प्राप्त झालेल्या साहित्याचे नमुने प्रयोगशाळेत पाठविले पाहिजेत. परंतु साहित्य तपासणी करण्यात न आल्यामुळे या संदर्भात संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई झाली पाहिजे व कामाचे आयुर्मान किती आहे आणि ते तेवढे वर्षे टिकणार आहे किंवा नाही हे देखील बघितले पाहिजे. मूल्यांकन करताना मोजमाप पुस्तिकेवर

दिनांकित स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत. संबंधित अधिकाऱ्यांनी दिनांकित स्वाक्षऱ्या करावयास पाहिजेत, उप अभियंता तपासणी करतात, मग दिनांकित स्वाक्षरी नसल्यामुळे त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे. दिनांकित स्वाक्षरी न केल्यामुळे तेथूनच भ्रष्टाचारास सुरुवात होते. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी गुण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून या कामाची चौकशी करावी आणि यामध्ये अनियमितता झाली असेल तर कनिष्ठ अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. आपण या संदर्भात कार्यवाही करुन समितीला अहवाल सादर करावा.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी पंचायत समित्यांना भेट दिलेली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दोन पंचायत समित्यांना भेट दिलेली आहे. यावर समितीने निदेश दिले की, सर्व खाते प्रमुखांनी पंचायत समित्यांना भेट द्यावी. दिनांकित स्वाक्षरी न करणे चुकीचे आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून यामध्ये सुधारणा केली पाहिजे. पंचायत समित्यांना भेट देऊन यामध्ये सुधारणा करावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

समितीने निर्देश दिल्यानुसार स्मशानभुमी शेड व रस्ता बांधकामाची गुणनियंत्रण मंडळाच्या माध्यमातुन चौकशी करण्यात आली आहे काय ? असल्यास त्यात काय आढळुन आले आहे ? त्यानुसार संबंधिताविरुध्द जबाबदारी निश्चित करुन कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ? नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना निधी अंतर्गत स्मशानभुती शेड व रस्ता बांधकाम एकूण १५ कामांपैकी ४ कामांचे गुणवत्ता चाचणी अहवाल घेण्यात आले होते. उर्वरित प्राप्त न झालेल्या ११ कामांची तपासणी करणेसाठी उप अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद परभणी यांची समिती नेमण्यात आली. समितीने या ११ कामांची प्रत्यक्ष पाहणी केली.त्यानुसार सन २०११-१२ मध्ये करण्यात आलेली स्मशान भुमी शेड, रस्ता, संरक्षण भिंत व तार कुंपणांची कामे गुणवत्तेसह झाली आहेत, असा अहवाल सादर केला आहे.

तसेच मा.पंचायती राज समितीने दिलेल्या निर्देशानुसार राज्य गुणवत्ता नियंत्रक (SQM ) यांना सदर कामे तपासून अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (योजना-६) समितीने निर्देश दिल्यानुसार जिल्हा परिषदेने अद्यापि स्मशानभुमी शेड व रस्ता बांधकामाची गुणनियंत्रण मंडळाच्या माध्यमातुन करावयाच्या चौकशीचा अहवाल सादर केलेला नाही. सदरचा अहवाल एक महिन्यात सादर करण्याबाबत तसेच अद्यापि  कार्यवाही पूर्ण करण्यास झालेल्या विलंबाची जबाबदारी जि.प.स्तरावरील संबंधित खातेप्रमुख व पंचायस समिती स्तरावरील गटविकास अधिकारी यांच्यासह या प्रकरणाशी निगडित अन्य अधिकारी /कर्मचारी  यांच्यावर निश्चित करण्यासंबंधाने मुख्य कार्यकारी, अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना निदेश देण्यात येत आहेत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ८ जानेवारी २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या

वेळी समितीने अशी विचारणा केली की, समितीने दिलेल्या निर्देशानुसार राज्य गुणवत्ता नियंत्रक (SQM) यांना सदर कामे तपासून अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. सदरहू अहवाल सादर करण्यात आलेला आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, राज्य गुणवत्ता नियंत्रक यांच्यामार्फत तपासणी झालेली आहे. दिनांक १७ ऑक्टोबर २०१८ रोजी त्यांचा अहवाल विभागाला पाठविलेला आहे.

यावर समितीने मुद्दा उपस्थित केला की, आपण समितीला असा अहवाल दिला की, आक्षेपाच्या अनुषंगाने एकूण १५ कामांपैकी ३ गावातील ४ कामांचे गुणवत्ता चाचणी अहवाल घेण्यात आले होते. उर्वरित ११ कामांची तपासणी प्रत्यक्ष मोक्यावर जाऊन करण्यात आली असून सर्व कामे सुस्थितीत आढळून आली असून गावकऱ्यांना कामाचा उपयोग होत असल्याचे दिसून आले आहे. तसेच आज तारखेस देखील ग्रामस्थांकडून वापर चालू आहे.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, परभणी अंतर्गत पंचायत समिती, जिंतूर येथे सन 2011-12 मधील लेखापरिक्षण अहवालामध्ये सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना निधी अंतर्गत स्मशानभूमी शेड व रस्ता बांधकामाचे अभिलेखे तपासणी केली असता एकूण १५ कामावर रक्कम रुपये ३८,८५,४०० एवढा खर्च केलेला असून लेखापरिक्षण अहवालामध्ये कंत्राटदाराच्या देयकातून कामाच्या मुल्यांच्या २.३० टक्के दराने कपात करणे आवश्यक होते. परंतु आयकराची रुपय ८७,८१० एवढी रक्कम वसूल करुन शासनखाती भरणा करणे होते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक ३ मार्च, २००६ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार ४ टक्के दराने मुल्यवर्धित कर वसूल करण्यात यावा असे आदेश असताना स्मशान भूमी बांधकाम बोर्डी, बोरी, सावंगी (भां) व अंबरवाडीच्या देयकातून रक्कम रुपये २४,२५६ एवढी कमी कपात केलेली रक्कम वसूल करण्यात आली नाही. महसूल व वन विभागाच्या गौण खनिजासंदर्भातील दिनांक १५ डिसेंबर २००६ रोजीच्या शासन निर्णयानुसार जांब (बु) माळेगाव, दुधगाव बोरी करवली, गणपूर, नागणगाव, भोगाव, वाघी (बो), वाधी शेख व अंबरवाडी येथील कामाची स्वामित्वधनाची परिगणना करुन देयकातून रुपये १,०४,७१६ एवढी रक्कम कपात करुन महसूल खाती भरणा न करता देयक पारित करण्यात आले.

सदर स्मशानभूमी शेड व रस्ता बांधकामाचे सामन्य पावती नमुना क्रमांक १० नुसार वसुल केलेल्या निविदा रक्कमा जिल्हा परिषद उपकर खाती भरणा केल्याचे चलन दर्शविण्यात आले नाही. सिमेंट गिट्टी रेती याचा वापर करण्यापूर्वी शासन प्रयोगशाळेतून गुणवत्ता चाचणी करुन घेण्यात आलेली नाही. मुल्यांकन करताना मोजमाप पुस्तिकेवर दिनांकित स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत. नमुना नं.६९ मध्ये पूर्ण झालेल्या कामाची नोंद मालमत्ता नोंदवहीत घेणे आवश्यक असताना नोंदवही दर्शविली नाही. सदरहू आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, परभणी यांनी केलेल्या लेखी खुलाशानुसार आयकराची एकूण रक्कम रुपये ८७,८१० मुल्यवर्धीत कराची रक्कम रुपये २४,२५६ तसेच स्वामित्वधनाची परिगणना करुन एकूण रक्कम रुपये १,८३,२९२ वसूल करण्यात आली आहे. निविदा रक्कम रुपये २८,००० उपकर खाती भरणा करण्यात आली आहे. ग्रामपंचायत दुधागाव, गणपूर (गोधळा) व नागणगाव येथील ३ कामांचे गुणवत्ता चाचणी अहवाल उपलब्ध असून उर्वरित १२ कामांचे गुणवत्ता चाचणी अहवाल उपलब्ध नाहीत. मुल्यांकन करताना मोजमाप पुस्तिकेवर दिनांकित स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे संबंधित शाखा अभियंता यांना कारणेदाखवा नोटीस देण्यात आली आहे. यापुढे कामाचे मुल्यांकन करताना मोजमाप पुस्तिकेत दिनांकित स्वाक्षऱ्या करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. नमुना नं.६९ मध्ये पूर्ण झालेल्या कामाची नोंद घेण्यात आलेली नव्हती ही वस्तुस्थिती आहे. यापुढे नमुना नु.६९ अद्ययावत ठेवण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे. सदर लेखी माहितीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ नोव्हेंबर २०१७ रोजी साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, लेखापरीक्षणामध्ये सुचित

केल्याप्रमाणे एकूण रक्कम रुपये २,९५,३९८ वसुल करण्यात विलंब झालेला आहे. तसेच ग्रामपंचायत दुधगाव, गणपूर (गोधळा) व नागणगाव येथील ३ कामांचे गुणवत्ता चाचणी अहवाल उपलब्ध आहेत. तथापि, उर्वरित १२ कामांचे गुणवत्ता चाचणी अहवाल उपलब्ध नाहीत. त्यामुळे १२ कामांची गुणवत्ता तपासण्यासाठी प्राप्त झालेल्या साहित्याचे नमुने प्रयोगशाळेत पाठविणे आवश्यक होते. कारण सदर कामाचे आयुर्मान किती आहे आणि ती कामे किती वर्षापर्यंत टिकणार आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे होते. त्यामुळे यासंदर्भात सखोल चौकशी करुन संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यानुसार कारवाई करण्यात यावी तसेच मुल्यांकन करताना मोजमाप पुस्तिकेत दिनांकित स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत. दिनांकित स्वाक्षऱ्या न केल्यामुळे गैरव्यवहारास सुरुवात होते असे समितीचे स्पष्ट मत आहे. त्यामुळे **मोजमाप पुस्तिकेत दिनांकित स्वाक्षऱ्या घेण्याची जबाबदारी उप अभियंता यांची असल्यामुळे याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व उप अभियंता यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

**तसेच समितीने दिलेल्या निदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राज्य गुणवत्ता नियंत्रक यांच्या माध्यमातून उपरोक्त कामाची चौकशी करावी व चौकशीनुसार कामामध्ये अनियमितता आढळून आलेली असल्यास संबंधित कनिष्ठ अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता यापैकी जे कोणी दोषी आढळून येतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी.**

**तसेच स्मशानभूमी शेड व रस्ता बांधकामाची गुणनियंत्रण मंडळाच्या माध्यमातून करावयाचा चौकशी अहवाल सादर करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यास झालेल्या विलंबाची जबाबदारी जिल्हा परिषद स्तरावरील संबंधित खाते प्रमुख व पंचायत समिती स्तरावरील गटविकास अधिकारी यांच्यासह या प्रकरणाशी निगडीत अन्य अधिकारी यांच्यावर देखील जबाबदारी निश्चित करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

# प्रकरण तेरा

## जिल्हा परिषद, परभणी

## लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणेबाबत

### (१) परिच्छेद क्रमांक ३.१०३७ (६९) (सन २००८-०९)

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरीक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखे संबंधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधीत जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समिती यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करण्याबाबत कालवधी दिला जातो. तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करत नाही असे अभिलेखे उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवुन त्या बाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळुन येते व नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करुन देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करुन देऊन सुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभागाने आणि पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखाबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६९ | परभणी | सामान्य प्रशासन | ३५ | ११,२०,००० |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत राज समिती लेखा आक्षेपात नमुद करण्यात आलेनुसार लेखा आक्षेपाचे अनुपालन खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात पंचायत समिती पुर्णा अंतर्गत ग्रामपंचायत ताडकळस, कलमुला, पिंपळा भ. व लोनखुर्द येथिल यशवंत ग्राम समृध्दी योजनेचे अभिलेखे लेखा परिक्षणाकरिता उपलब्ध न करुन दिल्या मुळे संबंधितावर मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० नुसार कार्यवाही करण्यात येऊन दंडाची रक्कम शासन खाती भरणा करण्यात आली आहे. तसेच आज रोजी सर्व अभिलेखे लेखापरिक्षणाकरिता उपलब्ध आहेत.

**(२) परिच्छेद क्रमांक ३.१०३७ (७०) (सन २००८-०९)**

परिच्छेद क्रमांक १ (३.१०३७) मध्ये नमूद केलेल्या मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम (३), ६ (१) व ७ प्रमाणेच स्थानिक निधी लेखा यांनी घेतलेल्या आक्षेपाबाबतची माहिती खालील प्रमाणे दर्शविली आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ७० | परभणी | बांधकाम विभाग | ७४ | निरंक |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

आक्षेपाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, सन २००८-०९ च्या लेखा परीक्षणास पुर्ण अपुर्ण कामाची यादी उपलब्ध करुन देण्यात आलेली नव्हती. या बाबत संबंधित तत्कालिन कर्मचारी श्री.पी.पी.अंबुरे, वरिष्ठ सहाय्यक (लेखा), श्री.एन.जे.राठोड, प्रमुख आरेखक, श्री.डी.बी.कदम, कनिष्ठ सहाय्यक यांना या कार्यालयाचे आदेश दिनांक १६ ऑक्टोबर २०१७ अन्वये समज देण्यात आलेली आहे.

**(३) परिच्छेद क्रमांक ३.१०३७ (७१) (सन २००८-०९)**

परिच्छेद क्रमांक १ (३.१०३७) मध्ये नमूद केलेल्या मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम (३), ६ (१) व ७ प्रमाणेच स्थानिक निधी लेखा यांनी घेतलेल्या आक्षेपाबाबतची माहिती खालीलप्रमाणे दर्शविली आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ७१ | परभणी | लघुपाटबंधारे विभाग | ४८ | ४,९६,१६८ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

आक्षेपात नमुद केल्यानुसार रक्कम रु. ४,९६,१६८ चे पंचायत समिती, सोनपेठ अंतर्गत जवाहर व्याप्ती विहिर योजनेवरील खर्चाचे अभिलेखे लेखा परिक्षणास दर्शविण्यासाठी आता उपलब्ध आहेत. स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० नुसार संबंधिताकडून रु. १०० दंडाची रक्कम वसूल करुन शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे.

**(४) परिच्छेद क्रमांक ३.१०३७ (७२) (सन २००८-०९)**

परिच्छेद क्रमांक १ (३.१०३७) मध्ये नमूद केलेल्या मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम (३), ६ (१) व ७ प्रमाणेच स्थानिक निधी लेखा यांनी घेतलेल्या आक्षेपाबाबतची माहिती खालीलप्रमाणे दर्शविली आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ७२ | परभणी | समालकल्याण विभाग | ३६ | ३३,२६,००० |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती जिंतूर २००८-०९ दलित वस्ती सुधार योजना एकूण प्रमाणके ४२ रक्कम रुपये ३३,२६,००० गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर यांना अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे पत्र जाक्र.१४६१/२०१५ दिनांक १८ सप्टेंबर २०१५ नुसार सदर कालावधीत लेखा परिक्षणास अभिलेखे न दर्शविल्याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. तसेच समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे पत्र क्र. जा.क्र./जि.प./सकवि/प.रा.स./१७२३/२०१७, दि. २९ सप्टेंबर २०१७ अन्वये ज्या कर्मचाऱ्यांनी लेखा परिक्षणाच्यावेळी अभिलेखे दर्शविले नाहीत त्यांच्याकडून मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षण अधिनियम, १९३० चे कलम ७ अन्वये १०० रुपये दंड का वसूल करण्यात येवू नये असे कळविले आहे.

तेव्हा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतुर यांनी कळविल्यानुसार संबंधित कर्मचारी श्री.सुनिल पवळे, आरेखक पंचायत समिती, जिंतूर यांचेकडून रु. १०० दंड वसूल केला आहे. तथापि, सदरचे एकूण ४२ प्रमाणका पैकी २५ प्रमाणकाचे अभिलेखे आता लेखा परिक्षणास उपलब्ध आहेत.

**(५) परिच्छेद क्रमांक ३.१०३७ (७३) (सन २००८-०९)**

परिच्छेद क्रमांक १ (३.१०३७) मध्ये नमूद केलेल्या मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम (३), ६ (१) व ७ प्रमाणेच स्थानिक निधी लेखा यांनी घेतलेल्या आक्षेपाबाबतची माहिती खालीलप्रमाणे दर्शविली आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ७३ | परभणी | समाजकल्याण विभाग | ३७ | ३३,००,३४१ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणीकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती मानवत २००८-०९ दलित वस्ती सुधार योजना एकूण प्रमाणके ३९, रक्कम रुपये ३३,००,३४१.

आक्षेपात नमुद केल्या नुसार गट विकास अधिकारी पंचायत समिती, मानवत यांना अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद परभणी यांचे पत्र जाक्र.१४६१/२०१५, दिनांक १८ सप्टेंबर २०१५ नुसार सदर कालावधीत लेखा परिक्षणास अभिलेखे न दर्शविल्याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. तसेच समाज कल्याण अधिकारी जि.प. परभणी यांचे पत्र क्रं. जा.क्र./जि.प./सकवि/प.रा.स./१७२३/२०१७, दि. २९ सप्टेंबर २०१७ अन्वेय ज्या कर्मचा-यांनी लेखा परिक्षणाच्यावेळी अभिलेखे दर्शविले नाहीत त्यांच्याकडून मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षण अधिनियम, १९३० चे कलम ७ अन्वये १०० रुपये दंड का वसूल करण्यात येवू नये असे कळविले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद परभणी यांचे आदेश क्रमांक जाक्र/जिप/साप्रवि/आस्था-३/कावि/४२८/२०१६, दि. ०७ एप्रिल २०१६ अन्वये त्यावेळेस कार्यरत असलेले श्री.गणेश तुकाराम मार्गे, वरिष्ठ सहाय्यक पंचायत समिती, मानवत यांना जिल्हा परिषद सेवेतुन सक्तीने सेवा निवृत्त करण्याची शास्ती देण्यात आलेली आहे. तथापि, सदरचे एकुण ३९ प्रमाणका पैकी ३४ प्रमाणकाचे अभिलेखे आता लेखा परिक्षणास उपलब्ध आहेत.

**(६) परिच्छेद क्रमांक ३.१०३७ (७४) (सन २००८-०९)**

परिच्छेद क्रमांक १ (३.१०३७) मध्ये नमूद केलेल्या मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम (३), ६ (१) व ७ प्रमाणेच स्थानिक निधी लेखा यांनी घेतलेल्या आक्षेपाबाबतची माहिती खालीलप्रमाणे दर्शविली आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ७४ | परभणी | समाजकल्याण विभाग | ३९ | १,४१,८३,३०४ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणीकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

समाज कल्याण विभाग जि.प. परभणी ने सन २००८-०९ चे लेखापरिक्षणात अस्तिव्यंग/ मुकबधिर/मतीमंद प्रर्वगासाठीच्या अशासकीय संस्थांना वेतन व वेतनेत्तर अनुदान, (निर्वाह भत्ता) प्रदान केलेला आहे. (एकूण प्रमाणके १५ रक्कम रुपये १,४१,८३,३०४)

समाज कल्याण अधिकारी जि.प. परभणी यांचे पत्र क्रं. जा.क्र./जि.प./सकवि/प.रा.स./ १७२३/२०१७, दि. २९ सप्टेंबर २०१७ अन्वेय ज्या कर्मचाऱ्यांनी लेखा परिक्षणाच्यावेळी अभिलेखे दर्शविले नाहीत त्यांच्याकडून मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षण अधिनियम, १९३० चे कलम ७ अन्वेय १०० रुपये दंड का वसूल करण्यात येवू नये असे संबंधितास कळविले आहे.

तेव्हा श्री. एस.ई गोडगोडवार, तत्कालिन वैद्यकिय सामाजिक कार्यकर्ता यांचे कडून रक्कम रुपये १०० दंड वसूल केला आहे.

आक्षेपात नमुद प्रमाणके ही वेतन आणि वेतनेतर बाबींची असून, एकूण १५ प्रमाणकाचे अभिलेखे आता लेखा परिक्षणास उपलब्ध आहेत.

**(७) परिच्छेद क्रमांक ३.८१२ (६१) (सन २०११-१२)**

परिच्छेद क्रमांक १ (३.१०३७) मध्ये नमूद केलेल्या मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम (३), ६ (१) व ७ प्रमाणेच स्थानिक निधी लेखा यांनी घेतलेल्या आक्षेपाबाबतची माहिती खालीलप्रमाणे दर्शविली आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६१ | परभणी | सामान्य प्रशासन | ४१ | ३०,६७,४६६ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती परभणी अंतर्गत लेखापरिक्षात अभिलेखे न दर्शविणे बाबत पत्र क्र.जिप/साप्रवि/व्हिपी-६/कावि/२२०/१५, दि. ३० सप्टेंबर २०१५ नुसार गट विकास अधिकारी पंचायत समिती परभणी यांना संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यावर कार्यवाही करणे बाबत कळविण्यात आले आहे. त्यानुसार गट विकास अधिकारी परभणी यांनी त्यांचे पत्र क्रमांक १५६२, दि. १२ ऑक्टोबर २०१७ नुसार संबंधिताच्या आस्थापनेस त्यांच्या वेतनातुन दंड वसूल करणे बाबत कळविले आहे. आक्षेपात नमुद करण्यात आलेल्या सर्व विषयाच्या संचिका नोंदवह्या व इतर सर्व अभिलेखे लेखा परिक्षणास दर्शविण्यास उपलब्ध आहेत.

**(८) परिच्छेद क्रमांक ३.८१२ (६२) (सन २०११-१२)**

परिच्छेद क्रमांक १ (३.१०३७) मध्ये नमूद केलेल्या मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम (३), ६ (१) व ७ प्रमाणेच स्थानिक निधी लेखा यांनी घेतलेल्या आक्षेपाबाबतची माहिती खालीलप्रमाणे दर्शविली आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६२ | परभणी | बाधकाम | ५१ | २५,५०,०४६ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

आक्षेपाचे अनुषंगाने अनुपालन सादर करण्यांत येते की, सन २०११-१२ स्थानिक निधी लेखा परिक्षण कालावधीत लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन देण्यांत आले होते.

तथापि, संबंधित लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा यांनी उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यांपैकी काही अभिलेख्याची तपासणी केली आहे व काही अभिलेख्यांची तपासणी केली नाही. तपासणी करणे बाबत परत विनंती करण्यांत आली होती. लेखा परीक्षणास अभिलेखे दर्शविण्यास उपलब्ध आहेत.

**(९) परिच्छेद क्रमांक ३.८१२ (६३) (सन २०११-१२)**

परिच्छेद क्रमांक १ (३.१०३७) मध्ये नमूद केलेल्या मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम (३), ६ (१) व ७ प्रमाणेच स्थानिक निधी लेखा यांनी घेतलेल्या आक्षेपाबाबतची माहिती खालीलप्रमाणे दर्शविली आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६३ | परभणी | बाधकाम | ५४ | ४२,१८,९७२ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

आक्षेपाचे अनुषंगाने अनुपालन सादर करण्यांत येते की, सन २०११-१२ स्थानिक निधी लेखा परिक्षण कालावधीत लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन देण्यांत आले होते.

तथापि, संबंधित लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा यांनी उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यांपैकी काही अभिलेख्याची तपासणी केली आहे व काही अभिलेख्याची तपासणी केली नाही. तपासणी करणे बाबत परत विनंती करण्यांत आली होती. लेखा परीक्षणास अभिलेखे दर्शविण्यास उपलब्ध आहेत.

**(१०) परिच्छेद क्रमांक ३.८१२ (६४) (सन २०११-१२)**

परिच्छेद क्रमांक १ (३.१०३७) मध्ये नमूद केलेल्या मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम (३), ६ (१) व ७ प्रमाणेच स्थानिक निधी लेखा यांनी घेतलेल्या आक्षेपाबाबतची माहिती खालीलप्रमाणे दर्शविली आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६४ | परभणी | आरोग्य | २६ | ३३,८३,९७५ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

आक्षेपात दर्शविल्यानुसार लेखा परिक्षणाचे वेळी लेखे व अभिलेखे का उपलब्ध करुन दिली नाही या बाबत पत्र क्रं. जिप/आरोग्य/बजेट/ कावी/ २७ /२०१३, दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ व कारणे दाखवा नोटिस क्रं.

जिप/आरोग्य/बजेट/कावी/३९/२०१३, दि. २२ नोव्हेंबर २०१३ संबंधिताचा खुलासा मागविण्यात आला होता. तसेच शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. लेखाप-२०११/प्र.क्र./८/वित्त-१८ मंत्रालय मुंबई दिनांक १६ मार्च २०११ नुसार कार्यवाही करण्यात येईल याबाबत सक्त ताकिद देण्यात आली होती. परंतु संबंधितांनी लेखे/ अभिलेखे उपलब्ध न करुन लेखा परिक्षणास दर्शविले नसल्यामुळे प्रा.आ. केंद्र जांब व पिंगळी येथील कनिष्ठ सहाय्यक यांना निलंबित केलेले असून त्यांच्यावर याबाबत पुरवणी दोषारोप ठेवण्यात आलेले आहेत. विभागीय चौकशीचे अहवालानूसार प्रा.आ.केंद्र पिंगळी येथील कनिष्ठ सहायक यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश जा.क्र.जिप/साप्रवि/आस्था-२/कावि/२११/१६, दि. १८ फेब्रुवारी २०१६ अन्वये सक्तीने सेवानिवृत्त करण्याची शास्ती दिलेली आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र जांब येथिल कनिष्ठ सहाय्यक यांना चौकशी अंती आदेश क्रं. जाक्र/जिप/आरोग्य/आस्था-१/कावि/१४३७/१७, दिनांक २७ ऑक्टोबर २०१७ चे आदेशान्वये "सध्याच्या कनिष्ठ सहाय्यक या पदाच्या मुळ वेतन श्रेणीत मुळ टप्यावर आणने" हि शिक्षा देण्यात आलेली आहे.

**(११) परिच्छेद क्रमांक ३.८१२ (६५) (सन २०११-१२)**

परिच्छेद क्रमांक १ (३.१०३७) मध्ये नमूद केलेल्या मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम (३), ६ (१) व ७ प्रमाणेच स्थानिक निधी लेखा यांनी घेतलेल्या आक्षेपाबाबतची माहिती खालीलप्रमाणे दर्शविली आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६५ | परभणी | आरोग्य | ३० | ६,०९,९९१ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

आक्षेपात दर्शविल्यानुसार लेखा परिक्षणाचे वेळी लेखे व अभिलेखे का उपलब्ध करुन दिली नाही या बाबत पत्र क्र. जिप/आरोग्य/बजेट//कावी/२७/२०१३ दिनांक १८ नोव्हेंबर २०१३, कारणे दाखवा नोटिस जिप/आरोग्य/ बजेट//कावी/३९/२०१३, दि. २२ नोव्हेंबर २०१३ अन्वये संबंधिताचा खुलासा मागविण्यात आला होता. लेखापरिक्षणाचे वेळी सबंधित कर्मचाऱ्याची प्रकृती ठिक नसल्यामुळे लेखे व अभिलेखे दर्शविण्यात आले नसल्याचे सबंधित कर्मचाऱ्याने लेखी खुलाश्याव्दारे कळविले होते. त्यानुसार संबंधिताने लेखा आक्षेपात नमुद लेखे व अभिलेखे परिपुर्ण करुन सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा परभणी यांना दि. ०३ डिसेंबर २०१३ रोजी दर्शविले आहेत.

सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, परभणी यांचे कार्यालयाचे पत्र जा.क्र. स्था/४-ब/लेप-अ/१३१०/२०१३, दि. ०३ डिसेंबर २०१३ अन्वये लेखे / अभिलेखे तपासणी केले बाबत कळविले आहे. (सोबत पत्राची छायांकित सोबत जोडण्यात आली आहे.)

**(१२) परिच्छेद क्रमांक ३.८१२ (६६) (सन २०११-१२)**

परिच्छेद क्रमांक १ (३.१०३७) मध्ये नमूद केलेल्या मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम (३), ६ (१) व ७ प्रमाणेच स्थानिक निधी लेखा यांनी घेतलेल्या आक्षेपाबाबतची माहिती खालीलप्रमाणे दर्शविली आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६६ | परभणी | समाज कल्याण | ११ | ६,१६,८६५ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती गंगाखेड २०११-१२ दलित वस्ती सुधार योजना एकूण प्रमाणके ०५ (रक्कम रु. ६,१६,८६५) लेखापरिक्षणास न दर्शविणेबाबत.

आक्षेपात नमुद केले नुसार दलित वस्ती सुधार योजनेची ग्राम पंचायत घटांग्रा ०२ प्रमाणके, दामपुरी ०१ प्रमाणक, सांगळेवाडी ०१ प्रमाणक, उंबरवाडी ०१ प्रमाणक या गावातील कामांची अभिलेखे/मोजमाप पुस्तिका, संचिका लेखापरिक्षणास उपलब्ध न करणे बाबत आक्षेप नोंदविला आहे. तथापि, सदर आक्षेपाच्या अनुषंगाने अभिलेख्यांची लेखापरिक्षकांनी तपासणी केलेली आहे. (अभिलेखे अवलोकनार्थ सादर.)

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ८ नोव्हेंबर २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने असे निदेश दिले की, सन २००८-०९ या वर्षाच्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.१०३७ (६९) ते ३.१०३७ (७४) आणि सन २०११-१२ या वर्षाच्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.८१२ (६१) ते ३.८१२ (६६) हे सर्व परिच्छेद लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न करण्यासंदर्भातील आहेत. त्यामुळे या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अहवाल सादर करावा व यासंदर्भात मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये १०० रुपये तसेच सुधारित अधिनियमानुसार २५ हजार रुपये दंड आकारावयाचा असून सेवापुस्तिकेत नोंदही घ्यावयाची आहे. तसेच, वेतनवाढ रोखण्यासंदर्भात देखील तरतूद आहे. ही सर्व कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या स्तरावर करावी व समितीला एक महिन्याच्या आत अहवाल सादर करावा. त्यानंतर विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

लेखापरिक्षणास अभिलेखे सादर न केल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सबंधितांना २५,००० रुपये दंड आकारुन त्यांच्या सेवापुस्तिकेत नोंद घेण्याप्रकरणी समितीने निर्देश दिल्यानुसार संबंधिताविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

प्रस्तुत परिच्छेदाअंतर्गत मुद्रांक शुल्क अनुदान याद्या, ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन, जमिन महसुल अनुदान याद्या, सरपंच व ग्रामसेवक बैठक खर्च, कार्यशाळा या प्रमाणकांचा समावेश आहे. हे दस्तऐवज लेखापरिक्षणास न दर्शविणेबाबत मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम १९३० चे सुधारणा अधिनियम २०११ चे कलम ८ नुसार रुपये २५,००० दंड, श्रीमती व्ही.पी.साळवे, कनिष्ठ सहायक यांचेकडून वसूल करुन त्यांच्या मुळ सेवापुस्तिकेत नोंद घेण्यात आली आहे. सदर प्रमाणकांचा विनियोग झाल्याचे निदर्शनास आले. आज रोजी संबंधित दस्तऐवज उपलब्ध असुन त्याचे लेखापरिक्षण करुन घेणे बाबत सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखापरिक्षा परभणी यांना विनंती करण्यात आली आहे.

सन २०११-१२ स्थानिक निधी लेखा परिक्षण कालावधीत लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आले होते.

तथापि, संबंधित लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा यांना १०० टक्के अभिलेखे उपलब्ध करुन दिले होते. अभिलेख्यांपैकी काही अभिलेख्याची तपासणी केली आहे व काही अभिलेख्याची तपासणी केली नाही. तपासणी करणे बाबत परत विनंती करण्यांत आली होती. लेखा परीक्षणास अभिलेखे दर्शविण्यास उपलब्ध आहेत.

सन २०११-१२ स्थानिक निधी लेखा परिक्षण कालावधीत लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आले होते.

तथापि संबंधित लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा यांना १०० टक्के अभिलेखे उपलब्ध करुन दिले होते. अभिलेख्यांपैकी काही अभिलेख्याची तपासणी केली आहे व काही अभिलेख्याची तपासणी केली नाही. तपासणी करणे बाबत परत विनंती करण्यांत आली होती. लेखा परीक्षणास अभिलेखे दर्शविण्यास उपलब्ध आहेत.

स्थानिक निधी लेखा आक्षेपामध्ये सुचविल्यानुसार शासन निर्णय १६ मार्च, २०११ प्रमाणे सबंधिताविरूध्द चौकशी करून त्यांना निलंबित करण्यात आले आहे.

१) विभागीय चौकशीअंती प्रा.आ.केद्र पिंगळी येथील कनिष्ठ सहाय्यकास सक्तीने सेवानिवृत्त करण्याची शास्ती केली आहे.

२) आता प्रा.आ.केंद्र पिंगळी येथील अभिलेखे तपासणी साठी उपलब्ध आहेत व सदर अभिलखे तपासणी करून देण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र २२१ दि. १८ जुलै २०१७ अन्वये सहाय्य्क संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा परभणी यांना कळविले आहे.

३) विभागीय चौकशीअंती प्रा.आ.केंद्र जांब येथील कनिष्ठ सहाय्यकास निलंबित करण्यात येऊन पदाच्या मुळ वेतनश्रेणीतील मुळ टप्पावर आणणे ही शास्ती दिली आहे.

प्रा.आ.केंद्र ताडकळस यांनी लेखा आक्षेपामध्ये न दर्शविलेले सर्व अभिलेखे दिनांक ०३ डिसेंबर, २०१३ रोजी स्थानिक निधी लेखा परिक्षणास दर्शविले आहेत. त्यानुसार सहाय्यक संचालक स्था.नि.ले. परभणी यांनी त्यांचे पत्र जाक्र. स्था-४/ब/लेपअ/ १३१०/२०१३, दिनांक ०३ डिसेंबर २०१३ अन्वये अभिलेखे दर्शविल्याबाबत पत्र दिलेले आहे.

पंचायत समिती गंगाखेड २०११-१२ दलित वस्ती सुधार योजना एकूण प्रमाणके ०५ (रक्कम रुपये ६,१६,८६५) लेखापरिक्षणास न दर्शविणे बाबत.

आक्षेपात नमुद केले नुसार दलित वस्ती सुधार योजनेची ग्राम पंचायत घटांग्रा ०२ प्रमाणके, दामपुरी ०१ प्रमाणक, सांगळेवाडी ०१ प्रमाणक, उंबरवाडी ०१ प्रमाणक या गावातील कामांची अभिलेखे/मोजमाप पुस्तिका, संचिका लेखापरिक्षणास उपलब्ध न करणे बाबत आक्षेप नोंदविला आहे. तथापि सदर आक्षेपाच्या अनुषंगाने अभिलेख्यांची लेखापरिक्षकांनी तपासणी केलेली आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-७) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ८ जानेवारी २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखापरीक्षणास कागदपत्रे नंतर दाखविण्यात आली काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर दिले. यावर समितीने विचारणा केली की, ३/७ प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यामध्ये एकूण ६ कर्मचारी होते. पंचायत समिती, परभणी येथील कर्मचाऱ्यांनी ग्रामपंचायतीचे नोंदवह्या किंवा अभिलेखे दाखविले नव्हते. त्यामुळे एका कर्मचाऱ्यावर २५ हजार रूपयांचा दंड आकारण्यात आलेला आहे व त्याची सेवा पुस्तकात नोंद घेण्यात आलेली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समवेत झालेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २००८-०९ तसेच सन २०११-१२ च्या स्थानिक निधी लेखा परिक्षणाच्या वेळी लेखा परिक्षकांस ते तपासणी करीत असताना त्यांनी मागितलेली कागदपत्रे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी दाखविली नाहीत. सन २००८-०९ तसेच सन २०११-१२ या वर्षाचे एकूण १२ परिच्छेदांच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार सन २००८-०९ मधील प्रकरणांसंदर्भात कारवाई करण्यात यावी तसेच सन २०११-१२ मधील प्रकरणांसंदर्भात वित्त विभागाने या अधिनियमात केलेल्या सुधारणेनुसार महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रुपये २५००० इतकी दंडाची शास्ती तसेच एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करुन तशी नोंद संबंधितांचे सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्याची शिफारस करुन देखील काही अधिकारी या नियमास न जुमानता लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन देत नाहीत.

समिती राज्यात अनेक ठिकाणी भेट देत असताना लेखा परिक्षकांना अभिलेखे संबंधित अधिकाऱ्यांकडून वेळीच उपलब्ध करुन दिली जात नाही. त्यामुळे लेखापरिक्षण करता येत नाही. या बाबींचा फायदा संबंधितांकडून घेतला जातो हे टाळण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या दंडात्मक तरतुदीत बदल करणे आवश्यक आहे. सदर बाब विचारात घेता आता समिती अशी शिफारस करीत आहे की, "**जी कोणतीही व्यक्ती कलम ६ पोटकलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) अन्वये कायदेशीररित्या तिला केलेल्या कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात जाणूनबुजून दुर्लक्ष करेल किंवा तिचे अनुपालन करण्याचे नाकारेल ती विभागीय आयुक्तांपुढे सदर बाब सिध्द झाल्यानंतर लेखापरिक्षणास उपलब्ध न झालेले दस्तऐवज/अभिलेख यामध्ये गुंतलेल्या एकूण रक्कमेच्या ५% किंवा रुपये ५०,००० यापैकी जास्त असणाऱ्या रक्कमे इतक्या दंडात्मक रक्कमेस पात्र ठरविण्यात यावी. तसेच त्यांची एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करुन तशी नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्यात**

**यावी**" अशी सुधारणा संबंधित अधिनियमात करण्यात यावी व करण्यात आलेल्या रक्कमेबाबतची माहिती समितीला कळविण्यात यावी.

ज्या प्रकरणामध्ये अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत, त्या प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई केलेली दंड आकारणी करण्यात यावी. समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी केलेल्या अनुपालन अहवालामध्ये सदर अभिलेखे उपलब्ध असल्याचे स्पष्टीकरण केले आहे. मात्र सदर अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. **परभणी जिल्हा परिषदेमध्ये सन २००८-०९ तसेच सन २०११-१२ या वर्षामध्ये एकूण १२ परिच्छेदांसंदर्भात अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अभिलेखे लेखापरिक्षणाच्यावेळी सादर करण्यात आलेले नाहीत अशा सन २००८-०९ मधील परिच्छेदासंदर्भात तत्कालिन नियमानुसार व सन २०११-१२ मधील परिच्छेदासंदर्भात कलम ६ मधील पोटकलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) नुसार कायदेशीर कारवाई करुन वसुल केलेली रक्कम व गुंतलेली एकूण रक्कम याबाबतचा सविस्तर अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

# प्रकरण चौदा

## जिल्हा परिषद, परभणी

## सर्वसाधारण शिफारशी

### १. गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्याबाबत :-

समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता विशेषत: परभणी जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या मोठ मोठ्या रकमा वसुलीविना प्रलंबित आहेत. अशी अनेक प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असता समितीने या प्रकरणात सदरच्या रक्कमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेशित केले आहे. सदर गैरव्यवहाराची/अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जुनी आहेत. जिल्हा परिषदांनी वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हा परिषदांनी सदरच्या रकमा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करुन वसुल केल्या असत्या तर या रकमा केंव्हाच शासन खाती जमा झाल्या असत्या. शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेव्हा हडपला जातो तेव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा विपरीत परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हा परिषदा अशा कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असून त्यांचेवरील संभाव्य कार्यवाहीस पुढे ढकलण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यामुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करीत आहे की, जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोपपत्र दाखल करुन असे प्रकरण सहा महिन्यात निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी त्याचप्रमाणे अशी कार्यवाही मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या संबंधित विभाग प्रमुखांवर सोपविण्यात यावी व असे विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रकमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर त्या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यवधी रुपयांचा निधी तरतुदी करुन मिळविला जातो व असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासन खाती जमादेखील केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिकाऱ्यांकडून रकमा वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यवधी रुपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणाऱ्या अत्यंत महत्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिकाऱ्यांद्वारा होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुसऱ्या महत्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करुन राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत नैराश्य व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार**

**करता अखर्चित रकमांवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने याबाबत कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे अशीही समितीची शिफारस आहे.**

**गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करुन परभणी जिल्हा परिषदेमधील रक्कमा शासन खाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रकमेची शासन खाती वसुली केली याबाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**२. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे :-**

समितीने परभणी जिल्हा परिषदेला भेट दिली असता अनेक लेखा परिच्छेदांमध्ये लेखा परिक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखा परिक्षकांस व्यक्त करता आला नाही. याबाबत समितीने असे लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकरणात लेखा परीक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हती आता उपलब्ध आहेत असे समितीला सांगण्यात आले. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या. **मुळात कागदपत्रे उपलब्ध असतानाही ते लेखा परिक्षणास न दाखविणे ही गंभीर बाब आहे. तो सरळसरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे. लेखा परिक्षक सुरुवातीला कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यासाठी चार महिन्यांचा वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असूनदेखील संबंधित अधिकारी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन देत नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करुन देणाऱ्या अधिकाऱ्यास केवळ १०० रुपयांचा दंड आकारण्यात येत असे. कदाचित त्यामुळे लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे २५,००० रुपये (पंचवीस हजार रुपये) दंडाच्या रकमेची तरतूद केली आहे. समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखा परीक्षणाचे वेळी लेखा परिक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत अशा जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांना अधिनियमातील तदतुदीनुसार रु.२५,०००/- इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार परभणी जिल्हा परिषदेमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली याची संपूर्ण माहिती प्रकरणनिहाय समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**३. नियमानुसार व नैसर्गिक न्यायाच्या तत्वाला अनुसरुन दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :-**

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी पंचायती राज समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरुन समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्याची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोषींविरुध्द जाणिवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केलेली नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याचे धोरण दिल्याने कारवाई करतानादेखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते.

कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे नैसर्गिक न्यायाच्या तत्वाला अनुसरुन नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करुन नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीचे स्पष्ट मत आहे. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निष्पक्षपणे चौकशी करुन चौकशी अहवालामध्ये दोषीविरुध्द कार्यवाही करुन त्यास शिक्षा करणे योग्य आहे. **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही केल्यास त्यात समितीच्या सूचनेनुसार कार्यवाही केली असे म्हणणे ही बाब समाजाची लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणवता व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणिवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी व आकसापोटी निर्दोष व्यक्तींवर कार्यवाही करुन समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधित व्यक्तींना नैसर्गिक न्याय तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच नि:पक्षपातीपणे कार्यवाही करुन दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती या तत्वानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

# परिशिष्ट (अ)

## शासनाचे आदेश व परिपत्रके

**(परिशिष्ट क्र. १.१)**

**जिल्हा परिषदांमधील कामे किंवा विकास योजना यांच्या संबंधित प्रशासकीय मान्यता तसेच तांत्रिक मान्यता तसेच निविदा किंवा कंत्राट स्विकारण्याच्या अधिकारात वाढ करण्याबाबत**

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्रमांक झेडपीए २००८/प्र.क्र ४४४/वित्त-९
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दि. १५ जुलै, २००८

**वाचा :-** १) ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. झेडपीए २०००/प्र.क्र ४०२३/३३ दि. १२ जानेवारी, २००१

२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. झेडपीए १०९९/प्र.क्र २०८९ भाग-२/३३ दिनांक १२ जानेवारी, २००१

३) ग्रामविकास व जलसंधारण विभाग अधिसूचना क्र. झेडपीए २००१/प्र.क्र ४०२३/वित्त-९ दि. १९ मार्च, २००४

४) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. झेडपीए २००८/प्र.क्र ४४४/वित्त-९ दि. २५ जून, २००८

**शासन निर्णय :-**

जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या विविध योजनांमुळे जिल्हा परिषदांकडील कामाची व्याप्ती ब-याच प्रमाणात वाढलेली आहे. यामुळे जिल्हा परिषदेकडील कामाच्या स्वरुपात वाढ झालेली आहे. त्या अनुषंगाने कालावधीत व किंमतीत वाढ झालेली आहे. तसेच या कालावधीत बांधकामासाठी वापरावयाच्या सिमेंट व स्टीलच्या दरात झालेल्या असाधारण (Abnormal) भाववाढ झाल्यामुळे शासकीय बांधकामांच्या प्रगतीवर विपरित परिणाम होत आहे. यामुळे शासकीय निधी अखर्चित राहणे, शासनाच्या विविध योजना वा कामे अपुर्णावस्थेत राहणे. इत्यादी कारणांमुळे विविध स्तरावरून या विभागाच्या दिनांक १२ जानेवारी, २००१ च्या दोन्ही शासन निर्णयात सुधारणा करण्याबाबत मागणी होत आहे. यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ४ खालील परिशिष्ट दोन मध्ये शासन अधिसूचना ग्रामविकास व जलसंधारण विभाग अधिसूचना क्र. झेडपीए २००१/प्र.क्र ४०२३/वित्त-९, दि. १९ मार्च, २००४ अन्वये करण्यात आलेल्या सुधारणेत **दि. २५ जून, २००८ च्या शासन निर्णयान्वये बदल करण्यात आलेले होते. परंतु सदर शासन निर्णय रद्द करण्यात येत असून** खालील प्रमाणे फक्त **अनावर्तीत खर्चाच्या अधिकाराच्या मर्यादेत सुधारणा** करण्यात येत असून त्यानुसार सुधारीत शासन आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता १९६८ (नियम ४ खालील)परिशिष्ट - दोन**

**जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या अधिकारांची विभागणी करणे**

| अ. क्र.१ | अधिकाराचे स्वरूप | ज्या प्राधिका-या कडे अधिकार सोपविण्यात आले आहे तो प्राधिकारी /प्राधिकरण | **अंदाजित अनावर्ती खर्च** | |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ |
| | | **जिल्हा परिषद** | **न्यूनतम मर्यादा** | **अधिकतम मर्यादा** |
| भाग -१ | कामे किंवा विकास योजना यांच्या संबंधातील प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार | १.उप अभियंता<br>२.कार्यकारी अभियंता<br>३.मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | --<br>१,००,०००<br>५,००,००० | १,००,०००*<br>५,००,००० *<br>२०,००,००० * |
| | | ४.अध्यक्ष, स्थायी समितीचा | २०,००,००० | २५,००,००० * |
| | | ५.विषय समितीचा सभापती | २०,००,००० | २३,००,००० * |
| | | ६.विषय समिती | २३,००,००० | ३०,००,००० |
| | | ७.स्थायी समिती | २५,००,००० | ५०,००,००० |
| | | ८.जिल्हा परिषद | संपूर्ण अधिकार | संपूर्ण अधिकार |
| | | **पंचायत समिती** | | |
| | | १.गट विकास अधिकारी | -- | ५,००,००० * |
| | | २.पंचायत समितीचा सभापती | ५,००,००० | १०,००,००० * |
| | | ३.पंचायत समिती | संपूर्ण अधिकार | संपूर्ण अधिकार |
| भाग -२ | कामे किंवा विकास योजनांच्या निविदा किंवा कंत्राट स्विकारण्याचा अधिकार | १.उप अभियंता<br>२.कार्यकारी अभियंता<br>३.मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | <br>१,००,०००<br>५,००,००० | १,००,०००*<br>५,००,०००*<br>२०,००,०००* |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ४. अध्यक्ष, स्थायी समितीचा | २०,००,००० | २५,००,०००* |
| | | ५. अध्यक्ष,विषय समितीचा | २०,००,००० | २३,००,०००* |
| | | ६.विषय समिती | २३,००,००० | ३०,००,०००* |
| | | ७.स्थायी समिती | २५,००,००० | ५०,००,०००* |
| | | ८.जिल्हा परिषद | संपूर्ण अधिकार | संपूर्ण अधिकार |
| | | **पंचायत समिती** | | |
| | | १.गट विकास अधिकारी | | ५,००,००० |
| | | २.पंचायत समितीचा सभापती | ५,००,००० | १०,००,००० |
| | | ३.पंचायत समिती | संपूर्ण अधिकार | संपूर्ण अधिकार |
| भाग -३ | कामे किंवा विकास योजना यांच्या संबंधातील तांत्रिक मान्यता देण्याचा अधिकार | १.उप अभियंता (मूळ बांधकाम) व दुरुस्त्या | | १,००,००० मूळ बांधकाम/ व दुरुस्त्या |
| | | २.कार्यकारी अभियंता-<br>१)मूळ बांधकामे<br>२) दुरुस्त्या<br>३)विद्युत कामे | | २५,००,००० पर्यंत मूळ कामे अर्थसंकल्पिय तरतूदींच्या अधीन राहून पूर्ण अधिकार<br>५०,००० |
| | | ३.मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | | ५०,००,००० पर्यंत |
| | | ४. जि.प मधील विविध खातेप्रमुख | | ५,००,००० पर्यंत |
| | | ५. गटविकास अधिकारी | | ३,००,००० पर्यंत |

* टिप:- १) या स्तरावर दिलेल्या मान्यतेची माहिती पुढील विषय समितीस/स्थायी समितीस पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य राहील.

२) प्रत्येक तिमाही बैठकीत जिल्हा परिषद विभागांनी तिमाहित केलेल्या कार्यवाहीचा आढावा दर्शविणारा अहवाल समितीच्या बैठकीत सादर करावा. अनुदानांची, बांधकामे व योजना यांच्याशी सुसंगती यांची माहिती अहवालात प्रामुख्याने द्यावी.

या अनुषंगाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील परिशिष्ट २ मध्ये यथायोग्य वेळी बदल करण्यांत येईल.

हा शासन निर्णय संगणक संकेतांक क्र. २००८०७१५१२४४५४००१ अन्वये www. maharashtra.gov.in अन्वये शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(ना.रा. भागवत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
सर्व विभागीय आयुक्त ( विकास शाखा )
मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा कोकण भवन, नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा नवी मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,नागपूर,अमरावती
सर्व जिल्हा लेखा परिक्षक अधिकारी स्थानिक निधी लेखा
महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) / ( लेखा व परिक्षा ) महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) / ( लेखा व परिक्षा ) महाराष्ट्र-२, नागपूर.
या विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, कार्यासन क्रमांक वित्त-९

**(परिशिष्ट क्र. ४.१)**

GR 20040726164070001-0500
प्राथ

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत २००२-०३ या शैक्षणिक वर्षापासून इ. १ ते ५ वीच्या विद्यार्थ्यांना शिजविलेले अन्न देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय, क्र. शापोआ १००२/१२७५/०२/प्राशि-४.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२.
दिनांक : १६ मे २००२.

संदर्भ : १) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. पूप्राशा १०९५/२१३४/प्राशि-२, दि. २२ नोव्हेंबर १९९५.

पार्श्वभूमी :-

राज्यामध्ये सन १९९५-९६ पासून इयत्ता १ ली ते ५ वीतील विद्यार्थ्यांना त्यांची मासिक उपस्थिती किमान ८० टक्के असल्यास, दरमहा ३ किलो तांदूळ देण्याची केंद्र शासन पुरस्कृत शालेय पोषण आहार योजना कार्यान्वित आहे. ही योजना अनुदानित, अशंत: अनुदानित शाळा,वस्तीशाळा, महात्मा फुले शिक्षण हमी योजनेअंतर्गत शैक्षणिक केंद्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व शाळा, अनुदानित अपंग शाळा, यामध्ये कार्यान्वित केली जाते.

२. देशामध्ये भूकबळी होत असल्या संदर्भात पिपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज् या संस्थेने सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका क्रमांक १९६/२००१ दाखल केली होती. या याचिकेमध्ये असलेल्या विविध मुद्यांमध्ये शालेय पोषण आहार योजनेचा समावेश केलेला होता. या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत इ. १ ली ते ५ वीच्या विद्यार्थ्यांना वर्षातून किमान २०० दिवस, ३०० कॅलरीज् आणि ८ ते १२ ग्रॅम प्रोटीनयुक्त दुपारचे भोजन द्यावयाचे आहे.

शासन निर्णय:-

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने इयत्ता १ ली ते ५ वीच्या विद्यार्थ्यांना दररोज ३०० कॅलरीज्, ८ ते १२ ग्रॅम प्रोटीनयुक्त शिजविलेले अन्न द्यावयाचे आहे. यादृष्टीने विद्यार्थ्यांना शिजविलेले अन्न, वरण-भात, खिचडी, भातभाजी , दहीभात, दूधभात, पेज इत्यादी स्वरुपात उपलब्ध करुन द्यावयाचे आहे. या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून राज्य शासनास प्रत्येक विद्यार्थ्यामागे ३ किलो तांदूळ आणि तांदूळाच्या वाहतुकीसाठी रुपये ५०/- प्रतिक्विंटल या दराने प्रतिपूर्ती देण्याची तरतुद आहे.

एश - ३३९(१०००-५-०२)-१

-2-

[illegible] [illegible]च्या शाळेच्या कार्यकक्षेत नियंत्रण ठेवण्यासाठी प्रथम [illegible]

शिक्षण समित्यांना [illegible] निर्णय घेण्यात आला आहे. संबंधित गावातील सरपंच हे या समितीचे

[illegible] शिजवलेले अन्न देण्याच्या योजनेची

[illegible] महानगरपालिकेच्या/

नगरपालिकेच्या [illegible] महानगरपालिका शिक्षण

समित्या [illegible] शासनाकडे

राहील [illegible]

२. [illegible]

[illegible] योजनेअंतर्गत [illegible] देण्यासाठी [illegible]

[illegible]

१) [illegible]

[illegible] ठेकेदार

[illegible]

२) या योजनेमध्ये [illegible] यंत्रणेस

[illegible]

[illegible] घेण्यात

[illegible]

[illegible] आस्थापना [illegible] संबंधित शाळेच्या नावे [illegible]

शाळेपासून [illegible] जोडण्यात येईल.

३) [illegible] स्थानिक/

[illegible] पोषण

आहारासाठी [illegible]

[illegible]

[illegible]

-३-

४) [illegible] करण्याची व्यवस्था अन्न-नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत करण्यात येईल.

५) शाळेसाठी असलेल्या [illegible] पर्यंतच्या [illegible] व प्राधिकृत केलेल्या मर्यादेपर्यंत (किलोग्रॅम) [illegible]

६) [illegible] देण्यात येणार आहे. [illegible] आवश्यक अन्न पदार्थ ( [illegible] पालेभाजी [illegible] ) [illegible] लोकांच्या सहभागाने, [illegible] उपलब्ध करून देतील. [illegible] लोकप्रतिनिधी, शिक्षक, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था [illegible] अधिकारी/ कर्मचारी [illegible] अपेक्षित आहे. [illegible]

७) प्रस्तुत योजनेअंतर्गत [illegible] आवश्यक आहे.

८) उपरोक्त [illegible] शिक्षणमंडळ/ शिक्षण समिती [illegible] समिती यांचे [illegible] समितीचे [illegible] अनुसूचित [illegible] संयुक्त [illegible]

९) अंमलबजावणी यंत्रणा [illegible] निश्चित करेल.(वरण-भात/ [illegible] भाजी-भाकरी [illegible] ) [illegible] पदार्थ आवश्यक त्या [illegible]

१०) सदर योजनेकरिता जिल्हास्तरावर ( [illegible] ) [illegible] "नियंत्रक अधिकारी" म्हणून काम पाहतील व राज्यस्तरावर शिक्षण संचालक (प्राथमिक शिक्षण), नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतील. [illegible] संबंधित शिक्षणाधिकारी [illegible] अधिकारी (शिक्षणमंडळ) [illegible] काम पाहतील. [illegible]

११) प्रस्तुत योजनेमध्ये [illegible] आवश्यक आहे. [illegible] केंद्रशासनाकडून [illegible] जिल्हाधिकाऱ्यांना/तालुक्यांना व [illegible] कळविणे, त्यात आवश्यक ते बदल करून घेणे, [illegible]

एन्य-३३९ (१० [illegible] -५-०१)-२

मिळविणे ही सर्व कार्यवाही शिक्षण संचालक (प्राथमिक)यांनी जिल्हास्तरावरील नियंत्रक अधिका-यांच्या मदतीने पार पाडावी.

१२) आस्थापना शिधापत्रिका देण्यासाठी सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषदा, प्रशासन अधिकारी/शिक्षणाधिकारी,महानगरपालिका/नगरपालिका/कटकमंडळे यांनी त्यांच्या कार्यक्षेत्राखालील सर्व पात्र शाळांची यादी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने विहित केलेल्या पुढील प्रपत्रात एका आठवडयात तहसिलदार/अन्नधान्य नियंत्रण अधिकारी/ शिधावाटप अधिकारी, मुंबई यांना द्यावी व त्याची प्रत जिल्हा पुरवठा अधिकारी/ नियंत्रक शिधावाटप यांना द्यावी.

| तालूका/ वॉर्ड-------- | | | जिल्हा-------- | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | शाळेचे नाव | गाव/वॉर्ड | योजनेस पात्र विद्यार्थीसंख्या | मासिक अनुज्ञेय तांदूळ (किलोमध्ये) | ज्यांना तांदूळ द्यावयाचा त्या अंमलबजावणी यंत्रणेचे नाव |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| | | | | | गट/वॉर्ड/पालिका शिक्षण अधिका-यांची सही |

१३) या योजनेअंतर्गत दरमहा रास्त भाव दुकानदारांकडून किती तांदूर आणला व किती वापरला याचा हिशोब अंमलबजावणी यंत्रणेने ठेवावा. शाळेच्या मुख्याध्यापकाने पुढील महिन्याच्या एक तारखेस हा हिशोब गटशिक्षणाधिका-यास सादर करावा.

४. संनियंत्रण समित्या :-

या योजनेची अंमलबजावणी सुयोग्य पध्दतीने होण्यासाठी पुढीलप्रमाणे संनियंत्रण समित्या राहतील :-

राज्यस्तरीय संनियंत्रण व मार्गदर्शन समिती

| | |
|---|---|
| १) प्रधान सचिव/सचिव, शालेय शिक्षण | अध्यक्ष |
| २) प्रधान सचिव/सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | सदस्य |
| ३) प्रधान सचिव/सचिव, महिला व बालविकास विभाग | सदस्य |
| ४) प्रधान सचिव/सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग | सदस्य |
| ५) सहसचिव/उप सचिव (प्राथमिक) शालेय शिक्षण | सदस्य-सचिव |

-५-

<u>जिल्हास्तरीय/महानगरपालिका/नगरपालिका स्तरावरील संनियंत्रण व मार्गदर्शन समिती -</u>

<u>जिल्हास्तरीय समिती</u>

जिल्हास्तरावर जिल्हा शिक्षण सल्लागार समिती व गट पातळीवर गट शिक्षण सल्लागार समिती, या योजनेचे संनियंत्रण व मार्गदर्शन समिती म्हणून काम पाहील.

<u>महानगरपालिका/नगरपालिका स्तरावरील समिती.</u>

| | |
|---|---|
| अध्यक्ष, शिक्षणमंडळ/शिक्षण समिती | अध्यक्ष |
| शिक्षण समितीमधील दोन सदस्य | सदस्य |
| दोन नगरसेवक | सदस्य. |
| शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारीशिक्षण मंडळ/शिक्षण समिती | सदस्य सचिव |

शिक्षण समितीमधील दोन सदस्य व नगरसेवक यांची नियुक्ती अध्यक्ष करतील.

५. वित्तीय भार :-

या योजनेअंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्यामागे दरमहा ३ किलो तांदूळ केंद्रशासनाकडून उपलब्ध होणार आहे. भाताबरोबरील इतर पदार्थ देणग्या व निधी इत्यादिद्वारे उपलब्ध करुन घ्यावयाचे आहेत. मात्र आदिवासी भागाकरिता संबंधित अंमलबजावणी समितीस रु.०.२५ प्रतिदिन प्रतिउपस्थित विद्यार्थी एवढे अनुदान शासनामार्फत देण्यात येईल. बिगरआदिवासी क्षेत्रासाठी कोणतेही शासकीय अनुदान देय असणार नाही. परंतु सर्वतोपरी प्रयत्न करुनही ज्या अंमलबजावणी यंत्रणांना स्थानिक सहभागातून शिजविलेले अन्न देणे शक्य होणार नाही, त्यांनी पूर्वीप्रमाणे ८० टक्के उपस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांना महिनाअखेर ३ किलो तांदूळ अंमलबजावणी यंत्रणेमार्फत देण्याची व्यवस्था करावी.

